महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ३१

संशोधनमुक्तावलि

[सर सातवा]

प्रस्तुत 'सरा'त संस्कृत वाङ्मयातील तीन महत्त्वाचे ग्रंथ, महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर प्रकाशझोत टाकणारे काही ताम्रपट व नाणी, आणि महाराष्ट्रातील काही विख्यात स्थापत्यकृति यांवर वीस संशोधनपर लेख संगृहीत केले आहेत.

"सर्वच लेख अतिशय वाचनीय असून नवोदित संशोधकांना मार्गदर्शन करणारे आहेत."

प्राचार्य गो. मा. कुलकर्णी

लेखक

किंमत दहा रुपये

वा. वि. मिराशी

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ द्वारा पुरस्कृत

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ३१

संशोधनमुक्तावलि

[सर सातवा]

लेखक

महामहोपाध्याय पद्मभूषण **डॉ. वासुदेव विष्णु मिराशी,**
एम्. ए., डी. लिट्.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि विदर्भ महाविद्यालय,
अमरावती; संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति
या विभागांचे माजी प्रमुख, नागपूर विद्यापीठ;
भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे सन्मान्य सल्लागार;
भारतीय साहित्य अकादमीचे, न्यूमिस्मॅटिक सोसायटीचे व
एपिग्राफिकल सोसायटीचे फेलो इ.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति] **किंमत दहा रुपये** [१९७६

प्रकाशक :

डॉ. मु. बा. देवपुजारी
विदर्भ संशोधन मंडळ,
पश्चिम हायकोर्ट मार्ग,
नागपूर–४४० ००१

मुद्रक :

म. पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर–४४० ००१

महाराष्ट्रातील आद्य संशोधक

डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

यांच्या पवित्र स्मृतीस

सादर समर्पण

अनुक्रमणिका

संशोधनपर लेख : पृष्ठ १ ते २३५

खंड पहिला–संस्कृत वाङ्मय

खंड दुसरा–प्राचीन भारतीय इतिहास

खंड तिसरा–प्राचीन भारतीय नाणी

खंड चौथा–संकीर्ण विषय

चित्रांची अनुक्रमणिका

पुरस्कार

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी यांच्या संशोधनपर लेखांचा आणखी एक संग्रह 'संशोधनमुक्तावलि : सर ७' सुविद्य वाचकांना सादर केला जात आहे. १९७२ मध्ये 'संशोधनमुक्तावली'चा सहावा सर प्रकाशित झाला होता. त्यानंतरच्या तीन वर्षांच्या काळात डॉ. मिराशी यांनी लिहिलेल्या लेखांचा समावेश या संग्रहात करण्यात आला आहे. चार भागांमध्ये मिळून एकूण वीस लेख या संग्रहात आहेत. पहिले तीन खंड विषयानुसार लेखांचे असून चौथ्या खंडात विविध विषयांवरील लेख आहेत. सर्वच लेख अतिशय वाचनीय असून नवोदित संशोधकांना मार्गदर्शन करणारे आहेत. संशोधनपर लेख बोजड व नीरस असतात असे कुणाला वाटत असेल तर त्यांनी महामहोपाध्यायांचे हे लेख वाचावेत म्हणजे त्यांचा गैरसमज दूर होईल. डॉ. मिराशी यांची शैली इतकी चटकदार आहे की सहज चाळायला म्हणून घेतलेला लेख पूर्ण वाचल्याशिवाय राहवत नाही.

ह्या संग्रहातील दुसऱ्या खंडातील 'मल्हारा येथील आदित्य-राजाचा ताम्रपट' ह्या लेखाकडे मी वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो. ह्या लेखात एका ताम्रपटाच्या आधारे विदर्भातील एका राजवंशाची माहिती प्रथमच देण्यात आली आहे. लेखाच्या शेवटी त्या ताम्रपटाच्या पाचही पत्र्यांवरील लेख देण्यात आले आहेत. त्यामुळे संशोधकांची चांगली सोय झाली आहे. ह्या क्षेत्रात नव्यानेच पदार्पण करणारांना ताम्रपटाचे वाचन कसे करण्यात येते याची कल्पना येईल. हा लेख मुळातूनच वाचून पाहावा.

चौथ्या खंडात आठ लेख संगृहीत करण्यात आले आहेत. त्यापैकी 'अय्यणवंशचरित–एक बनावट संस्कृत काव्य' व 'अय्यणवंश-चरितातील घासलेट–तेलाचा काल्पनिक इतिहास' या दोन लेखांकडे वाचकांनी लक्ष द्यावे. ह्यांपैकी पहिल्या लेखात 'अय्यणवंशचरित' हे कसे बनावट काव्य आहे व ते कोणा एका सरदाराने आपण चालुक्य-वंशीय आहोत हे दाखविण्याकरिता कसे रचून घेतले हे साधार

दाखविण्यात आले आहे. त्याप्रमाणेच दुसऱ्या लेखात त्याच काव्याच्या आधारे घासलेट तेलाचा काल्पनिक इतिहास कसा देण्यात आला आहे, हे दाखवून दिले आहे. संशोधन क्षेत्रातही भ्रष्टाचार कसा माजला आहे हे दाखवून देण्यासाठी डॉ. मिराशी यांनी हे परिश्रम केले आहेत.

महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांचा व्यासंग व संशोधनकार्य विद्वानांना सुपरिचित आहे. भारतातच नव्हे तर युरोप व अमेरिकेमध्ये त्यांचे लेख मोठ्या आस्थेने वाचले जातात व मान्यता पावतात. संशोधनाच्या क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीला आणण्याचा त्यांच्याइतका अधिकार कोणालाच नाही. त्यांनी हे अप्रिय कार्य अंगावर घेतले हे त्यांच्या तर्कशुद्ध विचारसरणीचे व सत्यप्रियतेचे द्योतक आहे. अभ्यासू संशोधकांवर त्यांचे हे ऋणच आहे. संशोधनाच्या क्षेत्रातील मंडळींना त्या ऋणात राहाणे आवडेल.

आज महामहोपाध्यांचे वय ८२ वर्षांचे आहे. पण त्यांच्या बुद्धीला, विचारशक्तीला व उत्साहाला कोणत्याही प्रकारचा उतार लागलेला नाही. त्यांचे संशोधन व लेखन अखंड चालू असते. या 'सातव्या सरा'-नंतर मुक्तावलीच्या सरांमध्ये आणखीही सरांची भर पडेल यात शंका नाही.

डॉ. सर भवानीशंकर नियोगी हे संशोधन मंडळाचे आरंभापासून ह्या वर्षापर्यंत अध्यक्ष होते. त्यांनी पूर्वीच्या सहा 'सरां'ना पुरस्कार लिहिला होता. तसा त्यांचा अधिकारही होता. आज पदपरत्वे हे कार्य मी करीत आहे.

प्रस्तुत संग्रहाचे अभ्यासकांकडून स्वागत होईल व तरुण संशोधकांना तो स्फूर्तिदायक ठरेल अशी मला आशा आहे.

गो. मा. कुलकर्णी
अध्यक्ष,
विदर्भ संशोधन मंडळ,
नागपूर

नागपूर,
मकरसंक्रमण १४-१-७६

लेखकाचे हृद्गत

माझ्या संशोधनपर मराठी लेखांचा हा सातवा संग्रह. यात संस्कृत वाङ्मय, प्राचीन भारतीय इतिहास, प्राचीन भारतीय नाणी व संकीर्ण विषय यांवरील एकूण वीस लेखांचा संग्रह चार खंडात केला आहे. हे लेख 'संशोधनमुक्तावली'चा सहावा सर प्रकाशित झाल्यावर गेल्या तीन वर्षांतील आहेत.

पहिल्या खंडात धनंजय या जैन कवीच्या 'द्विसंधान अथवा राघव-पाण्डवीय काव्य' आणि 'नाममाला' या दोन ग्रंथांची कालनिर्णयासह विस्तृत माहिती दिली आहे. हा कवि ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाइतका प्राचीन असला तरी त्याच्या ग्रंथांकडे संस्कृताभ्यासकांचेही लक्ष गेले नव्हते. त्यांची 'नाममाला' सर्व उपलब्ध संस्कृत कोशग्रंथांमध्ये प्राचीन आहे. पुढील 'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'वरील लेखांत महाराष्ट्रातील बुद्धिमंतांमध्ये अग्रेसर असलेल्या चित्पावन (कोकणस्थ) ब्राह्मणांच्या मूलस्थानाविषयी सप्रमाण चर्चा केली आहे. त्यामुळे एतद्विषयक सध्या प्रचलित असलेल्या अनेक भाकडकथांचा निरास होईल.

दुसऱ्या खंडात प्राचीन भारतीय इतिहासाविषयी अत्यंत महत्त्वाचे असे चार लेख आहेत. ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास

सातवाहनांचा अस्त झाल्यावर विदर्भात उदयास आलेल्या मुण्ड नामक एका ब्राह्मण राजवंशाविषयी साधार माहिती येथे प्रथमच प्रकाशित होत आहे. त्यामुळे विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पडला आहे. पुढील दोन लेखांत खानदेशातील महाराज भुलुंड आणि पश्चिम महाराष्ट्र व गुजराथ यांवर ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकांत राज्य करणाऱ्या त्रैकूटक विक्रमसेन यांविषयी नवीन माहिती दिली आहे. कोल्हापूर-जवळच्या खिद्रापूर या गावी शिलाहारांनी बांधलेल्या सुंदर शिवालया-विषयी माहिती कोल्हापूरच्याही रहिवाश्यांना फारशी नाही. ते स्थल महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील कुरुक्षेत्रच होय हे सातव्या लेखात दाखविले आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत उघडकीस आलेल्या नाण्यांविषयी पाच लेख तिसऱ्या खंडात संगृहीत केले आहेत. त्यांपैकी वाटेगाव येथे सापडलेला नाणकसंचय दक्षिणच्या सातवाहन राजांच्या इतिहासात क्रांतिकारक ठरावा इतक्या महत्त्वाचा आहे. इतर लेखांत क्षत्रप, विष्णुकुंडी व शिला-हार या राजवंशांविषयी त्यांच्या अलीकडे सापडलेल्या नाण्यांवरून व त्यांच्या कोरीव लेखांतील उल्लेखांवरून मिळालेली ऐतिहासिक महत्त्वाची माहिती दिली आहे.

चौथा खंड संकीर्ण स्वरूपाचा आहे. त्यात प्रथम रावणाच्या लंकेच्या स्थानाविषयी अलीकडे उपस्थित झालेल्या वादाचा सप्रमाण परामर्श घेतला असून नंतर कोल्हापूरचे महालक्ष्मी–देवालय व चंद्रपूर जिल्ह्यातील मार्कंडी येथील देवालये यांच्या कालाची सप्रमाण चर्चा केली आहे.

भारतात अलीकडे सर्व व्यवहारांत भ्रष्टाचाराची साथ फैलावत आहे. संशोधनाचे क्षेत्रही त्यापासून मुक्त नाही. त्याचे नियंत्रण केले नाही तर अनभिज्ञ अभ्यासकांची दिशाभूल झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून अलीकडे प्रसिद्ध झालेल्या एका बनावट ग्रंथाचे व संशोधनातील एका बिनबुडाच्या तर्कटाचे सत्य स्वरूप उघडकीस आणण्याकरिता

शेवटचे चार लेख प्रस्तुत संग्रहात अंतर्भूत केले आहेत. त्यांत सत्यान्वेषणाखेरीज दुसरा कोणताही हेतु नाही. अशा भ्रष्टाचाराचे सत्य स्वरूप उघडकीस आणण्याचे धारिष्ट कोणी करीत नाही. माझ्या कांही मित्रांनाही मी त्यांवर विदारक प्रकाश पाडून स्वत:वर ते भ्रष्टाचार करणाऱ्यांची लाखोली ओढवून घेतो, हे पसंत नाही. पण हे काम अप्रिय असले तरी ते कोणी तरी केलेच पाहिजे. नाही तर संशोधनाचा प्रवाह निर्मल राहणार नाही. या जाणीवेने मी हे लेख लिहिले होते. वृत्तपत्रे व मासिके यांत प्रसिद्ध झालेली चर्चा चिरस्थायी होत नाही. ती अभ्यासू संशोधकांना सदैव उपलब्ध नसते. म्हणून या लेखांचा प्रस्तुत 'सरा'त अंतर्भाव केला आहे. या 'सरा'तील बहुतेक लेख मंडळाच्या वार्षिकात व इतर नियतकालिकांत पूर्वी प्रसिद्ध झाले होते, पण काही नवीन आहेत. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या पुनर्मुद्रणाला अनुमति दिल्याबद्दल मी त्यांच्या संपादकांचा आभारी आहे.

'संशोधनमुक्तावली'चा हा सर पूर्वीच्या सरांप्रमाणे विदर्भ संशोधन मंडळाने प्रकाशनार्थ स्वीकारला, याबद्दल मी त्याचा आभारी आहे. त्याच्या प्रकाशनाकरिता महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने उदार अनुदान दिले, याबद्दल आमचे मंडळ त्या मंडळाचे ऋणी आहे. नारायण मुद्रणालयाचे श्री. मधुसूदन पांडुरंग बनहट्टी यांनी प्रस्तुत सर अल्पावधीत निर्दोष छापून दिला याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

नागपूर, **वा. वि. मिराशी**

मकर संक्रांति

१४-१-१९७६

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६	१९	वेंकटसुब्बया	वेंकटसुब्बय्या
३०	५	पोण्ण	पोन्न
५७	१०	प्राकृतात	संस्कृतात
८३	४	वडील	धाकटा
८३	९	नोळंबा	नोळंब
१२३	१८	बिसिगे	बीसिगे
१२३	२१	बीसिके	बीसिगे
१९९	१५	कलिदासाच्या	कालिदासाच्या

संशोधनमुक्तावलि : सर ७

खंड पहिला–संस्कृत वाङ्मय

१. धनंजय कवीचे द्विसन्धान अथवा राघवपाण्डवीय काव्य*

संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी काव्यांचे ध्वनिकाव्य, गुणीभूत-व्यङ्ग्यकाव्य आणि चित्रकाव्य असे तीन प्रकार मानले आहेत. शब्दांचा सरळ स्वाभाविक अर्थ होतो त्याला वाच्यार्थ, विशिष्ट परिस्थितीमुळे त्याचा निराळा अर्थ होत असेल तर त्याला लक्ष्यार्थ, आणि त्यातून काही अर्थ सूचित होत असेल तर त्याला व्यङ्ग्यार्थ असे अर्थाचे तीन भेदही त्यांनी केले आहेत. काव्यात वाच्यार्थापेक्षा व्यङ्ग्यार्थाला जास्त महत्त्व असावे, कारण जे सरळ सांगितले असते त्याच्यापेक्षा जे सूचित केले असते ते जास्त रमणीय असते असा सहृदयांचा अनुभव आहे. म्हणून ज्यात व्यङ्ग्यार्थाला प्राधान्य असते ते ध्वनिकाव्य सर्वोत्कृष्ट गणले जाते. शृङ्गारादि रस हे सदैव व्यङ्ग्यच असल्यामुळे रसोत्कट काव्याची ध्वनि-काव्यात गणना होते. कालिदासाची काव्ये ध्वनिप्रकाराची उत्तम उदा-

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७२, पृ. १ इ.

हरणे होत. ज्यात व्यङ्ग्यार्थापेक्षा वाच्यार्थच अलंकारादिकांच्या योजनेमुळे जास्त रमणीय भासतो, त्याला गुणीभूतव्यङ्ग्यकाव्य म्हणतात. ते मध्यम प्रकारचे गणले जाते. शेवटी, ज्यात व्यङ्ग्यार्थ मुळीच नसतो किंवा नगण्य असतो आणि कवीचे लक्ष बौद्धिक कसरतीच्या श्लेषादि शब्दालंकारांच्या निर्मितीतच गुंतलेले असते त्याला चित्रकाव्य म्हणतात.

कालिदासानंतरच्या काळात चित्रकाव्याला जास्त महत्त्व येऊ लागले. रघुवंशाच्या नवव्या सर्गात अनुप्रास आणि यमक या अलंकारांचा सढळ उपयोग करून कालिदासाने आपली शब्दालंकारांची हौस फेडून घेतली आहे. पण कोठेही त्यांचा अतिरेक होऊ दिला नाही. पण नंतरच्या भारवि[१], माघ[२] इत्यादि कवींनी श्लेषादि शब्दालंकार योजून, एक, दोन किंवा तीनच व्यंजनांचा उपयोग करून किंवा श्लोकांतील अक्षरांनी सर्वतोभद्र, किंवा मुरज (मृदङ्ग), चक्र, गोमूत्रिका इत्यादि बंध किंवा आकृत्या निर्माण व्हाव्यात अशी रचना करून चित्रकाव्ये रचण्यात आपली बुद्धि खर्च केली. अशा काव्यात हृदयाला नव्हे, तर बुद्धीला आवाहन असते. कवीचा उद्देश बौद्धिक कसरतीच्या विविध प्रकारांनी वाचकांकडून वाहवा मिळविण्याचा असतो. कालांतराने काव्य जितके जास्त क्लिष्ट, त्याचा अर्थ लावण्यास जितके जास्त पांडित्य आवश्यक तितका त्याचा दर्जा श्रेष्ठ अशी समजूत रूढ झाली.

'द्विसंधानकाव्य' हा चित्रकाव्याचाच प्रकार होय. एकाच काव्याच्या श्लोकांतील शब्दरचनेने दोन भिन्न कथांचे वर्णन होत असेल तर त्याला 'द्विसंधान काव्य' म्हणतात. कविराज नामक कवीने आपल्या

---

१. 'किरातार्जुनीय', सर्ग १५, श्लोक १४ 'न' या अक्षरातच रचला आहे—

न नो ननुन्नो नुन्नोनो नाना नाना ननानन‍ु ।
नुन्नो नुन्नो ननुन्नोनो नानेना नुन्ननुन्ननुत् ॥

या काव्यातील १५, १२ मध्ये गोमूत्रिकाबन्ध आला आहे.

'राघवपाण्डवीय काव्यात'[२] 'रामायण' आणि 'महाभारत' या दोन आर्ष काव्यांची कथा त्याच शब्दांत वर्णिली आहे. तो म्हणतो—

रम्या रामायणी यैषा भारती सैव भारती ।
अर्धनारीश्वरमयी मूर्तिरेकत्र शोभताम् ।।

भगवान् शंकर आणि पार्वती यांच्या भिन्न भिन्न मूर्ति केल्या जातात आणि त्या रमणीय असतात. पण अर्धनारीश्वराची मूर्ति—जिच्यात शिव–पार्वतीच्या मूर्तीचे एकीकरण केले असते—तिचे सौंदर्य काही आगळेच असते. तसाच हा द्विसंधान काव्याचा प्रकार होय.

प्रस्तुत लेखविषय 'द्विसंधानकाव्या'चा कर्ता धनञ्जय अशा कवींमध्ये कालानुक्रमाने अगदी पहिला जरी नसला तरी अत्यंत प्राचीन आहे. त्याच्याविषयी आणि त्याच्या कालाविषयी विद्वानांतही अनेक गैरसमज झाले आहेत. त्याचे काव्य पुष्कळ वर्षांपूर्वी (सन १८९५ मध्ये) निर्णयसागराने आपल्या काव्यमालेत प्रकाशित केले असले तरी ते विद्वानांच्याही वाचनात येत नाही. त्याची सर्वांगीण चर्चा अद्यापि कोठेही झाली नाही. हा कवि जैनधर्मी होता. कोल्हापूरच्या शिलाहार राजवंशातील गंडरादित्य नृपतीचा (सन ११००–११४०) ज्याला आश्रय होता तो श्रृतकीर्ति त्रैविद्य[३] याने धनञ्जय या टोपण नावाने 'राघवपाण्डवीय' हे द्विसंधान काव्य ख्रिस्तोत्तर बाराव्या शतकाच्या प्रथमार्धात रचले ही कै. डॉ. कांशिनाथ बापूजी पाठक यांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी [इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १४ (सन १८८५), पृ. १४] आपल्या लेखात मांडलेली कल्पना डॉ. विंटर्निट्झ,[४] डॉ. कीथ,[५] डॉ. सुशीलकुमार दे[६] या मान्यवर

---

२. 'शिशुपालवध' १९, ११४ मध्ये केवळ 'द' या अक्षराचा उपयोग केला आहे.

३. त्रैविद्य म्हणजे आगम, न्याय व व्याकरण या तीन विद्यांत प्रवीण.

4. *Geschicht der indischen Litteratur*, Vol. III, p. 75.

5. *History of Sanskrit Literature*, p. 137.

6. *History of Sanskrit Literature*, p. 340.

विद्वानांनी आपल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत स्वीकारली आहे. पण ती चूक आहे. हे प्रस्तुत लेखातील चर्चेवरून दिसून येईल.

धनञ्जय कवीला कोल्हापूरच्या एका शिलाहार नृपतीचा आश्रय होता या रूढ समजुतीमुळे अलीकडे शिलाहारांच्या इतिहासाचे परिशीलन करताना या प्रश्नाकडे माझे लक्ष गेले. त्याचे ‘ द्विसंधान ’ किंवा ‘ राघव-पाण्डवीय ’ काव्य आता अत्यंत दुर्मिळ झाले आहे. नागपुरात त्याची प्रत उपलब्ध न झाल्यामुळे मला ती पुण्याच्या भांडारकर संस्थेकडून मागवावी लागली. तिच्या परिशीलनाने आणि इतर साधनांवरून मिळालेली माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.

धनंजय कवीचा काल—पूर्वीची मते

१. डॉ. का. बा. पाठक यांचे मत–सुमारे सन ११२५

धनञ्जयाने आपल्या काव्यात आपल्या स्थलकालाविषयी काहीच माहिती दिली नाही. त्याच्या काव्याचे अठरा सर्ग आहेत. अठराव्या सर्गाच्या शेवटल्या श्लोकावरून त्याच्या मातेचे नाव श्रीदेवी, पित्याचे वसुदेव आणि गुरूचे दशरथ होते, एवढीच माहिती मिळते. त्याच्या काव्याचे नावही त्यात आले नाही, तथापि आरंभीच्या शतकांत तरी ते काव्य ‘ द्विसंधान ’ नावानेच प्रख्यात होते हे राजशेखर, भोज इत्यादींच्या तद्विषयक उल्लेखांवरून दिसते. त्याच्या सर्गांच्या सध्याच्या पुष्पिकांत मात्र त्याचे ‘ राघवपाण्डवीय ’ असे दुसरे नाव उल्लेखिलेले आढळते. याच नावाची आणखीही काही काव्ये माहीत झाली आहेत. त्यांपैकी कविराज नामक कवीचे ‘ राघवपाण्डवीय काव्य ’ सुप्रसिद्ध आहे. धनञ्जय जैन धर्मी, तर हा कविराज हिंदूधर्मी होता. त्यामुळे या दोन ग्रंथांतील राघवपांडवांच्या कथांत बरेच फरक झाले आहेत.

कन्नड कवि नागचंद्र ऊर्फ अभिनवपम्प[७] याने आपल्या रामचंद्र-चरितपुराण (किंवा पम्परामायण) या कन्नड ग्रंथात घातलेल्या एका श्रुतकीर्ति त्रैविद्य नामक जैन मुनीच्या स्तुतिपर श्लोकात (१, २४–२५) त्याने राघवपाण्डवीय या नावाचे काव्य 'गतप्रत्यागत' पद्धतीने रचून विद्वानांना आश्चर्यचकित केले असे म्हटले आहे. मैसूर प्रदेशात बंगलोर–मंजराबाद घाट रस्त्यावर चन्नरायपट्टण या गावाजवळ श्रवणबेळगोळ येथे एका जैन देवालयाच्या खांबावर कोरलेल्या खिस्तोत्तर ११६३ च्या लेखात कोल्हापूरच्या माघनन्दि नामक जैनमुनीचा शिष्य श्रुतकीर्ति, त्रैविद्य याच्या संदर्भात पूर्वोक्त 'पम्पपुराणा'तील 'राघवपाण्डवीय' काव्यविषयक दोन श्लोक आले आहेत.[८] याच श्रुतकीर्ति त्रैविद्याचे वर्णन पूर्वीच्या सांगली संस्थानातील तेरदाळ गावी एका जैन बस्तीत[९] (देवालयात) कोरलेल्या लेखात[१०] आले आहे. या लेखाचा काल शक संवत् १०४५ (इ. स. ११२३) हा आहे. या लेखात श्रुतकीर्ति त्रैविद्याचे वर्णन 'कोल्लगिराच्या (कोल्हापूरच्या) माघनन्दि सैद्धान्तिकाचा शिष्य' असे केले आहे. कोल्हापुरात शुक्रवार वेशीजवळची जैन बस्ती शिलाहार नृपति गंडरादित्य याच्या निंबदेव नामक सामन्ताने बांधली होती आणि तिला त्याने गण्डरादित्याचे बिरुद 'रूपनारायण' हे नाव ठेवले होते.[११] त्या बस्तीच्या आवारातील एका शिला–लेखात या श्रुतकीर्ति त्रैविद्याचा उल्लेख आहे.[१२] तेव्हा तो तेथील जैन बस्तीचा भट्टारक होता यात संशय नाही या लेखाचा काळ शक संवत् १०५८ (इ. स. ११३५) असा आहे.

---

७. याच्या पूर्वी पम्प (किंवा आदिपम्प) याने 'विक्रमार्जुनविजय' किंवा 'पम्पभारत' सन ९४१ मध्ये रचले होते. म्हणून नागचंद्राला 'अभिनवपम्प' म्हणतात.

८. एपिग्राफिया कर्णाटिका, व्हॉ. २, लेखांचे भाषांतर, पृ. १८.

९. बस्ती (संस्कृत, वसति) म्हणजे जिनाचे देवालय.

१०. इंडियन अँटिक्वरी, व्हा. १०; पृ. १४ इ.

११. पूर्वोक्त, पृ. २३.

१२. एपिग्राफिया इंडिया, व्हॉ. १९, पृ. १९ इ.

तेरदाळच्या लेखात श्रुतकीर्ति त्रैविद्याचे वर्णन आले आहे, पण त्यात याच्या राघवपाण्डवीय काव्याच्या कर्तृत्वाचा उल्लेख नाही. यावरून त्या लेखाचे संपादक डॉ. का. बा. पाठक यांनी असे अनुमान केले की श्रुतकीर्तीने हे 'राघवपाण्डवीय' काव्य त्या लेखाच्या शक संवत् १०४५ (इ. स. ११२३) नंतर लिहिले असावे. कारण 'पम्परामायणा'त व श्रवण बेळगोळच्या स्तम्भलेखात त्याचा कर्ता श्रुतकीर्ति त्रैविद्य होता असे स्पष्ट म्हटले आहे. त्यावरून डॉ. पाठकांनी असे अनुमान केले की श्रुतकीर्ति त्रैविद्याने हा ग्रंथ धनञ्जय या टोपण नावाने प्रकाशित केला असावा. त्याचा रचनाकाल शक संवत् १०४५ (तेरदाळ लेखाचे वर्ष) आणि शक संवत् १०७६[१३] (पंपाचा ज्ञात काळ) यामधील असावा. पंपाला श्रुतकीर्तीचे धनञ्जय टोपण नाव माहीत असावे. 'श्रुतकीर्ति–त्रैविद्यविरचित' म्हणून त्याने धनञ्जयाच्या 'राघवपाण्डवीया'ला म्हटले आहे, पण इतरांस ते ज्ञात नसल्याने हे राघवपाण्डवीय काव्य धनञ्जय कवीचे म्हणूनच प्रसिद्ध आहे. त्याच्या कर्त्याचे श्रुतकीर्ति त्रैविद्य हे खरे नाव लुप्त झाले आहे.

डॉ. पाठकांच्या मताचे परीक्षण

डॉ. पाठकांचे हे मत डॉ. विंटरनिट्झ, डॉ. कीथ, डॉ. सुशीलकुमार दे इत्यादि संस्कृत वाङ्मयेतिहासकारांनी स्वीकारून आपल्या ग्रंथांत दिले आहे. पण हे मत चुकीचे आहे हे श्री. ए. वेंकटसुब्बया यांनी जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी, व्हॉ. ३ (नवीन माला), पृ. १३४-१४४ (सन १९२८) यातील लेखात सप्रमाण दाखविले आहे. त्यांची प्रमाणे अशी–

(१) पम्पाने उल्लेखिलेला 'राघवपाण्डवीय' काव्याचा कर्ता श्रुतकीर्ति आणि कोल्हापूर जैन मठाचा भट्टारक श्रुतकीर्ति यांची 'त्रैविद्य' (आगम, तर्क आणि व्याकरण यांत निष्णात)ही पदवी एकच असली तरी ते एक नव्हत, कारण त्या दोघांच्या गुरुपरम्परा भिन्न होत्या. 'राघव-

१३. पंप यापूर्वी सन ११०० च्या सुमारास होऊन गेला हे आता सिद्ध झाले आहे.

पाण्डवीया 'चा कर्ता श्रुतकीर्ति याची गुरुपरम्परा बालचंद्र–मेघचंद्र–शुभकीर्ति–वासुपूज्य–श्रुतकीर्ति अशी आहे, तर कोल्हापूरच्या श्रुतकीर्तीची गुरुपरम्परा कुलभूषण–कुलचंद्र–माघनंदी–श्रुतकीर्ति अशी आहे.

(२) पंप हा सुमारे इ. स. ११०० च्या सुमारास होऊन गेला असावा, कारण त्याच्या 'रामायणा 'तील जैन यति मेघचंद्र याच्या वर्णनपर एक उतारा श्रवणबेळगोळ येथील सन १११५ मध्ये कोरलेल्या स्तम्भलेखात आला आहे.[१४] तेव्हा त्याने वर्णिलेला श्रुतकीर्ति त्रैविद्य हा सन ११०० च्या बराच अगोदर होऊन गेला असावा. याच्या उलट कोल्हापूरचा श्रुतकीर्ति त्रैविद्य याच्या काळचे तेरदाळ आणि कोल्हापूर येथे सापडलेले कोरीव लेख अनुक्रमे शक संवत् १०४५ (इ. स. ११२३) आणि शक संवत् १०५८ (इ. स. ११३५) या वर्षांचे आहेत. तो कोल्हापूरचा शिलाहार नृपत्ति गंडरादित्य (सुमारे सन ११०० ते ११४०) याचा समकालीन होता. यानंतर शक संवत् १०६५ च्या कोल्हापूरच्या कोरीव लेखात तेथील बस्तीचा भट्टारक माणिक्यनन्दि पण्डित नामक होता.[१५] तेव्हा कोल्हापुरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याचा कार्यकाल सुमारे इ. स. ११२० ते ११४० हा असावा. अर्थात् तो पंपाने वर्णिलेल्या श्रुतकीर्तीहून भिन्न असला पाहिजे.

(३) पंपाने उल्लेखिलेले श्रुतकीर्तिकृत 'राघवपाण्डवीय' काव्य धनञ्जयाच्या 'राघवपाण्डवीया 'हून भिन्न होते असे दिसते. पूर्वोक्त काव्य 'गतप्रत्यागत' प्रकारचे होते असे पम्प सांगतो. मैसूरचे विख्यात पुरातत्त्वज्ञ नरसिंहाचार हे याचा अर्थ असा करतात की त्या काव्याचे श्लोक डावीकडून उजवीकडे वाचत गेले म्हणजे राघववर्णनपर आणि तेच उजवीकडून डावीकडे वाचत गेले म्हणजे पाण्डववर्णनपर होते.[१६]

---

१४. ए. क. व्हॉ. २, कोरीव लेख, क्र. १२७ पाहा.

१५. ए. इं. व्हॉ. १९, पृ. ३१

१६. नरसिंहाचारांची नागवर्म्याच्या 'काव्यावलोकना 'ला जोडलेली प्रस्तावना पाहा. ज. बॉं. ब्रॅं. रॉ. ए. सो. नवी माला, व्हॉ. ३, पृ. १३८.

पण गतप्रत्यागताचा हा अर्थ बरोबर नाही आणि असे श्लोक रचणे अशक्य आहे. गतप्रत्यागत याचा आणि 'काव्यप्रकाशा'दि ग्रंथांत योजलेल्या अनुलोमप्रतिलोमाचा अर्थ एकच. तो हा की, श्लोक डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे वाचला तर तीच अक्षरांची आनुपूर्वी येते. धनञ्जयाच्या 'द्विसन्धान' काव्यातील याचे पुढील उदाहरण पाहा–

ततसारतमास्थासु सुभावानभितारधीः ।
धीरताभिनवाभासु सुस्थामा तरसाततः ॥

(द्विसन्धान, १८, १४३)

यांतील प्रथम अर्ध प्रथम डावीकडून उजवीकडे व नंतर तोच उजवीकडून डावीकडे वाचल्यास तो संपूर्ण श्लोक होतो. तसेच द्वितीय अर्धही प्रथम उजवीकडून डावीकडे आणि नंतर डावीकडून उजवीकडे वाचल्यास पुनः तोच श्लोक प्राप्त होतो.

अर्थ– ज्याची कुशाग्र बुद्धि (सर्व शास्त्रांत) संचार करते (अभितारधी:) असा बलवान् (सुस्थामा) विष्णु गाम्भीर्याने ज्यांना आगळीच उज्ज्वलता प्राप्त झाली आहे (धीरताभिनवाभासु) अशा विस्तृत प्रतिज्ञांमध्ये (ततसारतमास्थासु) आपल्या उत्कृष्ट अभिप्रायांना (सुभावान्) जिद्दीने (तरसा) व्यक्त करता झाला (आतत).

वरील संस्कृत शब्दांसह दिलेल्या अर्थावरून वाचकांस या काव्याच्या क्लिष्टतेची कल्पना येईल.

प्रस्तुत काव्यात गतप्रत्यागत पद्धतीने रचलेले आणखी दोन श्लोक (१८, १३८ व १३९) आहेत. याशिवाय त्या पद्धतीने रचलेल्या पदांची (सर्ग १८, श्लो. ५८) किंवा श्लोकार्धाची (सर्ग १८, श्लो. ३०) काही उदाहरणे आली आहेत. पण धनञ्जयाचे हे द्विसन्धान काव्य पूर्णपणे त्या गतप्रत्यागत पद्धतीने रचलेले नाही. तेव्हा अभिनवपम्पाला तो विवक्षित असणे शक्य नाही. त्याने उल्लेखिलेले श्रुतकीर्ति कवीचे गतप्रत्यागत पद्धतीचे 'राघवपाण्डवीय' काव्य अद्यापि उपलब्ध झाले नाही.

२. वेंकटसुब्बय्यांचे मत–(इ. स. ९८५)

श्री. ए. वेंकटसुब्बय्या यांनी जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच् ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी [नवी माला, व्हॉ. ३ (सन १९२८), पृ. १३४ ते १६०] मध्ये 'राघवपाण्डवीय' आणि 'गद्यचिंतामणि' यांचे कर्ते या विषयावर प्रदीर्घ चिकित्सात्मक लेख लिहिला आहे. त्यात या 'राघवपाण्डवीय' काव्याचा कर्ता धनञ्जय हा श्रवणबेळगोळ येथील क्र. ६७ च्या लेखामध्ये वर्णिलेला हेमसेन नामक जैनमुनि असावा असे अनुमान केले आहे. तो मोठा पंडित होता आणि त्याला 'विद्याधनञ्जय' अशी पदवी होती. वादिराजाने आपल्या 'पार्श्वनाथचरिता'त अनेक जैन ग्रंथकारांची स्तुति केली आहे. त्यामध्ये 'द्विसन्धान' काव्याच्या धनञ्जयाचा अन्तर्भाव केला आहे. हे सर्व ग्रंथकार जैनमुनि होते, तेव्हा हा धनञ्जयही जैनमुनि असावा. वर उल्लेखिलेल्या हेमसेनाचे 'विद्या-धनञ्जय' असे दुसरे नाव होते. या हेमसेनाचा काल सुमारे इ. स. ९८५ होता. तोच धनञ्जयाचा काल असावा, असे वेंकटसुब्बय्यांनी म्हटले आहे.

या प्रमाणाचे परीक्षण

पण हे प्रमाण विश्वसनीय वाटत नाही. वादिराजाने इतर अनेक कवींप्रमाणे आपल्या पूर्वीच्या जैन ग्रंथकारांची [उदाहरणार्थ, देव (पूज्यपाद), अकलङ्क, जिनसेन वगैरेंची] स्तुति केली आहे. यांत धनञ्जय आहे. पण यावरून तो मुनि होता असे अनुमान करणे सयुक्तिक होणार नाही. 'द्विसन्धान' काव्यात त्याच्या मुनित्वाचे काहीच गमक नाही. तो आपल्या गुरूचे दशरथ असे नाव देतो; त्याला मुनि म्हणत नाही. श्रवणबेळगोळच्या पूर्वोक्त लेखात हेमसेन ऊर्फ विद्याधनञ्जय याच्यापूर्वी मतिसागराचे नाव आले आहे. तो त्याचा गुरु होता काय याचा निर्देश नाही. तेव्हा धनञ्जय हा जैन मुनि नसून श्रावक (गृहस्थ) होता हे कै. पं. नाथूराम प्रेमी यांचे मत स्वीकरणीय वाटते.[१७] शिवाय

---

१७. जैन साहित्य और इतिहास (द्वि. आ.) पहा.

राजशेखराने आपल्या एका श्लोकात त्याचा उल्लेख केला असल्यामुळे तो इ. स. ९८५ इतका नंतरचा असणे शक्य नाही.

धनञ्जय कवीचा काल

तर मग द्विसन्धान ऊर्फ राघवपाण्डवीय काव्याचा खरा काल कोणता ? या प्रश्नाच्या उत्तराकरिता त्या कवीचा किंवा त्याच्या काव्याचा उल्लेख कोणी केला आहे हे कालक्रमवार पाहिले पाहिजे.

१. कन्नड कवि दुर्गसिंह (सुमारे सन १०२५) हा आपल्या 'पंचतन्त्र' ग्रंथात म्हणतो की धनञ्जय 'राघवपाण्डवीया'च्या योगे सरस्वतीपति झाला. दुर्गसिंह उत्तरकालीन चालुक्य नृपति द्वितीय जयसिंह (किंवा प्रथम जगदेकमल्ल, इ. स. १०१५–४२) याचा समकालीन होता. तेव्हा धनञ्जय इ. स. १००० पूर्वी झाला असावा.

२. वादिराजाने आपल्या 'पार्श्वनाथचरित' नामक ग्रंथात (१, २६) धनञ्जयाविषयी म्हटले आहे–

अनेकभेदसंधाना खनन्तो हृदये मुहुः ।
बाणा धनञ्जयोन्मुक्ताः कर्णस्येव प्रियाः कथम् ॥

यात अनेक शब्दांवर श्लेष आहेत–

अनेक लक्ष्यांचा भेद करणाऱ्या आणि हृदयामध्ये आत आत घुसणाऱ्या धनञ्जयाच्या (अर्जुनाच्या) बाणाप्रमाणे असलेले धनञ्जय कवीचे अनेकार्थी आणि हृदयात पुनःपुनः चिंतिले जाणारे शब्द कर्णाला (राधेयाला, पक्षी कानाला) प्रिय कसे होतील ?

वादिराजाने हा ग्रंथ शक संवत् ९४७, क्रोधन संवत्सर, कार्त्तिक शुक्ल तृतीयेला (२७ ऑक्टोबर १०२६) समाप्त केला. त्यापूर्वी (निदान सन १००० पूर्वी) धनञ्जय झाला असला पाहिजे.

३. धाराधीश भोज याने आपल्या 'शृंगारप्रकाश' ग्रंथात धनञ्जयाच्या 'द्विसन्धान' काव्याचा काही ठिकाणी उल्लेख केला आहे.[१८]

18. 'Raghavan, *Bhoja's Sṛingāraprakāśa*, p. 838.

त्यापैकी एक उल्लेख असा–तृतीयस्य (द्विसन्धानप्रकारस्य) उदाहरणं यथा दण्डिनो धनञ्जयस्य वा द्विसन्धानप्रबन्धौ रामायणभारतार्थावनुबध्नीतः।

हा परमार भोज सु. इ. स. १०१५-१०५५ या कालात होऊन गेला.

भोजाचा समकालीन प्रभाचंद्र यानेही आपल्या प्रमेयकमलमार्तण्ड मध्ये 'द्विसंधान' काव्याचा उल्लेख केला आहे, पण ते काव्य दण्डीचे किंवा धनञ्जयाचे याचा त्यात निर्देश नाही.

४. राजशेखराने खालील स्फुट श्लोकात धनञ्जयाचे वर्णन केले आहे–

द्विसन्धाने निपुणतां स तां चक्रे धनंजयः।
यया जातं फलं तस्य सतां चक्रे धनं जयः॥

[धनंञ्जय कवीने, तसेच अर्जुनाने, अनुक्रमे द्व्यर्थी काव्यरचनेमध्ये आणि लक्ष्यांचा भेद करण्यामध्ये असे नैपुण्य प्राप्त करून घेतले की त्या योगे त्यांना सज्जनांच्या समूहात अनुक्रमे धन व जय ही प्राप्त झाली.]

राजशेखर हा कन्नोजच्या प्रतीहारनृपति महेन्द्रपाल आणि महीपाल तसेच त्रिपुरीचा कलचुरिनृपति प्रथम युवराजदेव यांच्या दरबारी होता. त्याचा काल सुमारे इ. स. ९०० ते ९४० हा असावा.[१९]

५. पुढे दाखविल्याप्रमाणे धनंजयाचा 'अनेकार्थनाममाला' नामक संस्कृत कोशग्रंथ आहे त्यातील 'इति' शब्दाचे विविध अर्थ देणारा खालील श्लोक विख्यात जैन ग्रंथकार जिनसेन याचे गुरु वीरसेन यांच्या वि. सं. ८७३ (सन ८१६) मध्ये लिहिलेल्या 'धवला' टीकेत उद्धृत केला आहे.[२०]

हेतावेवंप्रकारादौ व्यवच्छेदे विपर्यये।
प्रादुर्भावे समाप्तौ च इतिशब्दं विदुर्बुधाः॥

---

19. Mirashi : *Insriptions of the Kalachuri–Chedi Era, pp. lxciv* f.

२०. षट्खण्डागम–प्रस्तावना, पृ. ६२.

६. 'अनेकार्थनाममाले'त धनञ्जयाने अकलंकाचा उल्लेख केला आहे. अकलंकाचा काल वि. सं. ७९७ ते ८३७ हा निश्चित झाला आहे. तेव्हा धनञ्जय वि. सं. ८५० च्या सुमाराम म्हणजे ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला असावा.

या प्रमाणांवरून धनञ्जय कवीचे 'द्विसन्धान' किंवा 'राघवपाण्डवीय' काव्य इ. सं. ७५० ते ८०० च्या सुमारास रचले गेले असावे असे दिसते.

अर्थातच हा धनञ्जय अभिनवपम्पाने वर्णिलेला सुमारे इ. स. १०५० चा 'राघवपाण्डवीया'चा कर्ता श्रुतकीर्ति किंवा इ. स. च्या बाराव्या शतकाच्या पूर्वार्धातील कोल्हापूरच्या रूपनारायण वस्तीचा भट्टारक श्रुतकीर्ति असणे शक्य नाही.

धनञ्जयाचे ग्रंथ

द्विसन्धान काव्याखेरीज 'नाममाला', 'अनेकार्थनाममाला', 'विषापहरणस्तोत्र' आणि 'यशोधरचरित' हे ग्रंथ धनञ्जयाच्या नावावर मोडतात. पहिल्या ग्रंथाच्या २०० श्लोकांत 'अमरकोशा'तल्याप्रमाणे संस्कृत शब्दांचे अर्थ दिले आहेत. म्हणून त्याच्या कर्त्याला 'नैघण्टुक-धनञ्जय' असे नाव पडले आहे. शेवटी आलेल्या एका श्लोकात त्याच्या 'द्विसंधान' काव्याचा उल्लेख आहे–

प्रमाणमकलङ्कस्य पूज्यपादस्य लक्षणम् ।
द्विसन्धानकवेः काव्यं रत्नत्रयमलक्षणम् ॥

यात म्हटल्याप्रमाणे अकलङ्काचा प्रमाणविषयक ग्रंथ, पूज्यपादाचे 'जैनेन्द्रव्याकरण' आणि धनञ्जयाचे 'द्विसन्धान काव्य' हे तीन ग्रंथ आपापल्या परीने अनुपम आहेत.

धनञ्जयाच्या 'अनेकार्थनाममाले'चे ४६ श्लोक आहेत. त्यांत अनेकार्थी संस्कृत शब्दांचा संग्रह केला आहे. यांतील 'इति' शब्दाच्या अर्थाविषयीचा श्लोक 'धवला' टीकेत उद्धृत केल्याचे मागे सांगितले आहे.

'विषापहरण स्तोत्र' हे इंद्रवज्रा वृत्तातील ३९ श्लोकांचे स्तुतिपर काव्य आहे. याच्या पठनाने विषबाधा नाहीशी होते अशा समजुतीमुळे त्याला हे नाव पडले असावे.

'द्विसन्धान' काव्याप्रमाणे धनञ्जय कवीचे वरील तीनही छोटे ग्रंथ सध्या उपलब्ध आहेत. पण त्याचे 'यशोधरचरित' मात्र अन्य ग्रंथांतील उल्लेखांवरूनच ज्ञात आहे. भट्टारक ज्ञानकीर्तीच्या वि. सं. १६५० मध्ये रचलेल्या 'यशोधरचरिता'त तत्पूर्वीच्या सात 'यशोधरचरितां'चा उल्लेख आहे. त्यांपैकी एक धनञ्जय कवीचे आहे. हा ग्रंथ अद्यापि उपलब्ध न झाल्याने त्याचा कर्ता धनञ्जय हा व पूर्वोक्त द्विसन्धान काव्याचा कर्ता धनञ्जय हे एक किंवा भिन्न हे कळण्यास साधन नाही.[२१]

दण्डीकृत 'द्विसंधान' काव्य

धनञ्जय हा द्विसंधान काव्य रचणारा आद्य कवि नाही. त्याच्या अगोदर ख्रिस्तोत्तर सातव्या शतकातील दण्डीनेही असेच रामायण-महाभारतीय कथांचे एकीकरण करणारे 'द्विसंधान' काव्य रचले होते. राजशेखर खालील श्लोकात दण्डीच्या तीन प्रबन्धांचा उल्लेख करतो–

त्रयोऽग्नयस्त्रयो वेदास्त्रयो धर्मास्त्रयो गुणाः ।।
त्रयो दण्डिप्रबन्धाश्च त्रिषु लोकेषु विश्रुताः ।।

हे दण्डीकृत तीन ग्रंथ कोणते याविषयी विद्वानांत दीर्घ काळ वाद माजून राहिला आहे. पण अलीकडच्या संशोधनावरून ते (१) 'काव्यादर्श,' (२) 'अवन्तिसुन्दरीकथा' आणि (३) 'द्विसंधान काव्य,' हे होते असे दिसते. 'काव्यादर्श' हा अलंकारविषयक ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. 'अवन्तिसुन्दरीकथे'ची थोडीच पृष्ठे सापडली आहेत. 'दशकुमारचरित' हे त्या कथेचे संक्षिप्त रूप असावे. काही विद्वान् समजतात तसे ते दोन ग्रंथ एक नव्हत. कारण त्यांची शैली भिन्न आहे. याशिवाय दण्डीने 'द्विसन्धान' काव्य रचले होते हे भोजाच्या अप्रकाशित 'शृंगारप्रकाशा'वरून कळते. तो उतारा मागे दिला आहे. भोजाने या 'द्विसंधान' काव्याचा उल्लेख

२१, नाथूराम प्रेमी–जैन साहित्य और इतिहास (द्वि. आ.) पृ. १००.

आपल्या ग्रंथात अनेक ठिकाणी केला आहे, एवढेच नव्हे तर त्यातील बहुधा आरंभीचा खालील श्लोकही उद्धृत केला आहे–[२२]

उदारमहिमारामः प्रजानां हर्षवर्धनः।
धर्मप्रभव इत्यासीत्ख्यातो भरतपूर्वजः ॥
रामायणमहाभारतयोर्दण्डिद्विसन्धानमिति।

या श्लोकात श्लेषयोजनेने रामाचे तसेच युधिष्ठिराचे वर्णन त्याच शब्दांत केले आहे.

१. **रामायण**–प्रजेच्या आनंदाची वृद्धि करणारा, उदार महिम्याने युक्त आणि भरताचा वडील बंधु राम हा सर्वांस धर्मनियम घालून देणारा म्हणून विख्यात झाला.

२. **महाभारत**–प्रजेच्या आनंदाची वृद्धि करणारा, उदार महिम्यांचा आश्रय, (दुष्यन्तपुत्र) भरत ज्याचा पूर्वज होता असा, यमधर्माचा पुत्र, युधिष्ठिर विख्यात होता.

दण्डी हा 'द्विसन्धान' काव्य रचणारा पहिला ज्ञात संस्कृत कवि होय. त्याचे हे काव्य सध्या उपलब्ध नाही. पण वरील श्लोकावरून ते त्याच्या 'काव्यदर्शा'प्रमाणे प्रसादगुणयुक्त होते, क्लिष्ट नव्हते, असे दिसते.

धनञ्जय हा त्यानंतर सुमारे शंभर वर्षांनी होऊन गेला असावा. धनञ्जयाच्या काव्याचे अठरा सर्ग आहेत. अत्यंत प्राचीन संस्कृत व प्राकृत कवि आपल्या काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटल्या श्लोकात एखादा विशिष्ट शब्द आपली खूण म्हणून घालत असत. उदाहरणार्थ, भारवीच्या 'किरातार्जुनीया'त 'लक्ष्मी' आणि माघाच्या 'शिशुपालवधा'त 'श्री' या शब्दाचा असा उपयोग केला आहे. प्राकृत कवींनीही ही प्रथा उचलली होती. वाकाटक नृपति सर्वसेन याचे 'हरिविजय' काव्य सध्या उपलब्ध नाही, पण हेमचन्द्राच्या 'अलंकारचूडामणी'च्या विवृतीवरून त्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या श्लोकात 'उत्साह' शब्द

22. Raghavan, *Bhoja's Sṛingāraprakāsa*, p. 838.

ग्रथित केला होता अशी माहिती मिळते.[२३] दुसरा वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन याचे 'सेतुबन्ध' काव्य सुदैवाने उपलब्ध आहे. त्यामध्ये 'अनुराग' शब्दाचा असाच उपयोग केला आहे. ही प्रथा निदान ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकापर्यंत प्रचलित होती. त्या शतकातील कविराज या कवीने आपल्या 'राघवपाण्डवीय' काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटी आपला आश्रयदाता कदंब नृपति कामदेव याचे नाव असेच गुंफले आहे. धनञ्जय हा कवि आठव्या शतकाइतका प्राचीन असल्याने त्याने या प्राचीन प्रथेचे अनुसरण करून प्रत्येक सर्गाच्या शेवटल्या श्लोकात आपले नाव गुंफले आहे उदाहरणार्थ, त्याच्या 'द्विसंधान' काव्याच्या पहिल्या वर्गाचा खालील अंतिम श्लोक पाहा–

को वा कविः पुरमिमां परमार्थवृत्त्या
शक्नोति वर्णयितुमत्र विनिर्णयेन ।
नित्यं विधिः सततसंनिहितो विभूति–
मन्यादृशं सृजति यत्र धनंजयाय ॥

तशाच पुढील सर्गाच्या अन्तिस पंक्ती पाहा–

सर्ग २ – व्यसनरहितराजराज्यभारः
स्वमुपचिकाय यशो धनंजयेन ॥

सर्ग ३ – न हि सुतवतां नामासाध्यं धनंजयमिच्छताम् ॥

एकाच श्लोकात दोन भिन्न कथांचे वर्णन करणे कसे शक्य होते यासंबंधी वाचकांस कुतूहल असेल. त्याचे उत्तर नंतरच्या 'राघवपाण्डवीया'चा कर्ता कविराज याने पुढील श्लोकांत (१, ३७–३८) दिले आहे.

प्रायः प्रकरणैक्येन विशेषणविशेष्ययोः ।
परिवृत्त्या क्वचित्तद्वदुपमानोपमेययोः ॥
क्वचित्पदैश्च नानार्थैः क्वचिद्वक्रोक्तिभागिभिः
विधास्यते मया काव्यं श्रीरामायणभारतम् ॥

---

२३. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १४८

कविराज म्हणतो, ‘मी रामायण आणि भारत यांच्या कथा त्याच श्लोकांत वर्णन करताना पुढील युक्त्या योजिल्या आहेत–क्वचित् दोन्ही कथांतील प्रसंग (उदाहरणार्थ, वनगमन) सारखे असल्यास एकीचे वर्णन तेच दुसरीचेही होऊ शकते. क्वचित् एका कथेतील विशेषण (उदाहरणार्थ बिभीषण, दुर्योधन) दुसरीत विशेष्य करून आणि त्याच्या उलटही करून ते साधता येते. तसेच उपमान आणि उपमेय यांच्या बदलानेही ते साध्य होते. क्वचित् श्लेषाचा आणि वक्रोक्तीचा उपयोग करून तसे वर्णन करणे शक्य होते.’ धनञ्जयानेही या युक्त्यांचा अवलंब करून आपले ‘द्विसंधान’ काव्य रचले आहे.

धनञ्जय जैनधर्मी होता. त्याने आपल्या काव्याच्या मङ्गलश्लोकात नेमिनाथ तीर्थंकाराच्या कृपेची प्रार्थना केली आहे–

श्रियं जगद्बोधविधौ विहायसि व्यदीपि नक्षत्रमिवैकमुद्गतम् ।
स यस्य वस्तीर्थरथस्य सुव्रतः प्रवर्तको नेमिरनीश्वरीं क्रियात् ॥

[ज्याला ज्ञान झाले असता सर्व जग आकाशात उगवलेल्या नक्षत्रा-प्रमाणे भासू लागले तो धर्मरूपी रथाच्या नेमिधारेसारखा नेमिनाथ तीर्थंकर तुम्हांस शाश्वत मोक्ष देवो !]

जैन परंपरेनुसार रामाची आणि पांडवांची कथा हिंदू परंपरेहून काही अंशी भिन्न आहे; म्हणून धनंजयाच्या ‘द्विसंधान–काव्या’तील त्या कथांचे वर्णन संक्षेपाने सर्गवार खाली दिले आहे. श्लेषादिकांच्या योजने-मुळे आणि त्याच शब्दांत राघवपांडवांच्या कथा देण्याच्या अट्टाहासामुळे धनञ्जयाचे काव्य अनेक ठिकाणी दुर्बोध झाले आहे. त्यावर विनय-चंद्राचा शिष्य नेमिचंद्र याची विस्तृत टीका आहे. पण ती अद्यापि छापली नाही. बदरीनाथ शास्त्री यांनी केलेली तिची संक्षिप्त आवृत्ति निर्णय-सागर मुद्रणालयाने ‘द्विसन्धान’ काव्याबरोबर छापली आहे. ते काव्य समजण्यास तिचा बराच उपयोग होतो.

‘द्विसन्धान’ काव्य रचताना कवीची कशी धांदल उडते हे स्वतः धनञ्जयाने रावण सीतेसह लंकेत आणि युधिष्ठिर द्वारकेत प्रवेश करीत

असता प्रेयसीकडे जाणाऱ्या वियोगी जनांच्या गडबडीचे वर्णन करून एका उपमेत (८, ४५) दाखविले आहे.

> वक्रोक्तिमुत्प्रेक्षणमङ्गबन्धं श्लेषं स्मरन्कालबलातिमूढः ।
> द्विसन्धिचिन्ताकुलितो विषण्णः कविर्वियोगीव जनोऽभ्यसर्पत् ॥

वक्रोक्ति, उत्प्रेक्षा, विविध प्रकारचे अक्षरांचे बंध (आकृत्या); श्लेष यांचा उपयोग कसा करावा याच्या चिंतेने हतबुद्ध झालेल्या 'द्विसन्धान' काव्याच्या कर्त्याप्रमाणे त्या नगरीत प्रेयसीची गाठ पडल्यावर तिच्याशी कसे कुटिल भाषण करावे, कटाक्ष कसे फेकावे, विविध प्रकारचे अंगभंग कसे योजावे, आलिंगन कसे द्यावे, यांच्या चिन्तनाने उद्विग्न झालेला वियोगी प्रियकर आपल्या प्रेयसीकडे जाऊ लागला.

धनञ्जयाच्या द्विसन्धान काव्याचा सर्गवार सारांश[२४]

सर्ग १–तीर्थंकर नेमिनाथ आणि सरस्वती यांच्या स्तुतीनंतर कवीने अयोध्या आणि हस्तिनापुर या नगरींचे वर्णन त्याच शब्दांत केले आहे.

सर्ग २–त्या अयोध्या नगरीत दशरथ आणि हस्तिनापुरात पांडु राज्य करीत होता. त्यांच्या शासनांचे आणि त्यांच्या अनुक्रमे कौसल्या व कुन्ती या राण्यांचे वर्णन.

सर्ग ३–दशरथाला राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार, आणि पांडूला पाच पुत्र झाले. तसेच धृतराष्ट्राला दुर्योधनादि पुत्र झाले.

सर्ग ४–राजा (दशरथ व पांडु) वृद्ध झाल्यामुळे पुत्राला (अनुक्रमे रामाला आणि युधिष्ठिराला) राजनीतीचा उपदेश करून राज्याभिषेक करतो. तेव्हा कैकेयीचा आणि दुर्योधनाचा संताप होतो. (अ) रामादिकांना वनात पाठविले जाते. (आ) युधिष्ठिर दुर्योधनाकडून

---

२४. यामध्ये राघवाच्या कथेतील घटनांचा (अ) या संज्ञेने व पांडूच्या कथेतील घटनांचा (आ)ने केला आहे. इतर वर्णन दोन्ही कथांना समान आहे.

द्यूतात हरला जाऊन आपल्या बंधूंसह वनास जातो. ते दोघे नर्मदा पार करतात (श्लो ४२).

सर्ग ५–(अ) राम दण्डकारण्यात जातो. (आ) युधिष्ठिर विराट-भूमीस पोचतो. (अ) लक्ष्मण कीचकांचे (वेणूंचे) वन तोडतो. (अ) द्रौपदी कीचकाच्या दृष्टीस पडते. (अ) शूर्पणखा लक्ष्मणावर आणि (आ) कीचक द्रौपदीवर आसक्त होतात. (अ) शूर्पणखेचा पक्ष घेऊन खर आणि (अ) कीचकाच्या हत्येचा सूड घेण्यासाठी दुर्योधन युद्ध करण्यास येतात. युद्धाचे वर्णन.

सर्ग ६–(अ) राम खरदूषणांचा वध करतो. (आ) पांडव युद्ध करून गोग्रहण थांबवितात.

सर्ग ७–शरद्‌ऋतुवर्णन. (अ) शूर्पणखा लंकेस रावणाकडे जाते.

(आ) युधिष्ठिर द्वारकेस कृष्णाकडे जातो. (अ) रावण सीतेचे हरण करतो. (अ) युधिष्ठिर आपले राज्य परत मिळविण्याचा निश्चय करतो. ते दोघे समुद्रतीरी–(अ) रावण दक्षिण समुद्रतीरी आणि (आ) युधिष्ठिर द्वारकेत पश्चिम समुद्रतीरी–जातात.

सर्ग ८–समुद्राचे वर्णन. (अ) लंकेत सीतेला आणि (आ) द्वारकेत युधिष्ठिराला पाहण्याकरिता धावलेल्या स्त्रियांचे वर्णन. (अ) रावण आणि (आ) युधिष्ठिर भावादिकांबरोबर राजनीतिचर्चा करतात.

सर्ग ९–(अ) वाली सुग्रीवाशी युद्ध करण्यास नगरावाहेर येतो. (आ) कृष्ण बलराम, पांडव इत्यादिकांसह जरासंधाने पाठविलेल्या सैन्याशी लढण्याकरिता द्वारकेबाहेर येतो. (अ) युद्धानंतर सुग्रीव रामाला कल्याणी नामक आपली कन्या, आणि (आ) कृष्ण अर्जुनाला सुभद्रा अर्पण करतो.

सर्ग १०–(अ) लक्ष्मणाचे सुग्रीवाला आणि (आ) जरासंधदूत पुरुषोत्तम याचे कृष्णाला वाक्ताडन.

सर्ग ११–प्राप्त प्रसंगी कोणती उपाययोजना करावी याविषयी (अ) सुग्रीव, हनुमान्, जांबवान् यांची, आणि (आ) कृष्ण, युधिष्ठिर, बलभद्र, भीम यांची चर्चा.

सर्ग १२–(अ) लक्ष्मण कोटिशिलेकडे जाण्यास निघतो. (आ) कृष्ण बळरामासहित त्याच उद्देशाने प्रस्थान करतो. इन्द्राने जिनाच्या अभिषेकाकरिता ती कोटिशिला मेरु पर्वतावरून आणली होती. (अ) लक्ष्मण, (आ) नारायण कोटिशिलेहून मोठा होतो आणि तिला उचलून स्वस्थानी ठेवतो.

सर्ग १३–(अ) हनुमान् रावणाकडे, आणि (आ) श्रीशैल (कृष्णदूत) जरासंधाकडे जातो. त्यांची भाषणे. (अ) हनुमान् सीतेला आणि (आ) श्रीशैल सुंदर स्त्रीला शोधतो. ते त्यांना अनुक्रमे (अ) रामाच्या आणि (आ) कृष्णाच्या भेटीचे आश्वासन देतात.

सर्ग १४–(अ) रामाच्या आणि (आ) कृष्ण व पांडव यांच्या शत्रूवरील स्वारीचे वर्णन. (अ) रामादिक समुद्रतीरी आणि (आ) कृष्ण व पांडव गंगातीरी पोचतात.

सर्ग १५–सैनिकांच्या–(अ) वानरांच्या आणि (आ) यादवांच्या–जलक्रीडेचे वर्णन.

सर्ग १६–(अ) रावण लंकेतून आणि (आ) जरासंध राजगृहातून क्रोधाने युद्धाकरिता बाहेर पडतो. (अ) बिभीषण रामाकडे, आणि (आ) कौरवपक्षीय सत्यक युधिष्ठिराकडे शरणार्थी म्हणून येतो.–युद्धाचे वर्णन.

सर्ग १७–(अ) राम–रावणाच्या आणि (आ) कृष्ण–जरासंधाच्या युद्धाचे वर्णन. युद्धात लक्ष्मण शक्त्याघाताने पडतो. हनुमान् द्रोणगिरीहून औषधी आणून त्याला सावध करतो. (आ) श्रीकृष्णाच्या भाषणाने पांडव उत्साहित होतात. सायंकालवर्णन.

सर्ग १८–(अ) रावण आणि (आ) जरासंध यांच्या युद्धाचे वर्णन. (अ) रावणवधानंतर सीता रामाला भेटते. (अ) जरासंधवधानंतर कृष्ण पांडवांना पृथ्वीचे राज्य देतो. नंतर रामादिक अयोध्येस आणि

कृष्णादि यादव द्वारकेस जातात. नारायणाच्या उत्कृष्ट राज्यशासनाचे वर्णन.

वरील सर्गवार त्रोटक सारांशावरून अशी द्विसंधान काव्ये कशी रचली जात यांची कल्पना येईल. त्यांतील प्रत्येक श्लोकाचे दोन भिन्न-कथांना अनुलक्षून भिन्न भिन्न अर्थ होतात अशी वस्तुस्थिति नाही. महाकाव्यात अवश्य असणारे विषय–उदाहरणार्थ, नगरवर्णन, ऋतुवर्णन, जलक्रीडावर्णन, सायंकालवर्णन, युद्धवर्णन ही-दोन्ही कथांना समान असल्यामुळे तद्वर्णनपर श्लोकांत एकच अर्थ विवक्षित असतो. काही प्रसंग, उदाहरणार्थ, वनगमन, दोन्ही कथांत येतात. इतरत्र श्लेषाचा आश्रय करून भिन्न अर्थ व्यक्त केले जातात–उदाहरणार्थ, दुर्योधन याचे (१) धृतराष्ट्रपुत्र आणि (२) युद्धात जिंकण्यास कठीण; तसेच धृत-राष्ट्र याचे (१) तन्नामक राजा (२) ज्याने राष्ट्राचे पालन केले आहे तो, असे दोन अर्थ विवक्षित आहेत.

धनञ्जयाने वर्णिलेली रामकथा बहुतांशी 'वाल्मीकि–रामायणा'तल्या सारखी आहे. बहुतांशी म्हणण्याचे कारण काही ठिकाणी तीत फरक आहे. उदाहरणार्थ, सर्ग ९, श्लोक ५२ मध्ये सुग्रीवाने रामाला कल्याणी नामक कन्या अर्पण केल्याचा उल्लेख पाहा. पांडवाच्या कथेतील युद्ध कौरवांशी झालेले नसून जरासंधाशी झाले असे वर्णिले आहे. तसेच वर्णनामध्ये भौगोलिक प्रमाद पुष्कळच आहेत. द्वारकेला जाण्या-करिता पांडवांना नर्मदा ओलांडण्याची जरूरी नव्हती. तसेच नर्मदा पार केल्यावर ते विराटाच्या नगरीस पोचणे शक्य नव्हते; कारण विराटाचे राज्य उत्तरभारतात अलीकडच्या जयपुरसंस्थानच्या प्रदेशावर होते.

धनञ्जय जैनधर्मी असल्यामुळे त्याने कोटिशिलेच्या उत्थापनाची पारंपरिक कथा प्रस्तुत काव्यात घुसडली आहे. ही कोटिशिला रामाला लंकेवर स्वारी करताना आणि कृष्णादिकांना जरासंधाच्या राजगृहावर आक्रमण करताना लागली असे वर्णिले आहे. तेव्हा तिचे निश्चित स्थान ठरविणे कठीण आहे. जैन ग्रंथकारांतही हिच्या स्थानाबद्दल एकमत नाही. कोणी ती कलिंगदेशात, कोणी मगधात, तर इतर कोणी ती दशार्णपर्वता-

जवळ आहे असे सांगतात.[२५] तिच्यावरून कोटि मुनि मुक्त झाले असे 'कोटिशिलाकल्प'मध्ये म्हटले आहे. तसेच ती एक योजन विस्ताराची होती असेही वर्णन आहे. जैन धर्मात ती फार पूज्य गणली आहे, यात संशय नाही. पण तिचा या काव्यात निर्देश करण्याचे प्रयोजन दिसत नाही.

धनञ्जयाच्या काव्यात श्लेषादिकांच्या उपयोगामुळे कृत्रिमता आली आहे. शिवाय त्याने विशेषतः अठराव्या सर्गात केव्हा एकेक पाद एका अक्षरात, तर केव्हा सबंध श्लोक एकाच अक्षरात रचून, तसेच समपादयमक, विषमपादयमक, पादादियमक, पादमध्ययमक, पादान्तयमक, शृंखलायमक, गतप्रत्यागत या सारखे शब्दालंकार आणि अश्वप्लुत, समुद्गक, गोमूत्रिका, मुरज आदि बंधांत श्लोकातील अक्षरे घालता येतील अशी रचना करून कृत्रिमतेचा कळस केला आहे. त्याच्या कविताशक्तीची ही कसरत आश्चर्यकारक असली तरी सहृदयांना ती उद्वेगकारक होते यात संशय नाही.

धनञ्जयाने अनेक ठिकाणी कालिदासाच्या कल्पनांचे व शब्द-योजनेचे अनुकरण केले आहे. पुढील उदाहरणे पाहा–

१. कालिदास– दिवं मरुत्वानिव भोक्ष्यते भुवं
दिगन्तविश्रान्तरथो हि तत्सुतः ।
अतोऽभिलाषे प्रथमं तथाविधे
मनो बबन्धान्यरसान्विलङ्घ्य सा ।। रघुवंश, ३, ४.

द्विसन्धान–जाने हि मृत्स्नाभ्यवहारमात्रं
मातुः प्रकाश्य च्छलमन्तरात्मा ।
समुद्रवेलाजलसिक्तसीमां
गर्भस्थितः स ग्रसते स्म भूमिम् ।। द्विसन्धान, ३,७,

२. कालिदास– शुद्धान्तदुर्लभमिदं वपुराश्रमवासिनो यदि जनस्य ।
दूरीकृताः खलु गुणैरुद्यानलता वनलताभिः ।।
शाकुन्तल, १, १७.

---

२५. जैन साहित्य और इतिहास, पृ. ४४७–४४८.

धनञ्जय–यदीदृशमिदं रूपं स्याद्वनेऽन्तःपुरेण किम् ।
किमुद्यानलतावलेशै रम्या वनलतास्ति चेत् ॥
द्विसन्धान, ७, ८६.

३. कलिदास–पत्तिः पदातिं रथिनं रथेश–
स्तुरंगयायी तुरगाधिरूढम् ।
यन्ता गजस्याभ्यपतद्गजस्थं
तुल्यप्रतिद्विन्द्वि बभूव युद्धम् ॥ रघुवंश, ७, ३७.

धनञ्जय–रथो वरूथस्य हयस्य वाजी
गजः करेणोः पदिकः पदातेः ।
दुर्मन्त्रितं ध्यानमिवात्मबिम्बं
स्वस्यैव संनद्धमिवाग्रतोऽभूत् ॥ द्विसन्धान, १६, ८.

धनञ्जयाने अनेक ठिकाणी श्लेषादिकांचा उपयोग करून क्लिष्ट काव्यरचना केली असली तरी त्याची प्रतिभा अनेक ठिकाणी प्रसाद-गुणयुक्त नवनवोन्मेषशालि काव्य प्रसविण्यास समर्थ होती हे ' द्विसन्धान ' काव्यातील अनेक उदाहरणांवरून दाखविता येते.

उन्हाळ्यात गिरिगह्वरातील वनलतावेष्टित प्रदेशात वाहणाऱ्या निर्झरांचे पुढील वर्णन पाहा–

इह भान्ति मण्डलभुवः सलताः सवितर्दिका गिरिपतत्सलिलाः ।
वनदेवताभिरपदिश्य मिथः पथिकान्प्रपा इव शुचौ रचिताः ॥
द्विसन्धान, १२, २५.

यात ' हे निर्झर म्हणजे जणू काय वनदेवतांनी ग्रीष्मऋतूंत तृषित पान्थां-करिता घातलेल्या पाणपोई होत ' अशी उत्प्रेक्षा कवीने केली आहे.

युद्धात शत्रूच्या वक्षःस्थलावर आपल्या बाणांनी अनेक क्षते करणाऱ्या योद्ध्याचे खालील वर्णन पाहा–

ध्रुवस्य शौर्यायतनस्य कर्तुं राज्ञा शिलाशासनमिच्छतेव ।
वक्षः स्वनामाक्षरमार्गणाङ्कं परोवरस्याक्रियताखिलेन ॥ १६, ५९.

एखादे चिरकाल टिकणारे देवालय बांधले असता त्याच्याजवळ शिला-लेख ठेवला जातो; तसे आपल्या शौर्याचे स्वनामांकित बाणांनी शत्रूच्या वक्ष:स्थलावर कोरलेले हे जणू काय शिलाशासन होय अशी उत्प्रेक्षा येथे केली आहे.

अशा सुन्दर कल्पना या काव्यात अनेक ठिकाणी आढळतात. त्यांची निर्मिति करणाऱ्या प्रतिभेच्या या कवीने क्लिष्ट चित्रकाव्य करण्यात तिचा उपयोग केलेला पाहून सहृदय वाचकांस उद्वेग वाटल्यावाचून राहत नाही.

'राघवपाण्डवीय' या नावाची आणखी दोन काव्ये ज्ञात आहेत. यांपैकी श्रुतकीर्ति त्रैविद्याचे काव्य 'पम्परामायणा'तील उल्लेखावरूनचा ज्ञात आहे. ते ख्रिस्तोत्तर ११०० पूर्वी रचले होते. ते आता उपलब्ध नाही. त्याचा कर्ता श्रुतकीर्ति हा कोल्हापूरच्या रूपनारायण वस्तीचा तन्नामक जैन भट्टारक नव्हे हे मागे दाखविले आहे. या जैन भट्टारकाच्या स्तुतिपर श्लोक श्रवण बेळगोळ येथील स्तम्भलेखात आले आहेत ते 'पम्परामायणा'तून चुकीने घेतले आहेत. त्यानेही राघवपाण्डवीय काव्य रचले होते याला यत्किंचितही पुरावा नाही.[२६]

पण दुसरे एक 'राघवपाण्डवीय' काव्य कविराजनामक हिंदू पंडि-ताने रचलेले उपलब्ध आहे. ते निर्णयसागर प्रेसने १८९७ मध्ये छापले होते. ते आता अत्यंत दुर्मिळ झाले आहे. याचा कर्ता कविराज हा त्यातील खालील श्लोकावरून (१, ४१) अनेकांस ज्ञात आहे–

सुबन्धुर्बाणभट्टश्च कविराज इति त्रय: ।
वक्रोक्तिमार्गनिपुणाश्चतुर्थो विद्यते न वा ॥

यांपैकी सुबन्धु हा 'वासवदत्ता' या संस्कृत गद्यकाव्याचा कर्ता होय. त्या काव्यात तो 'माझ्या काव्याच्या प्रत्येक अक्षरावर श्लेष आहे' अशी बढाई मारतो.[२७] 'कादम्बरी' व 'हर्षचरित' या गद्यकाव्यांचा

---

२६. याची चर्चा शेवटी केली आहे ती पाहा.

२७. प्रत्यक्षरश्लेष.

कर्ता बाणभट्ट हा श्लिष्ट रचनेबद्दल सुप्रसिद्ध आहे. 'राघवपाण्डवीय' काव्याचा कर्ता कविराज हा आपण त्या दोघांच्या तोडीचे आहो, असे सांगतो.

त्याच्या कालाविषयी विविध मते आहेत. मॅक्डोनेलच्या मतानुसार तो इ. स. ८०० च्या सुमारास होऊन गेला. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी त्याचे काव्य धनंजयाच्या तन्नामक काव्यापेक्षा पुष्कळच प्रसादगुणयुक्त असल्यामुळे तो धनंजयाच्या पूर्वी इ. स. ९९६ व ११४१ यांच्या दरम्यान होऊन गेला असावा असा तर्क केला होता. डॉ. का. बा. पाठक यांच्या मते त्या काव्याची रचना इ. स. ११८२ व ११९७ यांमध्ये झाली असावी. श्री. वेंकटसुब्बय्या यांनी या काव्याचा कर्ता कविराज हा कदंबनृपति द्वितीय कामदेव याच्या आश्रयास होता, आणि त्याचे काव्य इ. स. १२३६ ते १३०७ या कालात रचले गेले असावे असे प्रतिपादिले आहे. तसेच कविराज ही पदवी असून त्या कवीचे खरे नाव माधवभट्ट होते ही डॉ. पाठकांची कल्पना त्याज्य ठरविली आहे. त्याचे 'राघवपाण्डवीय' काव्य प्रस्तुत लेखाचा विषय नसल्यामुळे या प्रश्नाची चर्चा येथे करीत नाही.

कविराजाचे 'राघवपाण्डवीय' काव्य धनंजयाच्या काव्यापेक्षा पुष्कळच प्रसादगुणयुक्त आहे. त्यानेही श्लेषाचा उपयोग सढळ हाताने केला आहे. उदाहरणार्थ पुढील श्लोक (१, ८५) पाहा–

प्रतीपदर्शिनी सैषा विचचारास्य यत्पथि ।
ततो गुरुगिरा तस्या जीवितेशो बभूव सः ॥

रामाने विश्वामित्राच्या आज्ञेवरून ताटकेचा वध केला, आणि भीमाने युधिष्ठिराच्या सांगण्यावरून हिडिंबेचा पत्नी म्हणून स्वीकार केला ह्या दोन रामायण–महाभारतातील घटनांचे या श्लोकात वर्णन आहे. यात 'जीवितेशः' पदावर श्लेष आहे–(१) अंतक व (२) पति असे दोन अर्थ. कविराजाच्या 'राघवपांडवीया'त दशरथाच्या (पांडूच्या) कारकीर्दीपासून रामाच्या (युधिष्ठिराच्या) अभिषेकापर्यंतची कथा रामायण–महाभारताला अनुसरून वर्णिली आहे.

कालान्तराने संस्कृतकवींनी यापुढे जाऊन त्रिसंधान, चतुःसन्धान आणि पञ्चसन्धान काव्ये रचण्यात आपल्या बुद्धिमत्तेची करामत दाखविली. त्यापैकी काहींचा निर्देश येथे करू[२८]—

१. इतर द्विसन्धान काव्ये—

१. विद्यामाधवाचे 'पार्वतीरुक्मिणीय'. यात शिव–पार्वती आणि कृष्ण–रुक्मिणी यांचा विवाह वर्णिला आहे. हा कवि चालुक्य सोमदेव याच्या आश्रयास होता.

२. हरदत्तसूरीचे 'राघवनैषधीय. हा भट्टोजी दीक्षितानंतर होऊन गेला. याचे दोनच सर्ग व १४८ श्लोक असून त्यात राम व नळ यांची कथा वर्णिली आहे.

३. संध्याकरनन्दीचे 'रामचरित'. हे ऐतिहासिक पद्धतीचे द्विसन्धान काव्य आहे. यात दाशरथि राम आणि बंगालचा पालनृपति रामपाल (खिस्तोत्तर अकरावे शतक) यांच्या चरित्रांचे त्याच शब्दांत वर्णन आहे. याला ऐतिहासिक महत्त्व आहे.

४. या तऱ्हेचेच हेमचन्द्राचे 'द्वयाश्रयकाव्य' संस्कृत–प्राकृतात रचले आहे.

त्रिसन्धान काव्ये

१. राजचूडामणि दीक्षिताचे 'राघवयादवपाण्डवीय' (सतरावे शतक). यात रामायण, भागवत आणि महाभारतातील कथा त्याच शब्दांत वर्णिल्या आहेत.

२. चिदंबर सुमतीचे 'राघवपाण्डवयादवीय'. हेही वरील प्रकारचेच काव्य आहे. यावर या कवीच्याच पित्याची अर्थदीपिका नामक टीका आहे.

---

28. *K. B. Pathak Commomeration Volume*, pp. 374 ff. यांतील वीरराघवाचार्य यांचा लेख पाहा.

चतुःसन्धान काव्य

एका अज्ञात कवीने 'नलयादवपाण्डवराघवीय' नामक चार कथांचे त्याच शब्दांत वर्णन करणारे काव्य रचले होते असा उल्लेख आढळतो. पण ते अद्यापि उपलब्ध झाले नाही.

पञ्चसन्धान काव्य

चिदम्बरकवीने 'पञ्चकल्याणचम्पू' नामक गद्यपद्यमिश्रित काव्य रचले होते. त्यावर त्याचीच शब्दशाणोपल नामक टीका आहे.

याशिवाय गतप्रत्यागत पद्धतीने रचलेली काही विलोमकाव्ये ज्ञात झाली आहेत.

* * *

मागे लिहिल्याप्रमाणे 'द्विसन्धान' ऊर्फ 'राघवपाण्डवीय' या काव्याचा कवि धनंजय हा शिलाहार नृपति गण्डरादित्य याच्या आश्रयाखालील कोल्हापूरच्या रूपनारायण जैन बस्तीचा भट्टारक श्रुतकीर्ति त्रैविद्य होय या डॉ. का. बा. पाठकांच्या मतामुळे शिलाहारांच्या इतिहासाचे परिशीलन करताना या प्रश्नाकडे माझे लक्ष गेले, आणि मी त्याचा अभ्यास करू लागलो. त्याला आवश्यक ते सर्व ग्रंथ नागपुरात उपलब्ध नसल्यामुळे त्यांपैकी काही मला पुण्याची भांडारकर संस्था व दिल्लीतील पुरातत्त्व खात्याचे ग्रंथालय यांकडून मागवावी लागली. लेख तयार झाल्यावर माझे स्नेही डॉ. आ. ने. उपाध्ये यांच्या पत्रातील एका उल्लेखावरून धनंजयाचे 'द्विसंधानकाव्य' भारतीय ज्ञानपीठ प्रकाशनाने नेमिचंद्राची पदकौमुदी टीका व हिंदी अनुवाद यांसह एक दोन वर्षांपूर्वीच प्रकाशित केल्याचे कळले.[२९] आता या काव्याचे अध्ययन करणे सोपे झाले आहे. त्या काव्याच्या या आवृत्तीला जैन ग्रंथांचे सुप्रसिद्ध संपादक डॉ. हीरालाल जैन आणि डॉ. आ. ने. उपाध्ये यांची विस्तृत प्रस्तावना लाभली आहे. तीत त्यांनी या कवीच्या कालाची सविस्तर चर्चा केली

---

२९. द्विसन्धान महाकाव्य–भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन.

आहे. ही आवृत्ति मला पूर्वी मिळती तर माझे पुष्कळसे श्रम वाचले असते. असो.

या प्रस्तावनेतील धनंजयकविविषयक बहुतेक विवेचन माझ्या वरील लेखातल्या सारखेच आहे. फक्त एका बाबतीत वरील संपादकद्वयांचा आणि माझा मतभेद आहे. ते म्हणतात, अभिनवपंपाने आपल्या रामचन्द्रचरितपुराण ऊर्फ पंपरामायण या कन्नड काव्यात गतप्रत्यागत पद्धतीने रचलेल्या 'राघवपांडवीय' काव्याचा कर्ता म्हणून ज्या श्रुतकीर्ति त्रैविद्याचा उल्लेख केला आहे तो कोल्हापुरच्या रूपनारायण बस्तीचा भट्टारक श्रुतकीर्ति त्रैविद्यच होय. त्याचा काल त्यांनी सन ११०० ते ११५० असा दिला आहे.[३०] हे मत मला मान्य नाही. त्याची थोडी चर्चा येथे करू.

जैन मुनींच्या यादीत तीच तीच नावे (हिंदूंच्या शंकराचार्यांच्या नावांप्रमाणे) पुनः पुनः येतात. त्यांची त्रैविद्य (आगम, तर्क व व्याकरण यांत निष्णात) ही पदवीही अनेक मुनींना लावलेली आढळते. तेव्हा नामसादृश्य आणि पदवीसादृश्य यांवरून मुनींचे ऐक्य मानणे बरोबर होणार नाही. इतर प्रमाणेही लक्षात घेतली पाहिजेत.

या दोन श्रुतकीर्ति त्रैविद्यांच्या भिन्नत्वाची प्रमाणे

कालभिन्नत्व–अभिनवपम्पाने राघवपांडवीय काव्याचा कर्ता म्हणून श्रुतकीर्ति त्रैविद्याचा उल्लेख केला आहे. 'पंपरामायणा' तून एक उतारा वण बेळगोळ येथील कोरीव लेख क्र. १२७ मध्ये घेतला आहे.[३१] त्या लेखाचा काल सन १११५ त्यात दिला आहे. तेव्हा अभिनवपंपाने प्रशंसिलेला श्रुतकीर्ति सन ११०० पूर्वी बराच काळ होऊन गेला असावा.

याच्या उलट कोल्हापूरच्या रूपनारायण बस्तीचा भट्टारक श्रुतकीर्ति याचा उल्लेख तेथील शकसंवत् १०५८ (सन ११३५) च्या कोरीव लेखात येतो. तेरदाळ येथील कोरीव लेखातही त्याचा उल्लेख

३०. पूर्वोक्त आवृत्तीतील इंग्रजी प्रस्तावना, पृ. १०–११

31. *Ep. Carn.* Vol. II, Transl., p. 54, f. n. 3.

आहे. त्याचा काळ शकसंवत् १०४५ (सन ११२३) हा आहे. तेव्हा त्या श्रुतकीर्ति त्रैविद्याचा कार्यकाल सन ११२० ते ११४० हा मानला पाहिजे. तेव्हा तो श्रुतकीर्ति सन ११०० पूर्वी बऱ्याच काळाने होऊन गेलेल्या आणि पंपाने ' राघवपांडवीयकाव्या 'चा कर्ता म्हणून प्रशंसिलेल्या श्रुतकीर्ति त्रैविद्याशी एकरूप असणे शक्य नाही.

२. **गुरुपरंपराभिन्नत्व**– मागे दाखविल्याप्रमाणे कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याची गुरुपरंपरा कुलभूषण–कुलचन्द्र–माघनन्दी–श्रुतकीर्ति अशी तत्कालीन कोरीव लेखांवरून सिद्ध झाली आहे. याच्या उलट पम्पाने ' राघवपांडवीय ' काव्याचा कर्ता म्हणून प्रशंसिलेल्या श्रुतकीर्ति तैविद्याची गुरुपरंपरा बालचन्द्र–मेघचंद्र–शुभकीर्ति (वासुपुज्य)–श्रुतकीर्ति अशी दिसते. म्हणून ते श्रुतकीर्ति एक नव्हत.

३. **तत्कालीन कोरीव लेखांत व वाङ्मयात ' राघवपाण्डवीया 'चा अनुल्लेख**–कोल्हापूरच्या रूपनारायण बस्तीचा भट्टारक श्रुतकीर्ति त्रैविद्य त्या काळी बराच प्रसिद्ध होता. कोल्हापूरच्या व तेरदाळ येथील कोरीव लेखांत त्याचा उल्लेख आहे. त्याने ' राघवपांडवीया 'सारखे काव्य रचले असते तर त्याचा उल्लेख त्या लेखात अवश्य येता. पण तसा उल्लेख त्यातच नव्हे तर त्यानंतर कोल्हापूरच्या शिलाहारांच्या राज्यातील कोणत्याही जैन लेखात आढळत नाही. हे अभावात्मक प्रमाण आहे. तेव्हा ते निर्णायक होऊ शकत नाही असे कोणी म्हणेल तर दुसरे प्रमाण देता येईल.

कोल्हापूरचा शिलाहार नृपति गण्डरादित्य हा स्वतःचे ' श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसाद ' (ज्याला कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा वर प्राप्त झाला आहे असा) असे वर्णन करीत असला तरी त्याचा जैनधर्माकडे विशेष ओढा होता. त्याला कर्णादेवी अशी जैनधर्मी राणी होती. त्याने स्वतः व त्याच्या मांडलिकांनी त्या काळी अनेक जैन मंदिरे उभारली होती व त्यांना त्या राजाच्या बिरुदांची नावे दिली होती. कोल्हापूर येथील पूर्वोक्त रूपनारायण जैन बस्ती त्याच्या निंबरस नामक सामंताने पार्श्वनाथ तीर्थंकराच्या पूजेकरिता उभारली होती. दुसरीही जैन तीर्थंकर

चन्द्रप्रभ याची बस्ती कोल्हापुरजवळ हेर्ले येथे होती. तिचे नाव 'त्रिभुवनतिलक' असे होते. हेही गण्डरादित्याचे बिरुद होते. तेथील भट्टारक बालचंद्र नामक जैन आचार्य होता.

या दुसऱ्या बस्तीशी संबद्ध कर्णपार्य नामक कन्नड कवीने 'नेमिनाथपुराण' नावाचा ग्रंथ कन्नड भाषेत त्या काळी रचला होता. तो ग्रंथ सन १९४० मध्ये मद्रास युनिव्हर्सिटीने छापला होता. तो आता दुर्मिळ झाला आहे. हा कवि गंडरादित्याचा पुत्र विजयादित्य (सन ११४० ते ११६५) याच्या काळी (श्रुतकीर्ति त्रैविद्यानंतर) कोल्हापूर येथे होता.[३२]

पण मग श्रवण बेळगोळच्या क्र. ६४ (सन ११६३) च्या स्तम्भ-लेखात कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याची 'राघवपाण्डवीय' नामक गतप्रत्यागत पद्धतीने रचलेल्या काव्याचा कर्ता' म्हणून प्रशंसा कशी आली आहे ? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर देणे कठीण नाही. ही प्रशंसा अभिनवपम्पाच्या (सु. सन ११००) 'पम्परामायणा'तून (प्रथम आश्वास, श्लोक २४-२५) घेतली आहे. श्रवणबेळगोळ येथे लेख कोरविणारे त्या 'रामायणा'तून उतारे घेऊन स्वतःस इष्ट अशी जैनमुनींची प्रशस्ति बनवीत असत. याचे आणखीही एक उदाहरण श्रवण बेळगोळ येथील क्र. १२७ (सन १११५) च्या कोरीव लेखांत आढळते. त्यांत शेवटच्या मेघचन्द्रमुनीच्या प्रशंसेत अभिनवपम्पाच्या 'पम्प-रामायणा'तून (आश्वास १, श्लो. २०) हा श्लोक घेतला आहे. तेव्हा श्रवण बेळगोळच्या कोरीव लेखातील उल्लेखावरून कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याने 'राघवपाण्डवीय' काव्य रचले होते हे सिद्ध होत नाही.

अभिनवपम्पाने उल्लेखिलेले काव्य अद्यापि उपलब्ध झाले नाही, तेव्हा त्याविषयी काहीच माहिती देता येत नाही. ते संस्कृतात तरी लिहिले होते काय हेही निश्चितपणे माहीत नाही. अभिनवपम्पाने आपल्या काव्यात प्रशंसिलेले इतर कवि कन्नड काव्य रचणारे होते.

---

३२. या कन्नड ग्रंथातील माहिती डॉ. आ. ने. उपाध्ये यांनी मला पुरविली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तेव्हा हे श्रुतकीर्तींचे ‘ राघवपाण्डवीय ’ काव्य कन्नडमध्येच रचले असेल. अशी काव्ये देशी भाषांतही रचली जात.

या कर्णपार्याने विजयादित्याचा मंत्री लक्ष्मण याच्या आश्रयाखाली हे ‘ नेमिनाथपुराण ’ रचले. त्याच्या आरंभी त्याने पूर्वीच्या कन्नड कवींची प्रशंसा केली आहे. त्यांमध्ये पोण्ण, रन्न, पम्प आणि नागचन्द्रकवीन्द्र (अभिनवपम्प) यांचा अंतर्भाव आहे. पण ‘ राघवपाण्डवीय ’ काव्य रचणाऱ्या श्रुतकीर्ति त्रैविद्याचा निर्देश केला नाही. गण्डरादित्याच्या काली कोल्हापूरच्या रूपनारायण बस्तीच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याने ‘ राघवपाण्डवीया ’सारखे गतप्रत्यागत पद्धतीचे काव्य रचले असते तर गंडरादित्याचा पुत्र विजयादित्य याच्या मंत्र्याचा आश्रित कर्णपार्य याने कोल्हापुराजवळ रचलेल्या ‘ नेमिनाथपुराणा ’त त्याचा व त्याच्या काव्याचा उल्लेख अवश्यच केला असता. पण तो ‘ नेमिनाथपुराणा ’त श्रुतकीर्ति त्रैविद्याचा किंवा त्याच्या ‘ राघवपाण्डवीया ’चा मुळीच नामनिर्देश करीत नाही. यावरून त्या काव्याचा कर्ता कोल्हापुरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याहून भिन्न होता यात संशय नाही.

२. धनंजय कवीची ‘ नाममाला ’

अमरसिंहाचे ‘ नामलिंगानुशासन ’ ऊर्फ ‘ अमरकोश ’ हा सर्वांत प्राचीन असा श्लोकबद्ध कोश गणला जातो. पण त्याच्या कर्त्याने स्वतःच ग्रंथारंभी म्हटले आहे की आपण इतर कोशकारांचे ग्रंथ जमवून, त्यांचा संक्षेप करून व सुधारून आपला कोश रचला आहे. ‘ कल्पद्रुमकोशा ’चा कर्ता केशव याने खालील श्लोकात संस्कृत कोशकारांची नावे ग्रथित केली आहेत[१]–

कात्यवाचस्पतिव्याडिभागुर्यमरमङ्कलाः ।
साहसाङ्कमहेशाद्या विजयन्ते जिनान्तिमाः ॥

या श्लोकामध्ये खालील कोशकारांची नावे आली आहेत. कात्य, बृहस्पति, व्याडि, भागुरि, अमर, मङ्कल, साहसाङ्क (विक्रमादित्य), महेश आणि शेवटी जिन. यांपैकी बहुतेकांचे कोश ‘ अमरकोशा ’ने स्वकीय गुणवत्तेच्या योगे मागे टाकून नष्ट केले आहेत. त्यांतील काहींचे उल्लेख ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकात होऊन गेलेल्या क्षीरस्वामीच्या ‘ अमरकोशा ’वरील टीकेत आले आहेत. प्रस्तुत लेखात अमरसिंहापूर्वी होऊन गेलेल्या आणखी एका कोशकाराविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचे नाव धनंजय. त्याचा ‘ नाममाला ’ नामक कोश नुकताच भारतीय ज्ञानपीठ मालेत प्रसिद्ध झाला आहे. त्याचे २०३ श्लोक आहेत. मागील लेखांत सांगितल्याप्रमाणे धनंजय हा जैनधर्मानुयायी होता. त्याच्या ग्रंथारंभी दोन मंगलश्लोक आले आहेत. त्यांपैकी पहिला श्लोक येणेप्रमाणे–

---

१. अमरकोशावरील क्षीरस्वामीची टीका (सं. कृ. गो. ओक), प्रस्तावना, पृ. ४.

तन्नमामि परं ज्योतिरवाङ्मनसगोचरम् ।
उन्मूलयत्यविद्यां यद् विद्यामुन्मीलयत्यपि: ।।

यात जैनधर्मात्मक असे काही नाही. हा श्लोक एखाद्या वेदान्तपर ग्रंथाच्या आरंभीही येऊ शकला असता. दुसऱ्या श्लोकात मात्र जिनाचा उल्लेख आहे–

द्वयं द्वितयमुभयं यमलं युगलं युगम् ।
युग्मं द्वन्द्वं यमं द्वंतं पादयोः पातुजैनयोः ।।

नंतर नामे (शब्द) देण्यास ग्रंथकाराने सुरुवात केली आहे. 'अमरकोशा'तल्याप्रमाणे ही नामे वर्गांमध्ये विभागून दिली नाहीत. हा कोशकार एका अर्थाच्या शब्दांनंतर त्याच्याशी संलग्न अशा दुसऱ्या शब्दांकडे वळतो. उदाहरणार्थ, जिनविषयक पूर्वोक्त श्लोक दिल्यानंतर तो मुन्यर्थक शब्द देतो : कारण जिन हा एका मुनि होता. नंतर मुनींचे शिष्य व पुढे त्यांचे सिद्धान्त यांचे वाचक शब्द येतात. मुनि पृथ्वीवर पर्यटण करतो; म्हणून नंतर तिचे (भूमीचे) वाचक शब्द दिले आहेत. भूमीनंतर भूधर शब्द येतो. त्याचे (१) पर्वत, (२) राजा व (३) वृक्ष असे तीन अर्थ होतात. म्हणून हा कोशकार प्रथम पर्वत, त्याचे पठार इत्यादिकांचे वाचक शब्द देतो. नंतर राजा, व शेवटी वृक्ष यांचे शब्द येतात. वृक्षांवर माकडे असतात म्हणून नंतर त्यांचे, पुढे अरण्य, वनवासी, व्याध, पारधी यांचे वाचक शब्द घेतले आहेत. पृथ्वीनंतर जल आलेच. तत्संबंधी मत्स्य, मेघ, कमल, सागर इत्यादि शब्द घेतले आहेत. पुढे मनुष्य, नंतर त्यांचा राजा, सेवक, पत्नी, स्त्रियांचे विविध प्रकार, कुलटा, अभिसारिका, गणिका, यांचे वाचक शब्द येतात. नंतर प्रियकर, प्रिया, कुटुंबातील माता, पिता, पुत्र, कन्या व शेवटी इतर नातलग या अर्थांचे शब्द घेतले आहेत.

पूर्वोक्त वर्णनावरून या कोशकाराने नामांचे (शब्दांचे) गण कसे दिले आहेत याची कल्पना येईल. अमरसिंहाने महत्त्वास अनुसरून देव, देवता, स्वर्ग, त्यांतील देवांची वाहने, शस्त्रे वगैरे यांचे शब्द प्रथम दिले आहेत. पण प्रस्तुत कोशकाराने ही पद्धति अवलंबिली नाही. तो स्वतः

जैन होता. पण त्याचे आराध्य जिन याचा निर्देश आनुषंगिक रीतीने पुढील श्लोकार्धात आला आहे–

विष्टपं भुवनं लोको जगत् तस्य पतिर्जिनः ॥

त्याने सर्व जिनांचीही नामावलि कोठेही दिली नाही. फक्त महावीराचा उल्लेख श्लो. ११५ मध्ये आला आहे. त्या मानाने हिंदू देवदेवतांची अवस्था बरी आहे. ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र, इंद्राणी, लक्ष्मी, सरस्वती यांचा निर्देश, आनुषंगिक रीतीने का होईना, आला आहे. कृष्णावतारांतील घटनांचा कोशकाराला परिचय आहे. बलराम, त्याची पत्नी रेवती यांचे उल्लेख आहेत. देवपुत्रांमध्ये मदन आणि कार्त्तिकेय हे आले आहेत. पण गजाननाचा पत्ता नाही. कार्त्तिकेयाची नावे एकत्र देऊन शिवाय त्याचे आणखी एक नाव गुह हे मयूरवाचक शब्दांच्या अनुषंगाने खालील श्लोकात आले आहे–

मयूरो बर्हिणः केकी शिखी प्रावृषिकस्तथा ।
नीलकण्ठः कलापी च शिखण्डी तत्पतिर्गुहः ॥२॥

याप्रमाणे गजवाचक शब्द देताना गजाननाचा उल्लेख करता आला असता, पण कोशकाराने तो केला नाही. ही गोष्ट त्याच्या कालाची सूचक आहे.

प्रस्तुत कोशकाराने दिलेले काही अर्थ उल्लेखनीय आहेत–उदाहरणार्थ, 'देवानाम्प्रिय' व 'मत्तवारण' यांचे पुढील अर्थ पाहा–

(१) **स देवानाम्प्रियोऽप्राज्ञो मन्दो धीनामवर्जितः ।**
(२) **निर्व्यूहो मत्तवारणः ।**

या कोशाच्या शेवटी धनंजयाने आपला उद्देश संस्कृत शब्दांचे अर्थ देण्याचा आहे असे म्हटले आहे. या प्रसंगाने त्याने पातंजल 'महाभाष्या'त आलेली वाचस्पति व इंद्र यांची कथा दिली आहे.

धनञ्जयाने प्रस्तुत कोशात नानार्थक शब्दांचा अंतर्भाव केला नाही. त्याकरिता त्याने 'अनेकार्थनाममाला' रचली आहे. तिच्या आरंभी

त्याने जिनेन्द्राला नमन केले आहे. ती रचण्यात कवींना साहाय्य करणे (कवीनां हितकाम्यया) आपला हेतु आहे असे त्याने म्हटले आहे. अशा तऱ्हेच्या अनेकार्थनामकोशाची गरज त्याला स्वत:लाही 'द्विसंधानकाव्य' रचताना भासली असेल. या ग्रंथातील 'इति' अव्ययाचे अर्थ देणाऱ्या श्लोकाने (क्र. ३९) त्याच्या कालावर काय प्रकाश पडतो हे आम्ही मागे दाखविले आहे.

धनंजयाच्या 'नाममाले'ची अमरसिंहाच्या 'अमरकोशा'शी तुलना केली असता ती नाममाला 'अमरकोशा'पेक्षा निकृष्ट आणि म्हणून त्याच्यापेक्षा प्राचीन असावी, असे अनुमान होते. 'अमरकोश' तिच्यापेक्षा अधिक शब्दसंग्राहकच नाही तर जास्त पद्धतशीर रीतीने रचला आहे. त्यामध्ये केवळ नामेच (शब्दच) दिली नसून त्यांची लिंगेही सांगितली आहेत. म्हणून त्याचे 'नामलिंगानुशासन' हे नाव सार्थ आहे. धनंजयाने कोठेही शब्दांच्या लिंगांचा निर्देश केला नाही. शिवाय 'अमरकोशा'त नानार्थशब्दही दिले आहेत. 'अमरकोशा'ने शब्दांची तीन कांडे केली आहेत. पहिल्या कांडात पुढील वर्ग किंवा शब्दसमूह आले आहेत. स्वर्ग, व्योम (आकाश), दिक्, काल, पाताल, नरक इत्यादि. दुसऱ्या कांडात भूमि, नगर, पर्वत, वनौषधि, सिंहादि पशु, मनुष्य त्यांच्या जातिवगैरेंचे वाचक शब्द घेतले आहेत तिसऱ्या कांडात विशेषणे, नानार्थशब्द, अव्यये यांचा अंतर्भाव केला आहे. ही व्यवस्था 'नाममाले'तल्या पेक्षा जास्त पद्धतशीर दिसते. 'नाममाले'च्या कर्त्याला 'अमरकोश' माहीत असता तर त्याने आपल्या ग्रंथात शब्दांचा असा गडबडगुंडा केला नसता.

'नाममाले'च्या प्राचीनत्वाचे दुसरे गमक हे की त्यात गजाननाचा उल्लेख नाही. याच्या उलट 'अमरकोशात'त त्याच्या स्वरूपाचे पूर्ण वर्णन आढळते. पुढील श्लोक पाहा—

विनायको विघ्नराजद्वैमातुरगणाधिपाः ।
अप्येकदन्तहेरम्बलम्बोदरगजाननाः ॥

यामध्ये गजानन हा पार्वतीचा औरस पुत्र नसून तिने दत्तक घेतला होता. या कथेचा उल्लेख त्याच्या ' द्वैमातुर ' नावात आला आहे. यावरून त्या कोशाचा कर्ता बऱ्याच नंतरच्या काली होऊन गेला असे दिसते.

' अमरकोशा 'चा काल कोणता ? ' ज्योर्तिविदाभरणा 'तील एका श्लोकात विक्रमादित्याच्या नवरत्नांपैकी एक, म्हणून त्याच्या कर्त्याचा उल्लेख आहे. पण हा ग्रंथ कालिदासकृत नसून बनावट आहे हे आता सिद्ध झाले आहे.[२] पुष्कळ वर्षांपूर्वी मॅक्स मूलरने म्हटले होते की उज्जैनीच्या गुणराताने ' अमरकोशा 'चे चीनी भाषेत भाषांतर सहाव्या शतकात केले होते. पुढे त्याने हे आपले विधान मागे घेतले.[३] तरीही ते अद्यापि कांही विद्वान् उल्लेखिताना दिसतात.[४] विंटरनिट्झ्च्या मते अमरसिंह ख्रिस्तोत्तर सहाव्या आणि आठव्या शतकांमधील कालात होऊन गेला असावा.[५] पण या मताचे साधक असे खात्रीलायक प्रमाण त्याने दिले नाही. तो एवढेच

---

२. मिराशी, ' कालिदास ' (तृतीयावृत्ति), पृ. ३१–३२.

३. मॅक्स मूलर, *India, What can it teach us.* (first ed. p. 328). पण नंतर पृ. ३७६ वर टिप्पणीत मॅक्स मूलरने बुन्यिउ नंजिओ याचा हवाला देऊन असे म्हटले आहे की तो ग्रंथ ' अमरकोश ' नसून ' कोशशास्त्रहेतुप्रत्ययवस्तु ' होता आणि त्याचा अनुवादक गुणरात नसून कुलनाथ होता. नंतर मॅक्स मूलरने पुढील उद्गार काढले आहेत–" It shows how careful we ought to be in using the statements even of our best Chinese scholars." मॅक्स मूलरच्या या पुस्तकाच्या पुढील आवृत्तींत " गुणराताने अमरकोशाचे चिनी भाषेत भाषांतर सहाव्या शतकात केले, " हे विधान गाळले आहे.

४. उदाहरणार्थ, अलीकडे ए. ए. रामनाथन् यांनी अलीकडे प्रसिद्ध केलेली अमरकोशाची आवृत्ति (अडयार लायब्ररी) प्रस्तावना, पृ. २०, पाहा.

५. *History of Indian Literature,* (Eng. tr., pub. by Motilal Banarsidass), Vol. III, part II, p. 456.

म्हणतो की अमरसिंह हा बौद्ध धर्माचा ख्रिस्तोत्तर आठव्या शतकात जो ऱ्हास झाला त्यापूर्वी होऊन गेला असावा. हे अनुमान निर्णायक नाही. 'अमरकोशा'तील शब्दार्थाचा पहिला उल्लेख जिनेंद्रबुद्धीच्या 'न्यासा'त येतो असे समजले जाते. जिनेन्द्रबुद्धि आठव्या शतकात होऊन गेला. म्हणून 'अमरकोशा'चा काल त्यापूर्वीचा मानण्यात येतो. पण 'न्यासा'-तील हा उतारा त्यांत नंतरच्या काळी घुसडला होता व म्हणून तो अविश्वसनीय आहे[६], असे आता सिद्ध झाले आहे. 'अमरकोशा'तील आणखी एक उतारा शाकटायनाच्या 'अमोघवृत्ती'त आढळला आहे. हा ग्रंथ राष्ट्रकूट नृपति पहिला अमोघवर्ष (इ. स. ८१४–८७८) याच्या कारकीर्दीत लिहिला गेला. तेव्हा अमरसिंह इ. स. ८५० पूर्वी होऊन गेला असावा असे म्हणता येईल. धनञ्जय कवीची 'नाममाला' अमर-कोशापेक्षा निकृष्ट स्वरूपाची असल्यामुळे तिचा काल, सुमारे इ. स. ७५०–८०० हा मानता येईल. हेच आम्ही पूर्वीच्या लेखात दाखविले आहे.

धनंजयाच्या कालाची पूर्व मर्यादा 'नाममाले'च्या पुढील श्लोकां-तील अकलंकाचा प्रमाणावरील ग्रंथ आणि पूज्यपादाचा व्याकरण-विषयक ग्रंथ यांच्या निर्देशाने निश्चित होते–[७]

प्रमाणमकलंकस्य पूज्यपादस्य लक्षणम् ।
द्विसन्धानकवेः काव्यं रत्नत्रयमपश्चिमम् ॥

अकलंकाच्या कालाविषयी दोन मते आहेत. डॉ. उपाध्ये आणि कैलासचंद्र शास्त्री यांच्या मते तो ख्रिस्तोत्तर सातव्या शतकाच्या मध्यात होऊन

---

६. 'काशिकाविवरणपञ्जिका' ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याचे संपादक श्रीश चक्रवर्ती म्हणतात की, 'अथवा तन्त्रं सिद्धान्ते। तन्त्रं प्रधानं सिद्धान्ते इत्यमरः' हा संदर्भ डेक्कन कॉलेज (आता भांडारकर इन्स्टिटयूट) मधील हस्तलिखितातच आढळतो. तो वरेंद्र रीसर्च सोसायटी, राजशाही, आणि त्रिवेंद्रम् सरकारच्या ग्रंथसंग्रहालयातील मलयालम् लिपीत लिहिलेल्या हस्तलिखितांत सापडत नाही.

७. नाममला (भारतीय ज्ञानपीठ आवृत्ति), पृ. ९२.

गेला असावा. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर व डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण यांच्या मते आठव्या शतकाचा मध्य हा त्याचा काल असावा. ‘ अकलंक-ग्रन्थत्रयम् ’ (सिंघी जैन ग्रंथमाला) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पं. महेन्द्र-कुमार शास्त्री यांना अकलंकाच्या कालाची सविस्तर चर्चा करून तो इ. स. ७२० ते ७८० या कालात होऊन गेला असावा.[८] असे दाखविले आहे. तेव्हा त्याच्या ‘ प्रमाण ’ग्रंथाचा उल्लेख करणारा धनंजय कवि इ. स. ७५० पूर्वी झाला असणे शक्य नाही.

वरील श्लोकात उल्लेखिलेला दुसरा ग्रंथकार पूज्यपाद हा गंग नृपति दुर्विनीत (सु. इ. स. ५४०–६००) याचा गुरु होता अशी परंपरागत समजूत आहे ती खरी असावी.[९] धनंजय त्याच्या नंतर पुष्कळ कालाने होऊन गेला.

धनंजयाचा हा काळ (ख्रिस्तोत्तर ७५०–८००) ‘ नाममाले ’तील गजाननाच्या उल्लेखाभावाने समर्थित होतो. आम्ही इतरत्र दाखविले आहे की गजानन गुप्तकालाच्या शेवटी पुढे येऊ लागला. वराहमिहिराच्या ‘ बृहत्संहिते ’तील त्याच्या वर्णनाचा श्लोक नंतरच्या काळात त्या ग्रंथात घुसडला गेला हे आता सिद्ध झाले आहे.[१०] बाणाच्या हर्षचरितात त्याचा ‘ एकदन्त ’ म्हणून उल्लेख येतो.[११] भवभूतीने (ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाचा पूर्वार्ध) त्याचे शिवाचा एक गण म्हणून विनोदी वर्णन केले आहे.[१२] अद्यापि त्याचे शिव–पार्वतीचा पुत्र म्हणून वर्णन आढळत नाही.

---

८. ‘ अकलंकग्रन्थत्रयम् ’ची महेन्द्रकुमारशास्त्रींची प्रस्तावना, पृ. १२.

९. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते पूज्यपाद ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. त्यांची जैनेन्द्र व्याकरणाची प्रस्तावना पाहा.

१०. A. M. Shastri, *India as seen in the Bṛihatsaṁhitā of Varahamehira*, p. 148.

११. हर्षचरित्र, उच्छ्वास ४, श्लो. २.

१२. मालतीमाधव, अं. १, श्लो. १.

मग तो पार्वतीचा दत्तक पुत्र होता ही कथा तर दूरच राहिली! शिवाय हिंदू देवतांची जैन कवींना माहिती होऊन त्यांच्याकडून त्यांचा उल्लेख होण्यास काही काळ लागला असावा. म्हणून त्याचा निर्देश धनंजयाच्या नाममालेत आला नसला तर त्यात आश्चर्य नाही. 'अमरकोशात'त त्याच्या स्वरूपाचे पूर्णपणे वर्णन येते. त्यावरून तो कोश ख्रिस्तोत्तर नवव्या शतकाच्या प्रथमार्धात रचला असावा. राष्ट्रकूट नृपति प्रथम अमोघवर्ष (इ. स. ८१४–८७८) याच्या काळी होऊन गेलेल्या शाकटायनाच्या 'अमोघवृत्ती'त त्यातील उतारा आला तर त्यात आश्चर्य नाही.

'नाममाला' या नावाचा आणखी एक कोश होता. त्याचा उल्लेख क्षीरस्वामीने 'अमरकोशा'वरील आपल्या टीकेत केला आहे. त्याच्या कर्त्याचे नाव माहीत नाही, पण क्षीरस्वामीच्या टीकेतील उताऱ्यांवरून तो कोश धनञ्जयाच्या 'नाममाले'हून निराळा दिसतो. खालील उतारे पाहा[13]—

निकषा रक्षसां माता । पृ. १३
निखर्वः खट्टरः खर्वः । पृ. ९९
पाणिः शमः शयो हस्तः । पृ. १०४

यांतील एकही श्लोकपाद धनञ्जयाच्या 'नाममाले'त आढळत नाही.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे धनञ्जयाने आपल्या 'नाममाले'त नानार्थवाचक शब्द घेतले नाहीत. त्याकरिता त्याने 'अनेकार्थनाममाला' रचली आहे. तीत ४४ श्लोकांत अनेकार्थवाचक शब्द दिले आहेत. आरंभी पूज्यपाद व चैलाचार्य शिवायन यांना नमन केले आहे. या ग्रंथातही नंतरच्या अनेकार्थशब्दकोशांतल्याप्रमाणे शब्द अकारविल्ह्याने ग्रथित केले नाहीत.

---

१३. अमरकोश (क्षीरस्वामीच्या टीकेसहित), परिशिष्ट १, पृ. २.

३. 'श्रीवाडेश्वरोदयकाव्य' आणि चित्पावन या उपजातिनामाची व्युत्पत्ति*

शिलाहारांच्या कोरीव लेखांचा अभ्यास करताना कै. डॉ. मो. गं. दीक्षित यांनी आपल्या एका लेखात केलेल्या खालील विधानाकडे माझे लक्ष गेले. "डॉ. अ. द. पुसाळकरांनी संपादिलेल्या 'श्रीवाडेश्वरोदय-काव्या'त चिपळूण जवळच्या लेण्यांतील शिलाहारकालीन विन्ध्यवासिनी आणि कार्त्तिकेय यांच्या मूर्तींचा उल्लेख आहे." नंतर चौकशी केल्यावर पुण्याच्या भांडारकर मंडळाचे क्यूरेटर डॉ. भट यांनी त्या काव्याची एक प्रत मला पाठविली. तिजवरून डॉ. पुसाळकरांनी ते काव्य नाशिक येथे कै. डॉ. कुर्तकोटी यांच्या आश्रयाने काही काळ प्रसिद्ध झालेल्या 'ओरिएंटल थॉट' या इंग्रजी नियतकालिकात पुरवणीरूपाने प्रसिद्ध झाल्याचे समजले. त्या प्रतीला ग्रंथनामाचे पृष्ठ, प्रस्तावना वगैरे जोडली नसल्याने त्या ग्रंथाचे हस्तलिखित डॉ. पुसाळकरांना कोठे मिळाले वगैरे माहिती मिळाली नाही. भांडारकर मंडळाकडे आणि पूर्वोक्त नियत-कालिकाचे संपादक डॉ. देवस्थळी यांच्याकडे विचारणा करूनही काही माहिती मिळाली नाही. हे काव्य वाचल्यावर त्यातील शिलाहारकालीन शिल्पांचे उल्लेख आणि चित्पावन या ब्राह्मण उपजातीच्या नावाची व्युत्पत्ति यांनी माझे लक्ष आकृष्ट केले. त्या काव्याच्या निर्मितीचा शक संवत् १५५० (सन १६२८) हा कालोल्लेख त्यात असल्यामुळे त्यातील माहितीला आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. या काव्यावर पूर्वी कोणी लिहिले नसावे असे वाटून मी त्यावर सविस्तर लेख लिहून तो विदर्भ संशोधन मंडळाच्या दि. २५-८-७४ च्या सभेत वाचला.

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७४, पृ. ८९-९९.

त्यानंतरच्या चर्चेत या काव्यातील माहितीचा उपयोग कै. ना. गो. चापेकर यांनी अगोदरच आपल्या 'चित्तपावन' नामक ग्रंथात केला असल्याची माहिती प्रा. भ. श्री. पंडित यांनी दिली. म्हणून ते पुस्तक (प्रकाशन काल सन १९३८) नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयातून आणवून वाचले. पण त्यात या काव्याचा उल्लेख आढळला नाही. पण नंतर धरमपेठ हायस्कूल मधील लेखनिक श्री. ज. अ. जोशी यांनी त्या पुस्तकाची आपली प्रत आणून दाखविली. त्यावरून त्या पुस्तकाच्या सन १९६६ च्या दुसऱ्या आवृत्तीत या काव्याची चर्चा चापेकरांनी सविस्तर केल्याचे आढळले. तेव्हा आता त्या काव्याचा परिचय करून देण्याची जरूरी नाही. पण त्यात कोकणातील गुहागर, चिपळूण इत्यादि ठिकाणच्या चित्पावनांच्या वसतीबद्दल आणि त्यांच्या जातिनामाच्या व्युत्पत्तीबद्दल केलेल्या विधानांची चिकित्सात्मक चर्चा करणे आवश्यक आहे.

'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'चे एकच हस्तलिखित[1] सध्या उपलब्ध असून त्याची नोंद कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटीतील हस्तलिखितांच्या वर्णनात्मक कॅटलॉगच्या सातव्या विभागाच्या (काव्यग्रंथ) १७८–१८० पृष्ठांवर आहे. या हस्तलिखिताबद्दल माहिती डॉ. पुसाळकरांना भांडारकर मंडळाचे क्यूरेटर कै. डॉ. गोडे यांच्याकडून मिळाली होती. त्यांनी त्याचा अभ्यास करून जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच, रॉयल एशियाटिक सोसायटी, व्हॉ. २७, पृ. ६६–७८ मध्ये इंग्रजीत आणि नंतर 'स्वामी केवलानंद गौरवग्रंथ', पृ. ८३–१०२ (प्रकाशन काळ १९५२) मध्ये मराठीत लेख लिहून त्याची सविस्तर माहिती दिली आहे. पूर्वोक्त 'स्वामी केवलानंद गौरवग्रंथा'त माझाही एक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाला आहे. पण डॉ. पुसाळकरांच्या या लेखाकडे माझे

---

१. ग्रंथाचे एकच हस्तलिखित मिळाले असले तरी पृ. ५ वर पुसाळकरांनी २४ व्या श्लोकाच्या चतुर्थ चरणाचे एक पाठांतर कसे दिले ते समजत नाही. कदाचित् ते मूळ पोथीच्या समासात कोणी लिहिले असावे.

लक्ष त्यावेळी गेले नव्हते. श्री. चापेकरांनी आपल्या 'चित्पावन' ग्रंथाची सन १९३८ मध्ये पहिली आवृत्ति प्रसिद्ध केली तेव्हा हे काव्य किंवा त्याचा सारांश प्रसिद्ध झाला नसल्यामुळे त्यातील चित्पावन शब्दाच्या व्युत्पत्तीची चर्चा त्यांनी त्या आवृत्तीत केली नव्हती. नंतर '**इंडियन थॉट**' या नियतकालिकात पुसाळकरांनी ते काव्य समग्र प्रसिद्ध केले' असल्या-मुळे त्यांनी त्यातील माहितीची सविस्तर चर्चा आपल्या 'चित्पावन' ग्रंथाच्या सन १९६६ मध्ये प्रकाशिलेल्या द्वितीयावृत्तीत (पृ. १८२–१९७; २६२–२७०; ३०२–३०६) केली आहे.

'श्रीवाडेश्वरोदयकाव्य' काश्यपगोत्री विश्वनाथ कवीने शकसंवत् १५५० (सन १६२८–२९) मध्ये रचले होते. त्याने त्याची मिती खालील श्लोकात दिली आहे–

रन्ध्रबाणतिथिसंमिताब्दके
शालिवाहनशके गते सति ।
ग्रन्थपूर्तिसुकृतं कृतं चिरं
चक्रपाणिचरणे समर्पितम् ।।

तेव्हा हे काव्य शिवजन्मकालाइतके म्हणजे सुमारे ३५० वर्षांइतके प्राचीन आहे. त्याच्या पूर्वोक्त हस्तलिखिताचा लेखनकाल शेवटी पुढील श्लोकांत दिला आहे–

खगाश्वबाणभूयुक्ते शके विजयवत्सरे ।
वाडेश्वरोदयं काव्यं द्विजो रामो व्यलीलिखत् ।।

या श्लोकांतील 'खग' या शब्दाने एक, पाच आणि नऊ या तीन संख्या दाखविल्या जातात. पण येथे पाच हीच संख्या घेतली पाहिजे. म्हणजे त्या हस्तलिखिताचा काल शक संवत् १५७५ (सन १६५३–५४) येईल. त्या वर्षाला 'विजय संवत्सर' जुळते. तेव्हा हे हस्तलिखित प्रस्तुत काव्य निर्मितीनंतर पंचविसाव्या वर्षी लिहिले होते असे दिसते.

'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'च्या पाचव्या सर्गातील श्लोक २३ पासून ('चित्तपावन' गुहागर जवळचे चिपळूण) या गावाची कथा सुरू होते.

आपल्या संगतीकरिता ब्राह्मण असावे म्हणून परशुराम कावेरी नदीला गेला आणि पयोष्णीतीराहून तेथे आलेल्या वेदवेदांगपारंगत अशा साठ ब्राह्मणांना आपणांबरोबर घेऊन आला. पुढील श्लोक पाहा–

अथ रामो महाबुद्धिः कावेरीसरितं गतः ।
आनेतुं ब्राह्मणान्मुख्यान्निजसंगतये कृती ।। १३ ।।
तत्रार्या ब्राह्मणा मुख्याः पयोष्णीतीरसंभवाः ।
स(स्व)गृहप्रोषिताः पुण्या वेदवेदांगपारगाः ।। १४ ।।
तानुवाच समेतांस्तैः कृतातिथ्यो महामुनिः ।
सर्वं शृणुध्वं भो विप्रा मद्वाचं दत्तमानसाः ।। १५ ।।

× × ×

स्वकृते निर्मिता भूमिः सह्याधः सागरोदरे ।
तत्र साक्षात्स्वयं शंभुर्मद्वात्सल्यादधिष्ठितः ।। १८ ।।

× × ×

तत्र वो नेतुमिच्छामि स्वान्मत्वा स्वाश्रमान्तिके ।
सुखं तत्र समाध्वं वो मद्बाहुबलपालिताः ।। २१ ।।
इत्थं महर्षिणा प्रोक्ता मिथ आमन्त्र्य मंत्रिणः ।
ज्ञात्वा तमादिपुरुषमादृता द्रुतमाययुः ।। २६ ।।
रामोऽपि तान्समानीय षष्टिसंख्यान्कुटुंबिनः ।
पवित्रगोत्रान्गोत्रायां तद्वासार्थं स्वसंनिधौ ।। २७ ।।
पुरं पुरंदरपुरप्रतिमं विश्वकर्मणा ।
कारयामास सर्वेशः सर्वसंपद्विभूषितम् ।। २८ ।।
रामतीर्थस्य नद्याश्च प्रत्यग्दक्षिणयोः क्रमात् ।
तत्र तान् स्थापयामास ब्राह्मणान्ब्राह्मणाग्रणीः ।। ३० ।।
यथाधिकारं रम्येषु स्वधिमत्सु गृहेष्वथ ।
रामस्य चित्तमपुनात्पूर्णकामस्य तद्यतः ।। ३१ ।।
पुरं हृद्यतमं नाम्ना विदधे चित्तपावनम् ।
ततस्ते ब्राह्मणास्तत्स्था नाम्नासंश्चित्तपावनाः ।। ३२ ।।

(५.१३–३२)

या श्लोकांत परशुरामाने कावेरीनदीतीराहून आणलेल्या साठ वेदवेदांग-पारंगत ब्राह्मणांकरिता स्थापलेले नगर रामतीर्थाच्या पश्चिमेस आणि एका नदीच्या दक्षिणेस होते आणि त्याचे नाव 'चित्तपावन' होते, तसेच तेथील ब्राह्मणांस चित्तपावन नाव पडले, अशी महत्त्वाची माहिती दिली आहे.[२] या चित्तपावन नगराचे वर्णन सध्याच्या चिपळुणास जुळते. ते वासिष्ठी नदीच्या दक्षिण तीरावर वसले असून त्याच्या जवळच अद्यापि रामतीर्थ दाखविण्यात येते. वासिष्ठी नदीच्या उत्तर तीरावर समोरच पेठे नामक गाव आहे. तेथे परशुरामाचे मंदिर आहे. त्याच्याच चिपळूण पश्चाद्भागी बाणगंगा नावाचे कुंड आहे. चिपळूण हे चित्त-पावनांचे (कोकणस्थांचे) मूलस्थान मानण्यात येते. त्यांच्या 'चित्तपावन' या जातिनामाच्या विविध व्युत्पत्त्या विद्वानांनी सुचविल्या आहेत. 'स्कंद-पुराणा'च्या सह्याद्रि खंडात अशी आख्यायिका दिली आहे की, क्षत्रियांचा संहार केल्यामुळे परशुराम पतित झाला होता. म्हणून ब्राह्मणांनी त्याचे पौरोहित्य करण्याचे नाकारले. त्याच सुमारास सह्याद्रीच्या पायथ्याशी पश्चिम किनाऱ्यावर समुद्राहून वाहून आलेली परदेशी मनुष्यांची १४ प्रेते परशुरामास आढळली. परशुरामाने त्यांना जिवंत करून चितेच्या अग्नीत शुद्ध करून घेतले, त्यांना ब्राह्मणांची विद्या शिकविली आणि त्यांच्याकडून आपली धर्मकृत्ये करविली. ते चित्पावन ब्राह्मणांचे मूळ पुरुष होत. चितेने पावन झाल्यामुळे त्यांना हे नाव पडले.[३] ही आख्यायिका एका पुराणात आढळली असली तरी केवळ भाकडकथा आहे. अनेक पुराणांप्रमाणे सह्याद्रिखंडही अलीकडचे आहे. तेव्हा त्यात दिलेली 'चित्पावन' या जातिनामाच्या व्युत्पत्तीला महत्त्व नाही.

---

२. या काव्यात इतरत्र या ब्राह्मणांचे नाव 'चित्तप' असे दिले आहे. 'चित्तपावन'पासून ग्रामनाम 'चिपळूण' सिद्ध करणे कठीण वाटल्यामुळे त्या ब्राह्मणांचे नाव 'चित्तपोलन' असे सह्याद्रिखंडात कल्पिले आहे.

३. सह्याद्रिखंडातील हा भाग कोणी चित्पावन ब्राह्मणजातीच्या द्वेष्टयाने घुसडला असावा असे पं. महादेवशास्त्री दिवेकरांनी म्हटले आहे.

'पारशी लोक संजानला आले, यहुदी लोक अलिबागेस आले व चित्पावन खाली गुहागराजवळ येऊन थडकले' असे आपले मत श्री. ना. गो. चापेकरांनी दिले आहे.[४] हे मान्य करण्यात अनेक अडचणी आहेत. आतापर्यंत चित्पावनांच्या मूलस्थानाबद्दल केवळ तर्कच केले जात. आता प्रथमच साडेतीनशे वर्षांइतका जुना ग्रथांतरीचा पुरावा उपलब्ध होत आहे. अर्थात् तोही भक्कम पुराव्यावर आधारला आहे, असे नाही. तथापि त्यावरून साडेतीनशे वर्षांपूर्वी चित्पावनांच्या मूलस्थानाविषयी दक्षिण कोकणांतील लोकांची काय कल्पना होती हे स्पष्ट दिसते. त्यावरून 'स्कंदपुराणा'च्या सह्याद्रि–खंडातील परशुरामाने चित्पावनांची मृत मनुष्यांपासून उत्पत्ति केली, किंवा त्याने कोळ्यांना त्यांच्या जाळ्यांची जानवे करून चित्पावन ब्राह्मण बनविले, या भाकडकथांचा निरास होतो.

मी या प्रश्नाकडे ऐतिहासिक दृष्टया पाहतो. इ. स. च्या तेराव्या शतकापर्यंतच्या कोरीव लेखांत ब्राह्मणांच्या उपजातिनामांचा उल्लेख येत नाही. दानपत्रांत दान दिलेल्या ब्राह्मणांचा निर्देश करताना त्यांच्या वेदशाखांचा, गोत्रप्रवरांचा व ते जेथून आले त्या मूलस्थानांचा फक्त निर्देश असतो. तेराव्या शतकांतील कोरीव लेखांत प्रथमच करहाटक[५] (कऱ्हाडे), सहवासी[६] अशा उपजातिनामांचे, तसेच त्यांच्या पटवर्धन, घैसास[७] या सारख्या आडनावांचे उल्लेख आढळतात. सुमारे ८०० ते १२५० पर्यंत उत्तर व दक्षिण कोकणांवर राज्य करणाऱ्या शिलाहार राजांच्या कोरीव लेखांचा अभ्यास मी करीत आहे. उत्तर कोकणच्या शिलाहारांचे अनेक कोरीव लेख सापडले आहेत. त्यांत करहाटच्या (कऱ्हाडच्या) अनेक ब्राह्मणांना बोलावून शिलाहार राजांनी भूदाने

---

४. चित्पावन (१९६६), पृ. २५७.

५. मिराशी–शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ. ३२१, ३२७.

६. पूर्वोक्त, पृ. ३२१, ३२७.

७. पूर्वोक्त, पृ. ३२१, ३२७.

केल्याचा उल्लेख आहे.[८] प्राचीन काळी भारतातील काही स्थाने विद्वान् ब्राह्मणांची निवासस्थाने म्हणून सुप्रसिद्ध होती. उत्तर भारताच्या बोग्रा जिल्ह्यातील कुलाञ्चा हे सामवेदी ब्राह्मणांचे[९] आणि गया जिल्ह्यातील टकारी हे माध्यंदिनशाखी ब्राह्मणांचे[१०] निवासस्थान म्हणून प्रसिद्ध होते. तसेच दक्षिण भारतातील करहाट (कऱ्हाड) हे ऋग्वेद्यांचे[११] निवासस्थान म्हणून विख्यात होते. दक्षिण कोकणांतील गुहागर आणि चिपळूण ही त्या काळी चित्तपावन ब्राह्मणांची निवासस्थाने म्हणून प्रसिद्ध असती तर उत्तर कोकणच्या शिलाहारांनी तेथील ब्राह्मणांना बोलावून भूमिदाने दिली असती. पण तसा उल्लेख मी संपादिलेल्या उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या बेचाळीस कोरीव लेखांपैकी एकातही आढळला नाही. दक्षिण कोकणच्या शिलाहारांचे फक्त तीन ताम्रपट सापडले आहेत.[१२] त्यांतही गुहागर आणि चिपळूण येथील ब्राह्मणांचा निर्देश नाही.

तेव्हा गुहागर आणि चिपळूण ही विद्वान् ब्राह्मणांची निवासस्थाने म्हणून निदान तेराव्या शतकापर्यंत तरी प्रसिद्ध नव्हती. त्या कालात तेथे राज्य करणाऱ्या राजांनी इतर ठिकाणांहून ब्राह्मण बोलावले असावे. दक्षिण कोकणच्या शिलाहारांचे फार थोडे लेख मिळाल्यामुळे या बाबतीत निश्चित विधान करणे शक्य नाही. सतराव्या शतकात हे ब्राह्मण कावेरीतीराहून आले अशी समजूत होती हे 'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'वरून दिसते. परशुरामाने त्यांना आणले ही मात्र भाकडकथाच आहे.

हे ब्राह्मण इजिप्त, अरेबिया, पॅलेस्टाइन इत्यादि ठिकाणांहून त्या काळी आले असणे शक्य नाही; कारण तसे असते तर ते पारशी व यहुदी यांप्रमाणे अलग राहिले असते. ब्राह्मण म्हणून हिंदू समाजात मिसळून गेले नसते. त्या काळी हिंदू समाज परदेशस्थ लोकांना आपणां-

---

८. 'शिलाहार राजवंशाचा इतिहास', पृ. २७, ३४, १०० इत्यादी.

९. कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, व्हॉ. ४, पृ. २६८.

१०. पूर्वोक्त, पृ. ४७५.

११. 'शिलाहार राजवंशाचा इतिहास इ.', पृ. ९०

१२. पूर्वोक्त, लेख क्रमांक ४०–४२.

मध्ये सामावून घेऊन त्यांना ब्राह्मण मानण्याइतका उदार मनोवृत्तीचा नव्हता. तत्कालीन अपरार्कादि धर्मशास्त्रांवरील टीकानिबंधांचा अभ्यास केल्यास हिंदूधर्म संकुचित मनोवृत्तीचा बनत चालला होता, असे स्पष्ट दिसते.[१३] तेव्हा चित्पावन ब्राह्मण इजिप्त, इराण, पॅलेस्टाइन वगैरे पश्चिमेकडील देशांतून आले असणे शक्य नाही.

चित्पावन ब्राह्मणांना परशुरामाने कावेरीतीराहून आणले ही 'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'तील कथाही भाकडकथाच आहे.[१४] पण दक्षिण कोकणच्या राजांनी दक्षिणेतून विद्वान् ब्राह्मणांना बोलावून त्यांना गुहागर–चिपळूण वगैरे ठिकाणी वसविले असणे शक्य आहे. उत्तर कोकणच्या शिलाहारांनी करहाटकाच्या अनेक ब्राह्मणांना बोलावून ठाणे जिल्ह्यात वसविले व त्यांच्या मूलस्थानावरून त्यांना करहाटक (कऱ्हाडे) असे नाव पडले, तसे चित्पावनांच्या बाबतीत झाले असावे. तरीही 'चित्पावन' या जातिनामाची खरी व्युत्पत्ति समजत नाही. 'श्रीवाडेश्वरोदयकाव्या'तील व्युत्पत्ति 'त्यांना वसविल्यावर त्या स्थलाने परशुरामाच्या चित्ताचे समाधान केले' अशी आहे.

रामस्य चित्तमपुनात्पूर्णकामस्य तद्यतः ।
पुरं ह्यतमं नाम्ना विदधे चित्तपावनम् ॥५.३१३२.

ही व्युत्पत्ति समाधानकारक वाटत नाही. पू (पुनाति) या धातूचा तसा अर्थ कोठेही दिला नाही. चापेकरांनी 'चित्पावन' हे स्थलनाम असावे. 'चित्' हा त्यातील अवयव 'चिदम्बर'सारख्या दक्षिण प्रदेशातील नावांत आढळतो, असे म्हटले आहे. पावन हे विदर्भातील पवनी (पावनी) सारखे स्थलवाचक असेल. चित्पावन नामक मूलस्थानावरून त्या

१३. शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. ९६.

१४. अशीच कथा बंगालमध्येही प्रचलित आहे. तेथील आदिशूर नामक राजाने कन्नोजहून पाच ब्राह्मणांना यज्ञयागाकरिता बोलावले. त्यांचे वंशज हे सध्याचे कुलीन ब्राह्मण होत असे समजण्यात येते. पण या दंतकथेत ऐतिहासिक तथ्य नाही. मुजुमदार, हिस्टरी ऑफ बेंगाल (१९४३), पृ. ५८२.

ब्राह्मणांना कालान्तराने ते नाम पडले असण्याची शक्यता आहे. पण तसे स्थलनाम अद्यापि तरी कावेरीतीरी किंवा इतरत्र आढळले नाही.

तसेच चिपळूणगावाचे मूळ नाव चित्तपावन होते ही या काव्याच्या विश्वनाथ कवीची कल्पनाही निर्मूल आहे. इ. स. च्या दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तरी त्या गावाचे नाव चिपळूण हेच प्रचलित होते हे उत्तर कोकणच्या शिलाहारनृपति अपराजित याच्या शक संवत् ९१५ (सन ९९३) मध्ये दिलेल्या दोन ताम्रपटांवरून दिसते.[१५] त्या ताम्रपटांत अपराजिताच्या राज्याचा विस्तार सांगताना 'चिपुलणविषया'चा निर्देश केला आहे. या चिपुलण विषयात (जिल्ह्यात) चिपळूणसभोवारच्या प्रदेशाचा अंतर्भाव होत होता. त्या काली त्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण चिपुलण होते. चित्तपावन नव्हते. चिपळूण या स्थलनामाची व्युत्पत्ति 'चित्तपावन'पासून करणे कठीण आहे.

विश्वनाथ कवीच्या काळी चिपळूण, गुहागर वगैरे ठिकाणचे ब्राह्मण दक्षिणेतील कावेरीनदीतीराकडून आले अशी समजूत होती असे दिसते. ती खरी असल्यास कावेरी नदीच्या काठच्या ब्राह्मणवसतिस्थानांचा शोध करू.

मद्रासचे डॉ. राघवन् यांनी सुचविले आहे की परशुरामाने हे ब्राह्मण कावेरी नदीच्या काठावरून आणले, यावरून ही कावेरी नदी मध्यभारतातील असावी. काही 'माहात्म्या'त एका कावेरीचा नर्मदा-नदीला मिळणारी नदी म्हणून उल्लेख आढळतो. पण ही कल्पना ग्राह्य

---

१५. जंजिरा ताम्रपटांत (क्र. ५ व ६) अपराजिताच्या राज्याचा विस्तार सांगणारा पुढील श्लोक पाहा–

सिद्धां संथानभूमिं पृथुतरपुणकं देशमाज्ञाविधेयं
सह्यं प्रत्यन्तकान्तं निजभटकलितं संगमादीश्वराख्यम् ।
नामाख्यानप्रसाध्यं चिपुलणविषयं नष्टवैषम्यभावं
कृत्वा तेजोनुभावाद्वरविभवविभृत्स्वाज्ञया यः प्रशास्ति ।।

शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. २८ व ३८.

वाटत नाही. या कावेरीच्या काठी ब्राह्मणांची प्रसिद्ध निवासस्थाने होती, याला पुरावा नाही.

कोरीव लेखांचा अभ्यास करताना अशा स्थानांचा शोध विजयनगरच्या द्वितीय देवराज याच्या शक संवत् १३५६ (सन १४३४) च्या श्रीरंगम् ताम्रपटात लागला.[१६] त्या ताम्रपटात त्या राजाने चोलमंडलाच्या तिरुच्चिरापल्ली राज्यातील (विभागातील) कावेरीकाठची पाच गावे ऋग्वेदी आश्वलायनशाखी काश्यपगोत्री उत्तमनम्बी नामक ब्राह्मणाला (श्रीरंगनाथाच्या पूजाविधानार्थ)[१७] दान दिल्याचा उल्लेख आहे. या पाच गावांपैकी तीन कावेरी नदीच्या दक्षिण तीरावरील राजगम्भीर वळनाडू विभागात आणि दोन गावे कावेरीच्या उत्तरेस राजराज वळनाडूच्या मळ्ळनाडु विभागात होती. हे मळ्ळनाडु तामिळ ब्राह्मणांचे मूळ निवासस्थान मानण्यात येते. तिरुच्चिरापल्ली हे सध्याचे कावेरी–नदीच्या काठचे त्रिचनापल्ली होय.

कावेरी नदीकाठचा हा भाग मळ्ळ ब्राह्मणांचे निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. चित्पावन ब्राह्मण कावेरीतीराहून आले असल्यास यासारख्या ब्राह्मणनिवासस्थानाहून दक्षिण कोकणात आले असतील. वरील ताम्रपट विजयनगरच्या राजांच्या काळातील–विश्वनाथ कवीच्या काळापूर्वी सुमारे दोनशे वर्षे पूर्वीचा–आहे. तेव्हा तेथून चित्पावन ब्राह्मण आले असल्यास त्यांच्या निवासस्थानाची स्मृति विश्वनाथाच्या काळी जागृत असणे अशक्य नाही.[१८]

---

१६. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १७, पृ. ११० इ.

१७. पूर्वोक्त, पृ. ११२.

१८. चित्पावनांत पटवर्धन हे उपनाम प्रसिद्ध आहे. त्या नावाची एक संभवनीय व्युत्पत्ति पुढे दिली आहे. अहमदनगर जिल्ह्यात नेवाशाच्या पूर्वेस सोळा मैलांवर गोदावरीच्या दक्षिण तीरी काळेगाव या गावी यादव नृपति महादेव याचा पट्टबंध (राज्याभिषेक) महोत्सव शक संवत् ११८२ भाद्रपद शुक्ल द्वितीया सोमवार(२९

[पुढील पानावर]

पण या मळ्ळनाडूच्या ब्राह्मणांस त्या ताम्रपटात किंवा इतरत्र चित्पावन म्हटले नाही. ते काश्यप गोत्री ऋग्वेदी होते. काही चित्पावन या गोत्राचे व शाखेचे आहेत; म्हणून यात काही अडचण नाही. कावेरी नदीच्या काठी प्राचीन काळी इतरही अनेक ब्राह्मणांचे अग्रहार असतील. त्यांतून कोणता येथे विवक्षित आहे हे सांगता येत नाही. तथापि, चित्त-पावन किंवा चित्पावन या उपजातिनामाचा स्पष्ट उल्लेख मिळाल्याशिवाय कोणतीही उपपत्ति सिद्ध झाली असे म्हणता येणार नाही.

[मागील पानावरून]

ऑगष्ट सन १२६१)रोजी झाला त्या ‘ कालुगांव ’चे ‘ पट्टवर्धनपुर ’ असे दुसरे नाव त्या ताम्रपटात आले आहे (ए. इं., व्हॉ. ३२, पृ. ४२). त्या ताम्रपटात दान दिलेल्या ३० ब्राह्मणांचा उल्लेख आहे. ते काही ऋग्वेदी आणि काही तैत्तिरीय शाखेचे होते. पण त्यांच्या मूलस्थानाचा त्यांत उल्लेख नाही. त्याच्या पूर्वीच्या व नंतरच्या अनेक ताम्रपटांत पट्टवर्धन या चित्पावनांच्या उपनामाचा उल्लेख आढळतो. उदाहरणार्थ, यादव नृपति कन्दर (कृष्ण) याच्या शक-संवत् ११७१ (सन १ ४९–५०) च्या हुवळीजवळ सापडलेल्या ताम्रपटात अनेक पितापुत्र ब्राह्मणांच्या पट्टवर्धन उपनामाचा उल्लेख आला आहे (ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., व्हॉ ९, पृ. २४७ इ. पाहा). यादव नृपतींचा राज्याभिषेक या गावी होत असावा म्हणून तेथील ब्राह्मण कर्नाटकासारख्या दूर दूरच्या ठिकाणी पट्टवर्धन नावाने प्रसिद्ध होते. त्या गावाचे ‘ पट्टवर्धन ’ हे नवे नाव मात्र आता लुप्त झाले असून पूर्वीचे ‘ काळेगाव ’च सध्या प्रचलित आहे. या दोन्ही ताम्रपटांवरून चिपळूणचे चित्तपावन तेराव्या शतकापूर्वीच महाराष्ट्र-कर्नाटक प्रदेशात पसरले होते असे दिसते.

खंड दुसरा–प्राचीन भारतीय इतिहास

४. मल्हारा येथील आदित्यराजाचा ताम्रपट

(विदर्भाच्या वाकाटकपूर्वकालीन इतिहासावर नवीन प्रकाश)

सन १९७४ च्या एप्रील महिन्यात अचलपूर कँप मार्केटिंग पंचायत कमिटीचे चिटणीस श्रीयुत दिगंबर यशवंत वाटाणे यांनी नागपूरच्या मध्यवर्ति संग्रहालयाचे अभिरक्षक श्री. प. मा. मुळे यांना या ताम्रपटाचा एक पत्रा त्यावरील लेख वाचण्याकरिता आणून दिला. तो पत्रा त्यांना अचलपूर कँप्चे तांबे–पितळेचे व्यापारी श्री. कुबटकर यांचे कडून मिळाला होता असे समजते. नागपूर संग्रहालयाचे माजी अभिरक्षक श्री. वि. प्र. रोडे यांनी तो लेख वाचला, तेव्हा त्यांना आढळून आले की त्यात एका अज्ञात राजवंशाच्या आदित्यराज नामक राजाने काही ब्राह्मणांना कित्येक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. श्री. रोडे यांनी त्या ताम्रपटाचे आणखी पत्रे मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्यात यश न आल्यामुळे त्यांनी तो मिळालेला एकच पत्रा विदर्भ संशोधन मंडळाच्या १९७४ च्या वार्षिकामध्ये (पृ. १३९–१४४) छापांसह प्रसिद्ध केला.[१] त्यात उल्लेखिलेल्या आदित्यराजाचा वंश किंवा त्याच्या दानाचा काल याविषयी उपलब्ध लेखात काहीच माहिती नव्हती. तथापि, दान देणाऱ्या राजाचे नाव ‘राज’पदान्त होते, आणि त्या ताम्रपटाची लिपी पेटिका-शीर्षक होती. या बाबतीत त्या ताम्रपटाचे नागपूरजवळ सुमारे तीस

---

* विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक १९७५, पृ. १ इ.

१. ‘वार्षिक १९७४’ मध्ये प्रस्तुत ताम्रपटावरील लेखात श्री. वाटाणे यांनी सांगितल्यावरून प्रस्तुत ताम्रपटाचा चौथा पत्रा गौरखेडा गावात विहीर खणताना सापडला होता, अशी माहिती दिली होती. चौकशी केल्यावर ती चुकीची ठरली आहे.

वर्षांपूर्वी सापडलेल्या स्वामिराजाच्या सन ५७३ च्या नगरधन ताम्रपटाशी[२] साम्य लक्षात घेऊन श्री. रोडे यांनी त्या ताम्रपटाचा काल ख्रिस्तोत्तर सहावे शतक असा ठरविला होता, व मीही त्याला संमति दिली होती. मध्यंतरी प्रस्तुत ताम्रपटाचे इतर पत्रे मिळविण्याचा प्रयत्न चालूच होता. त्याला यश येऊन अचलपूरच्या जगदंब विद्यालयाचे प्रमुख श्री. कृ. वा. तारे यांना अचलपूरचे तांबेपितळेच्या भांड्यांचे व्यापारी श्री. श्रीकांत भेलोंडे यांच्याकडून त्या ताम्रपटाचे आणखी तीन पत्रे मिळाले. ते त्यांनी वणीच्या लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीयुत राम शेवाळकर यांच्या सूचनेवरून वाचनार्थ मजकडे पाठविले. त्याबद्दल मी त्या उभयतांचा, तसेच श्री. श्रीकांत भेलोंडे यांचाही अत्यंत आभारी आहे. हे चारी पत्रे एकाच ताम्रपटाचे आहेत; पण त्याचा आणखी एक पत्रा मिळाला नाही असे त्याचे वाचन केल्यावर माझ्या लक्षात आले. चौकशी केल्यावर समजले की हा ताम्रपट अचलपूर जवळच्या मल्हारा गावात श्री. महादेवराव बोरेकार यांच्या संग्रही होता. तो त्यांच्या रामेश्वर नामक मुलाने अचलपुरात आणून विकला होता. पाचव्या पत्र्यासाठी मी गेले वर्ष दीड वर्ष भगीरथ प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला. शेवटी अचलपूरच्या भ. शि. पाटील महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. राम केशव सातपुते यांनी स्वतः अनेकवार मल्हारा गावास जाऊन चौकशी केली, तेव्हा तो राहिलेला पाचवा पत्रा पूर्वोक्त रामेश्वरजवळच असल्याचे कळले. नंतर त्याचे चुलते श्री. नामदेवराव बोरेकार यांनी त्याची समजूत घातल्यावर त्याने तो प्रकाशनार्थ त्यांच्या स्वाधीन केला. अशा रीतीने आता पूर्ण ताम्रपट संपादणे शक्य झाले आहे. त्याबद्दल मी प्रा. सातपुते आणि श्री. नामदेवराव यांचे हार्दिक आभार मानतो.

मागे सांगितल्याप्रमाणे या ताम्रपटाचे पाच पत्रे आहेत. त्यांना जोडणारी ९ सें. मी. व्यासाची तुटलेली कडी मिळाली आहे, पण तिला जोडलेली मुद्रा उपलब्ध झाली नाही. पहिल्या व शेवटच्या पत्र्यांवर एका बाजूवर व इतर पत्र्यांवर दोन्ही बाजूंवर लेख कोरला आहे. सर्व

२. *Inscriptions of the Kalchuri–Chedi Era*, C. I. I., Vol. IV, pp. 611 f.

पत्रे वाकाटकांच्या ताम्रपटांच्या पत्र्यांपेक्षा पातळ व किंचित् लहान आकाराचे आहेत.[३] या पत्र्यांची लांबी १७.६ सें. मी. व रुंदी ९.७ सें. मी. आहे. सर्व पत्र्यांचे वजन ९०० ग्रॅम आहे.

अक्षरघटिका– प्रस्तुत ताम्रपटाचा लेख पेटिकाशीर्षक लिपीत (box–headed characters मध्ये) लिहिला आहे. अक्षरांचे वळण वाकाटकांच्या ताम्रपटांतल्या प्रमाणे आहे. स्वररहीत अन्त्य व्यंजने लहान आकाराने किंवा त्यांवर लहानशी आडवी रेघ काढून दाखविली आहेत. ‘ त् ’ला गाठ नाही, पण ‘ न् ’ला आहे. याला अपवाद ‘ यान् ’ (ओ. ५) याचा आहे. व् व ब् यांची चिन्हें निराळी आहेत. जिव्हामूलीय आणि उपध्मानीय या अर्ध विसर्गांचा यथोचित उपयोग केला आहे.

भाषा– लेखाची भाषा संस्कृत आहे. फक्त शेवटच्या ओळीतील मिति प्राकृतात आहे. लेख गद्यपद्यमिश्रित आहे. शेवटी दोन शापाशीर्वादात्मक श्लोक आहेत. लेखनपद्धतीचा एक उल्लेखनीय विशेष हा की संयुक्त व्यंजनामध्ये ‘ य् ’च्या पूर्वी आणि ‘ र् ’च्या नंतर येणाऱ्या व्यंजनाचे द्वित्व केले आहे. उदाहरणार्थ, ‘ पादानुद्ध्यात: ’ (ओ. ७) व ‘ चतुर्व्वेदा– (अ . ३) पाहा. ‘ स्ववङ्शवर्द्धनो ’ (ओ. ७–८) आणि ‘ वङ्शप्रतिष्ठा ’

---

३. यावरून हे पत्रे वाकाटकपूर्व कालातील दिसतात. प्राचीन ताम्रपटांचे पत्रे कालानुसार उत्तरोत्तर जाड व जास्त जास्त लांब-रुंद होत गेले होते. खालील मापे पाहा—

(१) प्रस्तुत ताम्रपट (सु. सन २७०)–७" × ३.४".

(२) द्वितीय विन्ध्यशक्तीचा वाशिम ताम्रपट (सु. सन ३९२)– ६.१" × ३.४"

(३) प्रभावतीगुप्तेचा पुणे ताम्रपट (सु. सन ४१३) ९.२५"×५.७५'

(४) द्वितीय प्रवरसेनाचा शिवनी ताम्रपट (सु. सन ४३८) ८.१९" × ४.५०"

(५) स्वामिराजाचा नगरधन ताम्रपट (सु. सन ५७३) ७.९"×४.१"

(६) नन्नराजाचा मुलताई ताम्रपट (सु. सन ७०९) ७.९" × ३.९"

(ओ. १९) मध्ये अनुस्वाराबद्दल ' ङ् 'चा उपयोग केला आहे. तो अपाणिनीय आहे. बाकी सर्व संस्कृत लेख शुद्ध भाषेत आहे.

प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश 'मुण्ड' वंशातील आदित्यराज नामक राजाने वानखेट येथे अंकिष्ठा नामक 'भोगा'तील (तालुक्यातील) खालील गाव कांही ब्राह्मणांना दान दिले, हे नमूद करण्याचा होता–महाग्राम, दोन गावे मिळून झालेली चिक्खलिका, आम्रकर्गतिका, लौहशलका, चिञ्चपल्लिका, निग्गोण्डिज्झार, दहरकपटत्ता, आम्रकवाटक, शिशपादिका आणि बुज्जाटक हे ते गाव होत. हे दान खालील अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते. उपरिक, कुमारामात्य, दण्डपाशिक, चाट, भट, काष्ठिक,[४] दूतप्रेषणिक आणि विनियुक्तक. दान दिलेले ब्राह्मण येणेप्रमाणे-भारद्वाजगोत्री मातुलस्वामी, भट्टस्वामी, अग्निस्वामी, दित्यस्वामी, द्रोणस्वामी, नन्नस्वामी, सूर्यस्वामी, कालिशर्मा इत्यादि. हे दान देण्याचा उद्देश दात्याला व त्याच्या मातापित्यांना पुण्याची व कीर्तीची प्राप्ति व्हावी हा होता. शेवटच्या ओळीत ताम्रपटाची मिति सव्व २ गिम्ह प २, दिव १० + ५[५] (संवत्सर २, ग्रीष्म पक्ष २, दिवस १५) अशी दिली आहे. ती प्राकृत भाषेत आहे.

ताम्रपटावरील लेखाचा आरंभ मंगलचिह्न (सिद्धम्) आणि 'नम ᳵ पुरुषोत्तमाय' (पुरुषोत्तमाला नमस्कार असो) यांनी झाला आहे. त्यानंतर दात्याची वंशावळ पुढीलप्रमाणे दिली आहे–परमभागवत (भगवान् विष्णूचे निष्ठावान् उपासक) असलेल्या आणि अश्वमेध याग करणाऱ्या मुंडवंशामध्ये[६] जन्मलेला भारद्वाजगोत्री, चारी वेदांच्या अध्ययनांत आनंद मानणारा सोम नामक ब्राह्मण होऊन गेला. त्याच्या-

४. या अधिकाऱ्याचा उल्लेख इतरत्र आढळत नाही. कदाचित येथे राष्ट्रिक विवक्षित असेल.

५. यातील '५' या संख्येचे चिन्ह इतरत्र आढळणाऱ्या चिन्हांहून भिन्न आहे. पण त्या चिन्हाचे दुसरे वाचन संभवनीय नाही.

६. 'मुंडपुत्राणाम्' म्हणजे 'मुण्डवंशीयांमध्ये'. यासारखाच 'शाक्यपुत्र' (बुद्धाचा अनुयायी) हा शब्द पाहा.

विषयी म्हटले आहे की, ब्रह्मदेवाने आपल्या चार मुखांनी ज्या चार वेदांचे पठन केले त्या वेदांचे अध्ययन आपल्या एकाच मुखाने केल्यावरही त्याला गर्व[७] झाला नव्हता. त्यानंतर त्याच्या पायांचे चिंतन करणारा त्याचा पुत्र आपल्या वंशाचे वर्धन करणारा वर्धन नामक होऊन गेला. त्याच्याविषयी म्हटले आहे की यमनियमांच्या अनुष्ठानात सदैव व्यापृत असणे, सच्छीलत्व, विद्वत्त्व, अतिथींविषयी प्रेम आणि तपश्चर्या हे त्या उदात्त मनोवृत्तीच्या वर्धनाचे अत्यंत खडतर व श्रेष्ठ असे सदैव पालन केले जाणारे व्रत होते. त्यानंतर त्याच्या पायांचे चिंतन करणारा आणि कोणतेही दान कधीही न स्वीकारणारा (अप्रतिग्राहक) असा त्याचा पुत्र मुण्ड होऊन गेला. त्याचा हात दानस्वीकाराने कधीही विटाळला नव्हता. तो सदैव व्रतस्थ आणि यज्ञानुष्ठानार्थ दीक्षित असे. म्हणून त्याच्या यज्ञांमध्ये संतुष्ट झालेला इन्द्र स्वर्गातून मोठी धनाची धारा ओतत असे.[८]

पुढे म्हटले आहे की या मुण्ड ब्राह्मणाचे नाव त्याच्या सत्कर्मांमुळे लोकांमध्ये अत्यंत आदरणीय आणि वंशाला प्रतिष्ठा मिळवून देणारे असे असल्यामुळे त्याचे वंशज अद्यापि ते मोठ्या अभिमानाने धारण करतात. या वर्णनावरून मुण्ड हा या वंशातला आरंभीचा ज्ञात पूर्वज नसताही त्याचे नाव या वंशाला कसे प्राप्त झाले याचा उलगडा होतो.

---

७. 'वि + स्मि' या धातूचा येथे 'आश्चर्यचकित होणे' सा अर्थ नसून 'गर्विष्ठ होणे' असा आहे. भासाच्या 'दूतवाक्या'तील (अंक १)–'आनीयतां स विहगवाहनमात्रविस्मितो दूतः।' हे कृष्णाच्या विषयी दुर्योधनाचे शब्द पाहा.

८. यासारखाच प्रसंग कालिदासाने 'रघुवंशा'च्या पाचव्या सर्गात (श्लो. २९) वर्णिला आहे. प्रस्तुत ताम्रपटातील हे वर्णन वाच्यार्थाने घ्यावयाचे नाही. मुण्ड स्वतः अकिंचन असला आणि दान स्वीकारीत नसला तरी जनता त्याच्या यज्ञाची सर्व सामग्री जमवून देत असे; अशी वस्तुस्थिति असावी. अलीकडील २५ वर्षांत अमरावतीस श्रीनारायण गुरू हे अशाच तऱ्हेचे साधुपुरुष होऊन गेले. ते दरवर्षी अमरावतीस कित्येक दिवस चालणारा यज्ञ करीत. त्याची सर्व सामग्री जनतेकडून पुरविली जात असे. ते नुकतेच दिवंगत झाले.

आतापर्यंत निर्दिष्ट केलेल्या या वंशातील तीन्ही ब्राह्मणांनी कधी राजपदाचा उपभोग घेतल्याचा उल्लेख नाही. ते सर्व धार्मिक, व्रतनिष्ठ, यज्ञानुष्ठानात सदैव व्यापृत असणारे, निःस्पृह, वेदवेत्ते ब्राह्मण होते. यानंतरच्या मुण्डपुत्र राष्ट्रमहाराजाने आपल्या गुणांनी राजपद मिळविले असे म्हटले आहे, पण ते कोणत्या परिस्थितीत हे सांगितले नाही. त्यानंतर त्याचा पुत्र राजकुलमहाराज याने युद्धरूपी अग्नीमध्ये आपल्या शत्रूंच्या जीवितांची आहुति दिली असे वर्णन आले आहे त्यावरून त्याने समरांगणावर मोठे विजय मिळविले होते असे दिसते. त्याचा पुत्र आदित्यराज याचे वर्णन तो सुवर्ण कमलांप्रमाणे गौरवर्णी, चन्द्राप्रमाणे सर्व जनांच्या नयनांना आनंद देणारा, पराक्रमात राम, अंबरीष व सगर यांसारखा होता, असे ठरीव ठशाचे आहे. त्याने प्रस्तुत ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या दुसऱ्याच वर्षी दिला होता हे पूर्वी सांगितले आहे.

आदित्यराजाच्या प्रस्तुत ताम्रपटाचा काळ कोणता, याचा आता विचार करू. या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे देणे कठीण आहे. सन ५७३ च्या नगरधन ताम्रपटातल्यासारख्या पेटिकाशीर्षक लिपीचा उपयोग प्रस्तुत ताम्रपटात केला आहे, आणि हे दान देणाऱ्या राजाचे आदित्यराज हे नाव नगरधन, मूलतापी इत्यादि ताम्रपटांतील राष्ट्रकूट मांडलिक स्वामिराज, नन्नराज यांच्या नावासारखे आहे. यांवरून त्या राजांप्रमाणे हा आदित्यराजही वाकाटकांनंतर ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकात होऊन गेला असावा, असे सकृद्दर्शनीच वाटते; याशिवाय प्रस्तुत ताम्रपटांतील शुद्ध संस्कृत भाषा, गुप्तांच्या काली प्रचारात आलेल्या 'उपरिक', 'कुमारामात्य' इत्यादि शासकीय संज्ञांचा उपयोग इत्यादिकांवरून वरील अनुमानाला बळकटी येते. म्हणून आदित्यराज ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकात होऊन गेला असावा असे वाटते.

पण पूर्ण विचाराअंती हे मत ग्राह्य वाटत नाही. त्याची कारणे अशी—

(१) या मुंड वंशाचे वर्णन 'अश्वमेधयाजी' असे केले आहे. तेव्हा यातील राजांनी निदान एकतरी अश्वमेध यज्ञ केला असावा. पण वाकाटक-

कालानंतरच्या थोड्याच काळात अश्वमेध यज्ञ प्रचारातून गेले होते. शेवटचा वाकाटक राजा हरिषेण याची कारकीर्द सन ५०० च्या सुमारास संपली हे आम्ही इतरत्र सिद्ध केले आहे.[९] त्यानंतर दण्डीच्या 'विश्रुतचरिता'तील गोष्ट खरी असल्यास त्याच्या पुत्राने १०–१५ वर्षे राज्य केले असेल. पण त्यानंतर आंध्रदेशीय विष्णुकुंडी नृपति माधववर्म्याचा अंमल विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यांवर प्रस्थापित झाला. त्याने अकरा अश्वमेध केल्याचे वर्णन आले आहे.[१०] त्याची मुबलक नाणी विदर्भात पवनार येथे व पश्चिम महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील नेवासे येथे केलेल्या उत्खननात सापडली आहेत.[११] शिवाय, त्याचा सातारा जिल्ह्यातील खानापूर येथे सापडलेला अपूर्ण ताम्रपट आम्ही प्रकाशित केला आहे.[१२] तथापि, विष्णुकुंडींचे राज्य महाराष्ट्रात अल्प काळच टिकले. कारण, लौकरच माहिष्मतीच्या कलचुरींचा उदय होऊन त्यांनी सुमारे सन ५३४ च्या सुमारास[१३] गुजराथ, महाराष्ट्र व कोंकण येथे आपली सत्ता प्रस्थापित केली. नगरधन येथे सन ५७३ मध्ये राज्य करणारा स्वामिराज त्यांचा मांडलिक दिसतो. कारण, त्याने त्यांच्याप्रमाणे आपल्या दानपत्रात आभीर संवताचा उपयोग केला आहे. कलचुरींनंतर बादामीच्या चालुक्य नृपति द्वितीय पुलकेशीने संपूर्ण महाराष्ट्रावर अंमल बसविला.[१४] वरील घटनांवरून वाकाटकांच्या कालानंतर सन ५०० पासून सन ६५० पर्यंत विदर्भात अश्वमेध यज्ञ करणाऱ्या मुंडवंशी राजांचा अंमल असणे शक्य नव्हते, हे दिसून येईल.

---

९. वाकाटकनृपति आणि त्यांचा काल, पृ. १२.

१०. एपिग्राफिया इंडिका, पु. १७, पृ. ३३६; जर्नल ऑफ दि आन्ध्र हिस्टॉरिकल रीसर्च सोसायटी, पु. ६, पृ. २०.

११. *Report on Pavnār Excavations*, pp. 13 f. Also *Literary and Historical Studies in Indology*, pp. 185 f., *From History to Pre-history at Nevāsā*, pp. 199 f.

१२. *Ep. Ind.*, Vol. XXVII. pp. 312 f.

१३. *Literary and Historical Studies in Indology*, pp. 125 f.

१४. See Aihoḷe Inscription, *Ep. Ind.*, Vol. VI, pp. 1 f.

(२) प्रस्तुत ताम्रपटाची मिति शेवटच्या ओळीत सव्व २, गिम्ह प २ दिव (१० + ५ =) १५ अशी प्राकृतात दिली आहे. अशा मितीला ऋतुमिति (season date) म्हणतात. ख्रिस्तीसंवताच्या आरंभीच्या शतकांत कालनिर्देशाची ही पद्धत उत्तर भारतात तशीच दक्षिण भारतातही प्रचलित होती. फरक इतकाच की उत्तर भारतातील ऋतुमितीत महिन्यांचा व दिवसांचा[१५] व दक्षिण भारतातील ऋतुमितीत पक्षाचा व दिवसांचा[१६] उल्लेख असे. वाकाटकांच्या प्रसिद्ध झालेल्या फक्त दोन लेखांत ऋतुमितींचे उल्लेख आहेत-(१) द्वितीय विंध्यशक्तीचा वाशीम ताम्रपट. यातील ऋतुमिति[१७] प्राकृतात दिली आहे. (२) द्वितीय प्रवरसेनाचा दुदिया ताम्रपट. यातील ऋतुमिति प्राकृतात दिली आहे.[१८] यांखेरीज वाकाटकांच्या इतर सर्व कोरीव लेखांतील मित्यांत कारकीर्दीचे वर्ष, चैत्रादि मास, पक्ष व तिथि अशा रीतीने काळाचा उल्लेख आढळतो. सुमारे सन ५०० नंतर ऋतुमितीचा उल्लेख करण्याची पद्धत प्रचारातून गेलेली दिसते.[१९] प्रस्तुत ताम्रपटातील मिति ऋतुनिर्देशात्मक असल्यामुळे तो ताम्रपट वाकाटकोत्तरकालीन असणे संभवनीय नाही. वाकाटक-

---

१५. See the date महारजस कणिष्कस सं. ३ हे 3 दि 20 (+) 2 of the Sārnāth Buddhist Image Inscription of Kanishka, *Ep. Ind.,* Vol, VII, pp. 173 f.

१६. See the date सवछरे १० (+) ८ वास पखे २ दिवसे १ of the Nāsik Cave Inscription of Gautamīputra Sātakarṇi, *Ep. Ind.*, Vol VIII, p. 71.

१७. वाशीम ताम्रपटातील पुढील मिति पाहा. साव्वच्छरं ३० (+) ७ हेमन्तापक्खं पढमं दिवस ४.

१८. दुदिया ताम्रपटातील मिति पाहा. संव्वत्सरे त्रयोविंशतिमे वर्षापक्षे चतुर्थे दिवसे दशमे.

१९. वाकाटकांच्या इतर ताम्रपटांतील मित्या पाहा. ऋतुमिति देणारा वाकाटकांचा पांढुरणा ताम्रपट बनावट आहे. अलीकडे सापडलेल्या हरिषेणाच्या ताम्रपटातही ऋतुमिति आहे. पण ती ऋतुमिति संस्कृतात आहे, असे कळते.

काली तर विदर्भात अशा अश्वमेधयाजी राजवंशाचा अंमल असणे शक्यच नाही. तेव्हा प्रस्तुत ताम्रपट वाकाटकपूर्वकालीन असला पाहिजे.

(३) प्रस्तुत ताम्रपटातील कालनिर्देश प्राकृतात आहे, हेही त्या ताम्रपटाच्या प्राचीनत्वाचे निदर्शक आहे. ख्रिस्तोत्तर पहिल्या दोन शतकांतील दक्षिण भारतीय सर्व कोरीव लेख प्राकृतात आहेत. नंतर आरंभीचा वंशावलीचा भाग संस्कृतात लिहून नंतरचा ग्रामदानविषयक भाग सचिवालयाकडून प्राकृतात घातला जात असे, असे द्वितीय विंध्यशक्तीच्या वाशीम ताम्रपटावरून दिसते. प्रस्तुत ताम्रपट कोणा विद्वान् ब्राह्मणाकडून संस्कृतात लिहून घेतल्यावर कालनिर्देश घालण्याकरिता सचिवालयाला दिला असावा. त्याने तत्कालीन पद्धतीस अनुसरून त्याचा कालनिर्देश प्राकृतात दिला आहे. ख्रिस्तोत्तर ४०० नंतरच्या कोणत्याही दक्षिण व उत्तर भारतीय दानपत्रांत प्राकृत भाषेचा कोठेही उपयोग केलेला आढळत नाही. म्हणून प्रस्तुत ताम्रपट ख्रिस्तोत्तर ४०० च्या पूर्वीचा असला पाहिजे. तो इ. स. २७५–५०० मधील वाकाटकांच्या अमदानीत दिला असणे शक्य नाही हे मागे दाखविले आहे. तेव्हा तो इ. स. २७५ पूर्वी दिला असला पाहिजे.

पण यावर एक आक्षेप संभवतो. प्रस्तुत ताम्रपट वाकाटकपूर्वकालीन असल्यास त्यांत उपरिक, कुमारामात्य, दण्डपाशिक, दूतप्रेषणिक अशा गुप्तकालीन[२०] किंवा गुप्तोत्तरकालीन[२१] लेखांतच आढळणाऱ्या शासनाधिकाऱ्यांच्या संस्कृत संज्ञा कशा आढळतात ? गुप्त–वाकाटककाली संस्कृत भाषेला महत्त्व येऊन दानपत्रे संस्कृत भाषेत लिहिण्याचा प्रघात पडला. मुंडवंश वाकाटकपूर्वकालीन असल्यास त्याच्या दानपत्रात संस्कृत भाषेचा उपयोग आणि या संज्ञा कशा आढळतात ?

---

२०. See e. g. कुमारामात्य mentioned the Allahabad Pillar Inscription of Samudragupta and in the Dāmodarpur plates of the reign of Kumāragupta I, *Ep. Ind.*, Vol. XV, p. 130 f.

२१. See the Bānskherā plate of Harsha, *Ep. Ind.*, Vol. IV, pp. 208 f.

या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण नाही. हे अधिकारी गुप्त–वाकाटक-कालापूर्वीही अस्तित्वात असावे. कारण खुद्द त्यांची नसली तरी तत्सदृश राजकुमार, सेनापति, राष्ट्रिक, देशाधिकृत या अधिकाऱ्यांची नावे सातवाहनानंतर उदयास आलेल्या पल्लवांच्या प्राकृत दानपत्रांत येतात.[२२] प्रस्तुत ताम्रपट एका विद्वान् ब्राह्मण राजवंशाचा आहे, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. त्यावरील लेख एखाद्या विद्वान् ब्राह्मणाकडूनच तयार करवून घेतला असला पाहिजे. म्हणून या संज्ञा संस्कृतात आहेत. अशा संज्ञा इतर वाकाटकपूर्व ताम्रपटांत आढळत नाहीत याचे कारण इतक्या प्राचीन काळचे विस्तृत ताम्रपट अद्यापि आपणांस सापडले नाहीत.[२३] या संज्ञा गुप्त नृपतींनी स्वत: बनविल्या होत्या असे म्हणण्यास आधार नाही. संस्कृत भाषेचा उपयोग गुप्तपूर्वकालीन खानदेशातील महाराज स्वामिदासाच्या आभीर संवत् ६७ (सन ३१७) च्या इंदूर ताम्रपटातही आढळतो.

मग या आदित्यराजाचा काळ कोणता ? या राजाला वाकाटकोत्तर कालात स्थान नाही हे आपण मागे पाहिले. वाकाटक कालातही तो झाला असणे शक्य नाही. कारण वाकाटकांची सत्ता उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पश्चिमेस खानदेशापासून पूर्वेस दक्षिण कोसला(छत्तीसगडा)पर्यंत निरंकुश होती. तेव्हा हा मुंडवंश सातवाहनांचा अस्त आणि वाकाटकांचा उदय यांमधील काळात झाला असावा हे उघड आहे.

पुराणांतील राजवंशावलीप्रमाणे आंध्रांनी (म्हणजे सातवाहनांनी) ४५६ किंवा ४६० वर्षे राज्य केले.[२४] त्यांनी अशोकाच्या निधनानंतर सुमारे ख्रिस्तपूर्व २३० मध्ये आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले असावे.

---

२२. See the Hirahaḍagallī plates of Śivaskandavarman, *Ep. Ind.*, Vol. pp. 5 f.

२३. खानदेशात व इंदूर येथे सापडलेले आभीरांच्या मांडलिकांचे ताम्रपट एकेका पत्र्याचे आहेत.

२४. Pargiter, *Dynasties of the Kali Age(D.K.A.)*,pp. 35 f.

तेव्हा त्यांचा अस्त सन २३० मध्ये झाला असावा. विदर्भामध्ये त्यांचा अंमल अगदी शेवटपर्यंत होता हे तऱ्हाळा येथील नाणक–संचयावरून सिद्ध झाले आहे. त्यांच्या अस्तानंतर देशात सर्वत्र अंदाधुंदी माजून दक्षिणेत नवे आभीरादि राजवंश उदयास आले. त्याकाळी विदर्भातील बेबंदशाहीस आळा घालण्यासाठी हा ब्राह्मणजातीय मुंडवंश पुढे सरसावलेला दिसतो. या वंशाचे प्रारंभीचे पुरुष धार्मिक, सच्छील, विद्वान्, व्रतस्थ व यज्ञानुष्ठानी होते; पण देशात बंडाळी माजून धार्मिक जीवन अशक्य झालेले पाहून मुंडपुत्राने स्रुवा (यज्ञातील पळी) टाकून तरवार हाती घेतली आणि विदर्भात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली.[२५] नंतर त्याने ‘ राष्ट्रमहाराज ’ हे सार्थ नाव धारण केले. प्रस्तुत ताम्रपटात त्याने स्वगुणाने राजपदवी प्राप्त करून घेतली असे त्याचे संक्षिप्त वर्णन आले आहे. त्याचा हाच अर्थ दिसतो.

पुढे त्याचा मुलगा राजकुलमहाराज याने युद्धयज्ञांत शत्रूंच्या आहुति दिल्याचे वर्णन आले. त्याने अश्वमेध यज्ञ करून आपला दरारा विदर्भात सर्वत्र बसविला असावा.

आदित्यराज हा त्याचा पुत्र. तो सन २७० च्या सुमारास गादीवर आला असावा. त्याने अल्पकाळच राज्य केले असे दिसते. कारण याच सुमारास वाकाटक प्रथम विन्ध्यशक्ति नामक विष्णुवृद्ध–गोत्रवंशी दुसऱ्या एका शूर ब्राह्मणाने आपला अंमल प्रस्थापित केला होता.[२६] तो मूळचा आंध्र प्रदेशातील वल्लूर (सध्याचे हैदराबादच्या ईशान्येस सुमारे४०मैलांवरचे वेलूर)येथील होता. त्याने लौकरच विदर्भावर स्वारी करून मुंडवंशाचे उच्चाटण केले असावे. म्हणून त्या वंशाचे आणखी लेख सापडले नाहीत. वाकाटक विंध्यशक्तीचा पुत्र प्रथम प्रवरसेन याने चार अश्वमेध करून आपली सत्ता चारी दिशांत पसरविली, असे वाकाटकांच्या ताम्रपटांवरून दिसते.

---

२५. मनुस्मृतीत (८,३४८) म्हटले आहे–शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते । द्विजातीनां च वर्णानां विप्लवे कालकारिते ।।

२६. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, पृ. १४–३०.

अनेक प्राचीन पुराणांत ऐतिहासिक कालातील सन ३०० पर्यंत होऊन गेलेल्या मौर्य, शुंग, काण्व, सातवाहन वगैरे राजांच्या वंशावळी दिल्या आहेत. वाकाटकवंशी विंध्यशक्ति व त्याच्या पुत्र प्रवीर (प्रथम प्रवरसेन) यांचाही त्यांत उल्लेख आहे. प्रस्तुत मुंडवंश वाकाटकपूर्व-कालीन असल्यास त्याचा उल्लेख पुराणांतील वंशावळीत कसा येत नाही, असा प्रश्न येथे उपस्थित होतो. पुराणांतील या वंशावळी लेख-कांच्या प्रमादांमुळे अत्यंत अशुद्ध स्वरूपात आल्या आहेत. उदाहरणार्थ, त्यांतील काहींत आंध्रांच्या म्हणजे सातवाहनांच्या उच्छेदानंतर 'हूणा ह्येकोनविंशतिः ।' (एकोणीस हूणराजांनी राज्य केले) असे म्हटले आहे.[२७] हूणांचे भारतावरील प्रथम आक्रमण सुमारे सन ४५० मध्ये (म्हणजे सातवाहनांच्या अस्तानंतर दोनशे वर्षांनंतर) झाले. तेव्हा पुराणांतील हूणांच्या कारकीर्दीविषयीचा हा उल्लेख चुकीचा आहे, हे उघड आहे. तथापि, विदर्भातील या अश्वमेधयाजी मुंडवंशाचा उल्लेख पुराणात अग-दीच नसेल, हे संभवनीय वाटत नाही. पुराणांतील वंशावळीची या दृष्टीने छाननी केल्यावर त्यांत खालील पंक्ति आढळली–[२८]

मौना ह्येकादशैव तु ।

यांत 'मौन' नामक अकरा राजांनी सातवाहन राजांच्या अस्तानंतर राज्य केले, असे म्हटले आहे. यात त्यांच्या शासनकालाचा अवधि सांगितला नाही. पण भागवतपुराणाच्या कांही हस्तालिखितांत तो–

मौना एकादश क्षितिं भोक्ष्यन्त्यब्दशतान्यङ्ग त्रीणि ।

अशा शब्दांत तो तीनशे वर्षांचा होता असे म्हटले आहे.[२९] 'मौनाः' बद्दल 'मौलाः' असाही पाठ कांही हस्तलिखितांत आढळतो. या नावाचे राजे अद्यापि ज्ञात झाले नाहीत. म्हणून येथे 'मौण्डाः' (मुण्डवंशाचे) असा पाठ असेल काय, अशी शंका मनात येते. त्यांची अकरा ही संख्या

---

२७. *D. K. A.*, p. 46.

२८. *Ibid.*, p. 46.

२९. *Ibid.*, p. 48, n. 77.

व तीनशे हा शासनावधि मात्र अत्यंत असंभवनीय आहे. पण अशा चुका इतर राजवंशांच्या व राजांच्या बाबतीत झाल्या आहेत.[३०]

स्थलनिश्चय– प्रस्तुत ताम्रपटात अनेक स्थलांचा निर्देश आहे. आदित्यराजाने हा ताम्रपट वानखेट येथून दिला होता. 'वानखेट' नामानंतर 'वासकात्' 'स्थानात्' यांसारख्या शब्दाचा प्रयोग न केल्यामुळे ते त्याच्या राजधानीचे स्थान असावे, असे वाटते. या स्थल-नामाला जुळणारी अशी तीन ग्रामनामे, (१) बुलढाणा जिल्ह्यातील वानखेडा, (२) चंद्रपूर जिल्ह्यातील वानखेड आणि (३) अकोला जिल्ह्यातील वानखेडपुर अशी सध्या विदर्भात आढळतात. त्यांपैकी तिसरे जास्त संभवनीय आहे. कारण, इतर काही स्थलनामे त्या जवळच्या अमरावती व अचलपूर तालुक्यातील आहेत, हे पुढे दाखविले आहे. महाग्राम हे अकोला तालुक्यातील महागाव असावे. चिक्खलिका हे अमरावती तालुक्यातील चिखली असावे. आम्रकर्गतिका अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट तालुक्यातील आमझिरी असेल. लौहशलका हे अमरावती तालुक्यातील लोहगाव दिसते. चिञ्चपल्लिकेचे सध्या 'चिंचोली' नावात रूपांतर झाले असावे. या नावाची अनेक गावे विदर्भात आहेत. त्यांपैकी दोन-चिंचोली खुर्द आणि चिंचोली बुद्रुक अशी–अचलपूर तालुक्यात आहेत. निग्गोण्डिज्झार, दहरकपटत्ता, आम्र-कवाटक, शिशपादिका आणि बुज्जाटक यांना जुळणारी गावे मात्र विदर्भाच्या ग्रामनामावलीत आढळत नाहीत. निग्गोण्डीज्झार हे कदाचित् अमरावती तालुक्यातील निधोंडी असेल. दान दिलेली गावे ज्यात अंतर्भूत होती तो अंकिष्ठा भोग सध्याच्या अकोला जिल्ह्याचा आकोट तालुका असावा. अंकिष्ठाचे अंकिसा असे रूपान्तर होणे जास्त संभवनीय आहे व तसे गाव चंद्रपूर जिल्ह्याच्या चंद्रपूर तालुक्यात आहेही. पण

---

३०. वास्तविक येथे 'शुङ्गाः', 'काण्वाः' याप्रमाणे 'मुण्डाः' पाहिजे. पण पुराणांच्या वंशावळी प्रथम प्राकृतात असून नंतर त्यांचे संस्कृतात रूपान्तर झाले असल्याने 'मौण्डाः' असा पाठही असणे असंभवनीय नाही.

ते मल्हारा, चिंचोली इत्यादि गावांहून फार दूर असल्यामुळे विवक्षित असण्याचा संभव नाही.

वाचन[1]

पहिला पत्रा

ओळ

१ सिद्धम्[2] ॥ नम≍पुरुषोत्तमाय ॥ स्वस्ति वानखेटात्
२ परमभागवतोश्वमेधयाजिनां मुण्डपु-
३ त्राणाम् भारद्वाजसगोत्रः चतुर्व्वेदा-
४ नन्दिसोमः ॥ चतुर्भिश्चतुरो
५ वेदान्वक्त्रै[:*] ब्रह्मा जगाद यान् [।*] तानधीत्यै-
६ कवक्त्रेण यो न विस्मयमागतः[3] [॥१॥*]

दुसरा पत्रा : पहिली बाजू

७ तस्य पुत्रस्तत्पादानुद्ध्यातः स्ववङ्श(वंश)-
८ वर्द्धनो वर्द्धणो(नो) नाम ॥ यमनियम-
९ रतत्वमार्य्यवृत्तिः श्रुतम-
१० तिथिप्रियता तपस्विता च [।*]
११ अभवदतिसुदुष्करं हि तस्य

---

१. मूळ ताम्रपटावरून. या सोबतच्या प्रतिमा नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. बी. वी. ब्रॅकन् यांनी घेतलेल्या छापांवरून केल्या आहेत. नागपूरच्या मध्यवर्ति संग्रहालयाचे अभिरक्षक श्री. प. मा. मुळे यांनीही त्यांचे फोटो व छाप मला दिले आहेत. मी या उभयतांचा आभारी आहे.

२. चिन्हाने प्रदर्शित.

३. वृत्त : अनुष्टुभ्.

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१२ व्रतमिदमार्य्यमते ~ परं सदैव[४] ॥[२॥*]
१३ तस्य पुत्रस्तत्पादानुद्ध्यातः अप्रति-
१४ ग्राहको मुण्डः ॥ प्रतिग्रहादिग्ध-
१५ करस्य यस्य। नित्यव्रतस्यापि हि
१६ दीक्षितस्य। यज्ञे वसोर्व्वासवतुष्ट(ष्टि)मुक्ता
१७ पपात धारा त्रिदिवादनल्पा[५] ॥[३॥*]

तिसरा पत्रा : पहिली बाजू

१८ चिह्नं लोकविशेषशंसि सुमहत्सक(त्क)र्म्मलब्धास्प-
१९ दम्। श्लाघ्यं रत्नमिव प्रजाबहुमतं वङ्श(वंश)प्रति-
२० ष्ठाकरम् [।*]यस्याद्यापि वहन्ति नाम कुलजा दिक्षु
२१ प्रकाशं गुणैः श्रीवत्सं भुजगा इवोन्नत-
२२ फणाः प्रोन्नामितैर्मूर्द्धभिः[६] ॥[४॥*] तस्य पुत्रः(त्र)-
२३ स्तत्पादानुद्ध्यातः स्वगुणोपार्ज्जितराज-
२४ शब्दः श्रीराष्ट्रमहाराजः [।*] तस्य पुत्रः

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

२५ तत्पादानुद्ध्यातः श्रीराजकुलमहाराजः
२६ येन कुन्तानलज्वाले। वैरारणिसमुद्भवे।
२७ यशोमलान्यमित्राणां हुतान्यायूंषि

---

४. वृत्त : पुष्पिताग्रा.

५. वृत्त : उपजाति.

६. वृत्त : शार्दूलविक्रीडित.

२८ संयुगे[७] ॥ [५॥ *] तस्यात्मजᳵकनकपङ्कज-
२९ राशिगौरः कान्त्या शशीव जगतो नयनाभि-
३० रामः [। *]रामाम्बरीषसगरप्रतिमप्रभावः ।
३१ आदित्यराज इति विश्रुतनामधेय[८] [:॥६॥*] यज्ञ[रा]जानुज्ञा[तः*]

चौथा पत्रा : पहिली बाजू

३२ स आदित्यराजᳵ कुशली ॥ अङ्क्ड्ग्राभोगवासिनः
३३ समुपागतानुपरिकुमारामात्यदण्डपाशिक-
३४ चाटभटकाष्ठी(ष्ठि)कदूतप्रेषणिकविनुयुक्तका-
३५ दीन् सम्बोधयत्यस्तु व[:*] संविदितम् [।*]
३६ भारद्वाजसगोत्राय मातुलस्वामिने
३७ भट्टस्वाम्यग्निस्वामिदित्यस्वामिद्रोणस्वामि-

चौथा पत्रा : दुसरी बाजू

३८ नन्नस्वामिशू(सू)र्य्यस्वामिकालिशर्म्मप्रभृ-
३९ तिभ्यश्च ब्राह्मणेभ्यः महाग्रामः चिक्खल्लि-
४० काद्वयम् ॥ आम्रकगर्त्तिका लौहश-
४१ लका । चिञ्चपल्लिका । निग्गोण्डिज्झारम् ।
४२ दहरकपटत्ता ॥ अ(आ)म्रकवाटक ॥ शिङ्श(शिंश)-
४३ पादिका । बुज्जाटकश्चेति ॥ मातापित्रो[:]

पाचवा पत्रा

४४ आत्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये । उदकपूर्व्वे-
४५ ण ग्रामा दत्ताः ॥ बहुभिर्व्वसुधा भुक्ता ।

---

७. वृत्त : अनुष्टुभ्. ८. वृत्त : वसन्ततिलका.

४६ राजभिस्सगरादिभिः [।*] यस्य यस्य यदा
४७ भूमिस्तस्य तस्य तदा फलम्[९] ॥ [५॥*] षष्टि-
४८ वर्षसहस्राणि । स्वर्गे मोदति भूमिदः [।*]
४९ आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव नरके वसे[त्*] ॥ [६॥*]
५० सव्व २ गिम्ह प २ दिव १० [+] ५[१०] ॥

---

९. या व पुढील श्लोकाचे वृत्त अनुष्टुभ्.
१०. येथील चिन्हाच्या अर्थाबद्दल मागे विवेचन केले आहे.

५. महाराज भुलुंड यांच्या ताम्रपटातील वर्षे गुप्त संवताची आहेत काय ?

'संशोधनमुक्तावलि' : सर दुसरा, पृ. ७९–८४, मध्ये 'खानदेशातील एक राजवंश' या शीर्षकाच्या लेखात मी खानदेशात राज्य करणाऱ्या महाराज स्वामिदास, महाराज भुलुण्ड आणि महाराज रुद्रदास यांच्या ताम्रपटांतील अनुक्रमे ६७, १०७ आणि ११७ ही वर्षे इ. स. २४९ मध्ये सुरू झालेल्या आभीर (पुढे कलचुरि–चेदि नावाने ख्याति पावलेल्या) संवताची असून त्यांना जुळणारी ख्रिस्ती संवताची वर्षे अनुक्रमे सुमारे ३१७, ३५७ व ३६७ ही होत, हे दाखविले होते. या तीन राजांचे प्रत्येकी एक एक ताम्रपट मी कॉर्पस् इन्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय–उत्कीर्ण–लेख–संग्रह), भाग ४, मध्ये प्रकाशित केले आहेत. त्यानंतर अलीकडे डॉ. जी. एस्. गै यांना महाराज भुलुंड याचा आणखी एक ताम्रपट इंदूर येथे मिळाला असून त्यांत संवत् ३८ आणि ७७ अशा दोन वर्षांचा उल्लेख आहे. हा ताम्रपट अद्यापि प्रकाशित झाला नाही, तथापि त्याची बरीचशी माहिती डॉ. गै यांनी सन १९७४ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या इंडियन हिस्टरी कॉंग्रेसच्या 'एपिग्राफी' या विभागाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात दिली आहे. त्या भाषणात त्यांनी पूर्वोक्त ३८ व ७७ ही वर्षे आभीर संवताची नसून गुप्तसंवताची होत, असे प्रतिपादिले आहे. म्हणून या प्रश्नाचा थोडचा बारकाईने येथे विचार करण्याचे योजिले आहे.

डॉ. गै यांनी दिलेल्या माहितीनुसार महाराज भुलुण्डाचा हाही ताम्रपट स्वामिदास व रुद्रदास यांच्या ताम्रपटांप्रमाणे 'वलख' नामक स्थलाहून दिला होता. त्यात नर्मदेच्या परतीरावरील दासिलकपल्ली

राष्ट्र या विभागातील काही जमीन संवत् ३८ मध्ये काही ब्राह्मणांना घर बांधण्याकरिता दिली होती, असा उल्लेख आहे. काही कारणाने या दानाचा ताम्रपट दिला गेला नव्हता; म्हणून[1] भुलुंडाने संवत् ७७ मध्ये तो पूर्वोक्त ब्राह्मणांस दिल्याचा शेवटी उल्लेख आला आहे.

ज्या वल्ख गावाहून हे ताम्रपट दिले गेले होते ते स्थान पूर्व खानदेशातील चाळीसगाव जवळचे वाघली असावे असे मी प्रतिपादिले होते. डॉ. गै यांचे मत भिन्न आहे. या चार ताम्रपटांपैकी तीन इंदूर येथे सापडले असल्यामुळे या राजवंशाचे राज्य नर्मदेच्या उत्तरेस असून तेथे त्यांची राजधानी शोधली पाहिजे, असे ते म्हणतात. शिवाय, प्रस्तुत ताम्रपटात उल्लेखिलेले दासिलकपल्ली याचा निर्देश सुबन्धूच्या बाघ लेण्यात सापडलेल्या ताम्रपटात आढळतो.[2] ते स्थळ बाघलेण्यांच्या दक्षिणेस १४ मैलांवरचे देसवालिया होय. तेव्हा या राजवंशाची राजधानी वल्ख ही बाघच असावी. तसेच या राजवंशाच्या सर्व ताम्रपटांतील वर्षे आभीर संवताची नसून सन ३१९ मध्ये सुरू झालेल्या गुप्त संवताची होत असेही त्यांनी म्हटले आहे. ' वल्ख ' ही या वंशाची राजधानी होती. यात संशय नाही. कारण आतापर्यंत सापडलेल्या ४ ताम्रपटांपैकी तीन वल्ख येथूनच दिले आहेत. चौथ्यातील हा भाग फुटून नष्ट झाला आहे. त्यातही वल्खचाच निर्देश असावा. पण वल्ख या स्थलाचा सीमानिर्देश कोठेही केला नसल्याने त्याचे स्थान अनुमानानेच ठरवावे लागेल. तथापि सुदैवाने प्रस्तुत नवीन ताम्रपटातील एक निर्देश सूचक आहे. त्यात

---

१. संवत् ३८ ही मिति महाराज भुल्लुंड यांच्या कारकीर्दीची असणे शक्य नाही; कारण तो संवत् १०७ पर्यंत राज्य करीत होता. तेव्हा घरठाणाचे हे संवत् ३८ मधील दान याच वंशातल्या पूर्वीच्या किंवा दुसऱ्या कोणा राजाने दिले होते, पण त्याचा ताम्रपट त्यावेळी दिला गेला नव्हता असे मानावे लागते.

२. *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era*, C. I. I. Vol. IV, p. 20.

म्हटले आहे की ज्या दासिलकपल्ली राष्ट्रातील जमीन घरे बांधण्याकरिता ब्राह्मणांना दिली होती ते नर्मदानदीच्या पलीकडील तीरावर (नर्मदायाः परकूले) होते. दासिलकपल्ली हे सध्याचे नर्मदेच्या उत्तर तीरावरचे देसवालिया होय यात संशय नाही. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटातील त्याच्या पूर्वोक्त वर्णनावरून त्यावरील लेख नर्मदेच्या दक्षिणेस लिहिला गेला होता, असे स्पष्ट दिसते. म्हणून जेथून हा ताम्रपट दिला होता ते वल्ख नर्मदेच्या दक्षिणेसच असले पाहिजे. ते खानदेशातील वाघली असणे सुतराम् संभवनीय आहे. बाघली येथे खिस्तोत्तर आठव्या शतकात काठेवाडातून आलेल्या मौर्य राजवंशाने आपली राजधानी केली होती. तेथे त्याचा शिलालेख सापडला आहे[३] व तेथे प्राचीन देवळेही अद्यापि दृष्टीस पडतात. तेव्हा वल्ख हे बाघ नसून वाघली असावे असे वाटते.

यानंतर या राजवंशाच्या ताम्रपटात उल्लेखिलेली वर्षे कोणत्या संवताची याचा विचार करू. आतापर्यंत सापडलेल्या चार ताम्रपटांत पुढील पाच वर्षांचा निर्देश आहे–३८, ६७, ७७, १०७ आणि ११७. ही सर्व वर्षे एकाच संवताची होत यात संशय नाही. तो संवत् सन २४९–५० मध्ये सुरू झालेला आभीर संवत् होय असे माझे मत आहे. याच्या उलट पूर्वी स्वामिदास आणि भुलुंड यांच्या ताम्रपटांचे संपादन करणारे डॉ. रमेशचंद्र मुजुमदार आणि प्रस्तुत ताम्रपटाचे संपादक डॉ. गै हे तो संवत् सन ३१९–२० मध्ये सुरू झालेला गुप्त संवत् असावा असे म्हणतात. या सर्व मित्यांत वार, नक्षत्र, चंद्र–सूर्य–ग्रहण इत्यादिकांचा उल्लेख नसल्याने त्या मित्या पडताळून पाहता येत नाहीत, म्हणून अन्य पुराव्यावरून या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे.

या मित्यांतील सर्वांत अगोदरची मिती संवत् ३८ ही होय. ही गुप्त संवताची मानल्यास तिला जुळणारे खिस्ती संवताचे वर्ष ३५७–५८ येईल. या वर्षी गुप्तांची सत्ता बाघ पर्यंत (किंवा इंदूर पर्यंतही) पोचली होती काय ? डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या **अखेरीस** (या ताम्रपटाच्या कालानंतर सुमारे वीस वर्षांनी) त्याच्या

---

३. *Ep. Ind.*, Vol. II, pp. 22; f.

राज्याचा विस्तार पुढीलप्रमाणे वर्णिला आहे–[४] "त्याच्या साम्राज्यात काश्मीर, पश्चिम पंजाब, पश्चिम राजस्थान, सिंध व गुजराथ हे देश वगळून राहिलेला उत्तर भारत, तसेच दक्षिणेतील छत्तीसगड, ओरिसा आणि पूर्व किनाऱ्याची चिंगलपुट पर्यंतची–किंवा त्याच्याही खालची पट्टी–येथपर्यंतचा प्रदेश अंतर्भूत होता." समुद्रगुप्ताच्या साम्राज्यातून वगळलेल्या उत्तर भारतीताल प्रदेशांमध्ये ज्याची राजधानी उज्जैनी होती तो पूर्व व पश्चिम माळवा (आकरावन्ती) आणि नर्मदेच्या कांठचा अनूप देश ह्यांचाही अंतर्भाव केला पाहिजे. माळव्यात त्या काळी शक क्षत्रपांचे राज्य होते. त्यांनी समुद्रगुप्तापुढे मान वाकविली असली तरी इतर सर्व बाबतींत ते स्वतंत्र होते. सन ३८८ (किंवा ३८८ + क्ष) या वर्षापर्यंतची त्यांची नाणी उपलब्ध आहेत.[५] समुद्रगुप्ताचा स्वतःचा कोरीव लेख सागर जिल्ह्यातील एरण गावात सापडला आहे. याच्या पश्चिमेस त्याचा लेख सापडला नाही. त्याचा पुत्र व उत्तराधिकारी रामगुप्त याचे लेख अलीकडे विदिशेस सापडले आहेत.[६] त्यावरून दशार्ण देश गुप्तसाम्राज्यात मोडत होता यात संशय नाही.[७] पण त्याच्या पश्चिमेचा प्रदेश तेव्हापर्यंत गुप्तांच्या खास अमलाखाली आला नव्हता. गादीवर आल्यावर द्वितीय चंद्र गुप्ताला माळवा जिंकण्याकरिता दिग्विजय करावा लागला हे विदिशेजवळच्या उदयगिरि येथील लेण्यातील लेखावरून स्पष्ट दिसते.[८] सुमारे सन ३९० मध्ये क्षत्रपांचा उच्छेद

---

४. *History and Culture of the Indian People.*, Vol. III, p. 12.

५. Rapson, *Coins of the Andhra Dynasty etc.* introd., p. cxlix.

६. *Journal of the Oriental Institute*, Vol. XVII, pp. 247 f.

७. विदिशा ही दशार्ण देशाची राजधानी होती. मेघदूत (सं. का. बा. पाठक), श्लो. २३–२४ पाहा.

८. Fleet, *Gupta Inscriptions*, pp. 34 f.

केल्यावरच चंद्रगुप्ताला पूर्व व अपर आकरावन्तीवर (माळव्यावर) आपली सत्ता प्रस्थापित करता आली.

सन ३९० पर्यंत उज्जैनी गुप्तांच्या राज्यात आली नसल्यास त्याच्या दक्षिणेस सरळ रेषेत सुमारे ४० मैलांवर असलेले इंदूर आणि त्याच्याही नैर्ऋत्येस सरळ रेषेत सुमारे ८० मैलांवर असणारे बाघ ही स्थले गुप्तराज्यात तोपर्यंत आली नव्हती हे स्पष्ट आहे. तेव्हा संवत् ३८ हे भुलुंडाच्या ताम्रपटातील वर्ष गुप्त संवताचे असणे शक्य नाही. ते तसे मानले तर सन (३२० + ३८ =) ३५८ मध्येच गुप्तांची सत्ता बाघपर्यंत पोचली होती असे मानावे लागेल; पण पूर्वोक्त विवेचनावरून ते अशक्य आहे हे स्पष्ट आहे. गुप्त साम्राज्यात अंतर्भूत होण्यापूर्वी तेथे गुप्त संवताचा प्रसार झाला असणे असंभवनीय आहे. राजसत्तेबरोबर राजसंवताचा प्रसार होत असतो असा सामान्य सिद्धान्त आहे. या राजांच्या ताम्रपटांतील ही वर्षे गुप्त संवताची नसल्यास ती सन २४९–'५० च्या आभीर संवताचीच असली पाहिजेत. ती दुसऱ्या कोणत्याही संवताची असणे शक्य नाही.

पण यावर एक आक्षेप संभवतो. त्याचाही विचार केला पाहिजे. भुलुण्डाच्या ताम्रपटांतील ७७ व १०७ ही वर्षे आभीर संवताची मानल्यास ती अनुक्रमे खिस्ती संवताच्या ३२६–२७ व ३५६–५७ या वर्षांशी समान होतील. या कालात पश्चिमेचे क्षत्रप माळव्यात उज्जैनी येथे राज्य करीत होते. या कालात–चौथ्या शतकाच्या प्रथम व द्वितीय पादांत–उज्जैनीच्या जवळ इंदूर येथे आभीर संवताचा प्रचार असणे शक्य आहे काय ? या संबंधात मला हे म्हणावयाचे आहे की या राजांचे तीन ताम्रपट इंदूर येथे सापडले असले तरी ते मूळचे इंदूरचे नसावेत. त्यांपैकी दोन–स्वामिराजाचा संवत् ६७ चा व भुलुंडचा संवत् १०७ चा असे–पं. वामनशास्त्री इसलामपूरकर यांच्या संग्रहातील होते. हे शास्त्री अनेक ठिकाणांहून जुन्या हस्तलिखित संस्कृत पोथ्या, ताम्रपट वगैरे साधने जमवीत असत. तेव्हा पूर्वोक्त दोन ताम्रपट मूळचे इंदूरचे नसून त्याच्या दक्षिणेस असलेल्या अनूप देशाचे असावेत. संवत् ७७ च्या

ताम्रपटांत निर्दिष्ट केलेला दासिलकपल्ली हा गाव बाघच्या दक्षिणेस १४ मैलांवरील देसवालिया होय हे आता मान्य झाले आहे[९]. त्यावरून वरील अनुमान सयुक्तिक दिसेल. पूर्वी अनूप देश शक क्षत्रप प्रथम रुद्रदामन् याच्या साम्राज्यात मोडत होता खरा,[१०] कारण त्याच्या सन १५० च्या गिरनार येथील प्रस्तर लेखात तसा त्याचा उल्लेख आहे. पण पुढे हा देश आभीरांनी जिंकून घेऊन तेथे आपल्या मांडलिकांची स्थापना केलेली दिसते. स्वामिदास, भुलुंड व रुद्रदास हे आपल्या ताम्रपटांत स्वतःचा 'परमभट्टारकपादानुध्यात' असा उल्लेख करतात. तेव्हा ते कोणा तरी सम्राटाचे मांडलिक असले पाहिजेत. हे सम्राट् शक क्षत्रप असणे शक्य नाही. कारण तसे असते तर या ताम्रपटांत शक संवताचा उपयोग केला असता. पण या ताम्रपटांतील वर्षे शक संवताची असणे शक्य नाही; कारण अक्षर वटिकेवरून हे ताम्रपट इतके प्राचीन दिसत नाहीत. पूर्वोक्त वर्षे गुप्त संवताची नाहीत, हे आपण मागे पाहिले आहे. तेव्हा ती आभीर संवताची असून या महाराज स्वामिदासादिकांचे सम्राट् आभीर राजेच असले पाहिजेत, हे उघड आहे.

अनूप देशात आभीर संवताचा प्रचार होता म्हणूनच सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास तेथे उदयास आलेल्या कटच्चुरि (कलचुरि) राजांनीही आपल्या दानपत्रांत आभीर संवताचाच उपयोग केला आहे.[११] त्यांची राजधानी माहिष्मती (सध्याचे नर्मदा तीरावरील महेश्वर) ही होती.[१२] ती अनूप देशात मोडत असे. अनूप देशात शक किंवा गुप्त संवताचा पूर्वी प्रचार असता तर कटच्चुरींनीही त्याच

९. *C. I. I.*, Vol. IV, p. 20.

१०. *See his Girnār Rock Inscription, Ep. Ind.*, Vol. VIII, p. 42 f.

११. *C. I. I.*, Vol. IV., pp. 38 f,

१२. *Ibid.*, Introd., p. XIV. माहिष्मती हे सध्याच्या महेश्वरचे प्राचीन नाव होते हे महेश्वर येथील कोरीव लेखांवरून आता निश्चित झाले आहे.

संवताचा उपयोग आपल्या दानपत्रांत कालनिर्देशार्थ केला असता. पण कटच्चुरींच्या दानपत्रांतील मित्या आभीर संवताच्या आहेत हे यापूर्वी सिद्ध झाले आहे.

सुबन्धूच्या बडवानी (मध्यप्रदेश) ताम्रपटाची मितीही (संवत्सर १६७) आभीर संवताची आहे हे मी दाखविले आहे. तिचे ख्रिस्ती संवतातील समान वर्ष सन ४१७ येते. त्याची राजधानी माहिष्मतीच होती. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की सुबन्धूने आपल्या माहिष्मती राजधानीपासून फार दूर नसलेल्या उज्जैनीच्या गुप्तांचे स्वामित्व कसे कबूल केले नाही ? त्याच्या ताम्रपटात कोणाही गुप्त सम्राटाचा उल्लेख नाही आणि त्यात गुप्त संवताचाही उपयोग केला नाही हे कसे ? या प्रश्नाचे उत्तर मी यापूर्वीच कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्च्या चौथ्या भागात दिले आहे.[१३] 'ज्या अनूप देशावर सुबन्धु माहिष्मती येथून राज्य करीत होता त्यात नर्मदा नदीच्या दोन्ही तीरांवरचा प्रदेश (सध्याच्या मध्यप्रदेशाच्या नेमाड जिल्ह्यातल्याप्रमाणे) अंतर्भूत होत होता. याच कालात नर्मदानदीच्या दक्षिणेस त्रैकूटकांचे राज्य उदयास येत होते. पुराणांतील उल्लेखानुसार आभीरांचे राज्य १६७ वर्षे टिकले. नंतर त्यांच्या प्रदेशात त्रैकूटक उदयास येऊन त्यांनी आपली सत्ता लौकरच उत्तर कोंकण, गुजराथ व महाराष्ट्र या प्रदेशांवर पसरविली. माहिष्मती येथील राज्याला गुप्त आणि त्रैकूटक यांच्या राज्यांमधील तटस्थ राष्ट्र (buffer state) म्हणून मान्यता मिळाली असावी.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की खानदेशातील स्वामिदास, भुलुंड व रुद्रदास या राजांचे इंदूर व शिरपुर येथे सापडलेले ताम्रपट, तसेच सुबन्धु राजाचे बडवानी व बाघ लेणे या ठिकाणी सापडलेले ताम्रपट ह्यांच्या मित्या गुप्त संवताच्या नसून आभीर संवताच्या आहेत.

---

१३. *C. I. I.*, Vol. IV, Introd., p. xl.

६. त्रैकूटकांच्या माटवण ताम्रपटासंबंधी काही विचार*

सातवाहनानंतर पश्चिम महाराष्ट्रात आभीरांचे राज्य झाले. त्यांचा मूळ पुरुष ईश्वरसेन याचा एक लेख नाशिकच्या एका लेण्यांत सापडला आहे. इतर राजांविषयी आपणांस विशेष माहिती नाही. दहा आभीरांनी राज्य केले असे पुराणे सांगतात. त्यांचा राज्यकाल ६७ वर्षे पुराणांत दिला आहे, तो असंभवनीय वाटतो. खरा राज्यकाल १६७ वर्षें असावा हे वायुपुराणातील एका वचनावरून मी इतरत्र दाखविले आहे.

आभीरांनी आपला स्वतःचा सवंत् सन २४९ मध्ये सुरू केला होता. तो त्यांच्या साम्राज्यात त्यांच्या मांडलिकांनी उपयोगात आणला होता. नंतरच्या पश्चिम महाराष्ट्र, गुजराथ, खानदेश वगैरे प्रदेशांत राज्य करणाऱ्या राजवंशांनी आपल्या लेखांत त्याचाच उपयोग केला आहे. पुढे तो मध्य भारतात कलचुरि राजांनी नेल्यावर त्याला 'कलचुरि-चेदि' संवत् असे नाव पडले. या संवताचे सन १९५५ पर्यंतचे सर्व उपलब्ध लेख मी कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह) या ग्रंथमालेच्या चौथ्या भागात संपादिले आहेत.

त्रैकूटक हे प्रथम आभीरांचे मांडलिक असून त्यांच्या पतनानंतर स्वतंत्र झाले. कांही वर्षांपूर्वीपर्यंत त्यांच्यापैकी खालील राजांची, नाणी व कोरीव लेख यांवरून, माहिती होती–

इंद्रदत्त (सुमारे सन ४१५–४४०)
दह्रसेन (सु. सन ४४०–४६३) (ज्ञात आभीर वर्ष २०७)
व्याघ्रसेन (सु. सन ४६३–४९२) (ज्ञात आभीर वर्ष २४१)

---

* भारतीय इतिहास आणि संस्कृति, पृ. ३८, पु. ५–८.

२. त्यानंतर अलीकडे डॉ. शोभना गोखले यांनी मध्यमसेन[1] (आभीर संवत् २५६, सन ५०५) आणि विक्रमसेन (आभीर संवत् २८४, सन ५३३) यांचे ताम्रपट 'भारतीय इतिहास आणि संस्कृति' मध्ये प्रसिद्ध केले आहेत. विक्रमसेनाच्या ताम्रपटासंबंधी त्यांच्या कांही विधानांची चर्चा येथे करावयाची आहे.

विक्रमसेनाचा ताम्रपट दापोलीजवळ माटवण गावी सापडला होता. त्याचा आरंभ असा आहे–'स्वस्ति विजयानिरुद्धपुरात्कटच्चुरीणां मातापितृपादानध्यातो...श्रीमहाराजविक्रमसेनः महाकटाहारापरतटिकान्तर्गतपञ्चामलकग्रामनिवासिनः समाज्ञापयति ।' यात विक्रमसेनाच्या विजयानिरुद्धपुर नामक राजधानीचा ताम्रपटाच्या दानाचे स्थान म्हणून प्रथम निर्देश आहे. त्यानंतर 'कटच्चुरीणाम्' असा शब्द आला आहे. त्रैकूटकांच्या आतापर्यंत सापडलेल्या इतर सर्व ताम्रपटांत या ठिकाणी 'त्रैकूटकानाम्' असा शब्द येतो आणि तत्कालीन अन्य राजवंशांच्या तत्सदृश शब्दप्रयोगाच्या अर्थपद्धतीप्रमाणे[2] त्याचा अर्थ 'त्रैकूटक राजवंशातील' असा केला जातो. 'कटच्चुरीणाम्' याचा तसा अर्थ केल्यास हा ताम्रपट देणारा राजा विक्रमसेन कटच्चुरि राजवंशातील होता असे मानावे लागेल. त्रैकूटकांच्या नंतर कटच्चुरि (कलचुरि) राजे महाराष्ट्र, कोकण, गुजराथ, मध्यभारत येथे राज्य करू लागले. त्यांचे ताम्रपट महाराष्ट्रात सापडले आहेत. हे कटच्चुरि म्हणजे नंतर उत्तर भारत व छत्तीसगड येथे राज्य करणारे कलचुरि होत.

मग विक्रमसेन या कटच्चुरि वंशाचा होता काय ? सर्व ताम्रपट वाचल्यावर तसे दिसत नाही. याची कारणे अशी:–(१) त्याची राजधानी त्रैकूटकराजांच्या प्रमाणे अनिरुद्धपुर येथे होती. (२) त्याचे नाव इंद्रसेन दह्लसेन, व्याघ्रसेन, मध्यमसेन या ज्ञात त्रैकूटकराजांच्या प्रमाणे 'सेन–'

---

१. पूर्वोक्त, पु. ३५, पृ. ५–११

२. उदाहरणार्थ, सौराष्ट्रातील मैत्रकराजांच्या दानपत्रांतील 'प्रसभप्रणतामित्राणां मैत्रकाणां...श्रीसेनापतिभटार्कः' इत्यादि उल्लेख पाहा (इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. ६, पृ. ९ इत्यादि)

पदान्त आहे. ज्ञात पूर्वकालीन कट्टचुरींची नावे कृष्णराज, शंकरगण व बुद्धराज अशी होती. (३) ताम्रपटातील लेख 'कटच्चुरीणाम्' पद वगळता त्रैकूटकांच्या इतर ज्ञात ताम्रपटांतल्याप्रमाणे आहे. या कारणांवरून विक्रमसेन कटच्चुरिवंशी नसून त्रैकूटकवंशी होता याविषयी संशय राहात नाही.

मग या लेखाच्या आरंभी आलेल्या 'कटच्चुरीणाम्' या वंशदर्शक शब्दाची उपपत्ति कशी लावावयाची, हा यक्षप्रश्न येथे उपस्थित होतो. मी प्रथम हा लेख 'भारतीय इतिहास आणि संस्कृती'त वाचला तेव्हा 'त्रैकूटकानाम्'च्या जागी कोणी तरी मागाहून 'कटच्चुरीणाम्' असे कोरले असावे असे मला वाटले. म्हणून मी डॉ. गोखले यांच्याकडून पहिल्या पत्राचा फोटो मागवून तो तपासला. पण त्यात काही खोडाखोड दिसली नाही. तेव्हा 'कटच्चुरीणाम्' हा शब्द ताम्रपट कोरक्यानेच कोरला यात संशय नाही.

डॉ. गोखले यांनी 'कटच्चुरीणाम्' याचा अर्थ 'कटच्चुरींचा मांडलिक' असा केलेला दिसतो. त्या म्हणतात, 'त्रैकूटक राजा मध्यमसेनाचा पुत्र विक्रमसेन हा राज्यावर आल्यावर कलचुरि राजाची स्वारी झाली व विक्रमसेनाने त्याचे अधिपत्य मान्य केले असे दिसून येते.' पण सम्राटाचा उल्लेख करण्याची ही रीत इतर कोणत्याही प्राचीन कोरीव लेखात आढळत नाही. सामान्यत: मांडलिक राजे आपल्या दानपत्रांच्या आरंभी सम्राटांची वंशावळ देऊन पदव्यांसह त्यांचा उल्लेख करतात आणि समकालीन सम्राटाचा निर्देश करून 'तत्पादानुध्यात' किंवा 'तत्पादपद्मोपजीवि' यासारख्या शब्दांनी स्वत:चे मांडलिकत्व निर्दिष्ट करतात आणि मग आपले नाव व आज्ञा कोरवितात. तसे काहीच येथे दिसत नाही. याच्या उलट, विक्रमसेन आपले 'प्रतिहतसामन्ताराति:' (ज्याने सामन्त व शत्रु यांचा पाडाव केला आहे) असे आपले वर्णन करतो. कट्टचुरींनी महाराष्ट्रादि प्रदेश जिंकल्यावर मौर्य सामन्ताची कोकणात स्थापना केली होती. त्यांचा लेख ठाणा जिल्ह्यात सापडला आहे. याच्या उलट विक्रमसेन आपल्या प्रस्तुत ताम्रपटात आपले, इतर

त्रैकूटक ताम्रपटांतल्याप्रमाणे, ‘ स्फीतापरान्तादिदेशपतिः ’ (समृद्ध अशा कोंकणादि देशांचा अधिपति) असे वर्णन करतो. त्यावरून त्याने हा ताम्रपट दिला तेव्हा त्याचे राज्य यत्किंचित्ही कमी झाले होते असे दिसत नाही.

मग हा ताम्रपट बनावट आहे काय ? अक्षरवटिकेवरून तसे म्हणण्यास कारण दिसत नाही. तो त्याच कालातला (सन ५३३ च्या सुमाराचा) दिसतो.

मग ‘ कटच्चुरीणाम् ’ पदाची उपपत्ति कशी लावावयाची ? मति गुंग करून टाकणारा हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर देणे कठीण आहे. एक संभाव्य उत्तर सुचवितो.

आभीर संवत् २८४ (सन ५३३) च्या सुमारास महाराष्ट्रात व कोकणात राज्यक्रांति झाली असावी. कटच्चुरींनी दक्षिणेतील पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, कोकण वगैरे देश जिंकण्याचा सपाटा चालविला होता. दापोली तालुक्यातील ज्या ब्राह्मणाला हे दान दिले होते त्याला त्याचा ताम्रपट राजाकडून मिळविता आला नव्हता. त्याने कोकणातील एखादा (त्रैकूटक मध्यमसेनाच्या ताम्रपटासारखा) ताम्रपट मिळवून त्यावर स्वतःला ताडपत्रांवर मिळालेल्या दानपत्राचा ताम्रपट कोरवून घेतलेला दिसतो. त्यावेळी कट्टचुरींची सत्ता महाराष्ट्रातल्याप्रमाणे कोकणातही प्रस्थापित होत असल्यामुळे त्याने कोरक्याला आरंभी ‘ त्रैकूटकानाम् ’च्या जागी ‘ कटच्चुरीणाम् ’ असे कोरावयास लावलेले दिसते. तो शब्द घातल्यामुळे कटच्चुरींच्या काळीही आपल्या दानाच्या सुरक्षिततेला धोका नाही असे त्याला वाटले असावे.

वरील उपपत्ति मान्य झाल्यास कटच्चुरींची सत्ता महाराष्ट्रात सन ५३३ च्या सुमारास प्रस्थापित झाली असावी. राज्यक्रांतीच्या किंवा कारकीर्दीच्या बदलाच्या प्रसंगी असे प्रकार होणे संभवनीय आहे.

हा लेख संपविण्यापूर्वी डॉ. गोखले यांच्या अर्थात एक सुधारणा सुचवितो. ओळ ११ मध्ये ‘ नरेंद्रनारायणयोर्मातापित्रोरात्मनश्च पुण्याभिवृद्धये ’ याचा अर्थ ‘ आमच्या नरेंद्र आणि नारायण या मुलांच्या,

आमच्या माता-पित्यांच्या व आमच्या स्वतःच्या पुण्याभिवृद्धीकरिता' असा त्यांनी केला आहे. तो बरोबर वाटत नाही. नरेन्द्र आणि नारायण ही विक्रमसेनाची मुले होती, याला प्रमाण नाही. तसे असते तर त्यांचा नामनिर्देश विक्रमसेनाच्या मातापित्यांच्या पूर्वी कसा आला असता ? तेव्हा 'नरेंद्रनारायणयोः मातापित्रोः' याचा अर्थ 'नरेंद्ररूपी नारायण व नारायणी (लक्ष्मी) असे जे आमचे माता व पिता[3] यांच्या पुण्याभिवृद्धीकरिता' असा करणे उचित होईल.

संदर्भाच्या सोईकरिता माटवण ताम्रपटाचे वाचन पुढे दिले आहे.

विक्रमसेनाच्या माटवण ताम्रपटाचे वाचन

पहिला पत्रा

ओळ

१ विजयानिरुद्धपुरात्कटच्चुरीणां मातापितृपादानुध्यातो भगवत्पा-

२ दकर्म्मकर ˜ करगतक्रमागतस्फीतापरान्तादिदेशपतिरपरिमितनृपति-

३ नतचरणकमल[:*] स्वभुजपरिपालनप्रतापाधिगतप्रचुरद्रविणविश्रा-
णना-

४ व्याप्तसर्व्वदिग्व्यापिशुक्लयशा[:*] शारदरजनिकररुचिरवपुरनद्यका-
लीनपुरुष-

---

३ 'नरेंद्रनारायणयोः' या समासाचा विग्रह असा – नारायणश्च नारायणी च नारायणौ । नरेन्द्रौ एव नारायणौ (रूपक अलंकार) किंवा नरेन्द्रौ नारायणौ इव (उपमा अलंकार) । तयोः नरेन्द्रनारायणयोः ।

५ विशेषसदृशोदारचरितस्सुचरितनिदर्शनार्थमिव निर्म्मितऽप्रति-
हतसामन्ता-

६ रातिरन्यनरपतिप्रतिविशिष्टवङ्शा(वंशा)लङ्कारभूतऽप्रभूतप्रवीरसा-
धनाधि-

७ ष्ठितदुर्ग्गनगरसागरस्सागरगम्भीरगिरिगुरुस्थिरप्रकृति[:*] प्रकृति-
जनमनो-

८ हरऽप्राज्ञसंश्रितगुरुस्वजनसाधुसाधारणधनोभिजनसदृशयन्त्रणोप-

९ गृहीतस्पृहणीयश्रीश्श्रीमहाराजविक्रमसेन[:*] महाकटाहारपरत-
टिका-

१० न्तर्ग्गतपञ्चामलकग्रामनिवासिनस्समाज्ञापयति[।*] विदितमस्तु वो
यथास्माभिर्न्न-

११ रेन्द्रनारायणयोर्मातापित्रोरात्मनश्च पुण्याभिवृद्धये बलिचरुवै-

१२ श्वदेवाग्निहोत्रक्रियोत्सर्प्पणार्थमाचन्द्रार्कार्णवक्षितिस्थितिसमकालीन-

दुसरा पत्रा

१३ ऽपुत्रपौत्रान्वयभोग्यश्चोरराजापथ्यकारिवर्ज्जमचाटभटप्रावेश्य[:*]
सर्व्वदित्यवि-

१४ ष्टिपरिहीणो भूमिच्छिद्रन्यायेन कौण्डिण्यसगोत्रत्तैत्तिरीयककल्लि-
वनवास्तव्य-

१५ ब्राह्मणशिवस्वामिनेयं ग्रामोतिसृष्टो यतोस्मद्वङ्श्य(वंश्य)राजभिरन्यैश्च
विभवानभावानुबन्धा-

१६ नायुर्व्वियोगानुगतं गुणांश्च दीर्घकालानुगुणान्विगणय्य दानञ्च
गुणवतामवदात-

१७ मपदानमिति प्रमाणीकृत्य शशिकररुचिरं चिराय यशश्चिचीषु-
भिरयं भूमिदा–

१८ योनुमन्तव्यः पालयितव्यश्च ॥ यस्मादुक्तं भगवता वेदव्यासेन
व्यासेन [। *]

१९ षष्टिवर्षसहस्राणि[1] स्वर्गे मोदति भूमिदः[।] आच्छेत्ता चानु-
मन्ता च तान्येव नरके वसेत् [॥१॥*]

२० बहुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिस्सगरादिभिः[। *] यस्य यस्य
यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलम् [॥२॥*]

२१ पूर्व्वदत्तां द्विजातिभ्यो यत्नाद्रक्ष युधिष्ठिर[। *]महीं महीमतां
श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपालनम् [॥३॥*]

२२ विन्ध्याटवीषु घोरासु शुष्ककोटरवासिनः[।*] कृष्णाहयो हि
जायन्ते भूमिदायं ह–

२३ रन्ति ये [॥४॥*] दूतकश्चात्रानिरुद्धः[।*] लिखितञ्चैत-
त्सान्धिविग्रहिकस्वामिकेनेति [। *]

२४ सं. २०० ८० ४ चैत्र व २ [। *]

---

१ ' षष्टि वर्षसहस्राणि ' असे वाचावे.

७. खिद्रापूर – प्राचीन महाराष्ट्रातील विख्यात समरभूमि*

खिद्रापूर हे सन १९६१ च्या जनगणनेप्रमाणे १७६७ लोकसंख्येचे गाव कोल्हापूर जिल्हयाच्या शिरोळ तालुक्यात कोल्हापुरच्या आग्नेयेस सुमारे ३५ मैलांवर कृष्णानदीच्या काठी एका गेचक्यात वसले आहे. तेथे दक्षिण दिशेस वाहणाऱ्या कृष्णानदीचा प्रवाह पश्चिम दिशेस वळतो. हे स्थळ फार प्राचीन काळापासून भगवान् शंकराचे पवित्र स्थान गणले गेले आहे. तेथे यादवनृपति सिंघण याचा शक संवत् ११३६ (सन १२१३) मध्ये चैत्र महिन्यातील सूर्यग्रहणप्रसंगी दिलेल्या ग्रामदानाचा उल्लेख करणारा शिलालेख शिवालयात ठेवलेला आहे.[१] त्यात तेथील शिवलिंगाचे वर्णन 'श्रीमदाद्यस्वयंभू' असे केले असून त्याचे नाव 'श्रीकोप्पेश्वरदेव' असे दिले आहे. तेच नाव अद्यापि प्रचलित आहे. सिंघणाच्या पूर्वोक्त शिलालेखात कूडलदामवाड हे गाव कूडलकृष्णवेणी व भेणसी या नद्यांच्या संगमावर मिरिंजि देशात असून ते कूडलकृष्णवेणी आणि कुवेणी यांच्या संगमाजवळच्या आद्यस्वयंभू कोप्पेश्वर देवाच्या अष्टविध अर्चनेकरिता दान दिल्याचा निर्देश आहे. सध्या यातील कांही नद्यांची नावे बदलली आहेत. कूडलदामवाड म्हणजे सध्याचे कुरूंदवाड. हे पूर्वी मिरिंजि (म्हणजे सध्याच्या मिरज) देशात मोडत होते. त्याच्या जवळचा कूडलकृष्णवेणी आणि भेणसी नद्यांचा संगम म्हणजे सध्याच्या नृसिंहवाडीजवळ झालेला कृष्णा–पंचगंगासंगम होय. तेव्हा पंचगंगेचे

---

* धर्मभास्कर, १९७५ चा दिवाळी अंक, पृ. ५१-५५

१. मिराशी– शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ. ३४९ इ.

पूर्वीचे नाव भेणसी होते असे दिसते. खिद्रापूर या संगमाच्या आग्नेयेस सुमारे ८ मैलांवर आहे. दुसरा कृष्णवेणी आणि कुवेणी यांचा संगम म्हणजे खिद्रापूरच्या नैर्ऋत्येस सुमारे पाच मैलांवर दानवाड गावाजवळ झालेला कृष्णा व दूधगंगा नद्यांचा संगम होय. त्यावरून कुवेणी हे दूधगंगेचे प्राचीन नाव होय हे निष्पन्न होते. खिद्रापूर या दोन संगमांच्या मध्ये वसले आहे. तेथे पौष महिन्यात मोठी जत्रा भरते. तेथे कोप्पेश्वराचे अपूर्ण राहिलेले सुंदर मंदिर आहे. त्याचा उल्लेख पुढे येईल.

खिद्रापूरचा कोप्पेश्वर देव प्राचीन काळी नवसाला पावणारा म्हणून विख्यात होता. येवूर (जि. विजापूर) येथील सन १०७७ च्या शिलालेखात शंकरार्य नामक ब्राह्मणाला कोप्पदीश्वर (कोप्पचा ईश्वर) या देवाच्या कृपाप्रसादाने पुत्र झाला म्हणून त्याने त्याचे नाव कोप्पदेव असे ठेवल्याचा उल्लेख आहे.[२] त्यावरून या स्थानाचे प्राचीन नाव खिद्रापूर नसून ‘ कोप्प ’ होते असे दिसते.

कोप्प किंवा कोप्पम् हे गाव दक्षिण भारताच्या प्राचीन इतिहासात सुप्रसिद्ध आहे. इ. स. च्या अकराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास दक्षिणेत उत्तरकालीन चालुक्य सम्राट् प्रथम सोमेश्वर (सु. सन १०४३–१०६३) व चोल सम्राट् राजाधिराज (सु. सन १०१८–१०५४) या राजांमध्ये कोप्पम् येथे घनघोर लढाई झाली होती. तिचे वर्णन दक्षिणच्या अनेक कोरीव लेखांत आले आहे.[३]

चोल व चालुक्य यांचे वैमनस्य दीर्घकाळ चालू होते आणि त्यात कधी चोलांचा तर कधी चालुक्यांचा जय होत होता. एकदा चोल नृपति राजाधिराज याने, साडे सात लाख रट्टपाडीवर (राष्ट्रकूटांच्या आणि नंतर चालुक्यांच्या अमलाखालच्या प्रदेशावर) स्वारी करून एका महानदीच्या तीरावर असलेल्या कोप्पम् नामक महातीर्थापर्यंत धडक मारली. चालुक्य नृपति आहवमल्ल (प्रथम सोमेश्वर) याला ते कळताच तो

२. *Ep. Ind.*, Vol. XII, pp. 279, 286, 296

३. Kielhorn's *List of Inscriptions of Southern India*, Nos. 744, 745, 749 etc.

त्याच्याशी सामना करण्यास धावून आला. चालुक्यांनी प्रथम चोल सैन्यावर हल्ला केला. त्या धुमश्चक्रीत हत्तीवरून लढणारा चोलनृपति राजाधिराज बाणाने घायाळ होऊन मृत्यु पावला. त्याच्या बाजूचे अनेक योद्धे कामास येऊन त्याचे सैन्य पराभव पावून पळू लागले. तेव्हा त्याचा वडील भाऊ द्वितीय राजेन्द्र हा त्याच्या मागील हत्तींच्या फळीचा नायक म्हणून लढत होता तो पुढे झाला, आणि त्याने आपल्या सैन्याला धीर देऊन लढाई पुढे चालविली. तीत चालुक्यांच्या बाजूचे अनेक सेनानायक धारातीर्थी पडले. त्यांमध्ये पुलकेशी, दशपन्मा, अशोकय्यन्, आरैयन्, नन्नि नोळंबा या चालुक्यांच्या सामंतांचा व सेनापतींचा उल्लेख आहे. चालुक्यांच्या फळीचा धुव्वा उडाला आणि सोमेश्वर गर्भगळीत होऊन पळून गेला. चालुक्यांचे अनेक हत्ती, घोडे, उंट, वराहांकित निशाण आणि सत्यप्पै, शांगप्पै यांसारख्या अप्रतिम सौंदर्याच्या राण्या व इतर स्त्रिया चोलांच्या हाती पडल्या. नंतर राजेंद्राने समरांगणावरच आपणांस राज्याभिषेक करवून घेतला आणि कोल्हापूर येथे जयस्तंभ उभारून तो स्वदेशी परत गेला.[४]

या लढाईचे वर्णन चोलांच्या अनेक कोरीव लेखांत विस्तृत रूपाने आले आहे. चालुक्यांच्या लेखांत मात्र त्याचा उल्लेख येत नाही. बिल्हणाच्या 'विक्रमांकदेवचरिता'तही त्याचा निर्देश नाही. या युद्धाचा पहिला उल्लेख राजेंद्राच्या कारकीर्दीच्या दुसऱ्याच वर्षी, सन १०५४

---

४. द्वितीय राजेन्द्रवर्म्याच्या तिरुपल्लम् येथील कोरीव लेखात (Kielhorn's *List*, No. 744) राजेन्द्रवर्म्याच्या कोल्हापूर येथील जयस्तंभाचा उल्लेख सोमेश्वर–आहवमल्लाच्या पराभवाच्या वर्णनापूर्वी आला असला तरी राजेन्द्राने तो जयस्तंभ कोप्पम् येथील विजयानंतरच उभारला असला पाहिजे. त्या विजयापूर्वी राजराज हा चोलांचा सम्राट् होता. सोमेश्वर-आहवमल्लावरील विजयापूर्वी कोल्हापूर येथे जयस्तंभ उभारला असता तर तो राजराजाने उभारला होता, असे वर्णन आले असते.

मध्ये, कोरलेल्या शिलालेखात येतो. नंतरच्या सन १०५५ मध्ये कोरलेल्या मणिमंगलम् येथील लेखात त्याचे सविस्तर वर्णन आले आहे. चालुक्यांच्या लेखांत त्याचा उल्लेख नसावा हे साहजिकच आहे. पुढे सोमेश्वराच्या कारकीर्दीच्या अखेरीस, सन १०७१ च्या एका लेखात, चोलांच्या आक्रमणाचा आणि त्यांच्या राजाच्या युद्धातील निधनाचा उल्लेख आला आहे.[५] त्या राजाचे नाव त्यात दिले नसले तरी तो उल्लेख कोप्पम्च्या लढाईचाच असावा.

हे ऐतिहासिक दृष्टचा अत्यंत महत्त्वाचे युद्ध ज्या कोप्पम् येथे झाले त्या स्थलाच्या निश्चित स्थानाविषयी अनेक मते व्यक्त झाली आहेत. व्हिन्सेंट स्मिथच्या मते हे स्थान तुंगभद्रेच्या काठी असावे.[६] डॉ. पी. बी. देसाई यांनी ते रायचूर जिल्ह्यातील कोप्पल असावे असे म्हटले आहे.[७] अनेक वर्षांपूर्वी डॉ. फ्लीटने याची सविस्तर चर्चा करून हे स्थान खिद्रापूर असावे हे दाखविले होते.[८] प्रा. नीलकंठ शास्त्री यांनी अलीकडे चोलांवर सविस्तर ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यात 'कोप्पम्'च्या स्थानाची विस्तृत चर्चा अपेक्षित होती, पण त्यांनी फ्लीटच्या पूर्वोक्त मताचा उल्लेख करून ते न स्वीकारता 'अलीकडे मस्कीजवळ रायपूर जिल्ह्यातील हिरेहळ्ळ(महानदी)च्या काठचे कोप्‌बाळ हे प्राचीन कोप्पम् असावे हे जास्त संभवनीय मानले जाते' असे म्हटले आहे.[९] डॉ. रमेशचंद्र मुजुमदार हे कोप्पम्चे स्थान अनिश्चित मानतात.[१०] या प्रश्नाविषयी अशी विविध मते व्यक्त झाली असल्यामुळे त्याचा थोडचा बारकाईने विचार केला पाहिजे.

---

५. *Bombay Guzattier* (Old ed.), Vol. I, part ii, p. 441; *Ep. Ind.*, Vol. XV, p. 23.

६. Smith, *Early History of India* (1914), p. 431, 467.

७. P. B. Desai, *A History of Karnāṭaka*, p. 166.

८. *Ep. Ind.*, Vol. XII, pp. 296 f

९. Nilakanta Sastri, *The Cholas* (Second ed.), p. 256.

१०. R. C. Majumdar, *Ancient India* (1960), p. 371.

कोप्पम् हे रायचूर जिल्ह्यातील हिरेहळ्ळ नदीच्या काठचे कोप्बाळ, या मताचा मुख्य आधार श्री. सी. आर. कृष्णमाचार्लूंच्या 'कोप्बाळ येथील कन्नड कोरीव लेख '[११] या ग्रंथातील विवेचन होय, हे प्रा. नीलकंठशास्त्रींच्या ग्रंथातील संदर्भावरून दिसते.[१२] तेव्हा त्याचा प्रथम विचार करू.

कोप्बाळ हे रायचूर जिल्ह्यात हिरेहळ्ळ नदीच्या उजव्या तीरावर वसले असून तेथे दोन ब्राह्मी आणि आठ कन्नड लिपीत लिहिलेले लेख सापडले आहेत. ब्राह्मी लिपीतील लेख हे अशोकाच्या लघु प्रस्तर लेखांचे भग्न अवशेष आहेत. कन्नड लिपीतील लेखांत त्या स्थळाचे नाव कोपण असे येते. हेच प्राचीन 'कोप्पम्' असावे. कोप्पम् हे एका महानदीच्या तीरावरील तीर्थस्थान होते असे चोल नृपति राजेंद्र याच्या लेखांत म्हटले आहे.[१३] कोप्बाळ हे हिरेहळ्ळ नदीच्या उजव्या तीरावर आहे. हिरेहळ्ळ या कन्नड शब्दाचा अर्थ 'महानदी' असा होतो. शिवाय कोप्बाळ हे पवित्र स्थान गणण्यात येते. तेथे अनेक जैन मंदिरांचे व जैन मुनींच्या समाधींचे उल्लेख असलेले कन्नड लेख सापडले आहेत. तेव्हा चोल व चालुक्य सैन्यांच्या घनघोर लढाईचे स्थान 'कोप्पम्' हे कोप्बाळ असावे असे मत सी. आर. कृष्णमाचार्लू यांनी प्रथम मांडले. ते प्रा. नीलकंठशास्त्री व डॉ. पी. बी. देसाई यांनी स्वीकारले आहे. त्याचा आता विचार करू.

फ्लीटने दाखविले आहे की 'कोप्प' या कन्नड शब्दाचा अर्थ 'लहान खेडे' असा होतो.[१४] या नावाची अनेक खेडी कर्नाटकात आहेत. पण ती कोणत्याही महानदीच्या तीरावर नाहीत व पवित्र क्षेत्र म्हणूनही

---

११. *Hyderabad Archaeological Series, (H. A. S.)*, No. 12, pp. 1–5.

१२. *The Cholas*, p. 276.

१३. *H. A. S.*, No. 12, p. 4

१४. *Ep. Ind.*, Vol. XII, p. 297, no 5

प्रसिद्ध नाहीत. ' कोप्पम् 'चे आधुनिक स्थान शोधताना खालील कसोट्या लावल्या पाहिजेत.

(१) त्याचे नाव ' कोप्पम् 'शी जुळले पाहिजे.

(२) ते एका महानदीवर वसले असले पाहिजे.

(३) ते विख्यात तीर्थ असले पाहिजे.

(४) ते कोल्हापुराजवळ असले पाहिजे; कारण या लढाईतील विजयानंतर राजेन्द्राने तेथे जयस्तंभ उभारला होता.

रायचूर जिल्ह्यातील कोप्बाळच्या बाबतीत पहिल्या तीन कसोट्या पूर्ण होतात; पण चौथी कसोटी मात्र लागत नाही. रायचूर जिल्ह्यातील कोप्बाळ हे प्राचीन कोप्पम् मानल्यास ते कोल्हापूरच्या पूर्वेस सरळ रेषेत सुमारे सव्वादोनशे मैलांवर आहे. कोप्पम् येथे अभूतपूर्व विजय मिळाल्यावर राजेंद्र नृपति आपला जयस्तंभ उभारण्यास इतक्या दूर पश्चिमेस कशाला जाईल ? प्राचीन कोप्पम्चे रायचूर जिल्ह्यातील कोप्बाळशी ऐक्य प्रतिपादिताना प्रा. नीलकंठ व डॉ. पी. बी. देसाई[१५] यांनी ही दुर्लंघ्य अडचण लक्षात घेतली नाही.

याच्या उलट शिरोळ तालुक्यातील खिद्रापूरला या सर्व कसोट्या उत्तम प्रकारे लागू पडतात.

(१) तेथील शिवलिंगाचे नाव अद्यापि कोप्पेश्वर असे आहे. ते कानडी लेखातील कोप्पदीश्वर (कोप्प येथील ईश्वर) याला बरोबर जुळते. तेव्हा खिद्रापूरचे प्राचीन नाव कोप्प असले पाहिजे.

(२) ते एका महानदीच्या (कृष्णेच्या) काठावर आहे.

(३) तेथील शिलालेखात तेथील शिवलिंगास ' आद्यस्वयंभू ' असे म्हटले आहे. तेथे अद्यापि पौष महिन्यात जत्रा भरते. त्याचे पावित्र्य लक्षात घेऊन शिलाहार नृपति गंडरादित्य याने भगवान् शंकराचे उत्तुंग व सुंदर शिल्पाकृतींनी अलंकृत असे मंदिर बांधण्यास आरंभ केला होता.

---

१५. डॉ. देसाई तर कोल्हापूरचा निर्देश अग्राह्य मानतात ! पण तो अनेक उत्तरकालीन लेखांत आल्यामुळे खरा मानला पाहिजे.

त्याचे बांधकाम त्याचा पुत्र विजयादित्य आणि नातू द्वितीय भोज यांच्या कारकीर्दीतही पूर्ण झाले नव्हते. पुढे यादव नृपति सिंघणाने भोजाचा उच्छेद करून शिलाहार राज्य खालसा केल्यामुळे ते अद्यापि तसेच अपूर्णावस्थेत विद्यमान आहे.[१६]

(४) खिद्रापूरहून कोल्हापूर केवळ तीस मैलांवर आहे. रणांगणावर विजय मिळवून आणि तेथेच स्वत:ला अभिषेक करवून घेतल्यावर जवळच्या मोठ्या नगरीत राजेंद्राने आपला जयस्तंभ उभारणे अगदी साहजिक आहे. ही कसोटी खिद्रापूरला पूर्णपणे लागते. इतर कोणत्याही सूचित समीकरणाला ती लागू पडत नाही. हे लक्षात घेतले पाहिजे.[१७]

पण येथे एका संभाव्य आक्षेपाचा विचार केला पाहिजे. दक्षिण भारताच्या पूर्व भागातील आपल्या गंगापुरी या राजधानीहून इतक्या दूर पश्चिमेस चोलनृपति का चालून गेला ? या प्रश्नाचे उत्तर देण्यास तत्कालीन राजकीय परिस्थिति लक्षात घेतली पाहिजे.

त्या काळी कोल्हापूर प्रदेशावर शिलाहार राजांचे राज्य होते. हे राजे उत्तरकालीन चालुक्यांचे मांडलिक होते. सोमेश्वर आहवमल्लाचा पिता द्वितीय जयसिंह याने दक्षिण कोंकणातील शिलाहारांचे राज्य जिंकून तो प्रदेश कोल्हापूरच्या शिलाहारांच्या स्वाधीन केला होता.[१८] तेव्हापासून चालुक्य–शिलाहारांचे संबंध दृढ होऊ लागले होते. पुढे मारसिंह या शिलाहार नृपतीच्या चंद्रलेखा नामक अप्रतिम सौंदर्याच्या कन्येचा विवाह सोमेश्वराचा पुत्र षष्ठ विक्रमादित्य याच्याशी झाला.[१९] त्यायोगे हे संबंध दृढतर झाले. कोल्हापूरच्या शिलाहारांच्या अनेक लेखांत तत्कालीन राजांनी व त्यांच्या सामंतांनी तोंडनृपति चोलांच्या प्रदेशावर

---

१६. मिराशी, शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. (२३४) इ.

१७. म्हणून डॉ. देसाई यांनी अनेक तामिल समकालीन लेखांतील कोल्हापूरचा उल्लेख अग्राह्य मानला आहे. हा सत्यापलाप आहे.

१८. *Ind. Ant*,, Vol. VIII, pp. 11 f.

१९. शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. (५४).

स्वाऱ्या केल्याचे उल्लेख आढळतात.[२०] तेव्हा चोलनृपति राजाधिराज आणि त्याचा बंधु राजेंद्र यांनी चालुक्यांच्या या आक्रमक सामंतांना धडा शिकविण्यासाठी कोल्हापूर प्रदेशावर आक्रमण केले असल्यास आश्चर्य नाही. त्याची वार्ता कळताच सोमेश्वर–आहवमल्ल आपल्या सामंताच्या साहाय्यास धावून आला असावा. त्यांची लढाई कृष्णातीरी कोप्पम् (सध्याचे खिद्रापूर) येथे झाली. तेथे विजय मिळाल्यावर चोल नृपति राजेंद्राने कोल्हापूर येथे–शत्रूच्या राजधानीत–आपला विजयस्तंभ उभारावा हे साहजिक आहे. या घटनेचा अन्वयार्थ कोप्पम्च्या खिद्रापूरशी समीकरणास बरोबर जुळतो. इतर कोणत्याही समीकरणास जुळत नाही.

एपिग्राफिया इंडिका (पु. १२, पृ. २९६ ते २९८) मधील आपल्या लेखाच्या शेवटी डॉ. फ्लीटने खिद्रापूर येथेच चालुक्य–चोलांची दुसरीही लढाई झाली असावी, असे म्हटले आहे. या लढाईचा उल्लेख 'कूडलसंगमाचे युद्ध' असा केला जातो. कृष्णा नदीला पूर्वोक्त खिद्रापूर शिलालेखात 'कूडलकृष्ण–वेणी' असे म्हटले आहे. तेव्हा त्या नदीचा नृसिंहवाडी येथे पंचगंगेशी झालेला संगम 'कूडलसंगम' या संज्ञेने विवक्षित असावा असे फ्लीटला वाटले. तसेच या लढाईनंतर सोमेश्वर आहवमल्लाने चोलनृपति राजेंद्राचा पुत्र आणि उत्तराधिकारी वीर राजेंद्र याला पुनः आव्हान देऊन कूडलसंगम येथेच युद्धाकरिता बोलावले. त्याप्रमाणे वीर राजेंद्र आपल्या सैन्यासह कूडलसंगमाजवळ करंदै किंवा कांदै येथे त्याची वाट पाहत बसला. पण सोमेश्वर आला नाही. हे करंदै खिद्रापूरजवळचे इचलकरंजी असावे असे फ्लीटचे मत होते. या प्रश्नाची चर्चा पुढे एखाद्या लेखात करण्याचे अभिवचन त्याने दिले होते.[२१] पण ते पूर्ण झाल्याचे दिसत नाही.

पण कूडलसंगम हे खिद्रापूर असेल असे वाटत नाही. कारण पूर्वोक्त दुसऱ्या प्रसंगी सोमेश्वराची महिनाभर वाट पाहून तो न आल्यामुळे वीरराजेन्द्राने रट्टपाडीत (चालुक्यांच्या राज्यात) धुमाकुळ घालून

२०. पूर्वोक्त, पृ. (५७).

२१. *Ep. Ind.*, Vol. XII, p. 289.

तुंगभद्रेच्या तीरावर आपला जयस्तंभ उभारल्याचे वर्णन आहे.[२२] तेव्हा कूडलसंगम हे ठिकाण तुंगभद्रेच्या काठी असावे. कोणी ते तुंगा व भद्रा यांच्या संगमाचे स्थान, तर दुसरे ते तुंगभद्रा व कृष्णा यांच्या संगमाचे स्थान मानतात.[२३] ते खिद्रापूर असणे शक्य नाही.

पण यानंतर खिद्रापूर येथे आणखी दोन लढाया झाल्याचे उल्लेख सापडतात. सोमेश्वर आहवमल्ल याचा वंशज तृतीय तैलप (११५१–११६३) याच्या कारकीर्दीत सुमारे सन ११५६ च्या सुमारास राज्यक्रान्ति होऊन मंगळवेढ्याच्या कलचुरि बिज्जलाने त्याला पदच्युत करून कल्याणीची गादी बळकावली. या साहसात त्याला कोल्हापूरच्या शिलाहार विजयादित्याचे साहाय्य झाले होते. त्याचा उल्लेख विजयादित्याचा पुत्र द्वितीय भोज याच्या ताम्रपटात येतो.[२४] गादीवर आल्यावर बिज्जलाने विजयादित्याला आपल्या दरबारात उपस्थित राहण्याची आज्ञा केली. पण विजयादित्याला ती अपमानास्पद वाटून तो गेला नाही. तेव्हा बिज्जलाने त्याच्या प्रदेशावर आक्रमण करून त्याचा पराभव केला असे ‘बिज्जलचरिता’त म्हटले आहे.[२५] हा ग्रंथ सर्वस्वी विश्वसनीय नाही; पण विजयादित्याच्या कारकीर्दीत खिद्रापूर येथे घनघोर लढाई झाल्याचे उल्लेख खिद्रापूरच्या शिवमंदिराच्या स्वर्गमंडपातील अनेक ब्रॅकेटांवरील कोरीव लेखांत आले आहेत.[२६] या लेखांत विजयादित्याचा दण्डनायक बोप्पण याची तुलना विष्णूच्या गरुडाशी, शंकराच्या कार्त्तिकेयाशी,

---

२२. *History and Culture of the Indian People*, Vol. V, 170; *The Cholas*, p. 265, 268.

२३. *The Cholas*, p. 265,

२४. शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. ३३२, ३४५.

२५. J. *R. A. S.*, Vol. IV, p. 34.

२६. Kundangar– *Inscriptions tn Northern Karnāṭaka and the Kolhāpur State*, Nos. 25, 26, 28, 29 and 30.

रामाच्या हनुमानाशी केली असून त्याने विजयादित्याला एकच्छत्री राज्य मिळवून दिल्याचे वर्णिले आहे. खिद्रापूरच्या शिवमंदिरात बोप्पणाचे व त्याच्या युद्धनैपुण्याचे वर्णन करणारे आठ लेख आहेत. त्यांवरून त्याने तेथील युद्धात नेत्रदीपक विजय मिळविला असावा यांत संशय नाही. या लेखांत शत्रूचा निर्देश नाही, पण 'बिज्जल-चरित्रा'तील उल्लेखावरून तो शत्रु कलचुरि नृपति बिज्जलच असावा, असे दिसते.

यानंतर आणखी एक अशीच मोठी लढाई खिद्रापूरला झाली. तिचेही अवशेष खिद्रापूरला आढळतात. उत्तरकालीन चालुक्यांनंतर देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य दक्षिण भारतात पसरले. कोल्हापूरच्या शिलाहारांनी त्यांचे स्वामित्व मान्य न करता 'राजाधिराज', 'परमेश्वर' 'परमभट्टारक', 'पश्चिमचक्रवर्ति' अशा स्वत:च्या सम्राट्पदनिदर्शक पदव्या धारण करण्यास सुरुवात केली. तेव्हा देवगिरीच्या सिंघणाने शिलाहार नृपति द्वितीय भोज याच्या राज्यावर स्वारी केली. त्यांची लढाई खिद्रापूर येथेच झाली. तिचा निदर्शक कोरीव लेख खिद्रापूर येथे सापडला आहे. तेथील एका वीरगळांवरील लेखांत महामण्डलेश्वर भोजदेव याच्या कारकीर्दीत बन्नेस हा संगमाजवळच्या लहानशा खिडीत आपल्या घोडदळासह शौर्याने लढून स्वर्गास जाता झाला, असे म्हटले आहे.[२७] या लेखातही शत्रूचा उल्लेख नाही. पण तो यादव नृपति सिंघणच होय, यात संशय नाही. या विजयप्राप्तीनंतर सिंघणाने तेथे एका शिळेवर शके ११३६ (सन १२१३) मध्ये आपला लेख कोरवून कृष्णा व भेणसी (सध्याची पंचगंगा) यांच्या संगमावरचे कूडलदामवाड (सध्याचे कुरुंदवाड) कोप्पेश्वराला दान दिल्याचे जाहीर केले. तसेच त्या देवाला पूर्वी दान मिळालेल्या (कृष्णानदीच्या समोरच्या काठावरील प्रदेशातील) जुगुल व सिरगुप्पि या गावांच्या उत्पन्नाचा विनियोग देवळाच्या डागडुजीकरिता करावा अशी त्याने आज्ञा केली.[२८] पण त्याने त्या वेळी अपूर्णावस्थेत असलेले कोप्पेश्वर देवालय पूर्ण करण्याची काहीहि व्यवस्था केली नाही.

२७. *Ibid.*, inscription No. 35.

२८. शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. ३४९,

कदाचित् तेथील गर्भगृहावरील साधे चुनेगच्ची शिखर त्याच्या आज्ञेने बांधले असेल. पण सभामंडपावर अद्यापि शिखर नाही. तसेच त्याच्या समोरील रंगमंडपावर तर अद्यापि छतही झाले नाही. देवालयाच्या गर्भगृहाच्या व सभामंडपाच्या बाहेरील भिंतींवर अनेक सुंदर शिल्पाकृति दिसतात. त्यांपैकी खालच्या पंक्तींतील बहुतेक शिल्पाकृति नंतरच्या काळात मूर्तिभंजकांनी छिन्नविच्छिन्न केल्या आहेत. ते पाहून प्रेक्षकांचे मन उद्विग्न होते.[२९]

२९. पूर्वोक्त, पृ. (१३४) इ.

खंड ३– प्राचीन भारतीय नाणी

८. वाटेगाव येथील सातवाहन नाण्यांचा संचय*

वाटेगाव हे पश्चिम महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात वाळवे गावाच्या नैर्ऋत्येस सरळ रेषेत सुमारे १६ मैलांवर एक खेडेगाव आहे. १९६१ सालच्या ऑगष्ट महिन्यात तेथील श्री. मारुती विष्णु माने यांच्या घराजवळील खोलगट जागेत फुलझाडे लावताना काही मुलांना हा संचय सापडला. सांगली जिल्ह्याच्या कलेक्टरच्या अहवालानुसार त्यावेळी त्या संचयात ७०० नाणी चांगल्या स्थितीत आणि ३५ नाणी तुकडे झालेली होती. नंतर कलेक्टरांनी तो संचय महाराष्ट्र शासनाच्या मुंबई येथील पुरातत्त्व खात्याकडे पाठविला. तेथे तो १९६३ साली मी प्रथम पाहिला. नंतर तो संचय महाराष्ट्र शासनाच्या एका उच्चाधिकाऱ्यांनी अभ्यासाकरिता नेला. तो त्यांच्याकडे सुमारे आठ वर्षे होता. शेवटी आपल्या सेवानिवृत्तीनंतर त्यांनी तो महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व खात्याकडे १९७२ साली परत केला. तो संचय अद्यापि कोठेही प्रसिद्ध झाला नसल्यामुळे त्याचा अभ्यास करण्याची मला उत्कंठा होती. माझ्या विनंतीवरून महाराष्ट्र शासनाचे शिक्षण सचिव डॉ. ए. यू. शेख यांनी तो संचय नागपुरास पाठवून त्याचा अभ्यास करण्याकरिता सर्व सोई मला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

नागपूरच्या मध्यवर्ति संग्रहालयात हा संचय आला तेव्हा त्यात एकूण ६८४ नाणी होती. त्यांपैकी ६८२ शिशाची व दोन तांब्याची होती. तांब्याच्या नाण्यांपैकी एकाचे तुकडे झाले होते. बाकीच्या नाण्यांचे

---

* भारतीय इतिहास आणि संस्कृति, पु. ३७, पृ. १०–१८.

काय झाले हे माहीत नाही. ही सर्व नाणी वाटोळ्या आकाराची असून त्यांच्या पुढील बाजूवर उजवीकडे किंवा डावीकडे सोंड उंच केलेला हत्ती आणि त्याच्या सभोवार ती नाणी पाडणाऱ्या राजाचे नाव आणि मागील बाजूवर एकावर एक आडव्या उभ्या ठेवलेल्या डंबेल्सच्या आकृतींनी बनविलेले ' उज्जैनी चिन्ह ' उमटविलेले आहे. या नाण्यांचा शिशाचा जाड पत्रा त्यावर उमटविलेल्या ठशापेक्षा किंचित् लहान आकाराचा होता आणि तो ठसा काळजीपूर्वक मारला नव्हता. यामुळे लेखांतील कांही अक्षरे सर्व नाण्यांवर उमटली नाहीत. अनेक नाणी एकत्र करून ती वाचावी लागतात. कांही नाण्यांच्या मागील बाजूवर अर्धचंद्राची आकृति उमटविलेली आढळते.

महाराष्ट्रात अलीकडे सापडलेला सातवाहन नाण्यांचा हा दुसरा मोठा संचय होय.[१] यापूर्वी सन १९३९ मध्ये विदर्भात अकोला ज़िल्ह्याच्या मंगरूळ तालुक्यातील तऱ्हाळा गावी यापेक्षा मोठा असा सातवाहनांच्या दीड हजाराहून जास्त पोटीन धातूच्या नाण्यांचा संचय सापडला होता. तो मी जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया (पु. २, पृ. ८३ इ.) मध्ये वर्णिला आहे. त्यामध्ये अनेक सातवाहन राजांची नाणी होती. त्यांपैकी स्कंद सातकर्णि आणि विजय सातकर्णि यांची नावे पूर्णपणे तेव्हा प्रथमच वाचण्यात आली, आणि कुंभ सातकर्णि, कर्ण सातकर्णि आणि शक सातकर्णि या तीन राजांची नावे

१. यापूर्वीचे सातवाहन नाण्यांचे दोन संचय पुष्कळ वर्षांपूर्वी कोल्हापुरात पंचगंगा नदीच्या काठच्या ब्रह्मपुरी या भागात सापडले होते. सन १८७३ मध्ये सापडलेल्या पहिल्या संचयात सातवाहनांची शिशाची व तांब्याची नाणी होती. त्यांपैकी १८१ तांब्याच्या आणि एका शिशाच्या नाण्याचे वाचन डॉ. पी. एल्. गुप्ता यांनी प्रिन्स् ऑफ वेल्स म्यूझियम् बुलेटिन, क्र. ५, पृ. ६५ इ. वर केले आहे. सन १८७७ च्या दुसऱ्या संचयातील आठ सातवाहन नाण्यांचे वर्णन डॉ. रामराव यांनी जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया (ज. न्यू. सो. इं.), व्हॉ. १७, पृ. ८१–८२ वर केले आहे.

प्रथमच ज्ञात झाली. त्या संचयातल्याप्रमाणे याही संचयात अनेक सातवाहनांची नाणी असतील अशी माझी अपेक्षा होती. पण जसजसा मी संचयातल्या नाण्यांचा अभ्यास करीत गेलो तसतशी माझी खात्री झाली की, प्रस्तुत संचयात फक्त दोन सातवाहन राजांची– (१) वासिष्ठीपुत्र शिवश्री पुळुमावि आणि (२) वासिष्ठीपुत्र स्कंद सातकर्णि ह्यांची– नाणी आहेत. हे ध्यानात आल्यावर यांतील बहुतेक नाण्यांवरचे अपूर्ण लेख वाचता आले. काही थोड्या नाण्यांवरचे लेख मात्र आता अगदी अस्पष्ट झाल्यामुळे किंवा अत्यंत अपूर्ण असल्यामुळे वाचता आले नाहीत.

प्रस्तुत संचयाच्या ६८४ नाण्यांपैकी दोनच नाणी तांब्याची असून बाकीची सर्व शिशाची आहेत. ही तांब्याची नाणी इतर ठिकाणातून त्या प्रदेशात आली असावी. त्यांपैकी एक नाणे थोडेसे गंजले असून त्याच्या पुढील भागावर सोंड वर केलेल्या हत्तीच्या सभोवार '–तक' असा अपूर्ण लेख वाचता येतो. मागील बाजूवर उज्जैनी चिन्ह आहे. हे नाणे कोणातरी सातकर्णि राजाचे असावे. उत्तरकालीन सातवाहन राजांची नावे 'सातकर्णि' पदान्त होती. त्यांतला हा राजा कोणता हे सबंध लेखाच्या अभावी निश्चयपूर्वक सांगता येत नाही. तथापि तो पूर्वोल्लिखित दोन राजांचा पूर्वज गौतमीपुत्र सातकर्णि असावा असे वाटते. दुसऱ्या तांब्याच्या नाण्याचे तुकडे झाले आहेत. त्याविषयी काहीच अनुमान करता येत नाही. बाकीच्या ६८२ नाण्यांपैकी ३६९ नाणी वासिष्ठीपुत्र शिवश्री पुळुमावि याची, आणि १९१ वासिष्ठीपुत्र स्कंद सातकर्णि याची आहेत. राहिलेली १२२ नाणी त्यांवरील अस्पष्ट किंवा अत्यंत अपूर्ण लेखामुळे कोणी पाडली होती हे सांगणे शक्य नाही. तथापि, ती या दोन राजांपैकीच एकाने पाडली असावी.

पूर्वोक्त दोन राजांच्या नाण्यांपैकी उत्तम अशा प्रत्येकी पाच नाण्यांचे वर्णन पुढे दिले आहे.[२]

---

२. या नाण्यांचे फोटो, आकार व वजन नागपूर सेंट्रल म्यूझियमचे क्यूरेटर श्री. वि. प्र. रोडे यांनी पुरविली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या दोन राजांच्या नाण्यांवरचे पूर्ण लेख खालीलप्रमाणे आहेत–

(१) शिवश्री पुळुमावि–रञो वासिठिपुतस सिवसिरि पुळुमाविस.[३]

(२) स्कंद सातकर्णि–रञो वासिठिपुतस सिरियञसातकणिस.[४]

यांतील प्रत्येक लेखांत सतरा अक्षरे आहेत. त्यांनी नाण्यांच्या पुढील बाजूवरची हत्तीची आकृति पूर्णपणे वेष्टिली आहे. पुळुमावीच्या काही नाण्यांवर सोंड उंच केलेला हत्ती उजवीकडे तोंड करून व इतर कांहीवर डावीकडे तोंड करून उभा असलेला दाखविला आहे. स्कंद सातकर्णीच्या सर्व नाण्यांवर तो उजवीकडे तोंड करून उभा आहे. या सर्व नाण्यांच्या मागील बाजूवर पूर्वोक्त उज्जैनी चिन्ह आहे. काही नाण्यांवर त्या चिन्हाच्या एका वर्तुळावर अर्धचंद्राची आकृति आहे. सर्व नाण्यांवरची अक्षरवटिका ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील ब्राह्मी लिपीची आहे. त्या काळी या लिपीतील 'ख' या अक्षराला खाली गाठ असे व तशी ती या संचयातील अनेक नाण्यांवर आढळते. पण काही इतर नाण्यांवर हत्तीच्या पायामुळे तेथे पोकळ त्रिकोण झालेला आढळतो.[५] एका नाण्यावर 'पु' आणि 'ळु' ही अक्षरे लेखकाच्या प्रमादामुळे उलटी काढलेली आढळली. या नाण्यांवरील लेखांची भाषा सातवाहन-कालीन इतर नाण्यांच्या भाषेप्रमाणे प्राकृत आहे. या सर्व नाण्यांवर 'राज्ञः' (राजाचे) याअर्थी 'रञो' हे पाकृत रूप योजिले आहे. तऱ्हाळे संचयातील कांही नाण्यांवर ते 'रणा' असे होते. या नाण्यांचा दुसरा विशेष हा की त्यांवरील लेख हत्तीला पूर्णपणे वेष्टीत आहे. तऱ्हाळे संचयातील नाण्यांवरचा लेख हत्तीच्या मागील पायांजवळ सुरू होऊन त्याच्या सोंडेजवळ समाप्त होत असे. दुसरा विशेष हा की या

---

३. संस्कृत–राज्ञः वासिष्ठीपुत्रस्य शिवश्रीपुळुमावेः। (हे नाणे वसिष्ठी-पुत्र शिवश्री पुळुमावीचे.)

४. संस्कृत–राज्ञः वासिष्ठीपुत्रस्य श्रीस्कन्दसातकर्णेः। (हे नाणे वासिष्ठीपुत्र स्कन्द सातकर्णीचे.)

५. स्कन्द सातकर्णीच्या खाली वर्णिलेल्या काही नाण्यांवरील लेखांतील 'ख' पाहा.

नाण्यांवरील लेखांत 'वासिठीपुत' (वसिष्ठगोत्रोत्पन्न स्त्रीचा पुत्र) असा दोन्ही राजांच्या विशेषणात मातृनामनिर्देश आहे. तसा निर्देश तऱ्हाळा संचयातील नाण्यांवर नव्हता. शिवश्री पुळुमावि आणि श्रीपुळुमावि हे एकच होत, हे मी इतरत्र दाखविले आहे.[६] काही सातवाहन राजे आपल्या नावामागे 'शिवश्री' हे पूर्वपद लावीत असत, हें कोरीव लेखांवरून स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ, शिवश्री आपीलक, शिवश्री पुळुमावि आणि शिवश्री सातकर्णि ही नावे पाहा.[७] पुराणांतल्या सातवाहन राजांच्या वंशावळींत 'शिवश्री' एवढेच एका राजाचे नाव दिले आहे.[८] ते 'शिवश्री सातकर्णी'चे होय हे मी इतरत्र दाखविले आहे.

१. शिवश्री पुळुमावीची नाणी

चिन्ह	लेख	आकार सें.मी. मध्ये	वजन ग्रॅममध्ये
१ उजवीकडे हत्ती	(१२) [९]रञो वसठ[पुतस] (सव) सरपुळुमवस (प्ले. ७ क्र. १)	१.२	८.६०
२ डावीकडे हत्ती	(८) रञो [वस]ठपुतस सवसर पुळुमवस (प्ले. ७ क्र. २)	१.००	६.७५

६. ज. न्यू. सो. इं., व्हॉ. ३१, पृ. १५१ इ.

७. पल्लवनृपति शिवस्कन्दवर्मन् यानेही आपल्या नावाला शिव हे पूर्वपद जोडले होते. एपिग्राफिया इंडिका (ए. इं.), व्हॉ. १, पृ. ५ इ. आणि व्हॉ. ६, पृ. ८६ इ.

८. पार्जिटर, डायनॅस्टीज ऑफ दि कलि एज् (डॉ. क. ए.,), पृ. ३६

९. नाण्यावरील लेख कोठे सुरू होतो, हे त्यापूर्वीच्या कंसातील घड्याळाच्या अंकांनी दाखविले आहे.

चिन्ह	लेख	आकार सें.मी. मध्ये	वजन ग्रॅममध्ये
३ डावीकडे हत्ती	(७) रञो वसठपुतस [सवसर] पुळुमवस (प्ले. ७, क्र. ३)	२.१	५.४०
४ उजवीकडे हत्ती	(३) रञो......पुळुमवस (प्ले. ७, क्र. ४)	१.१	५.३०
५ उजवीकडे हत्ती	(४) रञो वसठपुतस सवसर पुळुमव[स] (प्ले. ७, क्र. ५)	०.९	४.७५

२. स्कन्द सातकर्णीची नाणी

या राजाचे नाव तऱ्हाळा संचयातील नाण्यांवरच प्रथमतः पूर्णपणे वाचता आले. यापूर्वी विदर्भातील चांदा (चंद्रपूर) येथे सापडलेली काही नाणी या राजाची होती; पण त्यांवरील लेख पूर्ण नसल्याने होर्नल साहेबाने तो लेख 'य(ग)दसात–' असा वाचला होता. व्हिन्सेंट स्मिथने कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियम्मधील नाण्यांच्या कॅटलॉगमध्ये एका नाण्यावर 'सरचडसातकणि' असा लेख वाचला होता, पण ते वाचन चूक असून तेथेही 'सरखदसातकणि' असाच लेख आहे,[१०] तसेच इंडियन अँटिक्वरीमध्ये एडवर्ड थॉमस याने प्रसिद्ध केलेल्या कांही नाण्यावर हाच लेख आहे.[११] पार्जिटर साहेबाने अनेक हस्तलिखिते जमवून पुराणांतील सातवाहन राजवंशावळींचा संशोधित पाठ दिला आहे. त्यात

---

१०. ज. न्यू. सो. इं., व्हॉ. २, पृ. ३४ इ. पाहा.

११. ही नाणी ब्रह्मपुरी येथे सापडली होती असे कळते (ज. न्यू. सो. इं., व्हॉ. १७, पृ. ५९ इ.). थॉमस याने त्यांवरील लेख 'रञो वसिठिपुतस सर यसतस' असा वाचला होता (इं. अॅ., व्हॉ. ६, पृ. ३७७ आणि व्हॉ. ९, पृ. ६३). पण हे वाचन चूक आहे. ही नाणीही खद (स्कंद) सातकर्णीचीच असावी.

या राजाचे नाव 'स्कन्धसातकर्णि' असे दिले आहे.[१२] तेथेही 'स्कन्द-सातकर्णि' असाच शुद्ध पाठ घेतला पाहिजे. आणि तो पाठ पार्जिटरने उपयोजिलेल्या एका हस्तलिखितात आला आहे.[१३]

आतापर्यंत सापडलेल्या स्कंद सातकर्णीच्या नाण्यांवर त्याच्या मातृनामाचा निर्देश आढळला नव्हता. प्रस्तुत संचयातील नाण्यांवर तो प्रथमच दिसत आहे यात या संचयाचे मोठे महत्त्व आहे. पुळुमावीप्रमाणे हाही 'वासिष्ठीपुत्र' (वसिष्ठ गोत्रोत्पन्न राणीचा पुत्र) होता.

चिन्ह		लेख	आकर सें.मी. मध्ये	वजन ग्रॅममध्ये
१ उजवीकडे हत्ती	(३)	रञो वसठपुतस सरखद (प्ले. ७, क्र. ६)	१.१	४.३०
२ उजवीकडे हत्ती	(११)	रञो वसठपुतस सरखदसतकणस (प्ले. ७, क्र. ७)	०.९	६.५५
३ उजवीकडे हत्ती	(४)	रञो वसठपुतस ...खदसतकणस (प्ले. ७, क्र. ८)	०.९	५.३५
४ उजवीकडे हत्ती	(११)	रञो वस[ठ] पुत[स] [स]रखदसतकणस (प्ले. ७, क्र. ९)	·.८	३.८५
५ उजवीकडे हत्ती	(१२)	रञो वसठपुतस सरखद[सत...] (प्ले. ७, क्र. १०)	०.८	६.३४

१२. डा. क. ए., पृ. ४२

१३. पूर्वोक्त, पृ. ४२.

बहुतेक पुराणांतील वंशावळींत याच्या कारकीर्दीची वर्षे दिली नाहीत. त्यांचा पाठ 'शिवस्कन्दः सातकर्णिर्भवितास्यात्मजः समाः।' असा सदोष आहे.[१४] त्यात समांची (वर्षांची) संख्या दिलेली नाही. इतर ठिकाणांप्रमाणे येथेही वायुपराणाच्या 'ए' प्रतीतील पाठ बरा आहे. तो असा–

'शिवस्कन्दः सातकर्णिर्भविष्यति समास्त्रयः।' यात स्कन्द सातकर्णीने तीन वर्षे राज्य केले असे म्हटले आहे, पण ते अर्थातच चूक दिसते. कारण या राजाची नाणी दक्षिण भारतात अनेक ठिकाणी सापडली आहेत आणि त्यांवरील लेख भिन्न भिन्न ठिकाणी सुरू होत असल्यामुळे[१५] ती नाणी अनेक वर्षे पाडली जात होती हे स्पष्ट दिसते. तेव्हा स्कन्द सातकर्णीने तीन वर्षांपेक्षा पुष्कळच अधिक काळ राज्य केले असावे हे उघड आहे. पुराणांत दिलेली सातवाहन राजांच्या कारकीर्दीची वर्षे चूक असल्याची आणखीही काही उदाहरणे आहेत.[१६]

प्रस्तुत संचयात वासिष्ठीपुत्र शिवश्री पुळुमावि आणि वासिष्ठीपुत्र स्कंद सातकर्णि या दोनच सातवाहन राजांची नाणी आहेत, ही बाब सूचक आहे. या संचयात तत्पूर्ववर्ती एकाही राजाचे नाणे नाही. (गौतमीपुत्र सातकर्णीचे नाणे दुसरीकडून आले असावे.) यावरून वाटेगाव ज्यात अंतर्भूत होत होता तो कुन्तल देश वासिष्ठीपुत्र पुळुमावीच्या काळीच

---

१४. पूर्वोक्त, पृ. ४२, टीप ७. हा पाठ व्याकरणदृष्टया अशुद्ध आहे. 'समास्तिस्रः' असे पाहिजे; कारण, 'समा' शब्द स्त्रीलिंगी आहे.

१५. वर वर्णिलेल्या स्कंद सातकर्णीच्या लेखांचे आरंभ (घड्याळाच्या अंकांनी दाखविलेले) पाहा.

१६. पुराणांतील आंध्र (सातवाहन) वंशावळीत गौतमीपुत्राने २१ वर्षे राज्य केले असे म्हटले आहे (डा. क. ए., पृ. ४२). पण त्याचा नाशिकच्या लेण्यातील कोरीव लेख त्याच्या कारकीर्दीच्या तेविसाव्या वर्षाचा आहे.

प्रथम सातवाहन साम्राज्यात सामील करण्यात आला, असे दिसते. पुळमावीच्या कारकीर्दीच्या एकोणिसाव्या वर्षी नाशिकच्या लेण्यात कोरलेल्या लेखात त्याची आजी गौतमी बलश्री हिने आपल्या महाप्रतापी गौतमीपुत्र सातर्कणि नामक पुत्राच्या साम्राज्यात अंतर्भूत झालेल्या देशांचा उल्लेख केला आहे.[१७] त्यांमध्ये असिक (संस्कृत, ऋषीक); (सध्याचा खानदेश), असक (सं. अश्मक), (सध्याचा अहमदनगर जिल्हा), मुळक (सध्याचा औरंगाबाद जिल्हा) या दक्षिण भारतातील देशांचा नामनिर्देश आहे. गौतमीपुत्राचे घोडे तीन समुद्रांचे पाणी प्याले होते असे त्यात वर्णिले आहे खरे, पण त्यात दक्षिणेतील अन्य देशांचा नामनिर्देश नाही. यावरून असे दिसते की गौतमीपुत्र सातकर्णीचा पुत्र पुळुमावि याच्या कारकीर्दीत प्रथमच वाटेगाव ज्यात वसले आहे तो कुन्तल देश[१८] सातवाहन साम्राज्यात सामील झाला असावा.[१९] पुळुमावीनंतर स्कंद सातकर्णीचे राज्य या प्रदेशावर प्रस्थापित

---

१७. एपिग्राफिया इंडिका (ए. इं.), व्हॉ. ८, पृ. ६० इ.

१८. संशोधनमुक्तावलि, सर ६, पृ. १२३, १२४ वर कृष्णा नदीच्या बाजूच्या खोऱ्याचा अंतर्भाव कुंतल देशात होत असे हे मी सिद्ध केले आहे. करहाट-४००० (सध्याचे सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड) हा प्रदेश कुंतल देशात अंतर्भूत होत होता. (ॲन्यूअल रिपोर्ट ऑफ इंडियन एपिग्राफी, सन १९५३–५४, क्र. १८ पाहा.) असेच उल्लेख इतर काही कोरीव लेखांत आले आहेत. पांडरंगपल्ली दानपत्रात मानपुराचा (सातारा जिल्ह्यातील माण गावाचा) राष्ट्रकूट नृपति मानाङ्क याचे वर्णन ‘श्रीमान् कुन्तलानां प्रशासिता’ असे केले आहे. दिनेशचंद्र सरकार यांनी केलेला त्याचा ‘कुंतल देशाला शासन करणारा’ हा अर्थ वेडेपणाचा आहे.

१९. गौतमीपुत्र सातकर्णीचे एक नाणे वाटेगावातल्याप्रमाणे ब्रह्मपुरी येथेही सापडले होते. (ज. न्यू. सो. इ., व्हॉ. १७, क्र. ७५, पृ. ८१). ‘सातकणिस’ असा लेख असलेली इतर नाणी त्याच्या वंशजांची असावी.

झाले असे दिसते.[२०] कारण इतर कोणत्याही सातवाहन राजाची नाणी प्रस्तुत संचयात आढळली नाहीत.

'वासिष्ठीपुत्र' हे मातृनामनिदर्शक विशेषण आतापर्यंत तीन सातवाहन राजांनी लावलेले माहीत झाले आहे. (१) पुळुमावि (२) सातकर्णि आणि (३) स्कंद सातकर्णि, हे ते तीन राजे होत. पुराणांतील वंशावळीत त्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे आढळतो—

राजा श्रीगौतमीपुत्र एकविंशत्ततो नृपः ।
अष्टाविंशः सुतस्तस्य पुलोमा वै भविष्यति ।
शिवश्रीर्वै पुलोमात्तु सप्तैव भविता नृपः ।
शिवस्कन्दः सातकर्णिर्भविष्यति समास्त्रयः ।।

या उताऱ्यांत राजांचा उल्लेख पुढील क्रमाने करण्यात आला आहे—(१) गौतमीपुत्र सातकर्णि (चतुर्थ सातकर्णि),[२१] (२) त्याचा पुत्र पुलोमा (नाण्यांवरून 'पुळुमावि'), (३) शिवश्री (नाण्यांवरून शिवश्री सातकर्णि), (४) शिवस्कन्द सातकर्णि. नाशिकच्या लेण्यातील गौतमी बलश्रीच्या पूर्वोक्त लेखावरूनही पुळुमावि हा गौतमीपुत्र सातकर्णीचा पुत्र व उत्तराधिकारी होता हे स्पष्ट होते. ती बलश्री स्वतःचा 'महाराज-माता' आणि 'महाराजपितामही' असा निर्देश करते; कारण ती महाराज गौतमीपुत्र सातकर्णीची माता आणि महाराज पुळुमावीची पितामही (आजी) होती. पुळुमावि हा गौतमीपुत्र सातकर्णीचा वासिष्ठी (वसिष्ठ गोत्रोत्पन्न) राणीपासून झालेला ज्येष्ठ पुत्र होता. तो त्याच्या

---

२०. ब्रह्मपुरी येथे स्कंद सातकर्णि, यज्ञ सातकर्णि, रुद्र सातकर्णि इत्यादिकांची नाणी सापडली आहेत. त्यांवरून कुंतल देश दीर्घकाल सातवाहन साम्राज्यात राहिला असे दिसते. (प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझियम बुलेटिन, क्र. ५, पृ. ६५ पाहा).

२१. डा. क. ए., पृ. ४२. गौतमीपुत्र सातकर्णीला येथे चतुर्थ सातकर्णि म्हटले आहे. कारण पुराणांतील वंशावळीप्रमाणे त्याच्या पूर्वी सातकर्णि नावाचे तीन राजे होऊन गेले होते.

नंतर गादीवर आला. (पंचम) सातकर्णि आणि स्कंद सातकर्णि असे आणखी दोन पुत्र गौतमीपुत्र सातकर्णीला वासिष्ठी राणीपासून झाले होते असे दिसते,[२२] कारण त्या दोघांनाही 'वासिष्ठीपुत्र' असे पूर्वपद त्यांच्या नाण्यांवर लावले आहे. मागे दिलेल्या पुराणांतील उताऱ्यावरून पुळुमावीनंतर (पंचम) सातकर्णि आणि त्याच्यानंतर स्कन्द सातकर्णि गादीवर आले असे दिसते. पण प्रस्तुत संचयावरून कुन्तल देशात पुळुमावीनंतर स्कंद सातकर्णीच राज्य करू लागला, असे सिद्ध होत आहे. वासिष्ठीपुत्र सातकर्णि तेथे राज्य करीत असता तर त्याचीही नाणी प्रस्तुत संचयात आढळली असती. स्कंदाची नाणी विदर्भ आणि कुन्तल या दोन देशांत सापडली आहेत,[२३] पण आंध्र देशात मिळाली नाहीत. पण वासिष्ठीपुत्र सातकर्णीची (पंचम सातकर्णीची) नाणी आंध्रात सापडली आहेत.[२४] तेव्हा तेथे त्याचे राज्य होते यात संशय नाही. त्याच्या पूर्वी आंध्र प्रदेश त्याचा पिता गौतमीपुत्र सातकर्णि व ज्येष्ठ भ्राता पुळुमावि यांच्या राज्यात अंतर्भूत होता हे कोरीव लेख व नाणी यांवरून सिद्ध झाले आहे. तेव्हा पुळुमावीनंतर विशाल सातवाहन साम्राज्याची विभागणी त्याचे बंधु (१) स्कन्द सातकर्णि आणि (२) (पंचम) सातकर्णि यांच्यात झाली असे अनुमान प्रस्तुत संचया-

---

२२. पार्जिटरच्या 'शिवस्कन्धः सातकर्णिर्भवितास्यात्मजः समाः ।' या पाठानुसार स्कन्द हा पुळुमावीचा पुत्र होतो. पण प्रस्तुत संचयातील त्याच्या नाण्यांवरील 'वासिष्ठीपुत्र' हा मातृनामनिर्देश तो पुळुमावीचा सख्खा भाऊ होता असे दाखवितो.

२३. त्याची नाणी तऱ्हाला संचयात आणि ब्रह्मपुरी येथे सापडली आहेत.

२४. राम राव यांनी आंध्र प्रदेश म्यूझियममधील नाण्यांच्या कॅटलॉगमध्ये कित्येक नाणी या सातवाहनांची असे म्हटले आहे. त्यावर 'वासिठिपुत' असा मातृनामनिर्देश आढळत नाही. तथापि, त्यांतील निदान कांही नाणी त्याची असावी. पुळुमावीच्या आंध्रातील नाण्यांवरही तसा मातृनामनिर्देश आढळत नाही.

तील पंचम सातकर्णीच्या नाण्यांचा अभाव आणि आंध्रात स्कंद सातकर्णीच्या नाण्यांचा अभाव यांवरून काढता येते. स्कंदाला विदर्भ व महाराष्ट्र, आणि पंचम सातकर्णीला आंध्रदेश मिळाला होता. वासिष्ठीपुत्र (पंचम) सातकर्णीची चांदीची नाणी आंध्रात[२५] तशीच पश्चिम महाराष्ट्रात सापडली आहेत. ती क्षत्रपांच्या चांदीच्या नाण्यांसारखी आहेत. त्यांवरून स्कन्दाच्या निधनानंतर पंचम सातकर्णीने विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांवर आपला अंमल बसविला असे सिद्ध होते. कान्हेरी येथील कोरीव लेण्यातील लेखावरून तो शक क्षत्रप प्रथम रुद्रदामन् याचा जामात होता असे दिसते.[२६] त्याच्यानंतर सातवाहन राजा यज्ञ सातकर्णि याची नाणी आंध्र, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र[२७] या तिन्ही प्रदेशांत सापडली आहेत.

याप्रमाणे प्रस्तुत वाटेगाव नाणक-संचयावरून सातवाहनांच्या इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पडला आहे.

---

२५. त्याचे एक चांदीचे नाणे हैदराबादेत मिळाले होते. (ज. न्यू. सो. इं., व्हॉ. २१, पृ. ९) दुसरे तेथे विकत घेतले होते (पूर्वोक्त, व्हॉ. २७, पृ. २२) तिसरे मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम् मध्ये आहे (पूर्वोक्त, व्हॉ. ११, पृ. ८९), आणि चौथे सौराष्ट्रात मिळाले होते (पूर्वोक्त, व्हॉ. २१, पृ. १०७).

२६. ल्यूडर्स याची कोरीव लेखांची यादी, क्र. ९९४.

२७. ब्रह्मपुरी येथे सापडलेल्या आणि सातकणि असा लेख असलेल्या नाण्यांपैकी निदान कांही नाणी यज्ञ सातकर्णीची असावी (प्रि. ऑ. वे. म्यू बु., क्र. ५, पृ. ६५).

९. भर्तृदामन् याचे विदर्भातील तांब्याचे नाणे

हें तांब्याचे नाणे काही महिन्यांपूर्वी वाशीमचे श्री. ए. एस्. खान यांनी वाचनाकरिता मला आणून दिले. श्री खान यांना प्राचीन नाणी जमविण्याचा नाद आहे. त्यांनी मला यापूर्वीही कांही नाणी वाचनाकरिता आणून दिली होती. ती मी प्रसिद्ध केली आहेत.

हे नाणे पश्चिमेच्या क्षत्रपांच्या चांदीच्या नाण्यांसारखे आहे. त्याच्या पुढील बाजूवर उजवीकडे तोंड केलेल्या राजाचा मुखवटा आहे. त्याच्या कानामागे कालदर्शक अस्पष्ट चिन्हे आहेत. ती निश्चितपणे वाचता येत नाहीत. नाण्याच्या मागील बाजूवर मध्यभागी तीन टेकड्यांचा पर्वत, त्यावर डावी उजवीकडे चंद्र-सूर्यांची चिन्हे आणि खाली नदीदर्शक किंचित् वक्र अशी आडवी रेघ ही दिसतात. त्यांच्या सभोवार नाण्याच्या कडेला लागून आतल्या बाजूस लेख आहे. नाण्याचा व्यास .६ सें. मी. असून वजन १.३५ ग्रॅम आहे. त्यावरील लेख त्रुटित आहे. तो पुढील प्रमाणे वाचता येतो.....रुद्रसेनपुत्रस रञ महक्षत्रपस भर्तृद[म्न] (हे नाणे.....रुद्रसेनाचा पुत्र महाक्षत्रप भर्तृदामन् याचे आहे.)

रॅप्सन्ने वर्णिलेल्या भर्तृदामन्च्या चांदीच्या नाण्यांसारखेच[१] हे नाणे आहे. त्या चांदीच्या नाण्यांचे सरासरीने वजन ५५ ग्रेन (३.५६ ग्रॅम) आहे. प्रस्तुत नाण्याचे वजन त्यांच्या वजनापेक्षा किंचित् कमी आहे.

क्षत्रपांच्या (विशेषतः भर्तृदाम्याच्या) चांदीच्या नाण्यांशी प्रस्तुत नाण्यांचे सर्वांगीण सादृश्य लक्षात घेता असे वाटते की हे नाणे मूळचे तांब्याचे असले तरी चांदीचा मुलामा देऊन चांदीचे नाणे म्हणून प्रचलित

---

१. Rapson, *Coins of the Andhras* etc. (B. M. C.), pp. 153 f.

झाले असावे, आणि कालान्तराने चांदीचा मुलामा नाहीसा झाल्यामुळे त्याचे ताम्रस्वरूप आता उघड झाले असावे. सध्या या नाण्यावर चांदीच्या मुलाम्याचे काही चिन्ह नाही खरे, पण हे नाणे दीर्घकाल प्रचारात होते असे दिसते; कारण यावरील राजाच्या मुखवटयाची आकृति आता अत्यंत अस्पष्ट झाली आहे. पश्चिमेच्या क्षत्रपांनी चांदीच्या शिवाय इतर धातूंची नाणी पाडली होती यात संशय नाही. क्षत्रपांच्या नाण्यांच्या आपल्या कॅटलॉगमध्ये रॅप्सन्ने चष्टन[२] आणि जयदामन्[३] यांची तांब्याची नाणी, जीवदामन्[४] आणि रुद्रसेन यांची पोटीन धातूची नाणी, आणि तृतीय रुद्रसेन याची शिश्याची नाणी[५] वर्णिली आहेत. पण सामान्यतः ही इतर धातूंची नाणी आकार, वजन आणि प्रकार यांत क्षत्रपांच्या चांदीच्या नाण्यांहून भिन्न आहेत. चांदीची नाणी वाटोळी, तर ही पोटीन खेरीज इतर धातूंची नाणी सामान्यतः चौकोनी आहेत. तशीच ती वजनात हलकी आहेत. पश्चिमेच्या क्षत्रपांच्या चांदीच्या सर्व नाण्यांवर राजाचा मुखवटा असतो तर या इतर धातूंच्या नाण्यांवर बैल, किंवा हत्ती या-सारख्या प्राण्यांची आकृति असते. या फरकांचा हेतु ही दोन प्रकारची नाणी व्यवहारात भिन्न म्हणून सहज ओळखता यावी हा असला पाहिजे. या क्षत्रपांनी क्वचित् आर्थिक अडचणीमुळे चांदीचा मुलामा दिलेली नाणी पाडली होती.[६] चष्टनाचे या प्रकारचे नाणे प्रसिद्ध झाले आहे. कालांतराने वरचा चांदीचा मुलामा निघून गेल्यावर अशी नाणी तांब्याची दिसतात. व्हिन्सेंट स्मिथ्ला चष्टनाचे असे एक तांब्याचे नाणे मिळाले होते.[७] ते त्याच्या चांदीच्या नाण्यासारखे हुबेहूब होते. ते बहुतकरून

२. *Ibid.*, p. 75.

३. *Ibid.*, p. 74 f.

४. *Ibid.*, p. 35.

५. *Ibid.*, p. 187.

६. *J. N. S. I.*, Vol. XV, p. 98.

७. *J. R. A. S.*, 1895, pp. 173–74.

चांदीचा मुलामा दिलेले तांब्याचे नाणे असावे.[८] कालान्तराने चांदीचा मुलामा निघून गेल्यावर त्याचे मूळ स्वरूप स्पष्ट झाले असावे. प्रस्तुत नाण्याचा बाबतीत तेच झालेले दिसते.

भर्तृदामन्‌च्या कारकीर्दीच्या अखेरीस राज्यक्रान्ति झाली, असे दिसते. कारण त्याच्या नंतर त्याचा मुलगा विश्वसेन गादीवर न येता,[९] क्षत्रपांच्या दुसऱ्या वंशातील स्वामी जीवदामन्‌चा पुत्र द्वितीय रुद्रसिंह हा राज्य करू लागला. भर्तृदामन्‌च्या अखेरीस उत्पन्न झालेल्या या अस्थिर परिस्थितीचे प्रतिबिंब प्रस्तुत नाण्यात पडलेले दिसते. कारण भर्तृदामन्‌ची इतर नाणी चांगल्या चांदीची आहेत. मी स्वत: विदर्भात सापडलेली त्याची काही नाणी प्रकाशित केली आहेत.[१०]

---

८. स्मिथ्‌ला हे नाणे खरे असावे, असे वाटले, पण ॲलन्‌ला ते मान्य नाही. त्याचा *Coins of the Guptas* (B. M. C.), Introd. p. xcvii पाहा.

९. विश्वसेनाच्या सर्व नाण्यांवर त्याची क्षत्रप ही पदवी उल्लेखिली आहे. *J. N. S. I.*, Vol. XXIII, p. 338.

१०. *Ibid.*, Vol. XXIII, p. 337.

१०. दहीगाव येथील क्षत्रप आणि त्रैकूटक नाण्यांचा संचय

प्रस्तुत नाणकसंचय विदर्भातील बुलढाणा जिल्ह्याच्या मलकापूर तालुक्यातील दहीगाव येथे ग्रामसेवकांकरिता घराचा पाया खोदतांना दिनांक १०–११–१९५८ रोजी सापडला होता. तो यथावकाश मुंबईच्या पुरातत्त्व खात्याच्या संचालकांकडे पाठविण्यात आला होता. माझ्या विनंतीवरून शिक्षण खात्याचे सचिव डॉ. ए. यू. शेख यांनी तो संचय नागपूर येथे तपासण्याची मला संधी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हा सर्व संचय चांदीच्या नाण्यांचा आहे. त्यात ३५ नाणी होती; असे मलकापूरच्या तहसीलदाराने कळविले होते. नागपूरच्या संग्रहालयात हा संचय आला तेव्हा त्यात ३६ नाणी होती. त्यांपैकी एक मोडके होते; म्हणून ते गणण्यात आले नसावे.

विदर्भात सापडलेला क्षत्रप नाण्यांचा हा दुसरा संचय होय. यापूर्वी मध्यप्रदेशाच्या (प्राचीन विदर्भाच्या) छिंदवाडा जिल्ह्यातील सोनपूर येथे ६३३ क्षत्रप नाण्यांचा मोठा संचय सापडला होता. तो कै. जी. व्ही. आचार्य यांनी १९३७–३८ च्या बंगाल एशियाटिक सोसायटीच्या न्यूमिस्मॅटिक सप्लीमेंटमध्ये वर्णिला आहे. त्याच्या मानाने प्रस्तुत संचय फार लहान आहे. तरी त्याचे एका दृष्टीने फार महत्त्व आहे हे पुढे दाखविले आहे.

क्षत्रपांची फुटकळ नाणी विदर्भाच्या अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यात तसेच सध्याच्या मध्यप्रदेशाच्या (प्राचीन विदर्भाच्या) शिवनी आणि छिंदवाडा जिल्ह्यांत सापडली आहेत. तशी

अनेक नाणी मी न्यूमिस्मॅटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रकाशित केली आहेत.[१] पण तशा नाण्यांचा संचय सध्याच्या विदर्भात प्रथमच सापडला आहे, हा प्रस्तुत नाण्यांचा विशेष आहे.

प्रस्तुत संचयात एकूण ३६ नाणी आहेत. त्यांपैकी दहा नाणी त्रैकूटक नृपति दह्लसेनाची असून बाकीची २६ क्षत्रपांची आहेत. या सर्व नाण्यांचा चांदीचा पत्रा त्यांवर उमटविलेल्या ठशापेक्षा लहान आकाराचा असल्याने त्यावर सर्व अक्षरे उमटलेली नाहीत. त्यामुळे काही नाण्यांवरील लेख पूर्णपणे वाचता न आल्याने ती कोणत्या क्षत्रपाची हे निश्चितपणे सांगता येत नाही. दहा नाण्यांवरील लेख पूर्णपणे किंवा खंडित रूपाने वाचता येतात. त्यांचे वर्णन खाली दिले आहे.

नाणे	वाचन
(१) संगदामन् (एक नाणे)	राज्ञो क्षत्रपस रुद्रसिंहपुत्रस राज्ञ क्षत्रपस संगदाम्न: आकार १.५ सें. मी.; वजन १.६८ ग्रॅम.

इतरत्र याचे नाव संघदामन् असे आढळते, या नाण्यावर ते संगदामन् आहे हा विशेष आहे. याने फक्त दोन वर्षे राज्य केले होते,[२] म्हणून याची नाणी क्वचितच मिळतात. प्रस्तुत नाणे मोठ्या आकारात येथे दिले आहे. (**प्लेट ७, क्र. ११**)

नाणे	वाचन
(२) विजयसेन (एक नाणे)	राज्ञ महाक्षत्रपस···पुत्रस राज्ञ महाक्षत्रपस विजयसेनस–

१. *J. N. S. I.*, Vol. XXII, pp. 112 f; Vol. XXIII, pp. 335 f.; Vol. XXVII, pp. 94 f.; Vol. XXX, pp. 92 f ; Vol. XXXI, pp. 22 f. See also *Studies in Indology*, Vol. IV pp. 215 f.

२. *H. C. I. P.*, Vol. II, p. 187. नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयाचे अभिरक्षक श्री. वि. प्र. रोडे यांनी या नाण्यांचे फोटो माझ्याकडे पाठविले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

नाणे	वाचन
(३) दामजदश्री	(१) ····दामजदश्रिय
(दोन नाणी)	(२) ····क्षत्रपस दामजदश्रिय
(४) भर्तृदामन्	(१) रुद्रसेनपुत्रस राज्ञ महाक्षत्रपस····
(दोन नाणी)	(२) रुद्रसेनपुत्रस राज्ञ····
(५) विश्वसेन	(१) ····क्षत्रपस्य भतृदामपुत्रस····
(तीन नाणी)	[विश्वसेनस]
	(२) ····क्षत्रपस भर्तृदामपुत्रस····
	(३) राज्ञ महाक्षत्रपस····विश्वसेनस
(६) द्वितीय रुद्रसिंह	स्वामिजीवदामपुत्रस राज्ञ क्षत्रपस
(एक नाणे)	[रुद्रसिंहस[३]]

इतर क्षत्रप नाण्यांवरील लेख निश्चितपणे वाचता न आल्यामुळे ती कोणाची हे सांगता येत नाही.

सर्व त्रैकूटक नाणी दह्लसेनाची आहेत. त्यांवरील लेख त्याच्या इतर नाण्यांवरील लेखासारखाच आहे. म्हणून तो देण्याची जरूरी नाही.

ही नाणी तपासताना एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात आली. ती ही की, सर्व क्षत्रप नाणी झिजलेली असून ती दीर्घकाल प्रचारात असावी. त्रैकूटक नाणी मात्र सुस्पष्ट असून ती प्रचारात फारशी नसतानाच जमिनीत पुरली असावी. क्षत्रपांच्या नाण्यांवर राजाच्या मुखवटयाच्या मागे–कानाजवळ–शक संवताचे वर्ष उमटविलेले असते, पण तसे वर्ष यांतील कोणत्याही नाण्यावर स्पष्टपणे दिसत नाही.

उपरिनिर्दिष्ट सहा क्षत्रपांनी इ. स. २२२ ते ३१६ या कालात राज्य केले होते. त्यांशिवाय द्वितीय रुद्रदामन्‌चा पुत्र तृतीय रुद्रसेन

३. याचे नाव या नाण्यांवर आले नसल्यामुळे ते रुद्रसेन असण्याचाही संभव आहे. *J. N. S. I.*, Vol. XXX, pp. 92 f.;

याचीही नाणी विदर्भात सापडली आहेत.[४] त्याच्या कारकीर्दीचे शेवटचे वर्ष शक संवत् ३१२ (इ. स. ३९०) हे आहे.

विदर्भात अनेक क्षत्रपांची नाणी सापडल्यामुळे एक समस्या उत्पन्न झाली आहे. ती सोडविण्याचा अनेक विद्वानांनी आपापल्या तऱ्हेने प्रयत्न केला आहे. कोणी म्हणतात ही नाणी विदर्भात सापडण्याचे कारण प्राचीन काळी येथे क्षत्रपांचे राज्य असावे. पण तेथे क्षत्रपांच्या अमलाची दुसरी एकही खूण आढळत नाही. शिवाय त्या काळात विंध्यशक्ति, प्रथम प्रवरसेन, प्रथम पृथिवीषेण या बलाढ्य वाकाटक नृपतींचे राज्य विदर्भात भरभराटीत होते. तेव्हा त्या काळात क्षत्रपांचा अंमल विदर्भात प्रस्थापित झाला असणे शक्य नाही. डॉ. अ. स. अळतेकर यांनी म्हटले आहे की क्षत्रपांची नाणी विदर्भात सापडण्याचे कारण ती क्षत्रपांनी वाकाटकांना दिलेल्या खंडणीतून आली असावी.[५] पण हीही उपपत्ति शक्य वाटत नाही; कारण ज्यांची नाणी विदर्भात सापडली आहेत त्यांपैकी कित्येकांनी महाक्षत्रप पदवी धारण केली होती. अर्थात् ते स्वतंत्र होते. ते वाकाटकांचे कधीकाळी मांडलिक होते असे मानण्यास पुरावा नाही. तेव्हा ही नाणी विदर्भात सापडण्याचे कारण वाकाटकांनी स्वतःची नाणी पाडली नसल्याने त्यांनी आपल्या राज्यात, क्षत्रपांच्या चांदीच्या नाण्यांच्या प्रसारास संमति दिली असावी.[६] याच कारणामुळे गुप्तांची काही सोन्याची नाणी विदर्भात सापडली आहेत.

मागे सांगितल्याप्रमाणे त्रैकूटक दह्नसेन राजाची कांही नाणी प्रस्तुत संचयात आहेत. त्रैकूटकांची नाणी प्रथमच विदर्भात सापडत आहेत. त्यांचे राज्य गुजराथ, कोंकण व पश्चिम महाराष्ट्र या प्रदेशांवर होते व तेथे त्यांचे ताम्रपट व नाण्यांचे संचय सापडले आहेत. वाकाटकांचे राज्य

---

४. *J. N. S. I.*, Vol. XXVII, p. 95 ; *Num. Suppl.*, No X L VII, p.95.

५. *The Vākāṭaka-Gupta Age, p. 55.*

६. *J. N. S. I.*, Vol. XXIV, pp. 27 f. ; *Studies in Indology*, Vol. IV, pp. 223 f.

बुलढाणा जिल्ह्यापर्यंत पसरले असावे. कारण द्वितीय प्रवरसेनाचा तिरोडी ताम्रपट त्याजवळच्या अकोला जिल्ह्यातील नरत्तंगवारी या स्थानाहून दिला होता.[७] त्रैकूटक दह्लसेन हा या प्रवरसेनाचा पुत्र नरेन्द्रसेन याचा समकालीन असून[८] बलाढ्य होता. त्याने अश्वमेध यज्ञ केल्याचा त्याच्या पार्डी ताम्रपटात[९] निर्देश आहे. त्याने या अश्वमेधाच्या अनुषंगाने केलेल्या दिग्विजयात विदर्भाच्या पश्चिमेकडचा बुलढाणा प्रदेश बळकावला असावा. याच्या उलट त्याचा समकालीन वाकाटक नृपति नरेन्द्रसेन हा निर्बल होता. म्हणून सध्याच्या मध्यप्रदेशाच्या बस्तर जिल्ह्यात राज्य करणाऱ्या भवदत्तवर्मन् या नल राजाने त्याच्या राज्यावर आक्रमण करून विदर्भाचा काही पूर्व भाग बळकावला होता आणि वाकाटकांच्याच नन्दिवर्धन या पूर्वीच्या राजधानीहून एक ताम्रपट दिला होता.[१०] या कालात वाकाटकांवर आपत्ति आल्याची त्यांच्या स्वतःच्याच ताम्रपटात कबूली आहे.[११] या कालातील त्यांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन त्रैकूटक दह्लसेनाने त्यांच्या राज्याचे पश्चिमेचे काही लचके तोडले असावेत. प्रस्तुत संचयातील त्रैकूटक नाणी पश्चिम विदर्भावरील दह्लसेनाच्या अमलाची निदर्शक आहेत.

दह्लसेनाला पश्चिम विदर्भ दीर्घकाळ आपल्या सत्तेखाली ठेवता आला नाही असे दिसते. कारण नरेन्द्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण

---

७. *C. I. I.*, Vol. V, p. 49.

८. दह्लसेनाने सन ४४०–४६५ मध्ये राज्य केले. नरेन्द्रसेनाची कारकीर्द सु. ४५०–४७० अशी असावी. *C. I. I.*, Vol, IV, p. xiii; Vol. V, p. vi.

९. *C. I. I.*, Vol. IV, pp. 22 f.

१०. *Ep. Ind.*, Vol. XIX, pp 100 f.

११. द्वितीय पृथिवीषेणाचे बालाघाट ताम्रपटात 'द्विमग्नवंशस्योद्धर्ता' असे वर्णन केले आहे. (*C. I. I.*, Vol. V, p. 81.) माहुरझरी ताम्रपटांत ते 'मग्नवंशस्योद्धर्ता' असे आहे. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७१, पृ. ७६.

आपल्या ताम्रपटात स्वत:चे ‘ निमग्नवंशस्योद्धर्ता ’ असे वर्णन करतो. त्याने नलवंशीयांना पूर्व विदर्भातून पिटाळून लावून त्यांच्या पुष्करी राजधानी-पर्यंत आक्रमण केले होते व ती उध्वस्त केली होती असे त्याच्या व नल राजांच्या कोरीव लेखांवरून सिद्ध झाले आहे. त्याने दह्लसेनाच्या तावडीतून पश्चिम विदर्भालाही मुक्त केले असावे. प्रस्तुत संचयातील दह्लसेनाची नाणी उत्तम स्थितीत आहेत. त्यावरून ती फार काळ प्रचारात नसून लौकरच देशातील अस्थिर परिस्थितीमुळे जमिनीत गाडलेली दिसतात.

द्वितीय पृथिवीषेण हा या वाकाटकांच्या ज्येष्ठ पातीतील शेवटला राजा. त्याच्यानंतर वाकाटकांच्या वत्सगुल्म (वाशीम) शाखेच्या हरिषेणाने उत्तर विदर्भ आपल्या राज्यास जोडला. त्याने त्रैकूटक व्याघ्रसेनाचा पराभव करून त्याला आपले स्वामित्व कबूल करावयास लावले होते, हे त्याच्या मंत्र्याच्या अजंठा येथील लेखावरून स्पष्ट दिसते.

याप्रमाणे प्रस्तुत संचयातील क्षत्रप व त्रैकूटक नाण्यांच्या योगे विदर्भाच्या ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या उत्तरार्धावर महत्त्वाचा प्रकाश पडतो यात त्याचे महत्त्व आहे.

११. पवनार येथील विष्णूकुंडींचे विशिष्ट नाणे

सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी 'दशकुमारचरिता'च्या विश्रुतचरितातील कथानकाची ऐतिहासिक पार्श्वभूमि विशद करताना मी प्रथमच दाखविले होते की वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा शेवटचा ज्ञात राजा हरिषेण याच्या मुलाच्या कारकीर्दीत क्रांति होऊन विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्याची सत्ता विदर्भात प्रस्थापित झाली असावी.[१] त्यानंतर उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक साधनांवरून माझे ते अनुमान सिद्ध झाले आहे. विदर्भातच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातही विष्णुकुंडींच्या आधिपत्याची चिन्हे उघडकीस आली आहेत. सातारा जिल्ह्यात खानापूर येथे सापडलेला विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्याचा अपूर्ण ताम्रपट मी प्रसिद्ध केला आहे.[२] नाशिक जिल्ह्यातील नेवासे येथे उत्खननात विष्णुकुंडींची नाणी मिळाली आहेत.[३] विदर्भात भंडारा, नागपूर वगैरे ठिकाणी किरकोळ विष्णुकुंडी नाणी सापडली आहेत.[४] वाकाटकांची एका काळची राजधानी प्रवरपुर (सध्याचे पवनार) येथे तर विष्णुकुंडी नाण्यांचा मोठा संचयच मिळाला आहे.[५] त्यातील एक विशिष्ट प्रकारचे नाणे येथे प्रसिद्ध करीत आहे.

अनेक दक्षिण भारतीय राजांच्या नाण्यांप्रमाणे विष्णुकुंडींच्या नाण्यांवर लेख नसतो. आंध्रातील त्यांच्या प्राप्तिस्थानांवरून ती नाणी

---

१. *Studies in Indology*, Vol. I (Second ed.), pp. 182 f.; *C. I. I.*, Vol. V, p. xxxiii.

२. *Ep. Ind.*, Vol. XXVII, pp. 327 f.

३. Sankalia, *From History to Pre-history at Nevāsā*, p. 199. The coins were then ascribed to the Pallavas.

४. *J. N. S. I.*, Vol. XXVI, p. 241, notes 1 to 4.

५. *Paunar Excavations*, pp. 13 and 14.

विष्णुकुंडींची अशी समजली जातात.[६] पण त्यांवर राजाचे नाव नसल्यामुळे ती त्या राजवंशातील कोणत्या राजाने पाडली होती, हे सांगता येत नाही. अशी लेखविरहित अनेक विष्णुकुंडी नाणी प्रसिद्ध झाली आहेत.[७] पण याला अपवादभूत असे लेखयुक्त विष्णुकुंडी नाणे येथे प्रथमच प्रसिद्ध होत आहे, यातच त्याचे वैशिष्टच आहे.

हे नाणे १९६७ साली नागपूर विद्यापीठाच्या विद्यमाने केलेल्या उत्खननाच्या वेळी तेथील श्री. देशमुख यांना सापडलेल्या भांड्यातील नाणकसंचयात होते. काही दिवसांपूर्वी डॉ. अजय मित्र शास्त्री यांनी त्यावरील लेख वाचण्यासाठी ते मला दिले. त्याच वेळी त्यांनी सांगितले की आपण अनेक नाणकविशारदांना हे नाणे यापूर्वी दाखविले होते, पण कोणालाही त्यावरील लेख वाचता आला नव्हता. तेव्हा हे मला एक प्रकारचे आव्हानच होते. ते मी स्वीकारले आहे.

विष्णुकुंडी नाण्यांवर सिंहाची किंवा वृषभाची आकृति असते. यावर वृषभाची आकृति आहे. त्याच्या तोंडाखाली स्वस्तिक चिन्ह आहे. याचा आकार इतर नाण्यांच्याप्रमाणे वाटोळा आहे. विष्णुकुंडी नाण्यांच्या मागील बाजूवर मध्यभागी एक मधला भाग चपटा असलेले वाटोळ्या आकाराचे पात्र व त्याच्या दोन्ही बाजूंस त्रिशूल असतो. प्रस्तुत नाण्याच्या मागील बाजूवर मध्यभागी लांबट वर्तुळ (Spheroid) आणि त्याच्या दोन्ही बाजूंस इतर नाण्यांच्या प्रमाणे एक एक त्रिशूल आहे. लांबट वर्तुळ आडव्या उभ्या रेषांनी छेदले आहे. अशा रेषा सातवाहनांच्या एका नाण्यांवर मी पाहिल्या आहेत. दोन्ही बाजूंची

६. या नाण्यांचे मोठे संचय आंध्र प्रदेशात नलगोंडा आणि करीमनगर जिल्ह्यांत सापडले आहेत. नंतर त्यांचे अनुकरण वेंगीच्या चालुक्यांनी आपल्या नाण्यांत केले होते. म्हणून ही नाणी चालुक्यांच्या पूर्वी आंध्रात राज्य करणाऱ्या विष्णुकुंडींची मानण्यात येतात. See M. Rama Rao, *Vishṇukuṇḍin Coins*, pp. 33 f.

७. *Loc. Cit.*

त्रिशूलेही तीन तीन आडव्या रेषांनी छेदली आहेत. अशा आडव्या रेषा इतर विष्णुकुंडी नाण्यांच्या त्रिशूलांवर दिसत नाहीत.

प्रस्तुत नाण्याच्या पुढील बाजूवर वृषभाच्या आकृतीच्या वरील भागी आडव्या ओळीत लेख आहे तो मी 'श्रीभद्रम्' असा वाचतो. यातील तिसऱ्या अक्षराखेरीज सर्व अक्षरे सुवाच्य आहेत. तिसरे अक्षर मात्र कोरक्याच्या दोषामुळे कांहीसे विकृत झाले आहे. लेखाची अक्षर-वटिका चौथ्या–पाचव्या शतकाची आहे. 'श्रीभद्र' यासारखे नाव विष्णुकुंडीच्या (किंवा इतरही) वंशावळीत आढळत नाही. मग या लेखाचा अर्थ कसा लावावयाचा ? असा प्रश्न उपस्थित होतो. 'श्रीभद्रम्' याने आंध्रातील 'भद्राचलम्' विवक्षित दिसते. आंध्र प्रदेशात राजमहेंद्री-पासून १०४ मैलांवर गोदावरीच्या काठी भद्राचलम् नामक श्रीरामचंद्राचे पवित्र स्थान सुप्रसिद्ध आहे. तेथील मुख्य देवालय उत्तुंग असून त्याच्या सभोवार २४ लहान लहान देवालये आहेत. या ठिकाणी श्रीरामचंद्रानी गोदावरी पार केली अशी आख्यायिका आहे. त्यावेळी तेथे तपश्चर्या करीत असलेच्या भद्र नामक ऋषीवरून त्या स्थानाला 'भद्राचलम्' असे नाव प्राप्त झाले अशी कथा आहे. विष्णुकुंडींनी या नाण्यावर स्वतःचे नाव न घालता भद्राचलम् येथील 'श्रीभद्र' या देवाचे नाव घातलेले दिसते. यासारखे उदाहरण विजयनगरच्या राजांचे देता येईल. त्यांनी आपल्या दानपत्रांवर स्वतःची सही न करिता 'श्रीविरूपाक्ष' अशी आपल्या देवाची सही केली आहे. विजयनगराजवळ हंपी येथे श्रीविरूपाक्षाचे विशाल, विख्यात व पवित्र असे मंदिर आहे.

पण या माझ्या वाचनावर एक आक्षेप संभवतो. त्याचे निराकरण केले पाहिजे. श्रीभद्राचलम् हे वैष्णव स्थान आहे. विष्णुकुंडी राजे शिवोपासक होते. आपल्या दानपत्रांत ते आपल्या इष्ट दैवताचा 'श्रीपर्वतस्वामी' असा उल्लेख करतात. तो श्रीशैलम् येथील भगवान् शंकराचा द्योतक समजला जातो. तेव्हा विष्णुकुंडींनी भद्राचलम्च्या रामाच्या नावाने आपली नाणी पाडली हे कसे ? या आक्षेपाचे उत्तर देणे कठीण नाही. भारतीय राजे धार्मिक बाबतीत अत्यंत उदारमतवादी

असत. ते स्वत: शैव किंवा वैष्णव असले तरी ते अनुक्रमे विष्णूला किंवा शिवाला पूज्य मानीत असत. किंबहुना बौद्ध चैत्यांना व विहारांनाही त्यांचा उदार आश्रय असे.[८] विष्णुकुंडी राजे शिवोपासक असले तरी त्यांचा भगवान् विष्णूविषयी परमादर त्यांच्यातील गोविंदवर्मन्, प्रथम व द्वितीय माधववर्मन् इत्यादि राजनामांवरून व्यक्त झाला आहे. तेव्हा प्रस्तुत नाणे विष्णुकुंडींचे, याविषयी संशय राहू नये. लेखाखेरीज इतर बाबतीत हे नाणे विष्णुकुंडींच्या इतर नाण्यांसारखेच आहे. फक्त मागील बाजूवरच्या मधल्या आकृतीत किंचित् फरक आहे. ती चपटचा वर्तुळाची नसून लांबट वर्तुळाची आहे एवढाच फरक.

वरील विवेचनावरून प्रस्तुत नाणे विष्णुकुंडी राजवंशाचे असून ते त्याने भद्राचलम् येथील 'श्रीभद्रम्' या देवाच्या नावाने पाडले होते, हे दिसून येईल.

---

८. Mirashi, *Literary and Historical Studies in Indology*, pp. 131 f.

१२. शिलाहारांच्या कोरीव लेखांतील नाणी

शिलाहारांच्या अनेक शाखा दक्षिण भारतात प्राचीन काळी राज्य करीत होत्या पण त्यांपैकी तीन विशेष प्रसिद्ध आहेत. एक शाखा उत्तर कोकणात स्थानक (ठाणे) येथून इ. स. ८०० ते १२६५ पर्यंत राज्य करीत होती. दुसरीची राजधानी बलिपत्तन (सध्याचे खारेपाटण) होती. तिचा अंमल दक्षिण कोकणावर (रत्नागिरी जिल्ह्यावर) सन ७६५ ते १०२४ पर्यंत होता. तिसरीची आरंभीची राजधानी कऱ्हाड येथे होती, पण ती लौकरच कोल्हापूरच्या परिसरात हलविण्यात आली. तिच्या अमलाखाली सध्याचे सातारा, सांगली, कोल्हापूर व बेळगाव हे जिल्हे होते. या तीन्ही शाखांच्या कोरीव लेखांत काही तत्कालीन नाण्यांचे उल्लेख आले आहेत. त्यांचा साकल्याने विचार येथे करावयाचा आहे.

(१) उत्तर व दक्षिण कोंकणचे शिलाहार–

द्रम्म—उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या कान्हेरी येथील लेण्यांतील पहिल्याच शक संवत् ७६५ च्या लेखांत २०० द्रम्मांच्या दानाचा उल्लेख आहे.[१] त्यांची अक्षय नीवि (कायमची ठेव) केली होती, आणि त्यांच्या व्याजातून लेण्यातील भगवान् बुद्धाची पूजा, लेण्यांची डागडुजी, तेथे राहणाऱ्या भिक्षूंची चीवरे व पवित्र ग्रंथ यांचा खर्च करावयाचा होता. अशीच दाने तेथील आणखी दोन तत्कालीन लेखांत नमूद केली आहेत. द्रम्म हे चांदीचे नाणे असून त्याचे वजन ६४ ग्रेन असे. ही द्रम्म नाणी दक्षिण भारतात यादवांच्या कालापर्यंत प्रचलित होती. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या अनेक लेखांत त्यांचे उल्लेख येतात. शिलाहारांनी स्वतःची द्रम्म नाणी पाडली असावी,

१. *Ind. Ant.*, Vol. XIII, pp. 138 f.

पण त्यांपैकी फक्त छित्तराजाची नाणी सापडली आहेत. त्यांपैकी एक रॅप्सनने रॉयल एशियाटिक सोसायटीच्या सन १९०० च्या जर्नलमध्ये प्रसिद्ध केले आहे. ते वाटोळ्या आकाराचे असून त्याचा व्यास ·६ इंच व वजन ५४ ग्रेन होते. ते गधिया प्रकाराचे अजून त्याच्या पुढील बाजूवर राजाचा अत्यंत विद्रूप असा मुखवटा व मागील बाजूवर 'श्रीछित्तराजस्य' असा लेख आहे.[२]

शिलाहारांच्या काळी ही द्रम्म नाणीच विशेष प्रचारात होती शेतांचा सरकारी सारा द्रम्मांत निश्चित केला जात असे.[३] प्रत्येक घरावर एक द्रम्म कर असे, त्याला 'गृहद्रम्म' असे नाव असे. क्वचित् तो माफ केला जात असे, तेव्हा त्या माफीला 'गृहदेणकनिर्मुक्ति' असे नाव असे. तसेच वृक्षांवर (नारळी–पोफळींवर) द्रम्माचा कर असे, त्याला 'द्रुद्रम्म' अशी संज्ञा होती.

पूर्वोक्त कान्हेरी लेण्यांतील द्रम्म काञ्चनाचे म्हणजे सोन्याचे होते असे कीलहॉर्नने म्हटले होते.[४] त्याला अनुसरून अनेकांनी द्रम्म नाणी चांदीची व सोन्याची अशी दोन प्रकारची असत, असे म्हटले आहे[५] पण येथे कीलहॉर्नचे वाचन चुकीचे होते. 'एकं द्रम्मशतं'च्या ऐवजी 'काञ्चनद्रम्मशतं' असे त्याने चुकीने वाचले होते.[६] सोन्यांच्या द्रम्मांचा कोठेही उल्लेख नाही.

उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या कांही लेखांत 'पोरुथ' किंवा 'पोरुथि' द्रम्मांचा उल्लेख आहे. उदाहरणार्थ, द्वितीय अपरादित्याच्या

२. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्लेट १, क्र. ३ पाहा.
३. *Ep. Ind.*, Vol. XXV, p. 62.
४. *Ind. Ant.*, Vol. XIII, p. 13.
५. *J. N. S. I.*, Vol. XXV, pp. 23 and 39 यातील संदर्भ पाहा.
६. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख (शि. रा. इ. को. ले.), पृ. ५.

शक संवत् ११६६ च्या लोनाड शिलालेखात[७] व्योमेश्वर देवाला पोरुथि द्रम्मांचे दान दिल्याचा उल्लेख आहे. तसेच सोमेश्वराच्या शक संवत् ११८२ च्या चांजे शिलालेखात[८] स्थानक (ठाणे) येथील उत्तरेश्वर देवाला १६२ पोरुथ द्रम्म अर्पण केल्याचा उल्लेख आहे.

हे पोरुथ किंवा पोरुथि द्रम्म कशा प्रकारचे होते, याविषयी अनेकांनी अनेकविध तर्क केले आहेत. कोणी म्हणतात ती पार्थियन नाणी असावी. पण ही नाणी राजपुताना, माळवा, गुजराथ, मारवाड या प्रदेशांत प्रचलित होती. त्याकाळी परकी पार्थियन नाणी प्रचारात असतील असे वाटत नाही. 'लेखपद्धति' ग्रंथात या नाण्यांना पारौपथ[९] किंवा पारुपथक[१०] म्हटले आहे. 'पथ' किंवा 'पथक' हे एका भू–विभागाचे निदर्शक होते. तेव्हा ही नाणी एखाद्या विशिष्ट स्थली पाडली जात असावी, असा काहींचा तर्क होता. 'पुरातनप्रबन्धसंग्रहा'मध्ये म्हटले आहे की पारुथक द्रम्म हे भिनमाळ जवळच्या जालोर राज्यात प्रचलित होते. तेव्हा भिनमाळ द्रम्माप्रमाणे पारुथक द्रम्म हे नाव त्या स्थलावरून पडले असावे असा तर्क केला गेला. 'पुरातनप्रबन्धसंग्रहा'त म्हटले आहे की पारुथक द्रम्म आठ साध्या द्रम्मांच्या किमतीचे असे.[११] याचे कारण त्याचा आकार किंवा वजन तितक्या पट नसून त्यातील धातु विशेष शुद्ध असे, हे असावे.

शिलाहारांच्या काळी उत्तर कोकणात पोरुथ द्रम्म तसेच साधे द्रम्मही प्रचारात होते हे मागे सांगितले आहे. या संबंधांत लक्षणीय गोष्ट ही की पुष्कळ वर्षांपूर्वी उत्तर कोकणात सापडलेल्या एका भांड्यात गधिया आणि क्षत्रप नाण्यांचा संचय सापडला होता.[१२] त्यातील गधिया

---

७. शि. रा. इ. को. ले., पृ. १८९.
८. पूर्वोक्त, पृ. २१२.
९. लेखपद्धति, पृ. ३१, ४१ इ.
१०. पूर्वोक्त, पृ. ४३.
११. पुरातनप्रबन्धसंग्रह, पृ. ५३.
१२. पूर्वोक्त, पृ. ५१.

नाणी ही छित्तराजाची किंवा दुसऱ्या कोणा शिलाहार नृपतीची असावी. क्षत्रप नाणी ही पोरुथि द्रम्म असावी. त्यांना पोरुथि द्रम्म म्हणण्याचे कारण ती पार्थियन राजांनी (वस्तुतः शक राजानी) पाडली होती, असा तत्कालीन समज असावा. या संचयाचा संक्षिप्त उल्लेख मुंबई इलाख्याचे नाशिक जिल्हा गॅझेटीयर (जुनी आवृत्ति), पृ. ६१, टीप २ मध्ये आला आहे. पण या संचयाचे सविस्तर वर्णन कोठेही आले नाही.[१३] ही टीप पं. भगवानलाल इंद्रजी यांची असावी. तसे असल्यास त्या नाण्यांचे वर्णन यथातथ्य आहे असे समजण्यास हरकत नाही.

या संबंधात हेही लक्षणीय आहे की अल मसूदी (मृत्यु सन ९५६) याने आपल्या प्रवास वृत्तात ' राष्ट्रकूटांच्या राज्यात ताहरीया नावाचे दिह्लम प्रचलित होते. त्यांच्यावर कारकीर्दीचे वर्ष उमटविले असे ' असे म्हटले आहे.[१४] क्षत्रप नाण्यांचा हा उल्लेखनीय विशेष आहे हे सर्वांस माहीत आहे. तेव्हा पोरुथ द्रम्म म्हणजे क्षत्रपांची चांदीची नाणी असावी.

धरण– रट्टराजाच्या शक संवत् ९३० च्या खारेपाटण ताम्रपटात तेथे लागणाऱ्या प्रत्येक परदेशी जहाजाला एका स्वर्ण धरणाचा कर द्यावा लागे तसे म्हटले आहे.[१५] मनुस्मृतीत सुवर्ण धरणाचे वजन १० पल असे सांगितले[१६] आहे. एक पल ३२० गुजांचा असे. म्हणून सुवर्ण धरणाचे वजन ३२०० गुजांचे होते. एवढ्या मोठ्या वजनाच्या सोन्याच्या नाण्याचा कर जहाजाच्या बंदरात नांगरण्याबद्दल आकारला असणे संभवनीय नाही. भास्कराचार्यांच्या लीलावतीत म्हटले आहे की धरण हे २४ गुंजांच्या वजनाचे असून त्याची किंमत अर्ध्या गद्याणाइतकी

१३. डॉ. परमेश्वरीलाल गुप्ता यांच्या Coin–hoards from Mahārāshṭra मध्येही या संचयाचा उल्लेख नाही.
१४. Elliot & Dowson, *History of India*, Vol. I. p. 24.
१५. शि. रा. इ. को. ले., पृ. २३१.
१६. मनुस्मृति, ८,१३५.

असे.[१७] खारेपाटणा ताम्रपटातच कांही ठिकाणाहून आलेल्या जहाजांवर स्वर्ण गदियाणाच्या कराचा उल्लेख आहे. तेव्हा तेथील स्वर्ण धरण हें २४ गुंजा वजनाचे असावे.

गद्याणक– वर सांगितल्याप्रमाणे खारेपाटण ताम्रपटांत परदेशाहून येणाऱ्या जहाजांवरच्या एका सुवर्ण गद्याणाचा कर असे. हे अधेलीच्या आकाराचे असून त्याचे वजन ४८ गुंजा असे. किट्टेलला बेल्लारी येथे व कधी कधी म्हैसूर येथेही अशी नाणी आढळली होती. त्याचे वजन एक रुव्वी किंवा फार्दिग असे, असे त्याने म्हटले आहे.

कुमारगद्याण– मुम्मुणि राजाच्या शक संवत् ९७० च्या ठाणे ताम्रपटात[१८] ब्राह्मणांना दिलेल्या गावांचे किंवा शेतांचे उत्पन्न सांगताना त्याबरोबर एक कुमार गद्याणाचाही उल्लेख केला आहे. या नाण्याच्या नावाच्या अनेक उपपत्त्या विद्वानांनी सुचविल्या आहेत. कोणी म्हणतात या नावाच्या नाण्यांचा कर[१९] लावला जात असे. पण अशी नाणी अद्यापि सापडली नाहीत. इतर कोणी म्हणतात की टेकाडावर किंवा अरण्यात ‘ कुमरी शेती ’ केली जाते, तिजवरचा हा कर असावा.[२०] पण पूर्वोक्त ताम्रपटात तो सामान्य प्रकाराच्या शेतांवरही बसविलेला दिसतो. मागे हा कर राजकुमाराच्या जन्मोत्सव प्रसंगी लोकांना द्यावा लागणाऱ्या नजराणा पद्धतीचा असावा असे मी सुचविले होते.[२१] पण असे प्रसंग

---

१७. तुल्या यवाभ्यां कथितात्र गुञ्जा वल्लस्त्रिगुञ्जो धरणं च तेऽष्टौ।
गद्यानकस्तद्द्वयमिन्द्रतुल्यैर्ब्वल्लैस्तथैको धटकः प्रदिष्टः ।।
मनुस्मृतीत (८,१३६) व याज्ञवल्क्यस्मृतीत (१,३५४) चांदीच्या ३२ रती वजनाच्या धरणाचा उल्लेख आहे.

१८. शि. रा. इ. को. ले., पृ. १०८ इत्यादि.

१९. B. P. Mazumdar, *Socio-Economic History*, p. 27.

२०. *Ep. Carn.*, Vol. X, pp. 86 f.

२१. *Studies in Indology*, Vol. III, p. 146.

क्वचित् येणारे असल्याने त्यांचे उत्पन्न नगण्यच असणार. तेव्हा त्याचा दानपत्रांत उल्लेख असणे असंभवनीय वाटते.

कुमारगद्याणक हा राज्यातील सर्व शेतांवर लावलेला कर असून त्याचा उद्देश राजकुमाराचे शिक्षण, पालन–पोषण, तसेच त्याची इतर कर्तव्ये याला लागणाऱ्या खर्चाची तजवीज करणे, हा असावा. इतर कर राजाला त्याच्या कर्तव्यपूर्तीकरिता लावले जात. तसा हा कर राज-कुमाराकरिता असे; म्हणून त्याला हे नाव ठेवले होते. कुमारगद्याण कराचा उल्लेख गाहडवालांच्याही ताम्रपटांत आढळतो.[२२] तेव्हा हा कर उत्तर भारतातही प्रचारात होता असे दिसते.

दीनार–दक्षिण कोकणच्या तृतीय अवसराच्या शक संवत् ९१० या वर्षी दिलेल्या पट्टणकुडी ताम्रपटात काही श्रेष्ठींनी आपल्या कांही गावातील जीवलोकाकरिता (परंपरागत हक्काबद्दल) ४० दीनारांचा नजराणा दिल्याचा उल्लेख आहे.[२३] दीनार हे सोन्याचे नाणे गुप्तकालात प्रचलित होते. याज्ञवल्क्य, बृहस्पति व कात्यायन स्मृतींतही त्याचा उल्लेख आहे. ते ख्रिस्तोत्तर सातव्या शतकापर्यंत प्रचलित होते. पुढे सोन्याच्या नाण्यास सुवर्ण[२४] किंवा निष्क असे नाव पडले. तेव्हा दहाव्या शतकाच्या अखेरचा हा ' दीनार ' नाण्याचा उल्लेख महत्त्वाचा आहे.

विसोवा– सोमेश्वर राजाच्या शक संवत् ११८२ च्या चांजे लेखात याचा उल्लेख आला आहे[५] पण त्या लेखाच्या संपादकांच्या ध्यानात तो आला नव्हता. ' विसोवा ' हे संस्कृत ' विशोपक 'चे मराठी रूप आहे. त्याचा अर्थ एक विसांश किमतीचे नाणे. तेव्हा हे नाणे तांब्याचे

---

२२. *Ep. Ind*, Vol. IV, p. 120.

२३. शि. रा. इ. को. ले., पृ. २२०.

२४. चतुर्थ गोविंदाचा खंबायतचा ताम्रपट पाहा. ए. इं., व्हॉ. ७, पृ. ३६ इ.

२५. शि. रा. इ. को. ले., पृ. २१३.

असून त्याची किंमत द्रम्माच्या एक विसांश असे. यादवकालीन कोरीव लेखांत व वाङ्मयात याचा अनेकदा उल्लेख आला आहे.

२. कोल्हापूरचे शिलाहार–

कोल्हापूर प्रदेशात कन्नड भाषेचा प्रसार होता. म्हणून तेथे लेखांतील नाण्यांची नावे कन्नड भाषेत आहेत.

या राजवंशाच्या फक्त दोन लेखांत–गंडरादित्याच्या कोल्हापूर येथील शक संवत् १०५८ च्या[२६] आणि विजयादित्याच्या शक संवत् १०६६ च्या मिरज शिलालेखात[२७]–नाण्यांचा उल्लेख बाजारातील वस्तूंच्या किमतीसंबंधी आला आहे.

होंग–कापड व्यापाराच्या किंवा सोनाराच्या दुकानांत विकलेल्या जिनसांच्या किंमतीतील प्रत्येक होंगावर एक पण कर द्यावा लागे.[२८] होंग हे होन किंवा पोन यांसारखे सोन्याचे नाणे होते. त्याला वराह असेही म्हणतात.

पण–याचा उल्लेख वर आला आहे. हे तांब्याचे नाणे असून त्याला कार्षापण असेही म्हणत. मनुस्मृति, ८,१३६, पाहा. काहींच्या मते ते ५ किंवा ६ गुंजा वजनाचे (इंग्रजी फनम) अगदी लहान आकाराचे सोन्याचे नाणे असावे.

बिसिगे–हे संस्कृत विशोपकासारखे दिसते.[२९] पण याचा अर्थ एक विसांश किंमतीचे नाणे नसून वीस पळांच्या किंमतीचे नाणे असा आहे. त्याचे कोष्टक असे– २० पळ = १ बीसिगे. ५ बीसिगे = १ तोळा. गाडीतून आणलेल्या करुसेच्या प्रत्येक मळवेवर दोन बीसिके कर द्यावा लागे.

हाग–याचा अर्थ भाग किंवा पणाचा एक चतुर्थांश. होंगच्या किंयतीच्या पणांची परीक्षा करण्याकरिता एक हाग द्यावा लागे.[३०]

२६. शि. रा. इ. को. ले., पृ. २७७ इ.

२७. पूर्वोक्त, पृ. २९३ इ.

२८. पूर्वोक्त, पृ. २९८.

२९. बिसिगे या कन्नड शब्दाचा अर्थ २० असा आहे.

३०. शि. रा. इ. को. ले., पृ. ३०१.

अड्डु– हे तांब्याचे नाणे असून त्याची किंमत अर्धा पण असे. होंग नाण्याचा कस लावतांना सोनाराला स्थानिक देवाला एक अड्डु द्यावा लागे.[३१]

सोळस– तूप किंवा तेल याचे एक कोड विकताना दोन सोळस कर द्यावा लागे. सोळस हे एक माप होते असे काहींचे मत आहे.[३२] कदाचित् त्याचा अर्थ एक सोळांश किंमतीचे नाणे असा असेल. असे असल्यास ते पणाच्या एक सोळांश किंमतीचे तांब्याचे नाणे असावे,

बळ्ळ–लीलावतीत तीन गुजांच्या वजनाच्या सोन्याच्या नाण्याला बळ्ळ म्हटले आहे.[३३] पण मिरज येथील विजयादित्याच्या शिलालेखात बळ्ळ हे एक माप दिसते. बार्नेटच्या मते बळ्ळ हे चार मणांचे माप होते. अन्नधान्याच्या प्रत्येक गाडीवर एक बळ्ळ द्यावा लागे. या संदर्भात चार मणांचा कर जास्त वाटतो.

पंचगंगेच्या काठी कोल्हापूरच्या ब्रम्हपुरी नामक उपनगरात केलेल्या उत्खननात दोन लहान आकाराची सोन्याची नाणी सापडली होती.[३४] त्यांच्या पुढील भागावर मुठीशिवाय असलेला त्रिशूल आणि त्याच्या चिमटचांमध्ये सूर्य व चंद्र यांच्या आकृति होत्या. मागील बाजूवर पाय किंचित् वाकवून उभा असलेल्या आणि डाव्या हातात ध्वज आणि उजव्या हातात सर्प घेतलेल्या गरुडाची आकृति होती. ही नाणी वाटोळी असून त्यांचा व्यास अर्धा इंच व वजन २२.५ ग्रेन होते. कोल्हापूरच्या शिलाहारांचा ध्वज गरुडांकित होता. म्हणून ही नाणी त्यांचीच असावी. या घराण्यातील मारसिंह राजाच्या ताम्रपटाच्या मुद्रेवर त्रिशूलाची आकृति उल्लेखनीय आहे. या नाण्यांवर लेख नसल्याने ती कोणी पाडली होती हे सांगता येत नाही.

---

३१. शि. रा. इ. को. ले., पृ. ३०१.
३२. *Ep. Ind.*, Vol. XIX ची सूची पाहा.
३३. शि. रा. इ. को. ले., पृ. ३०१.
३४. *J. N. S. I.*, Vol. XIV, pp. 15 f.

खंड ३ – संकीर्ण विषय

१३. रावणाच्या लंकेचे स्थान*

हा विषय गेल्या पन्नास–पंचावन वर्षात मोठा वादग्रस्त झाला आहे. इंदूरचे सरदार माधवराव किबे यांनी १९१९ साली पुण्यात भरलेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनात बाचलेल्या आपल्या निबंधात असे प्रतिपादिले की रामायणाच्या किष्किन्धाकांडात सुग्रीवाने सीतेच्या शोधार्थ वानरांना पाठविताना देशांचा जो निर्देश केला आहे त्यावरून रावणाची राजधानी लंका मध्यभारतात विंध्यपर्वतात अमरकंटकजवळ होती. त्यानंतर त्यांनी आणखी काही पुरावे पुढे मांडून त्याच मताचा पुरस्कार दोन तीन लेखांत केला.[१] या मताला तत्कालीन मध्यप्रांतातील पुरातत्त्वज्ञ रायबहादूर हीरालाल यांनी अधिक प्रमाणे देऊन पाठिंबा दिला.[२] यासारख्याच मताचा पुरस्कार नंतर श्री. परमशिव ऐयर[३] आणि श्री. जी. रामदास यांनी केला.[४] अलीकडे डॉ. ह. धी. सांकलिया यांनी हे मत स्वीकारले असून त्याचे प्रतिपादन आपल्या अनेक इंग्रजी, हिंदी व मराठी लेखांत व नंतर प्रकाशित केलेल्या आपल्या 'वाल्मीकि-रामायण (एक पुरातत्त्वीय अध्ययन)' या पुस्तिकेत केला

---

* नवभारत, वाई, वर्ष १४, अंक ९, पृ. २९–४२.

१. *Indian Historical Quarterly*, Vol. IV, pp. 694 f.; *F. W. Thomas Volume*, pp. 144 f.; *P. K. Gode volume* pp. 93 f.

२. *Ganganath Jha Commemoration Volume*, pp. 151 f.

३. त्यांचे *Rāmāyaṇa and Laṅkā* हे पुस्तक पहा.

४. *Ind. Hist. Quart.*, Vol. IV, pp. 339 f.; *ibid.*, Vol. V, pp. 281 f.

आहे. त्या पुस्तिकेचे परीक्षण केसरी, नागपूरचे तरुण भारत इत्यादि वृत्तपत्रांत आले आहे; पण त्यात त्यांच्या मताचा केवळ परिचय दिला आहे; त्यांनी पुढे मांडलेल्या प्रमाणांची फारशी चिकित्सक छाननी केली नाही. हा विषय वादग्रस्त झाला असला तरी भारतीय इतिहास व संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. सत्यान्वेषणार्थ त्याची चर्चा होणे अत्यावश्यक आहे. म्हणून तसा प्रयत्न येथे केला आहे.

वास्तविक पाहता आपल्या प्राचीन ग्रंथकारांत या बाबतीत मतभेद नाही. रामचरितावर ज्यांनी ज्यांनी लिहिले आहे त्या सर्वांनी सिंहलद्वीप (सध्याची श्रीलंका) या बेटावरच रावणाची राजधानी होती, असे मानले आहे. या ग्रंथकारांमध्ये सर्वांत प्राचीन कालिदास होय. आपल्या ‘ रघुवंशा ’-च्या तेराव्या सर्गात त्याने भगवान् रामचंद्राचा लंकेपासून अयोध्येपर्यंतचा विमानातून प्रवास वर्णिला आहे. त्यात लंकेचे पूर्वोक्त स्थानच गृहीत धरले आहे. त्यानंतरच्या भवभूतीला ‘ उत्तररामचरिता ’तील उल्लेखांवरून अगस्त्याश्रम मध्य भारतात नसून अहमदनगर जिल्ह्यातील नेवासेजवळ होता हेच अभिप्रेत होते हे आम्ही इतरत्र सिद्ध केले आहे.[५] अर्थातच तो गोदावरी, किष्किंधा, पंपा इत्यादि स्थळे दक्षिणभारतातच होती, असे मानीत होता हे स्पष्ट आहे. त्या नंतरच्या मुरारि, राजशेखर जयदेव, इत्यादि संस्कृत नाटककारांना हेच मत मान्य होते, हे त्यांच्या नाटकांतील वर्णनावरून दिसते.[६] तेव्हा आपल्या प्राचीन ग्रंथकारांमध्ये या बाबतीत मतभेद नाही.

पण अलीकडच्या संशोधकांनी लंकेच्या स्थानाविषयी विविध मते प्रतिपादिली आहेत. सुप्रसिद्ध जर्मन प्राच्यविद्याविशारद याकोबी याने लंका आसामात होती असे प्रतिपादिले होते. पण हे मत इतके विलक्षण व सकृद्दर्शनीच असंभाव्य आहे की त्याच्या निराकरणाची जरूरी नाही. त्यानंतर सरदार किबे यांचे ती अमरकंटकजवळ होती हे मत. याशिवाय श्री. परमशिव ऐयर यांनी लंका ही जबलपूरच्या उत्तरेस अठरा मैलां-

५. संशोधनमुक्तावलि, सर ६, पृ. १ इत्यादि.
६. आमचा ‘ भवभूति ’ ग्रंथ, पृ. ३५३ इ.

वरील इंद्राणा नावाच्या खेडेगावाजवळच्या डोंगरात सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि डॉ. सांकलिया यांनी त्यांच्या मताला पाठिंबा दिला आहे. या दोन्ही मतांत एकवाक्यता नसली तरी त्या दोन्हीत लंका मध्यभारतातील विंध्य पर्वतात किंवा त्याच्या थोडे उत्तरेस होती हे साम्य आहे. तेव्हा या मतांच्या प्रतिपादकांनी स्वमतसिद्धयर्थ जी प्रमाणे मांडली आहेत त्यांची सत्यासत्यता ठरविली पाहिजे. त्यांचा यथाक्रम विचार करू—

प्रमाण पहिले–चित्रकूट ते किष्किन्धा या मार्गाचे वर्णन

श्री. किबे यांनी रामायणातील श्लोक उद्धृत करून हा मार्ग पुढीलप्रमाणे दाखविला आहे.

राम मन्दाकिनी नदीजवळ चित्रकूट पर्वतावर आले, तेव्हा त्यांना खरादि राक्षस दंडकारण्यात ऋषींना त्रास देऊ लागल्याचे समजले. तेव्हा त्यांनी तेथून दण्डकारण्याला प्रयाण केले. तेथे त्यांनी विराध राक्षसाला ठार मारले आणि नंतर ते शरभंगाच्या आश्रमास गेले. शरभंगाने त्यांना मन्दाकिनीच्या तीरावर असलेल्या सुतीक्ष्णाच्या आश्रमास जाण्यास सांगितले आणि स्वतः त्याने अग्निप्रवेश केला. नंतर सुतीक्ष्णाला वंदन करून दूर अंतर पार केल्यावर ते पञ्चाप्सर नामक एक योजन विस्तीर्ण असलेल्या तलावाला जाऊन पोचले. नंतर तेथून निघून ते अनेक आश्रमांत कोठे चार, तर कोठे पाच, सहा किंवा दहा महिने राहत दहा वर्षे घालवून पुनः सुतीक्ष्णाच्या आश्रमात परत आले. तेथे काही काळ राहिल्यावर रामाने अगस्त्याश्रमाचा मार्ग विचारल्यावरून सुतीक्ष्ण ऋषि म्हणाले, 'येथून चार योजनांवर अगस्त्याच्या भावाचा आश्रम आहे. तेथून एक योजनावर अगस्त्याचा आश्रम आहे.' रामाने तेथे गेल्यावर अगस्त्य ऋषींना आपल्या निवासाकरिता शांत अशा स्थलाविषयी विचारले, तेव्हा अगस्त्य ऋषि म्हणाले, 'येथून दोन योजनांवर फलमूलादिकांनी युक्त असे घनदाट छायेचे पंचवटी नामक स्थान आहे. तेथे तुम्ही राहावे.' पंचवटीत असताना रामाने खरादि राक्षसांचा वध केला. रावणाने सीताहरण केल्यावर राम व लक्ष्मण पम्पेस गेले. तेथे त्यांना

सुग्रीव भेटला. त्याने रामाला म्हटले, 'हा वालिशासित मलयगिरि आहे. येथे मुळीच भय नाही.' तेथे राम व लक्ष्मण ऋष्यमूक पर्वतावर राहिले. तेथून जवळच वालीची राजधानी किष्किधा होती. तिच्या पश्चिमेस रक्तवर्ण जलाचा सागर होता–

ततो रक्तजलं भीमं लोहितं नाम सागरम् ।[७]

वालिवधानंतर सुग्रीवाने चारी दिशांस सीतेच्या शोधाकरिता आपले वानरदूत पाठविले; पण कोणालाही तिचा पत्ता लागला नाही. शेवटी हनूमान् विंध्यपर्वतावर आला तेथे त्याला जटायूचा वडील भाऊ संपाति भेटला. तो त्यांना म्हणाला–

इतो दूरे समुद्रस्य संपूर्णे शतयोजने ।
तस्मिल्लंकापुरी रम्या निर्मिता विश्वकर्मणा ॥[८]

'येथून शंभर योजन अंतरावर समुद्रात विश्वकर्म्याने निर्मिलेली लंका ही सुंदर नगरी आहे.'

चित्रकूटापासून किष्किधेपर्यंतच्या रामाच्या प्रवासाचे वरील संक्षिप्त वर्णन देऊन श्री. किबे त्यांच्या मधील अंतर पुढीलप्रमाणे सांगतात :— "चित्रकूटापासून सुतीक्ष्णाच्या आश्रमाला जाण्यास रामाला एक दिवस लागला. म्हणजे त्यांच्यामधील अंतर सुमारे १२ ते १८ मैल असावे; तेथून शरभंगाचा आश्रम एका दिवसाच्या प्रवासाच्या अंतरावर म्हणजे सुमारे १८ मैल दूर होता. तेथून अगस्त्याच्या भावाचा आश्रम सहा योजनांवर म्हणजे २४ मैलांवर होता, तेथून अगस्त्याचा आश्रम ८ मैलांवर व त्यापुढे पंचवटी अर्ध्या दिवसाच्या प्रवासावर म्हणजे ८ मैलांवर होती. नंतर ६ मैलांवर पंपा तलाव आणि जवळच किष्किधा होती. तेव्हा चित्रकूट आणि किष्किधा यांमधील अंतर सुमारे २२ योजने किंवा

७. किष्किन्धाकाण्ड, ३९.३४. हा व यापुढील संदर्भ बडोद्याच्या ओरिएंटल इन्स्टिटयूटने संपादिलेल्या चिकित्सक आवृत्तीला अनुलक्षून आहेत.

८. किष्किधा, ५७, २०.

८८ (किंवा फार तर १००) मैल होते. हेच अंतर सर्व्हेच्या नकाशावरून चित्रकूटापासून पंपेचे (रेवा संस्थानातील गोविंदगडजवळच्या तळयाचे) आणि किष्किन्धेचे (रेवास्थानातील कंधोचे) आहे. तेथून जवळच रावणाची लंका होती."

वरील प्रमाणाचे परीक्षण

रामायणाच्या अरण्य आणि किष्किन्धाकांडातील रामादिकांच्या प्रवासाचे वर्णन अत्यंत त्रोटक आहे. त्यात फारच थोडया स्थलांचा नामनिर्देश आहे. उदाहरणार्थ, अगस्त्याच्या आश्रमाला जाताना विन्ध्य-पर्वत ओलांडण्याचा त्यात उल्लेख नाही. पण गोदावरीतीरावरच्या त्याच्या आश्रमाचा आहे. महाभारतात सांगितले आहे की विन्ध्यपर्वत उंच उंच होऊ लागल्यामुळे देवांच्या प्रार्थनेवरून अगस्त्य ऋषि दक्षिणेस जावयास निघाला. विन्ध्य त्याच्या पुढे नतमस्तक झाला. नंतर अगस्त्याने गोदावरीच्या तीरी आपला आश्रम स्थापला. पुढे तो दक्षिणेत दूरवर गेला. मलय पर्वतावरही अगस्त्याचा आश्रम होता. त्याचा निर्देश काही ग्रंथांत आला आहे.[९] पण रामाच्या वनवासात त्याचा आश्रम गोदातीरी होता. उत्तर भारतात कोठेही अगस्त्याश्रमाचा उल्लेख नाही. तसेच गोदावरीचाही नाही. रा. ब. हीरालालनी गोदा नावाची एक लहान नदी चित्रकूट पर्वताच्या दक्षिण दिशेला १२ मैलांवरून वहात असून ती पुढे सरस्वती नदीप्रमाणे एका विहीरीत (!) अदृश्य होते असे म्हटले आहे.[१०] पण ही क्षुद्र नदी रामायणातील अगस्त्याश्रमाजवळची गोदावरी असणे शक्य नाही. रामायणात विन्ध्य पर्वताप्रमाणे गोदावरीला अत्यंत महत्त्व आहे. ती अशी लहान नदी असणे शक्य नाही. शिवाय रामायणा-तील गोदावरी, श्री. किबे यांची अंतरगणना स्वीकारली तरी, चिद्रकूटाच्या दक्षिणेस निदान २० योजनांवर (किबे यांच्या गणनेप्रमाणे ८० मैलांवर) वाहत होती. ती १२ मैलांवर वाहणाऱ्या पूर्वोक्त गोदानामक क्षुद्र प्रवाहाशी एकरूप होणे शक्य नाही.

---

९. उदाहरणार्थ, उद्दंडीचे 'मल्लिकामारुत', अंक १० मधील कथा पहा.

१०. गंगानाथ झा व्हॉल्यूम, पृ. १५७.

शिवाय, रामायणात सांगितलेली अंतरे वस्तुस्थितीला धरून नाहीत, हे आम्ही इतरत्र दाखविले आहे.[११] उदाहरणार्थ, रामायणातील वर्णनाप्रमाणे प्रयाग येथील भरद्वाजाश्रमापासून चित्रकूटाचे अंतर दहा कोस किंवा वीस मैल होते. पण वस्तुस्थितीत हे अंतर ६५ मैल आहे. शिवाय, पूर्वोक्त रामवनवासातील कांही स्थळांची ठिकाणे निश्चित नाहीत. त्यामुळे पंपा, किष्किंधा इत्यादि स्थळे रामायणातील वर्णनावरून मध्यभारतात होती, हे सिद्ध करता येत नाही.

रामायणाच्या किष्किन्धाकाण्डाचे संपादक मानकड यांचेहि मत लंका मध्यभारतात होती असे होते. पण त्यास या गोदावरी निर्देशाची अडचण येत होती. ती दूर करण्याकरिता त्यांनी निराळीच क्लृप्ति लढविली. त्या कांडाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात.[१२] "किष्किन्धाकांडात गोदावरीचा उल्लेख अकरा ठिकाणी आला आहे. त्यांतील फक्त दोन ठिकाणे सोडून इतरत्र तिच्याबद्दल मन्दाकिनीसारखा दुसरा पाठ आहे. त्यावरून या सर्व ठिकाणी गोदावरीचे नाव मागाहून घालण्यात आले असावे." शुद्ध पाठ ठरविण्याची ही रीत अजब आहे ! शुद्ध पाठ हस्तलिखितांच्या पुराव्यावरून ठरवावयाचा असतो, अशा तऱ्हेने अनुमानावरून नव्हे. शिवाय डॉ. पुसाळकरांनी दाखवून दिले आहे की किष्किधाकांडात तेरा ठिकाणी आणि अरण्यकांडात चार ठिकाणी गोदावरीचा उल्लेख आला आहे. त्यांपैकी बारा ठिकाणी गोदावरीबद्दल दुसरा पाठ नाही. फक्त पाच ठिकाणी तिच्याबद्दल 'मंदाकिनी' असा पाठ आढळतो.[१३] हस्तलिखितांच्या पुराव्यावरून या सर्व ठिकाणी 'गोदावरी' पाठच योग्य आहे आणि तोच चिकित्सक आवृत्तीत स्वीकारला आहे, केवळ निर्देशांच्या संख्याधिक्यावर पाठ ठरवावयाचे म्हटले तरी गोदावरी पाठच स्वीकार्य ठरेल.

---

११. मेघदूतातील रामगिरि अर्थात रामटेक, पृ. ७३ इत्यादि.

१२. किष्किन्धाकाण्ड, प्रस्तावना, पृ. ५५.

१३. *Journal of the Oriental Institute*, Vol. XI, p. 33 f.

उत्तर भारतात गोदावरी नदी असल्याचा कोठेच उल्लेख नाही. दक्षिणेत तिच्या काठी अगस्त्याश्रम होता हे रामायणातच वर्णन आहे. अगस्त्याने विन्ध्य पर्वत ओलांडून तो स्थापला होता, असे महाभारतात म्हटले आहे. तेव्हा लंका विन्ध्य पर्वताच्या उत्तरेस असणे शक्य नाही.

प्रमाण दुसरे–किष्किन्धेच्या दक्षिणेस विन्ध्य पर्वताचा उल्लेख

सरदार किबे यांनी आपले लंकेच्या स्थानाविषयी संशोधन प्रथम मांडताना या प्रमाणाचा मुख्यत: निर्देश केला होता, " किष्किधाकाण्डाच्या चाळीसाव्या अध्यायात पुढील श्लोक या संदर्भात आले आहेत.

ततः प्रस्थाप्य सुग्रीवस्तन्महावानरं बलम् ।
दक्षिणां प्रेषयामास वानरानभिलक्षितान् ।। १ ।।

* * * *

सहस्रशिरसं विन्ध्यं नानाद्रुमलतावृतम् ।
नर्मदां च नदीं दुर्गां महोरगनिषेविताम् ।। ८ ।।
ततो गोदावरीं रम्यां कृष्णावेणीं महानदीम् ।
वरदां च महाभागां महोरगनिषेविताम्[१४] ।। ९ ।।

सुग्रीव किष्किन्धेत राज्य करीत होता. किष्किन्धेच्या दक्षिणेस विन्ध्य, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, वरदा (वर्धा) इत्यादि नद्या असल्यास ती किष्किन्धा उत्तर भारतात (उदाहरणार्थ, रेवा संस्थानात) असली पाहिजे हे उघड आहे. तेव्हा लंकाही उत्तर भारतातच असावी."

या प्रमाणाचे परीक्षण

डॉ. याकोबींनी हे श्लोक प्रक्षिप्त असावेत असे कळविल्यावरून श्री. किबे यांनी नंतरच्या लेखांत या प्रमाणावर आपली भिस्त ठेवली नाही. आता रामायणाची चिकित्सक आवृत्ति प्रसिद्ध झाली आहे. तीत हे श्लोक प्रक्षिप्त मानले गेले नाहीत. तेव्हा याही प्रमाणाची छाननी केली पाहिजे.

---

१४. किष्किन्धा, ४०.१.८–९.

सुग्रीवाने चारी दिशांत सीतेचा शोध करावा असे वानरांना आज्ञापिताना त्या त्या दिशांतील खालील देशांचा उल्लेख केला आहे[१५]—

(१) पूर्व–भागीरथी, सरयू, कौशिकी, कालिन्दी, सरस्वती, शोण इत्यादि नद्या; विदेह, मालव, काशिकोसल, मगध इत्यादि देश.

(२) दक्षिण–विन्ध्यपर्वत, नर्मदा, गोदावरी, कृष्णवेणी, वरदा या नद्या; मेकल, उत्कल, विदर्भ, ऋषिक, वङ्ग, कलिंग, कौशिक, आन्ध्र, चोल, पाण्डय, केरल देश; मलय पर्वत, महेन्द्र पर्वत इत्यादि.

(३) पश्चिम–सुराष्ट्र, बाल्हीक, शूर, आभीर देश; सिन्धुसागरसंगम, पश्चिम समुद्र इत्यादि.

(४) उत्तर–हिमालय, भरतदेश, कुरु, मद्रक, काम्बोज, यवन, शक आरट्टक, बाल्हीक, चीन हे देश, आणि कैलास, क्रौञ्च पर्वत इत्यादि.

चारी दिशांतील या पर्वत, नदी, देश इत्यादिकांचे निरीक्षण केल्यावर असे दिसून येईल की कवीने त्यांचा दिङ्‌निर्देश एकंदर भारताच्या दृष्टीने केला आहे, एका विशिष्ट ठिकाणाच्या संदर्भात नव्हे. तेव्हा ते पर्वत, नद्या व देश किष्किंधा नगरीच्या त्या त्या दिशांस होते असे मानणे उचित होणार नाही. इतक्यानंतरही विन्ध्यपर्वत किष्किन्धेच्या दक्षिणेस होता असा कोणी आग्रह धरल्यास तन्नामक दुसरा पर्वत दक्षिण भारतात मलयपर्वताजवळ होता, हे सहज दाखविता येईल. भारतासारख्या खंडप्राय देशात एकाच नावाचे अनेक प्रदेश, नगरे व नद्या आढळल्यास आश्चर्य नाही. उदाहरणार्थ, रामगिरि नावाचे अनेक पर्वत दक्षिण भारतातील भिन्न भिन्न प्रदेशांत असलेले संशोधकांनी दाखविले आहेत; विदर्भ, मध्यप्रांताचा बस्तर जिल्हा, पूर्वीचे सिरगुजा संस्थान, ओरिसा वगैरे प्रदेशांत रामगिरि नामक पर्वत आहेत. त्यांतून कोणता पर्वत कालिदासाच्या मेघदूतात विवक्षित होता हे आम्हांस ‘मेघदूता’त वर्णिलेल्या मेघमार्गावरून ठरवावे लागले.[१६] दुसरे उदाहरण प्रस्तुत वादातील किष्किन्धानगरीचे. रामकथेशी संबद्ध अशा किष्किन्धेशिवाय आणखी

१५. पूर्वोक्त, सर्ग ३९ ते ४२ पाहा.

१६. मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक, पृ. ३३ इ.

एक तन्नामक नगरी राजस्थानात उदेपूरच्या दक्षिणेस सुमारे ४५ मैला-वर कल्याणपूर नामक गाव आहे तेथे होती. तेथे अनेक प्राचीन अवशेष सापडले आहेत. ते राजपुतान्यातील प्राचीन किष्किन्धा नगरीचे स्थान होय. तेथे राज्य करणारा महाराज भेत्ति याचा जवळच्या धुलेव गावी सापड-लेला ताम्रपट सुमारे वीस वर्षांपूर्वी आम्ही एपिग्राफिया इंडिकात संपा-दिला आहे.[१७] राजपुतान्यातील ही किष्किधा नगरी आणि रामायणातील तन्नामक नगरी या एकच होत हे कोणीही अद्यापि प्रतिपादिले नाही. तथापि, या उदाहरणावरून केवळ नामसादृश्यावरून स्थानांचे ऐक्य मानण्यात काय धोका आहे हे ध्यानात येईल.

विंध्य पर्वत दक्षिणेतही होता हे पार्जिटरने पुष्कळ वर्षांपूर्वी दाख-विले होते. रामायणाचा सूक्ष्म दृष्टीने अभ्यास केल्यावर हे स्पष्टपणे ध्यानात येते.

सुग्रीवाच्या आज्ञेप्रमाणे अनेक वानरांना घेऊन हनुमान् दक्षिण दिशेस विंध्य पर्वताच्या गुहांत तपास करण्यास जाता झाला. दक्षिण दिशेचा निर्देश करताना त्याने तिचा 'अगस्त्याचरितामाशाम्' असा उल्लेख केला आहे.[१८]

अगस्त्याचरितामाशां दक्षिणां यमरक्षिताम् ।
सहैभिर्वानरैर्मुख्यैरङ्गदप्रमुखैर्वयम् ॥

पुढे ते त्या पर्वताच्या एका मोठ्या गुहेत अडकून पडले. तेव्हा रत्नप्रभा नामक तापसीने त्यांना डोळे मिटावयास सांगून क्षणार्धात त्या गुहेबाहेर आणले आणि म्हटले—

एष विन्ध्यो गिरिः श्रीमान्नानाद्रुमलतायुतः ।
एष प्रस्रवणः शैलः सागरोऽयं महोदधिः ॥ (४, ५२, १२).

१७. व्हॉ. ३०, पृ. १ इ. तसेच गोवा प्रदेशाला सिंहल किंवा लंका असे नाव होते, हेहि आम्ही इतरत्र दाखविले आहे. संशोधनमुक्तावलि, सर ५, पृ. १८८.

१८. किष्किन्धा, ५१.७

तेव्हा हा विन्ध्य सागराच्या तीरावर होता असे स्पष्ट दिसते. 'महोदधिः' या पदावरून सागराचाच बोध होतो; किबे वगैरे समजतात त्याप्रमाणे एखाद्या मोठ्या तलावाचा नव्हे.

हा विन्ध्य पर्वत दक्षिणभारतात समुद्राच्या काठी होता याचे एक गमक किष्किधाकांडात आले आहे. वानर त्या पर्वतात हिंडत असता त्यांना संपाति नामक गृध्र भेटला. त्याने "पूर्वी मी माझा धाकटा भाऊ जटायु याच्यासह सूर्यमंडळाकडे उड्डाण करीत असता सूर्याच्या तेजाने माझे पंख जळून गेले, पण मी आपल्या पंखांनी जटायूला आवरण घातल्यामुळे त्याचे पंख मात्र वाचले." असे सांगितले. त्यानंतर आपण विंध्य पर्वतावर आणि जटायु जनस्थानात कोसळला असे तो म्हणाला[१९]—

आशङ्के तं निपतितं जनस्थाने जटायुषम् ।
अहं तु पतितो विन्ध्ये दग्धपक्षो जडीकृतः ।।

संपाति जेथे पडला तो विन्ध्यपर्वत कोठे होता, याचे गमक याच कांडात इतरत्र आले आहे. संपातीने पुढे सांगितले की मी असा परस्वाधीन झालो असल्यामुळे माझा मुलगा सुपार्श्व हा मला आहारादि देऊन माझे पोषण करीत असतो. एकदा त्याला येण्यास उशीर लागला. त्याचे कारण विचारल्यावर सुपार्श्व म्हणाला,[२०] "मी मांसाच्या शोधार्थ महेंद्रपर्वतावर जाऊन तेथून सागराला जाणारा एकच मार्ग अडवून बसलो. नंतर मला एक काळाकभिन्न पुरुष एका सूर्यासारख्या उज्ज्वल प्रभेच्या स्त्रीला घेऊन जाताना दिसला. मी त्याला अडविले पण त्याने गयावया करून माझी प्रार्थना केल्यावर मी त्या दोघांना जाऊ दिले. पुढे ऋषींकडून मला कळले की तो रावण होता आणि तो आक्रोश करणाऱ्या रामपत्नी सीतेला घेऊन जात होता."

रामायणातील या वृत्तांतावरून पूर्वोक्त विन्ध्य महेंद्र पर्वताजवळच होता हे स्पष्ट आहे. महेन्द्र पर्वताचे स्थान दक्षिण भारतात होते हे कोरीव लेखांवरून सिद्ध करता येते. उत्तर भारतात तो पर्वत असलेला

१९. किष्किन्धा, ६०.१५
२०. किष्किन्धा, ५८.१३ इ.

कोठेही उल्लेख नाही. म्हणून त्याच्या जवळचा विन्ध्य पर्वत हा दक्षिण-समुद्रतीरी होता, तो नर्मदेच्या उत्तरेस लागून असलेला विन्ध्य नव्हे हे स्पष्ट आहे

डॉ. सांकलिया यांना या महेंद्र पर्वताचा उल्लेख माहीत आहे. पण ते त्याला ' विन्ध्य पर्वताचीच एक लहानशी गिरिमालेच्या नावाने ओळखली जाणारी ओळ आणि पूर्वघाटाला दिलेले नाव ' असे मानतात.[२१] उद्या ते सह्याद्रीला सुद्धा विन्ध्यपर्वताचा फाटा म्हणतील ! अशा रीतीने उत्तरेतील विन्ध्यपर्वताचा दक्षिणसमुद्रानजीकच्या पर्वतराजीशी संबंध जोडणे अजब आहे !

प्रमाण तिसरे–रावणवंशीयांचे सध्या मध्यभारतात अस्तित्व

" सध्या मध्यभारतात गोंड या आदिवासींच्या (१) रावण, (२) वानर, (३) रघु आणि (४) कोमर अशा चार जाती आहेत[२२] काही गोंड आपणांस रावणवंशी राजगोंड म्हणवतात. त्यावरून त्यांचे त्या प्रदेशातील प्राचीन कालातील अस्तित्व सिद्ध होते. तेव्हा रावणाची लंका याच भागात–अमरकंटकजवळ–असावी."

या प्रमाणाचे परीक्षण–

सध्याच्या समजुतीवरून अशी अनुमाने काढू लागलो तर अनवस्था प्रसंग येईल. भारतीयेतिहासाच्या मध्ययुगीन कालात स्वतःच्या वंशाचा प्राचीन विख्यात व्यक्तीशी किंवा वंशाशी संबंध जोडण्याची प्रथा पडून गेली होती. काही राजकुले स्वतःस सूर्यवंशी तर इतर काही चंद्रवंशी समजत. प्रतीहार राजे आपण लक्ष्मणाचे वंशज आहो, असे दिमाखाने सांगत. छत्तीसगडातील राजे स्वतःला पांडववंशी म्हणवत. गुजरातेतील आद्य गुर्जर राजे कर्णास आपला पूर्वज मानीत. रेवा संस्थानातील काही राजे स्वतःला कौरववंशी समजत. गोंड हे आर्येतर वंशातील. तेव्हा त्यांनी आपल्या वंशाचा संबंध रावणाशी जोडला तर त्यात आश्चर्य नाही. पण

२१. ' वाल्मीकि–रामायण (एक पुरातत्त्वीय अध्ययन),' पृ. ५९.
२२. *F. W. Thomas Volume*, p. 144.

जसे हे पूर्वोक्त मध्ययुगीन राजे त्या त्या वंशात किंवा त्या त्या विख्यात पौराणिक पुरुषापासून जन्मले असणे शक्य नाही तसेच गोंड लोकही रावणाच्या वंशात जन्मले होते हे संभवनीय नाही.

प्रमाण चौथे-रामायणाचा वस्तुनिष्ठ दृष्टीने अभ्यास

" रामायणाचा वस्तुनिष्ठ दृष्टीने अभ्यास केल्यास लंका विन्ध्यपर्वतातच होती असे सिद्ध होते. रामायणाच्या किष्किंधाकांडात संपातिपुत्र विंध्यपर्वतात असताना सुपार्श्वाने रावणाला आपल्या हाताने सीतेला उचलून घेऊन जाताना समक्ष पाहिले होते. तेव्हा रावण हा सामान्य प्रतीचा मानवच होता. हनुमंताने जो सागर पोहून पार केला तो शंभर योजना एवढा होता असे ' रामायणा 'त वर्णिले आहे. सध्याचे सीलोन हीच लंका मानल्यास सीलोन व रामेश्वर यामधील अंतर शंभर योजने (४५० मैल) होईल. पण ते अंतर इतके नाही. तेव्हा योजन म्हणजे २०० गज मानले पाहिजे. अशा प्रमाणाने हनुमान् १०० योजने पोहून गेला असणे शक्य आहे. ज्या ठिकाणी पाणी कमी असेल तेथे तो पायी चालत होता आणि ज्या ठिकाणी खडक वगैरे पाण्याच्या वर आलेले होते तेथे तो विश्रांति घेत होता. अशा रीतीने हे सरोवर (सागर नव्हे) त्याने पार केले असेल. याप्रमाणे या वर्णनाचा अर्थ केल्यास लंका मध्यप्रदेशात जबलपूरच्या उत्तरेस १८ मैलावर इंद्राणा पर्वतावर होती असे दाखविता येते."

या प्रमाणाचे परीक्षण

' रामायण ' हे एक काव्य आहे. त्यातील विधाने व वर्णने कल्पनाप्रचुर आहेत. ती वस्तुनिष्ठ दृष्टीने घेणे शक्य नाही. तशी ती घेतल्यास वस्तुस्थितीशी जुळत नाहीत हे मागे प्रयागापासून चित्रकूट पर्वताच्या अंतराच्या ' रामायणा 'तील विधानावरून आम्ही दाखविले आहे. म्हणूनच त्या काव्यात रावणाचे दशमुखत्व, हनुमानाचे ४५० मैल पोहून जाणे, रामाचा लंकेपासून अयोध्येपर्यंत बिभीषणादि राक्षस, वानर इत्यादिकांसह विमानातून प्रवास, युद्धात अनेक अस्त्रांचे प्रयोग इत्यादिकांचे वर्णन आढळते. ते वस्तुनिष्ठ दृष्ट्या घेणे योग्य नाही, आणि तसे सर्वत्र

शक्यही होणार नाही. उदाहरणार्थ, रावण सीतेला घेऊन पायीच चालत होता असे नाही. तो आकाशमार्गानेही जात होता. म्हणूनच सीतेला आपले अलंकार ऋष्यमूक पर्वतावर बसलेल्या वानरांकडे टाकता आले. तेव्हा तो केवळ मानव नव्हता.

शिवाय ज्या पर्वतात सुपार्श्वाला रावण सीतेला घेऊन जाताना भेटला तो पर्वत विन्ध्य नसून महेन्द्र होता. तो दक्षिण भारतातील, हे मागे दाखविले आहे. त्याच्याजवळचा विंध्य भारताच्या मध्यभागातील विन्ध्य पर्वताहून निराळा, भारताच्या दक्षिणटोकाजवळचा होता हे मागे दाखविले आहे. तेव्हा या दुसऱ्या विंध्य पर्वताच्या दक्षिणेची लंका ही मध्यभारतात असणे शक्य नाही.

इतर किरकोळ प्रमाणे

याशिवाय डॉ. सांकलियांनी लंका विंध्य प्रदेशातच होती हे सिद्ध करण्यास अनेक किरकोळ प्रमाणे दिली आहेत. त्यांचाही थोडक्यात विचार करू. ती ही–(१) रामाने सात साल वृक्षांचा वेध आपल्या बाणांनी केला. लंकेच्या युद्धात राक्षस व वानर यांनी सालवृक्ष उपटून एकमेकांवर फेकले असे वर्णन आहे. हल्ली सालवृक्षांची वने मध्यप्रदेशातील पूर्वभागात अमरकंटकाचे पठारावर, तसेच, छोटा नागपूर इत्यादि भागांत आढळतात. (२) लंका हा शब्द मुण्डारी भाषेतील आहे. (३) रावण हा गोंडजातीचा होता.

या प्रमाणांचे परीक्षण

ही प्रमाणे पोचट आहेत. (१) सध्या साल वृक्षांची वने दक्षिणेत दिसत नसली तरी पूर्वी ते वृक्ष दक्षिणेत होत नसत असे म्हणणे सयुक्तिक होणार नाही. याच्या उलट असे म्हणता येईल की रामायणातील सागराचे वर्णन मध्यप्रदेशातील कोणत्याही विशाल तळ्याला लागू पडणार नाही. त्याला लवणाम्भस् (खाऱ्या पाण्याचा) असे म्हटले आहे.[२३] तसेच

२३. रामायण, किष्किंधाकाण्ड, ५७. ३१. युद्धकाण्ड ४.१११ मध्ये चंद्रोदयामुळे सागराला भरती आल्याचे वर्णिले आहे.

चंद्रोदयाच्या वेळी त्याला भरती आली होती. आणि त्यात मोठमोठे पर्वत मगर, नाग इत्यादि जलचर होते, इत्यादि वर्णन आहे. हे वर्णन कोणत्याही तलावाला लागू पडणारे नाही. रामायणातील साल वृक्षांचे उल्लेख लक्षात घ्यावयाचे तर हे वर्णनही का यथार्थ मानू नये ? तसे न केल्यास 'अर्धजरतीयन्याया 'चा दोष प्राप्त होईल.

(२) लंका शब्द आर्येतर भाषेतून घेतला असेल. लंकेतील मूळची वसती आर्येतरांची असेल. पण त्यावरून रामायण कथा असत्य होत नाही.

(३) रावण शब्द संस्कृतमध्येही व्युत्पादिता येतो. 'शिवादिभ्योऽण् ।' या पाणिनिसूत्राच्या गणपाठात 'अण्' प्रत्ययापूर्वी 'विश्रवस्' शब्दाला 'विश्रवण' आणि 'रवण' असे आदेश होतात, हे सांगितले आहे. तो प्रत्यय लागल्यावर वैश्रवण (कुबेर) आणि रावण अशी रूपे होतात, गणपाठात या शब्दांचा उपयोग केला असल्यामुळे 'रावण' शब्दाची ही व्युत्पत्ति निदान ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकाइतकी प्राचीन आहे.[२४]

राम, हनुमान, रावण हे वस्तुतः मानव असले तरी अतिमानवशक्तिसंपन्न असेच कवीला विवक्षित होते आणि त्याच श्रद्धेने त्याने त्यांची चरित्रे वर्णिली आहेत. त्या वर्णनातून आपणास उपयोगी तेवढाच भाग घेऊन रामचरित्राची उपपत्ति लावणे योग्य नव्हे.

जे व्यक्तींच्या बाबतीत तेच नगररचना, अन्नपानादि व्यवहार यांच्या बाबतीत खरे आहे. ही वर्णने काल्पनिक आणि अतिशयोक्तिपूर्ण आहेत. कल्पनारम्य आणि अतिशयोक्त वर्णन करणे हा संस्कृत कवींचा स्वभावच आहे. एवढा मोठा कालिदास ऐतिहासिक कालात ख्रिस्तोत्तर ४०० च्या सुमारास झालेला. पण तोही दशरथराजाने दहा हजार वर्षे राज्य केले असे 'रघुवंशात 'त वर्णन करतो. रघुवंश (सर्ग १०, श्लो. १) मधील पुढील श्लोक पाहा—

---

२४. पाणिनीचा काल ख्रिस्तपूर्व सहावे शतक धरण्यात येतो.

पृथिवीं शासतस्य पाकशासनतेजसः ।
किञ्चिदूनमनूनर्द्धेः शरदामयुतं ययौ ।।[२५]

तेव्हा रामायणात काही नगरांच्या वर्णनात 'प्रशस्त आणि सरळ राजमार्ग आणि एकमेकांना समांतर असलेल्या सडका' यांचे वर्णन आलेले पाहून त्या काव्याचा तो भाग इंडो-ग्रीक संस्कृति वायव्य प्रदेशात प्रस्थापित झाली त्या कालानंतरचा असावा असे अनुमान करणे सयुक्तिक होणार नाही. तसेच 'रामायणा'च्या अयोध्याकांडात भरद्वाजाश्रमामध्ये भरताच्या सैनिकांचे जे मांस, मदिरा आणि मदिराक्षी यांच्या वैपुल्याने स्वागत झाले ते भारतात रोमन मद्याचे विपुल कुंभ येऊ लागल्यानंतरचे असावे हे अनुमानही तसेच तर्कदुष्ट आहे. भारतात मदिरेचा उपयोग आपला रोमन साम्राज्याशी व्यापार सुरू झाल्यानंतरचा नाही. ऋग्वेदातील १०.३४ या सूक्तात एक दारुड्या आपली निकृष्टावस्था सुरादिकांच्या आसक्तिमुळे झाली असे पश्चात्तापपूर्वक कबूल करीत आहे. तेव्हा भरद्वाजाश्रमातील सैनिकांच्या स्वागताचे वर्णन कवीला आपल्या कल्पना शक्तीने करता आले नसते असे नाही. त्याकरिता रोमन मद्याचे पाट भारतात वाहले असणे आवश्यक नाही.

डॉ. सांकलिया 'रामायणाचे' कमीत कमी चार भाग करतात. त्यातील सर्वांत प्राचीन भाग ई. स. पूर्व सहाव्या किंवा सातव्या शतकातील, आणि शेवटचा भाग ई. पू. सनाच्या ५ व्या किंवा ६ व्या शतकातील असावा असे ते मानतात. 'रामायणा'तील काही भाग ई. स. पूर्व पाचव्या-सहाव्या शतकाइतका प्राचीन आहे यात संशय नाही. पतंजलीच्या महाभाष्यात 'याति जीवन्तमानन्दो नरं

---

२५. 'रामायणा'तही अशी असंभाव्य वर्णने आढळतात. युद्धकांडातील रामाच्या राज्यकालाचे व त्याच्या अश्वमेध यज्ञांच्या संख्येचे खालील श्लोक पाहा–

राज्यं दश सहस्राणि प्राप्य वर्षाणि राघवः ।
शताश्वमेधानाजह्रे सदश्वान्भूरिदक्षिणान् ।।
(युद्धकाण्ड, ११६–८२)

वर्षशतादपि ॥ ' हा सुंदरकांडातील सुप्रसिद्ध श्लोकार्ध उद्धृत केला आहे.[२६] त्या आदिकाव्याचा काही भाग ख्रिस्तोत्तर पहिल्या दुसऱ्या शतकानंतरचा आहे हे ठरवण्यास पुरातत्त्वाच्या पुराव्याची जरूरी नाही. त्या काव्यात शक, वाल्हीक वगैरे परदेशी आक्रमकांच्या देशांचा उल्लेख आहे, त्यावरूनच ते सिद्ध होते. पण वाल्मीकिरामायणाला ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापूर्वीच सध्याचे रूप प्राप्त झाले होते यात संशय नाही. भास (ख्रिस्तोत्तर तिसरे शतक) व कालिदास (ख्रिस्तोतर चौथे–पाचवे शतक) यांनी आपल्या ग्रंथांत जी रामकथा दिली आहे ती उत्तरकांडासहित ' रामायणा 'तल्यासारखी आहे. त्यानंतर काही ठिकाणी काही भाग घुसडले गेले असतील. पण मूळ कथेत फरक झाला नाही. 'रामायण'संबद्ध शिल्पे गुप्त कालापूर्वी सापडत नाहीत हे खरे, पण त्यावरून त्या कालापूर्वी ते काव्य प्रचारात नव्हते असे म्हणता येणार नाही.

रामकथेचे मूळचे रूप कसे होते हे आपणांस आज शेकडो वर्षांनंतर सांगणे शक्य नाही. या बाबतीत पुरातत्त्वशास्त्राचा काही उपयोग होणार नाही. कारण रामायणनिर्मितिकालीन वस्तु उत्खननाने सापडल्या नाहीत आणि सापडण्याची शक्यता नाही. रामायण हे आदिकाव्य गणले जाते, ते इतिहास नव्हे. त्यातील वर्णन एका महान् कवीने आपल्या प्रभावी कल्पनाशक्तीने केले आहे, त्यात उत्तर भारतातल्याप्रमाणे दक्षिण भारतातील देश, पर्वत, नद्या इत्यादिकांचे उल्लेख आहेत. ख्रिस्तपूर्व पाचव्या सहाव्या शतकात हे देश वगैरे अज्ञात होते असे म्हणता येत नाही. कारण वेदवाङ्मयातही त्यातील आन्ध्र, विदर्भादि काही देशांचा उल्लेख येतो. तेव्हा 'रामायणा'चा आरंभकाल ख्रिस्तपूर्व पाचव्या–सहाव्या शतकापूर्वीही जाऊ शकेल.

रामायणात अयस् किंवा लोखंड यापासून बनविलेल्या वस्तूंचा–उदाहरणार्थ, शस्त्रे, धनुष्याकरिता आठ चाकांची पेटी वगैरेचा उल्लेख आढळतो, म्हणून त्याचा काळ ख्रिस्तपूर्व ४०० ते ५०० पासून इसवी-

२६. सुन्दरकांड, ३४.६. कल्याणी बत गाथेयं लौकिक प्रतिभाति मे ।
एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतादपि ॥

सनच्या नंतर ३०० ते ४०० शतकाच्या दरम्यान असला पाहिजे असे डॉ. सांकलियानी म्हटले आहे. पण 'अयस्'चा उपयोग ऋग्वेदकाळीही होत होता. ऋग्वेदाच्या १.११६.१५ या ऋचेत म्हटले आहे की, लढाईत तुटलेला विश्पलेचा पाय अश्विनी कुमारांनी लोखंडी रूपाने (जंघामायसीम्) बसवला. येथे काही विद्वान् आयसी याचा अर्थ 'तांब्याची' असा घेतात. पण ते बरोबर नाही. त्या शब्दांचा अर्थ लोखंडाचा पाय असाच सर्व प्राचीन व अर्वाचीन टीकाकारांनी केला आहे. अशा कामाकरिता लोखंडाचा उपयोग होत असल्यास ती धातु धनुष्याची गाडी, शस्त्रास्त्रे वगैरेकरिता उपयोगात आणली जात नसेल हे संभवनीय नाही.

वरील प्रमाणपरीक्षणावरून वाल्मीकि–रामायणात वर्णिलेली लंका मध्य भारतात होती आणि त्यातील वर्णनावरून त्याचा काही भाग आमचा रोमन साम्राज्याशी संबंध आल्यावर रचला गेला, हे सिद्ध होत नाही हे वाचकांच्या लक्षात येईल.

१४. कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे देवालय कोणी व केव्हा बांधले ?*

कोल्हापूर हे दक्षिण काशी म्हणून आज कित्येक शतके प्रसिद्ध आहे. तेथील महालक्ष्मीच्या देवालयाची गणना १०८ भारतीय शाक्त-पीठांमध्ये केली जाते.[१] 'देवीभागवत-पुराणा'त (७, ३८, ५-६) महाराष्ट्रातील प्रमुख शाक्त तीर्थांची गणना पुढील श्लोकात केली आहे.[२]

कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मीः सदा स्थिता ।
मातुः परं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम् ।
तुलजापुरं तृतीयं स्यात् सप्तशृङ्गं तथैव च ॥

– मार्कंडेय पुराणातील देवीमाहात्म्यात (किंवा सप्तशतीत) महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती अशी देवीची त्रिगुणात्मक तीन रूपे आणि त्यांनी महिषासुर, शुंभ, निशुंभ इत्यादि असुरांचा संहार करून केलेले देवादिकांचे रक्षण वर्णिले आहे. हे माहात्म्य निदान ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकापूर्वीचे आहे, कारण त्यातील एक श्लोक हर्ष संवत् १८९ (७९५-९६) च्या दधिमाता कोरीव लेखात उद्धृत केला आहे.[३] त्यापूर्वी काही शतके ख्रिस्तोत्तर पाचव्या सहाव्या शतकापर्यंत त्याचा काळ असावा, हे पार्जिटरचे मत ग्राह्य दिसते. विदिशेजवळ उदयगिरि टेकडीतील एका

---

* नवभारत, वाई, वर्ष २७, अंक ५, पृ. ६५-७१.

१. दिनेशचंद्र सरकार यांचा शाक्तपीठांवरचा लेख (जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल, व्हॉ. १४, पृ. ६९)

२. पूर्वोक्त, पृ. १०७.

३. आमचे 'स्टडीज इन इंडॉलॉजी,' व्हॉ. २, पृ. २००-२०६ पाहा.

गुप्तकालीन लेखात द्वादशभुजा महिषासुरमर्दिनी महालक्ष्मीची मूर्ति कोरली आहे.[४] तिजवरून त्या देवीची पूजा निदान ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकात प्रचलित होती असे दिसते. त्यापूर्वीचा निश्चित असा पुरावा मात्र सध्या ज्ञात नाही.

त्यानंतर महालक्ष्मीची पूजा उत्तर व दक्षिण भारतात सर्वत्र पसरलेली दिसते. प्रा. ग. ह. खरे यांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या देवळाचे सूक्ष्म निरीक्षण करून आणि त्यातील कोरीव लेखांचा अभ्यास करून असा निर्णय केला आहे की 'ते शके ९०० च्या पूर्वीचे असेल असे वाटत नाही. फार तर गाभाराच थोडा प्राचीन (शके ८००) असण्याचा संभव आहे[५]' पण त्यापूर्वीच्या शक संवत् ७९३ (सन ८७१) च्या राष्ट्रकूट नृपति प्रथम अमोघवर्ष याच्या संजान ताम्रपटात तिचा उल्लेख खालील श्लोकात[६] आला आहे हेही त्यांनीच दाखविले आहे.

> **सर्पं पातुमसौ ददौ निजतनुं जीमूतकेतोः सुतः**
> **श्येनायाथ शिबिः कपोतपरिरक्षार्थं दधीचोऽर्थिने ।**
> **तेऽप्येकैकमतर्पयन्किल महालक्ष्म्यै स वामांगुलिं**
> **लोकोपद्रवशान्तये स्म दिशति श्रीवीरनारायणः ।।**

एकदा अमोघवर्षाच्या राज्यात एका महान् व्याधीचा फैलाव झाला. हजारो लोक मृत्युमुखी पडू लागले. तेव्हा ज्योतिष्यांच्या सांगण्या-वरून अमोघवर्षाने आपल्या डाव्या हाताची करंगळी महालक्ष्मी देवीला अर्पण करून तो लोकोपद्रव शांत केला. या प्रसंगाला अनुलक्षून वरील श्लोक रचला आहे. त्यात म्हटले आहे की जीमूतकेतूचा पुत्र जीमूतवाहन याने एका सर्पाला वाचविण्याकरिता आत्मबलिदान केले. शिबि राजाने एका पारव्याला वाचविण्याकरिता बहिरी ससाण्याला आपले शरीर अर्पण केले. दधीचीनेही याचक इंद्राला तसेच स्वात्मार्पण केले. पण या वीर-

---

४. 'विक्रम व्हॉल्यूम,' पृ. ४११–१२.

५. ग. ह. खरे, 'महाराष्ट्राची चार दैवते,' पृ. ७६. श्री. खरे यांनी हे देवालय कोणी बांधले याची चर्चा केली नाही.

६. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १८, पृ. २४६.

नारायण (अमोघवर्ष) राजाने एकेकट्या व्यक्तीचे नव्हे तर आपल्या राज्यातील लाखो प्रजाजनांचे उपद्रवापासून रक्षण करण्याकरिता आपल्या डाव्या हाताची अंगुली महालक्ष्मीला अर्पण केली.

या संजान ताम्रपटाचा काल शक संवत् ७९३ (सन ८७१-७२) आहे. प्रस्तुत श्लोकातील उल्लेख कोल्हापूरच्या महालक्ष्मीचाच असला पाहिजे. कारण त्या काळी त्या नावाची दुसरी देवता राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात प्रसिद्ध नव्हती. त्या काली तिची विशेष प्रसिद्धि असली पाहिजे. अर्थातच तिचे देवालयही त्या काळी अस्तित्वात असून ते लोकांच्या श्रद्धेचे व भक्तीचे प्रमुख पीठ झाले होते असे अनुमान करण्यास हरकत नाही. तसे नसते तर राष्ट्रकूटांच्या सारख्या महान साम्राज्याचा अधिपति लोकोपद्रवनिवारणार्थ आपली करांगुलि तिला अर्पण करण्यास तयार होता ना. अर्थातच त्यावेळी हे देऊळही अस्तित्वात असले पाहिजे. तेव्हा त्याच्या कालाची उत्तरमर्यादा सन ८७१ किंवा नवव्या शतकाचा उत्तरार्ध ही दिसते.

महालक्ष्मीचे देवालय भव्य आहे. त्याला नंतरच्या काळात काही भाग जोडले असले तरी त्या त्रिकूट प्रासादाचे गर्भगृह व सभामंडप हे भाग तरी प्राचीन होत यात संशय नाही. हे देऊळ बाहेरून तारकांकित (star-shaped) असून त्याच्या बाहेरच्या भिंतींना तापस, सुरसुंदरी, नर्तिका वगैरेंच्या मूर्तींनी सुशोभित केले आहे. नवव्या ते अकराव्या शतकात बांधलेली अशी देवालये विदर्भात मार्कंडी, कोकणात अंबरनाथ वगैरे ठिकाणी अद्यापि विद्यमान आहेत, त्यांमध्ये हे देवालय प्राचीन आहे. कारण याच्या भिंतीवर त्यांच्याइतके प्रतिमाप्राचुर्य आढळत नाही.

अशी भव्य देवालये राजाश्रयाशिवाय बांधली जात नसत. तेव्हा आठव्या–नवव्या शतकात ज्यांनी हे देवालय बांधले असेल असे महाराष्ट्रात कोण राजे राज्य करीत होते याचा आता विचार करू.

प्राचीन काळी हा कृष्णाकाठचा प्रदेश कुंतल देशात अंतर्भूत होत होता. या प्रदेशाचा प्राचीन इतिहास बराचसा अज्ञात आहे. खिस्तोत्तर २५० पर्यंत हा सातवाहनांच्या अमलाखाली होता. पुढे हा काही काळ

वाकाटकांच्या व नंतर पूर्वकालीन राष्ट्रकूटांच्या ताब्यात गेला असे दिसते. या राष्ट्रकूटांची राजधानी मानपुर (सातारा जिल्ह्यातील माण) येथे होती. त्यांना ' कुंतलाधिपति ' म्हणत. हे राजे उत्तर भारतातील गुप्तांचे समकालीन होते. त्यांच्या दरबारी द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याचा राजकवि कालिदास दूत म्हणून आला होता अशी आख्यायिका राजशेखर, भोज, क्षेमेंद्र यांनी उल्लेखिली आहे. तिची चर्चा आम्ही इतरत्र केली आहे.[७]

ख्रिस्तोत्तर सातव्या शतकात हा प्रदेश बादामीच्या चालुक्यांनी जिंकून घेतला. द्वितीय पुलकेशीने प्रथम यावर आपला भाऊ कुब्ज विष्णुवर्धन याची नेमणूक केली होती.[८] पण पुढे त्याने त्यास वेंगीचे राज्य देऊन हा प्रदेश स्वतःच्या राज्यात समाविष्ट केलेला दिसतो. यानंतरचा या प्रदेशाचा इतिहास मात्र अद्याप बराचसा अज्ञात आहे.

चालुक्यांच्या नंतर हा प्रदेश उत्तरकालीन राष्ट्रकूटांच्या अमलाखाली गेला असता तो त्यांनी आपल्या साम्राज्याच्या इतर प्रदेशांप्रमाणे कोणा सामंताच्या स्वाधीन केला असावा. पण त्याविषयी निश्चित माहिती आपणांस नाही. तथापि अनुमान करण्यास साधन आहे.

कर्नाटकातील वनवासी–संतलिगे या भागात राज्य करणारा ईश्वर नामक सिंदवंशी सामंत (ज्ञातवर्षे सन ११६५ व ११७२) आपले वर्णन ' करहाटपुरवराधीश्वर ' (करहाट–सध्याचे सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड या श्रेष्ठ नगराचा अधिपति) असे करतो.[९] याचा अर्थ तो त्याकाळी कऱ्हाड येथे राज्य करीत होता असा करावयाचा नसून त्याचे पूर्वज एका काळी करहाट येथे राज्य करीत होते असा केला पाहिजे. हे प्राचीन

---

७. संशोधन–मुक्तावलि : सर ५, पृ. १२६–१३०.

८. याचा आरंभीचा ताम्रपट सातारा येथे सापडला आहे, त्यावरून त्याच्या अमलाखाली सातारा–पंढरपूर हा प्रदेश होता असे कळते. ज. ऑ. बाँ. ब्रँ. रा. सो., व्हॉ. २, पृ. ११.

९. पालि, संस्कृत अँड ओल्ड् कॅनरीज इन्स्क्रिप्शन्स्, क्र. ११९.

भारतीय इतिहासज्ञांस माहीत आहे. दक्षिणेतील गुप्तराजे ‘ उज्जयिनी-पुरवराधीश्वर ’ व कलचुरि राजे ‘ माहिष्मतीपुरवराटधीश्वर ’ असे स्वत:चे वर्णन करतात तेव्हा त्याचा अर्थ असाच करावा लागतो. तेव्हा सिंद राजेही एके काळी दक्षिण महाराष्ट्रात करहाट (कऱ्हाड) येथे राज्य करीत होते असे अनुमान करता येते.

पण अशा अनुमानाला काही उपोद्बलक प्रमाण आहे काय ? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचा विचार आता करू.

पुष्कळ वर्षांपूर्वी एका ताम्रपटाचा एकच पत्रा खानदेशचे गो. कृ. चांदोरकर यांना मिळाला होता. तो सध्या धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळात ठेवला आहे. त्याच ताम्रपटाचा दुसरा एक पत्रा पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात आहे. तो कोठे सापडला माहीत नाही. मूळ ताम्रपट तीन किंवा चार पत्र्यांचा असावा. पूर्वोक्त दोन पत्र्यांवर त्या ताम्रपटाचा शेवटचा भाग कोरला आहे. त्यापूर्वीचा भाग आता अगोदरचे पत्रे गहाळ झाल्यामुळे ज्ञात नाही.

सुमारे बत्तीस वर्षांपूर्वी सध्या उपलब्ध असलेल्या दोन पत्र्यांचे संपादन डॉ. मो. गं. दीक्षित आणि आम्ही एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. २५, पृ. १६४–१७१ मध्ये केले होते. हा ताम्रपट अपूर्ण असला तरी प्रस्तुत विषयाच्या विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

हा ताम्रपट सिंदवंशी आदित्यवर्म्याने जुन्निनगरमध्ये वास्तव्य असताना मध्यदेशातून आलेल्या नवशिव नामक ऋग्वेदी ब्राह्मणाला दिला होता. त्यात त्याने त्या ब्राह्मणाला रामतीर्थिका–८४ विभागातील पंगरिका नामक मोठ्या गावात अन्तर्भूत झालेले किणिहिका गाव शक संवत् ८८७, क्रोधन संवत्सर, चैत्र अमावास्येला झालेल्या सूर्यग्रहण प्रसंगी दान दिल्याचा निर्देश आहे. हा कालोल्लेख बरोबर जमतो. गत शक संवत् ८८७ ला क्रोधन संवत्सर होते. त्या वर्षी चैत्र अमा-वास्येस सूर्यग्रहणही होते. त्याची इंग्रजी तारीख ६ मार्च सन ९६५ अशी येते.

हे दान देणारा आदित्यवर्मा हा सिंदवंशी होता. प्रस्तुत ताम्रपटात त्याचा पिता मुंज आणि आजा भीम यांची नावे आली आहेत. त्यापूर्वीची त्याच्या पूर्वजांची नावे प्रस्तुत ताम्रपटाचे अगोदरचे पत्रे गहाळ झाल्यामुळे सांगता येत नाहीत. आदित्यवर्म्याचे वर्णन त्याने पंचमहाशब्द प्राप्त करून घेतले होते, तो महासामन्त होता, तो फणीन्द्रवंशात (नागवंशात) जन्मला होता, त्याचा ध्वज सुवर्णसिंहांकित होता असे केले आहे.

प्रस्तुत ताम्रपट नक्की कोठे सापडला हे माहीत नसले तरी त्यांत उल्लेखिलेल्या किणिहिका गावाच्या सीमा सांगताना लयणगिरि आणि इंद्रनदी यांचा उल्लेख केला आहे. त्यावरून त्यात निर्दिष्ट केलेली स्थाने निश्चित करता येतात. ही इंद्रनदी म्हणजे पुणे तालुक्याच्या उत्तरेस वाहणारी इंद्रायणी होय. दान दिलेले किणिहिका गाव हे शेलारवाडी जवळचे किन्हई गाव होय. त्याच्या पश्चिमेस कांही लेणी असलेली टेकडी आहे. तोच प्रस्तुत ताम्रपटात उल्लेखिलेला लयणगिरि. प्रस्तुत ताम्रपट देताना ज्या जुन्निनगरात आदित्यवर्म्याचा मुक्काम होता ते सध्याचे जुन्नर. या स्थलनिश्चयावरून प्रस्तुत ताम्रपट देणारा सिंदवंशी राजा आदित्यवर्मा हा पश्चिम महाराष्ट्रात पुणे–सातारा–कोल्हापूर या भागावर राज्य करीत होता हे उघड आहे. तो आपणास महासामन्त म्हणवतो. तो तत्कालीन राष्ट्रकूट सम्राट् तृतीय कृष्ण याचा मांडलिक असावा.

प्रस्तुत ताम्रपटात या सिंद राजाच्या राजधानीचा निर्देश नाही. पण सिंदराजांच्या 'करहाटपुरवराधीश्वर' या बिरुदावरून ती बहुधा करहाट येथे असावी.

प्रस्तुत ताम्रपट सन ९६५ चा आहे. त्यात त्या काळी राज्य करणाऱ्या आदित्यवर्म्याच्या दोन पूर्वजांचा निर्देश आहे. अगोदरचे पत्रे गहाळ झाल्यामुळे त्यापूर्वी किती पिढ्या हे राजे तेथे राज्य करीत होते, हे समजण्यास मार्ग नाही. तथापि ख्रिस्तोत्तर नवव्या–दहाव्या शतकात या भागात त्यांचे राज्य होते यात संशय नाही. याच कालात कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे देवालय सुप्रसिद्ध होते हे आम्ही मागे राष्ट्रकूटनृपति प्रथम अमोघवर्ष याच्या संजान ताम्रपटावरून दाखविले आहे. तेव्हा ते

देवालय करहाट(कऱ्हाड)च्या कोणा सिंदवंशी राजाने आठव्या-नवव्या शतकात बांधले असावे असे अनुमान केल्यास ते बहुधा चूक होणार नाही.

या सिंदवंशाचा आणखी एक, शक संवत् ९३३ चा, ताम्रपट जुन्नर जवळ नारायणगाव येथे सापडला होता असे डॉ. मो. गं. दीक्षितांनी मला कळविले होते. पण तो त्यांनी कोठे प्रसिद्ध केला माहीत नाही. तो कोणाच्या संग्रही असल्यास त्यांनी तो प्रसिद्ध करावा. कदाचित् त्यायोगे प्रस्तुत प्रश्नावर जास्त प्रकाश पडेल.

शक संवत् ९३३ नंतर लौकरच या सिंद वंशाचे कऱ्हाडहून उच्चाटन झालेले दिसते. यानंतर शिलाहारांनी हा प्रदेश जिंकून कऱ्हाड येथेच आपली राजधानी केली. या वंशातील मारसिंह नामक राजाच्या (सुमारे सन १०५०-१०७५) चंद्रलेखा नामक अत्यंत सुंदर कन्येच्या करहाट येथे झालेल्या स्वयंवराचे उत्कृष्ट वर्णन विल्हण कवीने आपल्या 'विक्रमांकदेवचरित्रा'त (सर्ग ८ व ९) केले आहे. त्या स्वयंवरात तिने उत्तरकालीन चालुक्य सम्राट् षष्ठ विक्रमादित्य[१०] याला वरले होते.

त्यानंतर शिलाहारांना आपली राजधानी करहाटहून कोल्हापूरला हलवावी लागली. यानंतरचे त्यांचे सर्व कोरीव लेख कोल्हापुरच्या आसमन्तात् सापडले आहेत. ते कोल्हापुरच्या महालक्ष्मीचे उपासक होते. आपणांस श्रीमहालक्ष्मीचा वरप्रसाद प्राप्त झाला आहे, (श्रीमहालक्ष्मी-लब्धवरप्रसाद) असे ते मोठ्या दिमाखाने आपल्या अनेक ताम्रपटांत सांगतात. सन १२१३ च्या सुमारास शिलाहारवंशी द्वितीय भोजाचा उच्छेद करून यादव नृपति सिंघण याने कोल्हापुरास आपला अंमल बसविला. त्याचा कोरीव लेख श्रीमहालक्ष्मीच्या देवालयात विद्यमान आहे.[११]

---

१०. विल्हणाने शिलाहार राजाचे नाव न देता त्याचे 'करहाटपति' असे वर्णन केले आहे. तथापि त्याच्या कालावरून तो मारसिंह असावा.

११. महालक्ष्मीच्या देवळातील सिंघणाचा लेख शक संवत् ११४० (सन १२१८-१९) चा आहे 'महाराष्ट्राची चार दैवते', पृ. ४३.

असा हा श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाचा प्राचीन इतिहास आहे. वरील विवेचनावरून कोल्हापूर येथील महालक्ष्मीचे देवालय निदान इ. स. नवव्या शतकाइतके प्राचीन असून ते बहुधा करहाट (कऱ्हाड) येथील कोणा सिंद राजाने बांधले असावे असे अनुमान करता येईल.[१२] यापेक्षा जास्त निश्चित विधान सध्या तरी करता येणे शक्य दिसत नाही.

---

१२. ते देवालय ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकात कोणा कर्ण नामक राजाने बांधले, या प्रा. कुंदनगारांच्या मताचे खंडण प्रा. ग. ह. खरे यांनी उत्तम प्रकारे केले आहे, पूर्वोक्त, पृ. ६३ इ.

१५. मार्कंडी येथील देवळांचा काल*

१९७२ च्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस नागपूर विद्यापीठाने आपल्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृति आणि पुरातत्त्व विभागातर्फे काही ग्रंथांचा प्रकाशन समारंभ कुलगुरु डॉ. मेने यांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला. त्यांपैकी एक ग्रंथ त्या विभागाचे प्रमुख डॉ. शां. भा. देव यांचा मार्कंडी टेंपल्स् (मार्कंडी येथील देवालये) हा होता. गेल्या गणेश-चतुर्थीच्या दिवशी डॉ. देव यांनी स्वतः माझ्या घरी येऊन त्या ग्रंथाची एक प्रत मला भेट दिली. त्यायोगे माझ्या त्या देवळाविषयीच्या पूर्वस्मृति जागृत झाल्या आणि मी तो ग्रंथ मोठ्या उत्सुकतेने वाचू लागलो. तेव्हा त्या देवळाविषयी आणखी चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटू लागले. डॉ. देवांनीही आपल्या निवेदनात आपला ग्रंथ हा या विषयावरील अखेरचा शब्द नसून कलाभिज्ञांचे आणि विदर्भातील जनतेचे या उत्कृष्ट कलाकृतींकडे लक्ष जावे या हेतूने तो लिहिला आहे, असे म्हटले आहे. तेव्हा त्यांच्या ग्रंथातील काही विषयांच्या चर्चेचे ते स्वागतच करतील असे वाटते.

मागे या पुस्तकाने माझ्या पूर्वस्मृति जागृत झाल्या असे म्हटले आहे. त्याचे थोडे स्पष्टीकरण करतो. सुमारे ४० वर्षांपूर्वी सन १९३४ च्या मकरसंक्रांतीस विदर्भ संशोधन मंडळाची (त्या काळच्या मध्यप्रांत संशोधन मंडळाची) स्थापना झाली. त्यायोगे नागपूरच्या सभासदांत उत्साह उत्पन्न होऊन संशोधनपर लेखांच्या चर्चेप्रमाणे ऐतिहासिक स्थलांचे निरीक्षण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. मंडळाचे एक उत्साही सभासद श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांच्या साहाय्याने काही

* विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७३, पृ. ५३–७६.

संशोधन–यात्रा आयोजित करण्यात आल्या. त्यांपैकी पहिली चांदा जिल्ह्यातील देवटेकची होय. त्यावेळी भारत सरकारच्या पुरावस्तु विभागाने माझ्यावर सोपवलेल्या ‘ कलचुरि–चेदि संवताचे कोरीव लेख ’ या बृहद्ग्रंथाकरिता छाप घेण्यासाठी माझ्याकडे पाठविलेल्या तंत्रज्ञाला (मेकॅनिकला) घेऊन आणि १५/२० सभासदांची खास बस (परिवहनयान) करून आम्ही देवटेकची सफर केली. वाटेत रात्री पौनीला आमचा मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी सकाळी तेथील लोकांनी दाखविलेल्या शिलालेखाचा छाप आमच्या तंत्रज्ञाने घेतला. तो लेख पुढे मी ‘ एपिग्राफिया इंडिका ’त (व्हॉ. २४, पृ. ११ इ.) प्रसिद्ध केला. त्यावरून विदर्भात ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकात भारवंशी राजा भगदत्त याने पौनीस स्थापलेल्या पादुकापट्टाची माहिती झाली. नंतर देवटेकास जाऊन आम्ही तेथील शिलालेखांचे छाप घेतले. हे लेख कनिंग्हाम या सुप्रसिद्ध पुरातत्त्वज्ञास माहीत होते. पण त्याला त्यांचा अर्थ लागला नव्हता. त्यांपैकी एक अशोकाच्या विदर्भातील महामात्राचा असून त्यात प्राण्यांची हिंसा किंवा बंधन करू नये अशी आपल्या स्वामीची (अशोकाची) आज्ञा त्याने जाहीर केली होती. त्याच शिलेवरील दुसरा लेख वाकाटक नृपति प्रथम रुद्रसेन याचा असून त्यात त्याने तेथे धर्मस्थान (देवालय) बांधल्याचा उल्लेख आहे. हे दोन्ही लेख नंतर मी प्रसिद्ध केले आहेत.[१]

या सफल सहलीने उत्तेजित होऊन आम्ही विदर्भातील अन्य ऐतिहासिक स्थलांना भेट देण्याची योजना करू लागलो. त्याच सुमारास (सन १९३६ मध्ये) राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंद याचा अमरावती जिल्हयातील अंजनवती येथे सापडलेला ताम्रपट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या कृपेने संपादनाकरिता मला मिळाला. तो ताम्रपट त्या राजाने आपल्या इतर अनेक ताम्रपटांप्रमाणे मयूरखंडीहून दिला होता. त्यावरून मयूरखंडी ही त्याची राजधानी होती, हे स्पष्ट झाले होते. पण तिचा स्थलनिश्चय झाला नव्हता. चांदा जिल्ह्या-

---

१. *Proceedings of the All–India Oriental Conference*, Mysore, (1935), pp. 713 f; *C. I I.*, Vol. V, pp. 1 f.

तील मार्कंडी येथे प्राचीन सुंदर देवालये आहेत हे मला माहीत होते. पण ती पाहण्याचा योग आला नव्हता. मयूरखंडी हे कदाचित् सध्याच्या मार्कंडीचे प्राचीन नाव असेल अशी कल्पना मनात येऊन ती देवालये पाहावी, अशी उत्कट इच्छा माझ्या मनात उत्पन्न झाली. ती श्री. आप्पासाहेब देशपांडे यांच्याजवळ व्यक्त करताच त्यांनी तिला दुजोरा देऊन त्या सहलीचे आयोजन केले. आमच्या बरोबर डॉ. य. खु. देशपांडे व प्रा. सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी यांनी येण्याचे कबूल केले. एके दिवशी सकाळच्या पॅसेंजरने चांदा जिल्ह्यातील मूल गावी जाऊन तेथून पूर्वेस ४० मैलांवर असलेल्या मार्कंडी गावास बैलगाडीने जाण्याचा बेत आम्ही निश्चित केला. त्या दिवशी सकाळी श्री. आप्पासाहेब आमच्याकडे आले. सर्वांना त्यांच्या निवासस्थानाहून घेऊन आम्ही नागपूर स्टेशनवर जातो तोच ती पॅसेंजर गाडी स्टेशनावरून चालू झाली. तरी निराश न होता श्री. आप्पासाहेबांनी तशीच मोटार भरधाव सोडून वर्धा स्टेशनवर त्या गाडीला गाठण्याचे ठरविले. त्यांच्या ड्रायव्हरने आम्हांस त्याप्रमाणे वर्ध्यास अगदी वेळेवर पोचविले आणि अशा रीतीने आमचा ' प्रथमग्रासे मक्षिकापातः ' टळला.

मूल येथे आम्ही तेथील मालगुजार श्री. का. अ. फडणीस यांचे कडे थोडा वेळ मुक्काम केला. त्यावेळी त्यांनी आम्हास एक अप्रकाशित ताम्रपट संपादनार्थ दिला. त्यात महासामंत श्री. नाइदेव राणक याने ब्राह्मणाला एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. तो ताम्रपट पुढे मी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ' दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने,' खंड ३, (पृ. ५७ इ.) मध्ये प्रकाशित केला आहे.

नंतर श्री. फडणीस यांनी ठरवून दिलेल्या बैलगाडीने आम्ही मार्कंडीच्या प्रवासास निघालो. सायंकाळी तेथे पोचलो. तेथील गावातून आणलेल्या शिधासामुग्रीने श्री. आप्पासाहेबांनी तयार केलेल्या खमंग व सुग्रास अन्नाचे सेवन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी मार्कंडेश्वराच्या देवळावर सर्व बाजूस खालपासून वरपर्यंत बसविलेल्या शिल्पाकृतींचे मनसोक्त दर्शन घेतले, आणि तृप्त झालो. नंतर त्याच बैलगाडीने मूलला

परत येऊन स्वस्थानी पोचलो. या सहलीत विदर्भाच्या एका अत्युकृष्ट देवालयाचे जे दर्शन झाले त्याने मनाला अवर्णनीय आनंद झाला.

पुढे अंजनवती ताम्रपटावरील 'एपिग्राफिया इंडिया' मधील माझ्या लेखात मार्कंडी ही तृतीय गोविंदाची राजधानी मयूरखंडी असावी अशी कल्पना मी पुढे मांडली होती.[२] त्यानंतर तिची चर्चा कोणी केली नाही. तथापि विदर्भातील या सर्वोत्कृष्ट देवालयाची माहिती कलाविज्ञांस तसेच जनतेस–विशेषत: विदर्भवासीयांस–व्हावी अशी उत्कट इच्छा होती. पाच सहा वर्षांपूर्वी डॉ. देव यांनी त्या देवळांवर इंग्रजीत ग्रंथ लिहिण्याचे काम हाती घेतले आहे हे समजल्यावर त्याचे मराठी रूपांतर करण्याविषयी त्यांस आग्रह करून त्यांच्या संमतीने आमच्या मंडळाच्या आगामी प्रकाशनांमध्ये आम्ही तो संकल्प जाहीरही केला होता. तो योग काही कारणाने घडून आला नाही. तथापि त्या देवळांवरचा डॉ. देव यांचा सचित्र विस्तृत ग्रंथ इंग्रजीत प्रसिद्ध होऊन विदर्भाच्या त्या उत्कृष्ट स्थापत्यकृतीची सर्वांस माहिती होत आहे हे पाहून मनास अत्यानंद झाला आहे.

मार्कंडी हे स्थान चांदा जिल्ह्यात, चांद्याच्या पूर्वेस ४० मैलांवर वैनगंगा नदीच्या डाव्या तीरावर आहे. प्राचीन काळापासून याची फार पवित्र तीर्थ म्हणून प्रसिद्धि होती असे दिसते व त्याचे मुख्य कारण येथे इतरत्र दक्षिणवाहिनी असलेली वेणानदी उत्तरवाहिनी झाली आहे, हे असावे. बरोबर शंभर वर्षांपूर्वी, सन १८७३ मध्ये, जनरल कनिंगह्याम याने या स्थलाला भेट देऊन तेथील २४ देवळांचे थोडेफार वर्णन आपला रिपोर्ट, व्हॉ. ९, पृ. १४२–१५० मध्ये केले आहे. त्यानंतर कझेन्स् या साहेबाने सन १९०२–०३ मध्ये व नंतरही पुरातत्त्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी या स्थलाला भेट देऊन तेथील देवालयांचे वर्णन केले आहे.[३]

---

२. *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 12–13.

३. *An. Rep., A. S. I.*, 1924–25, p 83.

सर्वांनी तेथील देवळांची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. सध्या त्या खात्यातर्फे ती देवळे 'सुरक्षित' (Protected monuments) म्हणून जाहीर झाली आहेत. तथापि त्यांच्याविषयी माहिती फारच थोड्यांना आहे. अलीकडे पर्सी ब्राउनने प्रसिद्ध केलेल्या इंडियन आर्किटेक्चर (हिंदी स्थापत्य), भाग १, या ग्रंथात त्यांचा नामोल्लेखही आला नाही.

डॉ. देव यांच्या प्रस्तुत ग्रंथात मार्कंडीच्या देवळांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांचे स्थापत्य, शिल्प वगैरेंचे वर्णन सुंदर प्रतिमांसह (प्लेट्स्‌सह) केले आहे. त्यांनी त्यांचे वैशिष्टय, सौंदर्य व महत्त्व यांची सविस्तर चर्चा केली आहे. ठिकठिकाणी आपल्या विधानाच्या समर्थनार्थ संदर्भ दिले आहेत. प्रत्येक प्रतिमेचे (प्लेट्चे) विषय निर्दिष्ट केले आहेत आणि ग्रंथातील विवेचनात त्यांचे संदर्भ दिले आहेत. त्यावरून अभ्यासकांस त्यातील विवेचन समजण्यास मदत होते. मागे कनिंग्हामने या देवळांचे वर्णन केले होते असे म्हटले आहे, पण त्याने त्यांच्या शिल्पांच्या आकृति प्रसिद्ध केल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांच्या सौंदर्याचा प्रत्यय वाचकांस येत नव्हता. प्रस्तुत पुस्तकातील ५५ प्लेट्स् मध्ये मार्कंडीच्या देवळांचे, त्यांच्या विविध भागांचे व त्यांना लावलेल्या शिल्पांचे आर्ट पेपरवर शक्य तितक्या सुबकपणाने फोटो छापल्यामुळे अभ्यासकांस या देवळांच्या स्थापत्याचा व शिल्पांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे.

आता प्रथम या देवळांविषयी संक्षिप्त माहिती देतो, म्हणजे पुढील विवेचन समजण्यास मदत होईल. ही देवळे मार्कंडी गावात वैनगंगेच्या डाव्या तीरावर दक्षिणोत्तर १९६ फूट लांब आणि पूर्वपश्चिम ११८ फूट रुंद अशा विस्तृत काटकोनी प्राकारा (enclosure) मध्ये बांधली आहेत. त्यांच्या सभोवतालची भिंत खाली ३ फूट, ९ इंच रुंद असून नंतर किंचित् निमुळती होत गेलेली अशी ९ फूट उंचीची आहे. वरती अर्धगोल आकाराचे दोन फूट जाडीचे दगड बसविले आहेत. ही भिंत प्राकारातील देवळांपूर्वीची असावी असा कनिंग्हामचा तर्क होता. या प्राकाराच्या दक्षिण बाजूला एक दुमजली प्रवेशद्वार आहे ते नगारखान्याकरिता असावे असा कनिंग्हामचा तर्क होता. याशिवाय या

प्राकारभिंतीला नंतर दोन भगदाडे पाडलेली दिसतात. त्यांपैकी पूर्वेच्या भगदाडातून वैनगंगेला जाण्याची वाट केली आहे. दुसऱ्यातून जवळच्या गावात जाता येते.

प्राकारामध्ये आता १८ देवालये अवशिष्ट आहेत, असे डॉ. देव सांगतात. कनिंग्ह्यामने त्यांची संख्या विसांहून अधिक (सुमारे २४) आहे असे म्हटले आहे. त्यांपैकी काही सध्या प्लॅटफॉर्मच्या रूपानेच अस्तित्वात आहेत. त्यांच्या वरच्या इमारती नष्ट झाल्या आहेत. अवशिष्ट देवळांपैकी मार्कंडेय ऋषि, यमधर्म, मार्कंडेयचा पिता मृकण्ड ऋषि, आणि शंकर यांची नावे दिलेली चार देवळेच उल्लेखनीय आहेत. बाकीच्यांत विठ्ठलरुक्मिणी मंदिर आणि दशावतार देवालय यांचाही निर्देश करावयास हवा. कारण त्यांचाही पुढे उल्लेख येईल. यांशिवाय प्राकारात काही एकसंधि दगडाचे (monolithic) खांब व एक उंच वीरगळ (युद्धात पडलेल्या वीराचा स्तंभ) आहे. त्यांपैकी काहींवर तत्कालीन लेख आहेत. त्यांचाही उल्लेख पुढे करावा लागेल.

वर उल्लेखिलेल्या चार देवळांत मार्कंडेय ऋषीच्या (किंवा मार्कंडेश्वराच्या) नावाने ज्ञात असलेले देवालय विशालता, शिल्पाकृतींचे वैपुल्य व सौंदर्य, आणि अलंकरणार्थ योजलेल्या विविध आकृति व कलाकुसरी यांनी सर्वोत्कृष्ट झाले आहे. मार्कंडी येथील देवळांची ख्याती या मुख्य देवळामुळेच झाली आहे.

मार्कंडेश्वराचे देऊळ पूर्वाभिमुख आहे. ते जगतीवर (प्लॅटफॉर्मवर) उभारलेले नाही. तथापि 'सभोवतालची जागा सध्या चिखलात विटा बसवून भरून काढली आहे, पण पूर्वी या देवळाला जगती होती' असे डॉ. देव सांगतात. तथापि खजुराहो येथील मुख्य देवालयांना जसे उंच प्लॅटफॉर्म आहेत, तसा प्लॅटफॉर्म या देवळाला नाही, हे उल्लेखनीय आहे.

या देवळाला पूर्व, दक्षिण व उत्तर बाजूस पोर्च (अर्धमंडप) होते व त्यांवर शिखरे होती, पण सध्या फक्त एका दरवाजावरचे तेवढे शिखर अवशिष्ट आहे. या देवळाचे पोर्च (अर्धमंडप), सभामंडप, अंतराल आणि गर्भगृह असे चार भाग आहेत. त्या सर्वांवर पूर्वी कमी अधिक

उंचींची व भिन्न आकारांची शिखरे होती; पण सुमारे दोन अडीचशे वर्षांपूर्वी वीज पडून गर्भगृहावरचे शिखर मोडून सभामंडपावर पडले आणि त्याचेही शिखर कोसळले. तेव्हा तत्कालीन गोंड राजाने सभामंडपात खांब उभारून, त्यांवरच्या कमानींनी सभामंडपाला सपाट छत करून दिले ते अद्यापि अस्तित्वात आहे. तथापि त्याने सभामंडपाची शोभा बिघडली आहे. पुरातत्त्व खात्याच्या स्थापत्यविशारदांनी (इंजिनीयरांनी) हे खांब काढून वरील छत पूर्वीच्या शिखरासारखे नसले तरी सभोवतालच्या भागाला शोभेल असे करण्याचा प्रयत्न करणे जरूर आहे. सध्याचे सभामंडपाचे दृश्य डोळ्यांना खुपणारे आहे.

सभामंडपाच्या नवीन खांबांवर तसेच अंतरालातील कोनाड्यांत गोंडांच्या काळात अनेक मूर्ति अस्ताव्यस्त रीतीने बसविल्या आहेत. त्याही काढून टाकणे अशक्य आहे.

या देवळाच्या जंघेवर (अधिष्ठान आणि शिखर यांमधील भिंतीवर) खालपासून वरपर्यंत तीन रांगांत देवदेवता, दिक्पाल, सुरसुंदरी आणि विविध प्रकारचे व्याल किंवा शार्दूल यांच्या रम्य आकृति बसविल्या आहेत. त्यांपैकी जवळ जवळ निम्म्या मूर्ति शिवपार्वतींच्या आहेत. काहींत अन्धकासुरवधासारखे भगवान् शंकराचे पराक्रम दाखविले आहेत. काही मूर्ति नग्न भैरवाच्या आहेत. काहींत खट्वांगधारी चामुण्डा, वसलेला किंवा नृत्य करणारा गणपति, सप्त मातृका, वगैरेंच्या आकृति आहेत. या शैव संप्रदायाच्या मूर्तींशिवाय इतरही संप्रदायांच्या मूर्ति–उदाहरणार्थ, लक्ष्मी–विष्णु, गजलक्ष्मी, सरस्वती, तसेच अष्ट दिक्पाल वगैरेंच्या सुंदर मूर्ति–आहेत. यांखेरीज मधून मधून अप्सरांच्या किंवा सुरसुंदरींच्या विविध कृत्यांत मग्न झालेल्या मूर्ति बसविल्या आहेत. कोणी नृत्य करीत आहे, कोणी आपल्या चिमुकल्या बाळाला कडेवर घेऊन उभी आहे, कोणी हातातल्या पोपटाचे बोल ऐकत आहे, कोणी त्याला खाऊ घालत आहे, कोणी गळून पडलेले आपले नूपुर, किंवा रशना (कमरपट्टा), स्वस्थानी घालत आहे, कोणी आरशात आपली छबी न्याहाळीत आहे, कोणी

बांसरी, वीणा, झांज यांसारखे वाद्य वाजवीत आहे, कोणी आम्रफलांनी लदबदलेल्या वृक्षाखाली चिंतामग्न अवस्थेत उभी आहे, कोणी आपली केशरचना करीत आहे, कोणी आपल्या पायातील काटा काढीत आहे, कोणी शलाकेने आपल्या डोळ्यांत काजळ घालीत आहे, कोणी आपल्या प्रियकराला पत्र लिहीत आहे, तर कोणी कंदुकक्रीडा करीत आहे. यांशिवाय अनेक तापसांच्याही मूर्ति आहेत. काहींत रामायण–महाभारतांतील प्रसंग–उदाहरणार्थ, जटायुहनन, वालिसुग्रीव युद्ध, भीम-दुर्योधनाचे मल्लयुद्ध, तसेच कित्येक संकुल युद्धाची दृश्ये दाखविली आहेत. ही असंख्य दृश्ये पाहता पाहता प्रेक्षक थकून जातो, पण ती संपत नाहीत. या सर्वांचे फोटो डॉ. देवांच्या पुस्तकात वर्णनासह दिले आहेत. त्यांवरून मार्कंडेश्वराच्या देवळाला लावलेल्या विविध सुंदर मूर्तींचे दर्शन वाचकांस घरबसल्या घेता येईल.

कनिंग्हामने या मूर्तींची संख्या ४०९ अशी दिली आहे. त्यांपैकी काही–उदाहरणार्थ, भैरवाच्या मूर्ति–नग्न आहेत. काही अप्सरांच्याही मूर्ति नग्न आहेत असे कनिंग्हामने म्हटले आहे. कदाचित् त्या तलमवस्त्रावृत असाव्या. कालिदासाने रघुवंशात (१६, ४६) निःश्वासहार्य (श्वासोच्छ्वासानेही उडून जाणाऱ्या) तलम वस्त्रांचे वर्णन केले आहे. कुशाणपूर्व काळापासून शालभंजिकादिकांच्या मूर्ति अशी वस्त्रे नेसलेल्या दाखविण्याचा प्रघात भारतीय कलेत पडला होता. पण मार्कंडेयाच्या देवळात कोठेही खजुराहो देवळांना लावलेल्या मूर्तींची अश्लीलता दिसत नाही. कनिंग्हाम म्हणतो, "Several of the statues of Śiva are naked, and so are some of the female statues; but they are simply nude figures, without any suggestive indelicacy such as is only too prominent in the obtrusive bestiality of the Khajūrāho sculptures." (काही शिवमूर्ति तशाच काही स्त्रियांच्या मूर्तीही नग्न आहेत. पण त्यांत अश्लीलता सूचित होत नाही. खजूराहो येथील शिल्पकृतींत मात्र पाशवी संभोगाची दृश्ये प्रमुखपणे दृष्टीस पडतात.) ही इतरत्र दिसणारी दृश्ये शाक्त पंथाच्या तत्कालीन प्रभावामुळे लावली जात हे तज्ज्ञांस माहीत आहे.

अशा विविध आणि असंख्य सुंदर आकृत्यांनी नटलेल्या या मार्कंडेश्वराच्या देवळाच्या निर्मितीचा काल कोणता, याची चर्चा आता करू. ह्या देवळाच्या बाहेरच्या भिंतींवरील तीन पंक्तींत बसविलेल्या विविध आकृतींमुळे ते खजूराहो येथील देवळांसारखे दिसते, असे अनेकांनी म्हटले आहे. खजुराहो येथील देवळे ख्रिस्तोत्तर ९०० ते ११०० या कालात होऊन गेलेल्या यशोवर्मा (९२५–९५०), धंग (९५०–१०००), गंड (१०००–१०१०) व विद्याधर (१०१०–१०३५) या चंदेल्ल नृपतींनी बांधली होती हे तेथील उत्कीर्ण लेखांवरून व इतर प्रमाणांवरून सिद्ध झाले आहे. तेव्हा हे मार्कंडेश्वराचे देऊळ फार तर ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकाइतके प्राचीन असावे, असे कनिंग्ह्यामने म्हटले आहे. याला त्याला एक अन्य पुरावाही सापडला. तो असा—

मार्कंडेयाच्या देवळाच्या दक्षिण दिशेच्या दरवाजाच्या एका खांबावर ' मगरध्वज जोगी ७०० ' असा कोरीव लेख आहे. असे लेख विदर्भाच्या नागपूर जिल्ह्यातील केळोद, मध्यप्रदेशाच्या छत्तीसगड विभागातील बस्तर जिल्ह्याच्या पोटेनार आणि पूर्वीच्या कवर्धा संस्थानातील बोरामदेव, जबलपूर जिल्ह्यातील बिल्हरी, नेमाड जिल्ह्यातील मांधाता, तसेच मंडला जिल्ह्यातील अमरकंटक आणि उत्तर भारतातील खजुराहो, ओरछा, चितोड वगैरे ठिकाणी कोरलेले आढळतात. ही ७०० संख्या विक्रम किंवा शक संवताची असणे शक्य नाही, कारण तिने अनुक्रमे ईसवी ६४४ किंवा ईसवी ७७८ असे वर्ष दाखविले जाईल. पण ही मार्कंडीची देवालये इतकी जुनी दिसत नाहीत. तेव्हा हे वर्ष ईसवी सन २५० या वर्षाच्या सुमारास सुरू होणाऱ्या कलचुरि संवताचे मानावे, म्हणजे त्याने ई. स. ९५० द्योतित होईल. ते या देवळांच्या स्थापत्यशैलीला जुळेल, असा युक्तिवादही कनिंग्ह्यामने केला होता.

डॉ. देवांनीही या प्रश्नाची चर्चा केली आहे. त्यांच्या मते या देवळाचा काळ स्थापत्यशैलीच्या पुराव्यावरून ठरविला पाहिजे. या देवळाची स्थापत्यशैली खजूराहो येथील देवळांच्या स्थापत्यशैलीतून उत्क्रान्त झालेली आहे. त्या शैलीची वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली आहेत

ती अशी[४]—(१) जगती किंवा प्लॅटफॉर्म यावर देऊळ बांधले असते; (२) मोल्ड(गोला–गलथा, कॉर्निस)नी युक्त असे अधिष्ठान; (३) जंघेवर तीन पंक्तींत बसविलेल्या मूर्ति; (४) सुरसुंदरी व व्याल यांचे प्राचुर्य; (५) देवळाचे सान्धार (प्रदक्षिणापथासहित) रूप; (६) सभामंडपावरील पिरॅमिड पद्धतीचे शिखर; (७) मुख्य शिखराबरोबर उपशिखरांची योजना इत्यादि. या सर्व बाबतींत मार्कंडेय देऊळ आणि खजुराहो येथील प्रमुख देवळे एकसारखी आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. खजुराहो देवळाचा काळ प्राध्यापक सरस्वती यांच्या मते ख्रिस्तोत्तर १०५० च्या अगोदरचा नाही.[५] तर श्री. कृष्णदेव यांच्या मते तो ख्रिस्तोत्तर ९५० ते ११०० या दरम्यानचा असावा.[६]

डॉ. देवांच्या मते मार्कंडेयाच्या देवळांची स्थापत्य व शिल्प शैली खजुराहो येथील देवळांच्या शैलीच्या मानाने निकृष्ट दर्जाची दिसते. तेव्हा ती देवळे खजुराहो देवळांनंतरची असावी. खजुराहो येथील देवळांत शाक्तपंथाची अनेक अश्लील मूर्तिशिल्पे आहेत, पण मार्कंडेय देवालय त्यापासून मुक्त आहे. ते शाक्तपंथाचा प्रभाव कमी झाल्यावर बांधले गेले असावे. अर्थात् ते नंतरचे आहे. मार्कंडी येथील दशावतार देऊळ खजुराहो व भेडाघाट येथील चौसष्ट योगिनी देवळांच्या मानाने निकृष्ट दर्जाचे, अर्थात् नंतरच्या कालातील आहे. मार्कंडेयाच्या देवळावर कोरलेले लेख नागरी लिपीत लिहिलेले अकराव्या शतकापूर्वीचे नाहीत.

तेव्हा मार्कंडेयाचे देऊळ अकराव्या शतकाच्या अखेरचे आणि इतर देवळे नंतरची–यादवकालापूर्वीची–असावी असा निष्कर्ष डॉ. देव यांनी काढला आहे.[७]

---

४. *Mārkaṇḍī Temples*, p. 20.

५. *History and Culture of the Indian people*, vol. V, p. 465.

६. *Ancient India*, No. 15, p. 49.

७. *Mārkaṇḍī Temples*, p. 21.

स्थापत्यशैलीवरून काढलेली अनुमाने निरपवाद असत नाहीत असा पूर्वीचा अनुभव आहे. तेव्हा शक्य तेथे कोरीव लेखांसारख्या अन्य साधनांचे साहाय्य कालनिश्चितीकरिता घेतले पाहिजे. असे लेख मार्कंडी येथे आहेत, पण ते या देवळांशी संबद्ध नाहीत; म्हणून त्यांचा पुरावा कनिंग्ह्याम आणि देव या दोघांनीही लक्षात घेतला नाही. त्यांची चर्चा पुढे करू. पण शैलीच्या पुराव्यावर भिस्त ठेवली तरी खजुराहो आणि मार्कंडी येथील देवालये एकसारखी नाहीत हे सहज दाखविता येते.

खजूराहो येथील मुख्य देवालयाच्या स्थापत्यशैलीचे प्रधान विशेष म्हणजे (१) उंच जगती (प्लॅटफॉर्म); (२) देवळांच्या आतील भागाचे विभाग-अर्धमंडप, मंडप, महामंडप, अंतराल आणि गर्भगृह; (३) जंघेवर तीन शिल्पाकृतींच्या पंक्ति; (४) शिखराशी उपशिखरांचे साहचर्य; (५) गाभाऱ्याचे सान्धार रूप आणि (६) महामंडपात सज्जा-युक्त खिडक्या. या बाबतींत मार्कंडेय देऊळ खजुराहो येथील शेवटच्या प्रमुख कंदरिया महादेवाच्या देवळासारखे तंतोतंत नाही. मार्कंडेय देवळाला जगती नाही. सभोवतालचा भाग विटांनी झाकला आहे म्हणून जगती दिसत नाही हे म्हणणे मनाला पटत नाही. खजूराहो येथील देवालये मी पाहिली आहेत. त्यांच्या जगती फार उंच असून त्यांच्या योगे त्या देवळांना भव्यता प्राप्त झाली आहे. त्यावर जाण्याकरिता अनेक पायऱ्या चढाव्या लागतात. तसा प्रकार येथे नाही. (२) मार्कंडेय देवळाला अर्धमंडपानंतर छोटा मंडप नाही. त्या देवळाचे चारच विभाग अर्धमंडप, मंडप, अंतराल आणि गर्भगृह असे आहेत. (३) त्याच्या जंघेला तीन शिल्पाकृतींच्या पंक्तींनी विभूषित केले आहे खरे, पण हे काही खजूराहो देवालयांचे व्यवच्छेदक लक्षण नाही. कारण तेथील लक्ष्मण देवालयाला अशा शिल्पाकृतींच्या दोनच पंक्ती आहेत.[८] शिल्पाकृतींनी महाराष्ट्र–कोकणांतील देवळांच्याही जंघेला विभूषित केले आहे. त्यांत एकच पंक्ती असते, येथे त्या तीन आहेत एवढाच फरक. त्याचे कारण प्रस्तुत देवालय पुढे दाखविल्याप्रमाणे एका महाप्रतापी व समृद्ध सम्राटाने

---

८. *Ancient India*, No. 15, p. 54.

बांधले होते हे आहे. ते भिन्न काली बांधले होते हे नव्हे. (४) मार्कंडेय देवळाचे शिखर आता पडून गेले आहे. फक्त एका बाजूचा भाग अवशिष्ट आहे. तेथे फक्त एकच उपशिखर दिसते.[९] खजूराहो येथील देवालयांप्रमाणे उपशिखरांची खालपासून वरपर्यंत मालिका दिसत नाही, आणि हे डॉ. देवांनीही मान्य केले आहे. शिवाय (५) मार्कंडेयाचे देवालय खजूराहो येथील काही देवालयांप्रमाणे[१०] सान्धार पद्धतीचे नाही. तसेच (६) त्याच्या सभामंडपाला सज्जायुक्त खिडक्या नाहीत.

मार्कंडेय देवळाचा चार विभागांचा साचा महाराष्ट्र–कोकण-मधील इतर देवळांतही आढळतो. तो दूरच्या खजूराहोच्या देवळांनी सुचविला असणे जरूर नाही. तेच मंडपावरील पिरॅमिड पद्धतीचे शिखर अधिष्ठानावरील मोल्डिंग व सुन्दर अप्सरांची योजना यांच्या बाबतीत म्हणता येईल.

मार्कंडेय देवळात काही नागरी लिपीत कोरलेले लेख आहेत. त्यांवरून त्यांचा काळ अकरावे शतक हा ठरविता येणार नाही. कारण असे लेख मागाहूनही कोरले जातात. 'मगरध्वज जोगी ७००' याचा अर्थ कलचुरि संवत् ७०० (सन ९५०) मध्ये मकरध्वजाने त्या देवळाला भेट दिली असा नाही. डॉ. हीरालालनी दाखविले आहे की बिलासपुर जिल्ह्यातील रत्नपूर येथे मिळालेल्या एका प्राचीन हस्तलिखितावरून मकरध्वज जोगी हा तेथील कलचुरि नृपति (द्वितीय) जाजल्लदेव (सु. ११६५–११७०) याचा समकालीन असून त्याचे ७०० शिष्य होते. त्यांच्यासह तो विविध पवित्र ठिकाणांना भेट देत असे आणि आपल्या मोठेपणाची खूण म्हणून आपल्या ७०० शिष्यांचा उल्लेख आपण कोर-विलेल्या लेखांत करीत असे. ही ७०० संख्या संवत्सराची द्योतक नाही.[११] शिवाय एका वर्षात दक्षिण व उत्तर भारतांतील पूर्वोक्त अनेक स्थानांना त्याने भेट दिली असणे शक्य नाही.

---

९. *Mārkaṇḍī Temples*, p. 8.

१०. *Ibid.*, p, 18.

११. *Ind. Hist. Quart.*, Vol III, pp. 408 f.

तथापि मार्कंडेय देवळाच्या ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या कालावर मुख्य व दुर्लंघ्य असा आक्षेप हा की अकराव्या शतकात इतके भव्य व सुंदर शिल्पाकृतींनी युक्त असे देवालय बांधू शकणारा एखादा सम्राट् विदर्भात राज्य करीत होता असे इतिहासावरून दिसत नाही. सामान्यतः असे दिसते की अशा भव्य व सुंदर स्थापत्यकृति थोर सम्राटच बांधू शकत आणि त्या त्यांच्या राजधानीपासून दूर नसत. प्राचीन लेण्यांची गोष्ट थोडी वेगळी आहे. त्यांना उपयुक्त असे पर्वत वा टेकड्या जेथे असतील तेथेच ती कोरावी लागत. म्हणून वत्सगुल्म वाकाटकांच्या मुख्य मंत्र्याने किंवा त्यांच्या खानदेशातल्या मांडलिकाने जळगाव जिल्ह्यातील अजंटा पर्वतात (राजधानीपासून किंवा आपल्या मुख्य नगरापासून थोड्या दूर अंतरावर) आपली लेणी कोरविली असली तर आश्चर्य नाही. क्वचित् तीर्थस्थानीही देवळे बांधली जात. पण तीही स्वतःच्या राज्यातच त्या त्या ठिकाणी (राजधानीपासून थोडे फार दूर) बांधली जात. उदाहरणार्थ, ठाण्याच्या शिलाहारांनी कल्याणजवळ अंबरनाथ येथे बांधलेले शिवमंदिर पाहा. पण सामान्यतः अशा देवळांपासून त्या त्या काळच्या राजधान्या फार दूर नसत. चंदेल्ल राजांनी आपली सर्व मुख्य मंदिरे खर्जूरवाहक (सध्याचे खजूराहो) येथे बांधली होती. तसेच माळव्याच्या परमार नृपति उदयादित्याने उदयपूर येथे सुंदर नीलकण्ठेश्वर देवालय उभारले होते. पल्लवांनी कांची (कांजीवरम्) येथे बांधलेली देवालये सुप्रसिद्ध आहेत.

अकराव्या शतकातील दक्षिणेतील राजकीय परिस्थिति कशी होती ते आता पाहू. सन ९७४ मध्ये उत्तरकालीन चालुक्यवंशी तैलपाने शेवटच्या राष्ट्रकूट राजाचा उच्छेद करून दक्षिणची साम्राज्यसत्ता हस्तगत केली. त्याने आपली राजधानी आरंभी मान्यखेट (सध्याचे मालखेड) येथेच ठेवली असली तरी पुढे ती कल्याण (बिदर जिल्हा, कर्नाटक) येथे नेण्यात आली. अकराव्या शतकाच्या उत्तरार्धातील उत्तरकालीन चालुक्य राजे (प्रथम सोमेश्वर, द्वितीय सोमेश्वर, विक्रमादित्य वगैरे) तेथूनच राज्य करीत होते. कल्याण हे मार्कंडीच्या दक्षिणेस शेकडो मैल दूर आहे. तेथील चालुक्य राजा आपल्या राजधानीहून इतक्या दूर

असलेल्या ठिकाणी, असे भव्य व सुंदर देवालय बांधण्याचे काम करवील असे वाटत नाही. अशी कामे दहा पाच वर्षांत पुरी होत नसत. ती कित्येक पिढ्या चालत. उदाहरणार्थ, ठाण्याचा शिलाहारनृपति छित्तराज याने सुरू केलेले अंबरनाथच्या भव्य व सुंदर मंदिराचे काम त्याचा भाऊ आणि उत्तराधिकारी नागार्जुन याच्या कारकीर्दीतही पुरे झाले नाही. पुढे ते त्याच्याही मुम्मुणि नामक भावाच्या कारकीर्दीअखेर पुरे झाले,[१२] असे त्या देवळातील शिलालेखावरून कळते. तेव्हा अकराव्या शतकात कल्याणच्या चालुक्य सम्राटाने विदर्भात मार्कंडेश्वरासारखे मंदिर बांधविले असणे सुतराम् असंभवनीय आहे. त्या काळी विदर्भात दुसरा कोणी समृद्ध सम्राट् राज्य करीत नव्हता.

स्थापत्यशैलीपेक्षा कालनिर्णयाचे जास्त विश्वसनीय असे साधन कोरीव लेख हे होय. मार्कंडी येथे दोन प्रकारचे कोरीव लेख सापडले आहेत. काही प्राचीन कुटिल लिपीत (किंवा बुल्हरने निर्देशिलेल्या acute-angled alphabet मध्ये) आहेत. आणि इतर नागरी लिपीत आहेत. पहिल्या प्रतीच्या लेखांचा काल कनिंग्हाम व देव यांनी पाचवे-सहावे शतक मानला आहे. पण त्यांच्या अक्षरवटिकेवरून ते इतके जुने वाटत नाहीत. ते आठव्या नवव्या शतकातले असावे.[१३] हे लेख मार्कंडी येथील देवळांना लावलेले नसल्यामुळे त्यांचा पुरावा कनिंग्हाम व देव या दोघांनीही त्या देवळाचा कालनिश्चय करताना लक्षात घेतला नाही. पण ते लेख तेथील मुख्य देवळापूर्वी कोरविले होते याला प्रमाण नाही. पुढे दाखविल्यामुळे त्यांपैकी एक तर मार्कंडेयाच्या देवळालाच लावला होता असे मानण्यास जागा आहे. म्हणून या लेखांचा पुरावाही ध्यानात घेतला पाहिजे.

---

१२. अंबरनाथ देवालयातील मुम्मणिराज राजाचा शक संवत् ९८२ चा लेख पाहा. शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. १३२.

१३. तृतीय गोविंदाच्या (सन ७९३-८१३) ताम्रपटातील अक्षरवटिका पाहा. काही अक्षरे उदा. यू, रू, इ. मात्र अगोदरची वाटतात.

यांपैकी दोन लेखांचा उल्लेख कनिंग्ह्यामनें केला आहे आणि त्यांच्या यथादृष्ट प्रती (eye-copies) त्याने आपल्या रिपोर्टात दिल्या आहेत.[१४] डॉ. देवांनीही त्याच आपल्या पुस्तकात देऊन कनिंग्ह्यामचे वाचन दिले आहे. त्यांनी स्वत:चे वाचन दिले नाही.

यांपैकी पहिला लेख एका एकसंध (monolithic) शिलास्तंभाच्या तुकड्यावर तीन बाजूंवर कोरला होता. वास्तविक, हा एक लेख नसून त्या स्तंभाच्या तीन बाजूंवर कोरलेले तीन स्वतंत्र लेख होते. त्यांच्या यथादृष्ट प्रती कनिंग्ह्यामने दिल्या आहेत. आता त्यांपैकी एका बाजूचा लेख मात्र सध्या अवशिष्ट आहे. त्याचा स्वत: घेतलेला छाप डॉ. देवांनी दिला आहे.

कनिंग्ह्यामने या तीन्ही लेखांचे आपले वाचन दिले आहे,[१५] पण ते बहुतांशी चूक आहे. शिवाय, त्यावरून त्या लेखांचा अर्थ मुळीच लागत नाही. कनिंग्ह्यामनेही ते कबूल केले आहे. पण हे लेख बरेचसे शाबूत असल्यामुळे एकाद्या चांगल्या संस्कृतज्ञास ते वाचता येतील अशी आशा त्याने व्यक्त केली आहे. पण हे लेख फारच त्रुटित आहेत. गेल्या शंभर वर्षांत त्याचे वाचन कनिंग्ह्यामच्या यथादृष्ट प्रतींवरून करण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. मला त्यांतील काही शब्द मात्र वाचता आले. ते असे–(१) डाव्या बाजूवरील लेख–(ओ. १) निस्तीर्ण सपदि (२) [अ*] मलयशोभुजश्रीर्यो...[स्य]

(२) मधल्या बाजूवरील लेख (१) स्वस्ति श्री सौम्य (२) ङकुल... (३)...आचन्द्र[सूर्य] (४) चो (श्रो) श्रिय...

(३) उजव्या बाजूवरील लेख (१) र्णबु... (२) व्यापार...(३) र्णारदीय...

यथादृष्ट प्रतींवरून लेख वाचणे धोक्याचे असते. शिवाय हे लेख अगदी त्रुटित असल्याने त्यांचा उद्देस सांगता येत नाही. तथापि मधल्या

१४. Cunningham, *Archaeological Survey of India Report*, (*C. A. S. I. R.*)Vol, IX, plate XXX.

१५. *Ibid.*, p. 150.

लेखात कोणाची तरी कीर्ति चन्द्र सूर्य असेतोपर्यंत टिकावी अशी आशा व्यक्त केलेली दिसते.

हे लेख कोणत्याही देवळाशी संबद्ध नसलेले असे आहेत. अक्षरवटिकेवरून ते आठव्या–नवव्या शतकाइतके प्राचीन असावे.[१६]

यानंतर कनिंग्ह्यामने उल्लेखिलेला आणखी एक प्राचीन लेख दुसऱ्या एका एकसंध (monolithic) स्तंभावर आहे. तो तीन अक्षरांचा आहे. कनिंग्ह्यामने त्याचे वाचन 'प्रयाश्री' असे केले आहे. खरे वाचन 'प्रायश्री' असे आहे. हे एका प्राकृत लेखाचे संस्कृतीकरण दिसते. प्राकृतात नावाच्या पुढे सिरी हे संमानदर्शक उपपद येते. उदाहरणार्थ, मुद्राराक्षसातील (अं. १) चन्दसिरी (चन्द्रश्री) हे चन्द्रगुप्त मौर्याचे नाव पाहा. संस्कृतात हे उपपद 'श्री'रूपाने नावाच्या पुढे लावतात. उदाहरणार्थ, पुराणांतील राजवंशावळीत उल्लेखिलेला 'यज्ञश्री' पाहा.[१७] तेव्हा येथे 'श्रीप्राय' असे विवक्षित असावे. पण प्राय म्हणजे कोण? हे व्यक्तिनाम आहे की सामान्य नाम? या प्रश्नाचा उलगडा या लेखावरून होत नाही. पण मार्कंडी येथील दुसऱ्या एका लेखावरून त्यावर थोडा प्रकाश पडतो हे पुढे दाखविले आहे.

प्रस्तुत लेख एका चौकोनी एकसंध शिलास्तंभाच्या शिरोभागी कोरला आहे. त्याच्याखाली एक चतुर्भुज परशुधारी पुरुषाची आकृति आणि जवळ दोन स्त्रियांच्या आकृत्या कोरल्या आहेत. त्याच्या कमरेभोवती नागाने विळखा घातलेला दाखविला आहे. त्यावरून कनिंग्ह्यामने तर्क केला आहे की ती पुरुषाकृति भगवान् शंकराची असावी.[१८] पण शंकराचे एक आयुध परशु असले तरी तो सामान्यतः त्रिशूलधारी दाखविला असतो. तेव्हा हा नागदेव असावा. दक्षिणेतील लेणी व देवळे

१६. तळटीप १३ पाहा.

१७. एकोनविंशति राजा यज्ञश्रीः सातकर्ण्यथ ॥ Pargiter, *Dynasties of the Kali Age*, p. 42.

१८. *C. A. S. I. R.*, Vol. IX, p. 149.

प्रामुख्याने नागांनी कोरली किंवा बांधली असावी, म्हणून अजंट्याच्या लेण्यांत नागराजाच्या मूर्ति कोरलेल्या दिसतात. 'श्रीप्राय' याने कदाचित् नागदेव विवक्षित असेल.

कनिंग्ह्यामच्या काळानंतर आणखी एक कुटिल लिपीतील शिलालेख मार्कंडेयाच्या देवळाच्या मागील बाजूस (lying in the rear of the Mārkaṇḍeśvara temple) सापडला आहे. डॉ. देवांनी त्याच्या छापाचे छायाचित्र आपल्या पुस्तकात दिले आहे. पुष्कळ वर्षांपूर्वी त्याचा छाप पुरातत्त्व खात्याच्या अधीक्षकाने (सुपरिंटेंडंटने) मला पाठविला होता. तो अद्यापि माझ्या संग्रही आहे.[१९] आतापर्यंत माझे त्याच्याकडे लक्ष गेले नव्हते. पण मार्कंडेयाच्या देवळाच्या कालनिश्चितीच्या संदर्भात मी त्याचा थोडा अभ्यास केला आहे--

डॉ. देवांना हा लेख पूर्णपणे वाचता आला नाही. त्यांनी त्याचे वाचन पुढीलप्रमाणे दिले आहे.

(१) अनुराग . . . य प्रभु (?)

(२) बप्पनागश्री

याचा अर्थ त्यांनी सांगितला नाही. हा लेख पाचव्या शतकाच्या अखेरचा किंवा सहाव्या शतकाच्या आरंभीचा असावा असे यांनी म्हटले आहे.

मी त्याचे वाचन

(१) अनुरागस्थ–प्राय–पूर्ण–

(२) बप्पनागश्री

असे करतो. हा लेखही मूळ प्राकृताच्या संस्कृतीकरणाने झालेला दिसतो. म्हणून अनुराग हे संस्कृतमध्ये विचित्र वाटणारे स्थलनाम त्यात आलेले दिसते. मूळचे प्राकृत नाव अनोरे किंवा अनूर यासारखे असावे आणि लक्षणीय गोष्ट ही की अन्नूर नामक गाव चंद्रपूर (चांदा) जिल्ह्याच्या राजुरा तालुक्यात अद्यापि विद्यमान आहे. (महाराष्ट्र शासनाने प्रकाशित

१९. प्लेट क्र. ८ पाहा.

केलेली 'महाराष्ट्र राज्यातील खेड्यांची व शहरांची वर्णक्रमी', पृ. १०, पाहा.)

या अनुराग गावात राहणारा प्राय पूर्णबप्पनाग याचा नामनिर्देश या लेखात केला आहे. पूर्णबप्पनाग हे नाव चमत्कारिक दिसते. पण असली नावे पूर्वी प्रचारात होती. शक संवत् ७६५ (ई. स. ८४३) च्या कान्हेरी लेखातील 'पूर्णहरि' हे नाव पाहा.[२०] या पूर्णबप्पनागाला 'प्राय' म्हटले आहे. त्यावरून 'प्राय' याचा अर्थ शिल्पी किंवा स्थपति असा झाला असावा.

याशिवाय कनिंग्ह्यामने न उल्लेखिलेले आणखी काही कोरीव लेख डॉ. देवांना आढळले आहेत. ते मोल्डिंगवर (गोल्यावर) कोरलेले आहेत.[२१] ते नागरी लिपीतील ११ व्या–१२ व्या शतकातील असल्यामुळे त्यांचा प्रस्तुत विवेचनात उपयोग नाही.

या सर्व लेखांचा विचार केला असता एक गोष्ट नजरेस येते ती ही की त्यांपैकी बहुतेक मार्कंडेयाच्या देवळाच्या दरवाजावर किंवा अधिष्ठानावर कोरले आहेत. वर उल्लेखिलेला पूर्णबप्पनागाचा लेखही आरंभी तसाच देवळाला लावलेला असावा. तो मार्कंडेयाच्या देवळाच्या मागील बाजूस पडला आहे. सुमारे दोन अडीचशे वर्षांपूर्वी विजेने मार्कंडेयाच्या देवळाचे शिखर मोडून मंडपाच्या शिखरावर पडले आणि त्याचे तुकडे तुकडे होऊन सभोवार फेकले गेले. त्यांपैकी पूर्णबप्पनागाचा लेख असलेला तुकडा हा एक असावा असे सहजच अनुमान करता येते. हा पूर्णबप्पनाग मार्कंडेय देवळाचा एक शिल्पी दिसतो. नंतरच्या अनेक लोकांप्रमाणे आपलेही नाव या देवळावर असावे अशी त्याला इच्छा झाली असावी. त्याने तत्कालीन कोणाकडून तरी हा आपल्या नावाचा लेख संस्कृतात लिहवून घेऊन तो त्या देवळाच्या एका शिलेवर कोरलेला दिसतो. प्राचीन काली अनेक शिल्पी आपली नावे आपल्या कृतींवर

२०. *Ind. Ant.*, Vol. XIII, p. 136.

२१. *Mārkaṇḍī Temples*, plate lvi.

कोरून ठेवीत असत. उदाहरणार्थ, कर्नाटकातील सोमनाथ देवळातील या प्रकारचे शिल्पींचे उल्लेख पाहा.

वरील अनुमान ग्राह्य झाल्यास त्या लेखाच्या लिपीवरून या देवळाचा निर्मितिकाळ आठवे–नववे शतक असा होईल.

वरील अनुमानाला उपोद्बलक अशी तत्कालीन राजकीय परिस्थिति होती हे आता दाखवितो.

त्या काळी विदर्भावर राष्ट्रकूटांचे राज्य होते. राष्ट्रकूट हे मूळचे कर्नाटकीय असा काही विद्वानांचा समज आहे.[२२] पण तो चूक आहे हे त्यांच्या आरंभीच्या लेखांतील एका श्लोकावरून दाखविता येते. राष्ट्रकूट साम्राज्य सत्तेचा संस्थापक दन्तिदुर्ग याच्याविषयी राष्ट्रकूटांच्या अंजनवती येथील आणि इतर अनेक ताम्रपटांत लेखांच्या आरंभी पुढील श्लोक आढळतो —[२३]

> **काञ्चीशकेरलनराधिपचोलपाण्ड्य–**
> **श्रीहर्षवज्रटविभेदविधानदक्षम् ।**
> **कार्णाटकं बलमनन्तमजेयमन्यै–**
> **र्भृत्यैः कियद्भिरपि यः सहसा जिगाय ।।**

यात अनेक देशांच्या राजांवर विजय मिळविलेल्या पण शेवटी दन्तिदुर्गाने सहज पराजित केलेल्या चालुक्य राजांच्या सैन्याला ‘ कार्णाटकं बलम् ’ असे म्हटले आहे. राष्ट्रकूट सम्राट् दन्तिदुर्ग स्वतः कन्नडभाषी असता तर त्याने आपण पराजित केलेल्या चालुक्यांच्या सैन्याला ‘ कार्णाटकबल ’ म्हटले नसते. तेव्हा तो महाराष्ट्रीय दिसतो.

राष्ट्रकूट दन्तिदुर्गाचा चुलता व उत्तराधिकारी प्रथम कृष्णराज याने वेरूळचे आश्चर्यकारक कैलास लेणे कोरविले होते. त्याची राजधानी

२२. Altekar, *The Rāshṭrakūṭās and Their Times* (1934), pp. 21 f. मान्यखेटला राजधानी गेल्यावर त्यांची भाषा कानडी झाली.

२३. *Ep. Ind.*, Vol. XXIII, p. 14.

त्याजवळच कोठे तरी असावी असा काही विद्वानांचा तर्क आहे.[२४] या प्रथम कृष्णराजाचा एक ताम्रपट चांदा जिल्ह्यातच भांदक येथे सापडला होता. त्यात उल्लेखिलेली गावे त्या जिल्ह्यात अद्यापि सापडतात, हे कै. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनी दाखविले आहे.[२५]

या राष्ट्रकूट वंशात आठव्या शतकाच्या अखेरीस झालेला तृतीय गोविंद याचे अनेक ताम्रपट विदर्भात सापडले आहेत. त्यांपैकी तीन तर– अंजनवती,[२६] सीसवै आणि लोहारा[२७] येथील–मीच संपादिले आहेत. एक (झरिका दानपत्र)[२८] डॉ. कोलते यांनी संपादिला आहे. आपले अनेक ताम्रपट त्याने मयूरखंडीहून दिले आहेत. तेव्हा ती त्याची राजधानी असावी. मयूरखंडीचा नक्की पत्ता अद्यापि लागला नाही. काही संशोधकांच्या मते ती नाशिक जिल्ह्यातील मोरखंड किल्ला ही असावी.[२९] पण तेथे प्राचीन अवशेष दिसत नाहीत. अंजनवती ताम्रपटाचे संपादन करीत असता तृतीय गोविंदाची राजधानी मयूरखंडी म्हणजे सध्याचे मार्कंडी, ही कल्पना मी पुढे मांडली होती. मयूरखंडी–मोरखंडी–मारखंडी अशी त्या स्थलनामाची स्थित्यंतरे संभवनीय दिसतात. मार्कंडी येथे आठव्या शतकाच्या अखेरची भव्य व सुंदर देवालये अद्यापि विद्यमान असल्याने त्यांच्या जवळपास कोणा मोठ्या सम्राटाची राजधानी असणे सुतराम् संभवनीय आहे. आठव्या शतकाच्या अखेरीस असा सम्राट् राष्ट्रकूट तृतीय गोविंद (सन ७९३–८१३) हाच होता. त्याने उत्तरेस हिमालयापर्यंत दिग्विजय केला; उत्तर भारतात प्रतीहार व पाल राजांचा पराजय

---

२४. Altekar, *op. cit.*, p. 48.

२५. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९६९, पृ. २९–३५.

२६. *Ep. Ind.*, Vol. XXIII. pp. 16–17.

२७. *Ibid.*, Vol XXII, pp. 210 f.; pp. 221 f.

२८. *Ibid.*, Vol. XXXII, pp. 157 f.

२९. Altekar, *Rāshrṭakūṭas*, p. 47. बुल्हरने पुढे स्वतःच म्हटले आहे की भारतीय राजे किल्ल्यात राहून राज्य करीत नसत.

केला; परत आल्यावर त्याने मध्य भारतातील अनेक राजांना आपले स्वामित्व मान्य करावयास लावले. पुढे दक्षिणेत स्वाऱ्या करून सिंहलद्वीपापर्यंत आपला दरारा बसविला.[३०] राष्ट्रकूट वंशात त्याच्या इतका पराक्रमी आणि थोर राजा झाला नाही.

तृतीय गोविंद धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्याला पवित्र देवालये बांधून पुण्यसंचय करण्याचा नाद होता. 'कुर्वन् धर्मान्कीर्तनैः पुण्यवृन्दैरध्यष्ठात्तां स्वोचितां राजधानीम्' असे त्याचे वर्णन त्याचा पुत्र प्रथम अमोघवर्ष याच्या संजान ताम्रपटात केले आहे. त्याने तुलादान, हिरण्यगर्भदान अशी अनेक महादाने दिली होती. अशा सुसमृद्ध व धार्मिक प्रवृत्तीच्या राजाला आपल्या राजधानीत किंवा जवळपासच्या तीर्थक्षेत्री उत्तुंग देवालये बांधून आपली कीर्ति अजरामर करावी असे वाटणे असंभवनीय नाही. त्याच्यासारखा समृद्ध सम्राटच मार्कंडेयाच्या देवळासारखे भव्य व सुंदर देवालय बांधू शकला असता. त्या काळी तरी विदर्भात त्याच्या सारख्या दुसऱ्या कोणा राजाचा अंमल नव्हता. दुसरी लक्षणीय गोष्ट ही की शके ७२५ मध्ये दूर तुंगभद्रेच्या काठी अलंपुर येथे स्वाऱ्यांच्या गडबडीत असतानाही चन्द्रग्रहणप्रसंगी ज्याला त्याने झरिका ग्रामदान केले तो विदर्भातील होता.[३१]

राष्ट्रकूट राजे शिवाचे तसेच विष्णूचेही उपासक होते. त्यांच्या दानपत्राच्या आरंभी पुढील श्लोक आढळतो.[३२]

स वोऽ व्याद्वेधसा धाम यन्नाभिकमलं कृतम् ।
हरश्च यस्य कान्तेन्दुकलया कमलङ्कृतम् ।।

यात भगवान् विष्णु तसेच शंकर यांची कृपा भाकली आहे. हीच प्रवृत्ति मार्कंडीच्या देवळांत दिसून येते. तेथे भगवान् शंकराचे उत्तुंग आणि सुंदर देवालय आहे तसे विष्णूच्या दशावतारांचेही देऊळ आहे.

---

३०. Altekar *op. cit*, p. 69.
३१. *Ep. Ind.*, Vol. XXXI, p. 160.
३२. *Ibid.*, Vol. XXIII, p. 13.

मयूरखंडी म्हणजे मार्कंडी या समीकरणावर एक आक्षेप संभवतो. तो हा की तसे असेल तर तेथील देवालयाला तेथल्याच एका शिलेवरील लेखात श्रीमार्कंडेश्वराचे देवालय असे कसे म्हटले आहे ?[३३] याचे उत्तर देणे सोपे आहे. हा लेख तेराव्या शतकाच्या नागरी लिपीत आहे. म्हणजे आमच्या म्हणण्याप्रमाणे मार्कंडेय देवळाच्या निर्मितीनंतर चार पाचशे वर्षांनंतरचा आहे. भारतीयांच्या इतिहासविमुखतेमुळे मध्यंतरीच्या काळात त्या देवळाचे मूळ नाव लुप्त होऊन त्याचा मार्कंडेय ऋषीशी संबंध जोडला जाणे असंभवनीय नाही. या प्रकारचे दुसरे उदाहरण नाशिकच्या सातवाहनकालीन बौद्ध लेण्यांचे 'पांडवलेणी' हे नाव पाहा. मार्कंडी येथेच याचे दुसरे उदाहरण आहे. तेथील सध्याचे विठ्ठलरुक्मिणी मंदिर हे पूर्वी शिवायतन होते हे त्याच्या दरवाजाच्या पट्टीवरील गणेशाच्या मूर्तीवरून आणि जंघेवरील भैरवाच्या मूर्तीवरून स्पष्ट आहे. पण त्याला आता विठ्ठलरुक्मिणीचे मंदिर म्हणतात. आठव्या नवव्या शतकांत विठ्ठलरुक्मिणीची पूजा प्रचारात नव्हती.

शिवाय मार्कंडेय ऋषीचा येथील देवळाशी संबंध असणे संभवनीय नाही. त्यांचे जे चरित्र मार्कंडेयादि पुराणांत आले आहे त्यावरून तो विदर्भात वेणातीरी राहत नसून त्याचा आश्रम हिमालयाच्या उत्तर भागात पुष्पभद्रा नदीच्या काठी होता.[३४] महाभारताच्या वनपर्वात[३५] पुलस्त्यतीर्थ यात्रेच्या वर्णनात वेणानदी व तिच्या संगमाचा उल्लेख आला आहे, पण त्यांत मार्कंडेय ऋषीचा निर्देश नाही. तेव्हा मयूरखण्डीचे मार्कण्डीत रूपांतर झाल्यावर तेथील शिवालयाशी मार्कंडेय ऋषीचे नाव संलग्न झालेले दिसते.

मयूरखंडी म्हणजे मार्कंडी हे समीकरण मान्य न झाले तरी प्रस्तुत देवळांचा काळ ख्रिस्तोत्तर नववे शतक, याला बाधा पोचणार नाही. कारण वाकाटकांनंतर त्या काळातच विदर्भात एका समृद्ध साम्राज्याची

---

३३. *Mārkāṇḍī Temples*, pl. lvi.

३४. चित्राव, भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश, पृ, ६४८.

३५. वनपर्व (चित्रशाळा प्रेस आवृत्ति), ८५, ३२–३३.

राजधानी होती हे मागे स्पष्ट केले आहे. दहाव्या अकराव्या शतकात विदर्भात तशी साम्राज्य सत्ता नव्हती म्हणून त्या काळात असे भव्य व सुंदर देवालय बांधले जाणे असंभवनीय आहे.

आमचे हे मत मान्य झाल्यास दक्षिणच्या स्थापत्य आणि शिल्पकला यांच्या इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पडेल. महाराष्ट्रात, किंबहुना दक्षिणमध्ये, राष्ट्रकूटकालीन देवालये सध्या ज्ञात नाहीत. म्हणून भारतीय विद्याभवनाच्या 'भारतीय इतिहास व संस्कृति' नामक इतिहासग्रंथमालेच्या चौथ्या राष्ट्रकूटविषयक ग्रंथात स्थापत्य–शिल्पकलांवर प्रकरणच घातले नाही. डेक्कन पद्धतीचे पहिले ज्ञात देवालय उत्तर कोकणातील अंबरनाथ येथील शिवालय सर्वांत प्राचीन मानले जाते. ते अकराव्या शतकाच्या मध्यातील (ई. स. १०६०) चे आहे. प्रस्तुत मार्कंडेयाचे देऊळ त्याच पद्धतीचे असून त्याचा काळ सुमारे इ. स. ८०० आहे. म्हणजे ते अडीचशे वर्षे पूर्वीचे आहे. डेक्कन पद्धतीची वैशिष्टचे[३६] देवळाचे चार विभाग–पोर्च (अर्धमंडप), मंडप, अन्तराल आणि गर्भगृह, तीन बाजूंस दरवाजे व त्यांसमोर पोर्च, शिखरांवर चैत्य गवाक्षांच्या आकृतींच्या कलाकुसरीने बनविलेल्या पट्ट्या, शुकनासिका–ही वैशिष्टचे मार्कंडेय तसेच अंबरनाथ देवळात आढळतात. मार्कंडेय देवालयाचा मंडप व गर्भगृह चौकोनी आहेत तर अंबरनाथची तारकाकृति (star–shaped) आहेत. मार्कंडेयाचा मंडप, गर्भगृह व अंतराळ यासारखाच, त्यांच्या समोर चौकोनी बांधला आहे. तर अंबरनाथचा मंडप गर्भगृहाला डायगोनल (तिरपा) लावला आहे.[३७] तेव्हा मार्कंडेय देवालयातून अंबरनाथचे देवालय उत्क्रान्त झालेले दिसते. अंबरनाथांच्या देवळाचा काळ ई. स. १०६० आहे. मार्कंडेयाचे देवालय त्यापूर्वीचे असले पाहिजे. ते ई. स. ११०० चे असणे शक्य नाही. तसेच त्यावर खजूराहो येथील चंदेल्लांच्या देवालयांचा प्रभाव पडला असणे संभवनीय नाही. कारण त्या दोघांच्या रचना (प्लॅन) भिन्न आहेत.

---

३६. Krishna Dev, *Temples of North India.*

३७. O. P. Verma, *Hemāḍpantī Temples*, plate I.

मार्कंडी येथील देवालये प्रसिद्ध नाहीत, याचे कारण ते गाव आडवळणी ठिकाणी आहे. मूलहून तेथे जाण्यास चांगला रस्ता नाही. वाटेत दोनदा नदी ओलांडावी लागते. तिच्यावर पक्के पूल नाहीत. पावसाळ्यानंतर तात्पुरते पूल बांधून रहदारीची सोय केली जाते. आम्हांला एके ठिकाणी पूल नसल्याने नदीच्या जवळ जवळ कमरेपर्यंतच्या पाण्यातून चालत जावे लागले. हे ठिकाण हौशी प्रवाश्यांचे उत्तम पर्यटन–केंद्र होऊ शकेल. पण त्याकरिता ते पक्क्या पुलांनी व रस्त्यांनी मूल गावाशी जोडले पाहिजे. तसेच मार्कंडीस हौशी प्रवाश्यांच्या उतरण्याची सोय केली पाहिजे. या गोष्टीकडे मी महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांचे लक्ष आकृष्ट केले आहे. माझ्या सूचनेवरून नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मेने यांनीही त्यांना लिहिले आहे. त्यायोगे महाराष्ट्राच्या आणि भारत सरकारच्या पर्यटन खात्याचे या गोष्टीकडे लक्ष जाईल आणि हौशी पर्यटकांच्याकरिता आवश्यक त्या सोयी केल्या जातील अशी आशा आपण करू या.

प्रस्तुत प्रदीर्घ लेख संपविण्यापूर्वी मला एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. मार्कंडीच्या देवालयांच्या कालाचे विवेचन करताना माझा उद्देश सत्यान्वेषण हाच आहे. तेथील देवालयांचे यथार्थ ज्ञान कलाभिज्ञांस तसेच सामान्य जनतेसही व्हावे ही माझी फार दिवसांची इच्छा होती. डॉ. देवांच्या प्रस्तुत सविस्तर व सुंदर पुस्तकाने ती पूर्ण झाली याबद्दल मला निरतिशय आनंद झाला आहे. तदर्थ त्यांचे मनःपूर्वक आभार मानून हा लेख पुरा करतो.

---

१६. अय्यणवंशचरित – एक बनावट ऐतिहासिक संस्कृत काव्य*

उत्तमा आत्मना ख्याताः । सुभाषित

गेल्या (सन १९७३ च्या) जून महिन्याच्या मध्याच्या सुमारास महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध संशोधक अनेकभाषाकोविद श्री. देवीसिंह चौहान यांनी आपल्या पत्रात प्रस्तुत काव्याच्या चौथ्या सर्गातील ३४ ते ३६ आणि ४१ हे श्लोक उद्‌धृत करून त्या काव्याच्या कर्त्याला पूर्वकालीन चालुक्य नृपति द्वितीय पुलकेशी याच्या दरबारी आलेल्या इराणदेशीय खुश्रूच्या दूताची माहिती कशी मिळाली, असा प्रश्न मला केला होता. आपण ते काव्य मराठी अनुवादासहित संपादित आहो, असेही त्यांनी शेवटी कळविले होते. मला ते श्लोक वाचून आश्चर्य वाटले. मी ते काव्य त्यापूर्वी वाचले नव्हते. तथापि, त्या श्लोकांवरून ते बनावट असावे, असा मला संशय आला. गेल्या पन्नास–साठ वर्षांत निर्माण झालेल्या अशा बनावट ग्रंथांची मला माहिती असल्याने मी श्री. चौहान यांना ता. १८–६–७३ च्या पत्रात माझी शंका कळविली. त्यानंतर 'भारतीय इतिहास आणि संस्कृति' त्रैमासिकाच्या ३७ व्या अंकात श्री. चौहान यांचा त्या काव्यावरचा सविस्तर लेख वाचून माझे तद्विषयक कुतूहल जास्तच वाढले. मी नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयामार्फत त्या पुस्तकाची प्रत मागवून त्याचा अभ्यास केला. तेव्हा माझा संशय दृढतर झाला. विद्वानांनी या पुस्तकाचे सूक्ष्म परीक्षण केल्याशिवाय त्यातील विधाने ग्राह्य मानू नयेत, ही धोक्याची सूचना देण्याकरिता प्रस्तुत लेख लिहिण्याचा खटाटोप केला आहे.

---

* भारतीय इतिहास आणि संस्कृति, पु. ४०, पृ. ४८–६०.

प्रस्तुत 'श्रीचालुक्यराज-अय्यणवंशचरितं काव्यम्' वाराणसीचे पं. विश्वनाथ शास्त्री भारदे (भारद्वाज) यांनी हिंदी प्रस्तावना व अनुवाद यांसह संपादिले असून अखिल भारतीय संस्कृत विद्यापीठ, दिल्ली, या संस्थेच्या ग्रंथमालेत सन १९६६ मध्ये ते प्रसिद्ध झाले आहे. हे पुस्तक भारताच्या महामंत्री श्रीमती इंदिराजी गांधी यांना अर्पण केले आहे. त्या विद्यापीठाचे निर्देशक डॉ. मंडन मिश्र यांच्या प्राक्कथनावरून ह्या पुस्तकाचे संपादक पं. विश्वनाथशास्त्री भारद्वाज यांनी स्वतः ते 'चालुक्य-कुलदीपक माननीय श्री. साबाजीराव उर्फ आप्पाजीराव चालुक्य, बी. ए., एम्. आर्. ए. एस्., आय्. ए. एस्.,' यांना अर्पण केले असून त्यात आरंभी त्यांचा फोटोहि घातला आहे. पूर्वोक्त विद्यापीठाच्या सन १९६६ च्या संस्कृत साहित्य संमेलनात ते संमेलनाध्यक्ष राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते प्रकाशित झाले होते. त्या प्रसंगाचे छाया-चित्रहि यात घातले आहे. पूर्वोक्त विद्यापीठाचे निर्देशक डॉ. मंडन मिश्र यांच्या प्राक्कथनावरून श्री. साबाजीराव चालुक्य यांच्या उदार अर्थ-साहाय्याने प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध झाले आहे असे समजते. त्याची किंमत ५ रुपये त्याच्या पृष्ठसंख्येच्या मानाने अत्यल्प आहे.

चालुक्य वंश हा प्राचीन कालचा अत्यंत विख्यात राजवंश होय. त्याच्या मुख्य दोन शाखा होत्या. पहिलीची राजधानी वातापि (विजापूर जिल्ह्यातील बादामी) ही होती. हिचे कर्नाटक आदिकरून दक्षिण भारतातील प्रदेशांवर सुमारे सन ५०० पासून सुमारे ७५० पर्यंत राज्य होते. शेवटला राजा द्वितीय कीर्तिवर्मा याचा पराभव करून ७५० च्या सुमारास राष्ट्रकूटांनी दक्षिणेत आपले साम्राज्य स्थापले. सु. सन ९७० च्या सुमारास त्यांचा उच्छेद करून उत्तरकालीन चालुक्यवंशी द्वितीय तैलप याने आपली सत्ता या प्रदेशांवर प्रस्थापित केली. त्याचा नातू द्वितीय अय्यण याला मूळ पुरुष कल्पून त्याच्या वंशाचे अद्ययावत् वर्णनपर हे काव्य त्याच्या राजगुरूचा वंशज कोल्हापूरनिवासी श्यामभट्ट भारद्वाज (भारदे) याने हे काव्य शके १७३७ (सन १८१५) मध्ये लिहिले (कविप्रशस्ति, श्लो. १). याच्या एका परिशिष्टात चालुक्य वंशाचा

मूळपुरुष विजयादित्य यापासून सुरवात करून ६२ पिढ्यांची वंशावळ सध्या सेवानिवृत्त झालेले पूर्वोक्त श्री. साबाजी उर्फ आप्पासाहेब (क्र. ६१) आणि त्यांचे दोन पुत्र (१) श्री. मूलराज उर्फ जैशिवराव आणि (२) कामदेव उर्फ वीरविजय (क्र. ६२) पर्यंत आणली आहे. ह्या प्रदीर्घ वंशावळीने तब्बल १२ पृष्ठे व्यापली आहेत. ती आपणांस सरदार साहेबांकडून समजावून घ्यावी लागली असे श्री. चौहान सांगतात.

प्रस्तुत ग्रंथाचा लेखक चालुक्य राजपुरोहितवंशी श्यामभट्ट भारद्वाज हा आपला पूर्वज होय हे संपादक पं. विश्वनाथशास्त्री यांनी दाखविले आहे. त्यामुळे त्यांनी हे संपादकीय मेहनतीचे काम आत्मीयतेने केलेले दिसते.

संस्कृत वाङ्मयात इतिहासग्रंथांची मोठी उणीव आहे. एक 'राजतरंगिणी' वगळल्यास 'इतिहास' या संज्ञेला प्राप्त होण्यासारखा एकहि संस्कृत ग्रंथ ज्ञात नाही. 'हर्षचरित', 'विक्रमांकदेवचरित', 'नवसाहसांकचरित' अशी ऐतिहासिक संस्कृत काव्ये आहेत; पण त्यांत इतिहासापेक्षा काव्यच जास्त आहे. 'राजतरंगिणी'तही दिलेला आठव्या शतकापूर्वीचा काश्मीरचा इतिहास कसोटीस उतरत नाही. पण श्री. चौहान यांच्या मते प्रस्तुत 'अय्यणवंशचरितकाव्य' हा 'प्राचीन चालुक्य वंश व पर्यायाने शिवकाल यांवरचा एक खराखुरा इतिहास ग्रंथ आहे.' सामान्यतः संस्कृत ऐतिहासिक काव्यांत कालोल्लेख येत नाहीत. 'हर्षचरिता'त, 'विक्रमांकदेवचरिता'त, 'नवसाहसांकचरिता'त एकहि कालोल्लेख नाही. पण श्री. चौहान यांनी गणना केल्याप्रमाणे, प्रस्तुत 'अय्यणवंशचरितकाव्या'त एक दोन नव्हे, तर ९४ कालोल्लेख आहेत. त्यांवरून श्री. चौहान यांनी अनुमान केले आहे की श्यामभट्टाने चालुक्य वंशासंबंधी शिलालेख, ताम्रपत्रे, भूर्जपत्रीय ग्रंथ, उत्तरकालीन कागदपत्रे आणि 'इतिहासलेखकांचा राजा' मानला गेलेला फिरिश्ता ही साधने पाहिली होती. असा हा अद्वितीय संस्कृत इतिहास ग्रंथ प्रकाशित केल्याबद्दल त्यांनी श्री. साबाजीराव व पं. भारद्वाज यांना धन्यवाद दिले असले तर आश्चर्य नाही.

प्रस्तुत ग्रंथात केवळ प्राचीन चालुक्य वंशाविषयीच नव्हे तर आधुनिक शिवकाल, पेशवेकाल वगैरे विषयीहि सन १८१५ पर्यंत म्हणजे पेशवाई बुडण्यापूर्वी तीन वर्षेपर्यंत विविध प्रकारची ऐतिहासिक माहिती आली असल्यामुळे त्याची चिकित्सक छाननी केली पाहिजे. तसा प्राचीन काळाच्या पुरता हा अल्पसा प्रयत्न करताना आरंभी एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. या ग्रंथप्रकाशनाचे आश्रयदाते श्री. साबाजीराव पाटील चालुक्य यांचा आणि माझा सुमारे आठ वर्षांपूर्वीपर्यंत मुळीच परिचय नव्हता. सन १९६५ मध्ये त्यांनी मला पत्र पाठवून आपल्या-जवळील प्राचीन कागदपत्रे व नाणी पाहण्यास आमंत्रण दिले. आपण पूर्वी कै. ए. एस्. अळतेकर यांनाही असेच बोलाविले होते, पण ते येऊ शकले नाहीत असेहि त्यांनी म्हटले होते. इतर अनेक कामांत व्यग्र असल्यामुळे मला त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करता आला नाही. तेव्हा त्यांनी आपल्याजवळच्या तीन नाण्यांच्या मागील पुढील बाजूंचे फोटो पाठवून त्यांवर लेख लिहिण्याची मला विनंती केली. त्यांपैकी एक (जयाश्रय चालुक्याचे) नाणे पूर्वीच प्रसिद्ध झाले असून मी त्यावर पूर्वीच लिहिले होते. दुसरी दोन मात्र अप्रकाशित होती. सकृद्दर्शनी ती संशयात्मक दिसली, तरी त्यांवर लेख लिहून ती त्यानंतरच्या डिसेंबर महिन्यातील वाराणसी येथील अखिल भारतीय नाणक परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी नाणकविशारदांच्या नजरेस आणण्याचे मी कबूल केले. श्री. साबाजीराव पाटील चालुक्य यांनी त्यावेळी आपण उपस्थित राहू असे मला कळविले.

त्याप्रमाणे त्या अधिवेशनात त्या नाण्यांचे फोटो मी विद्वानांपुढे मांडले. ते पाहताच अनेकांनी ती नाणी बनावट असल्याचा एकच गिल्ला केला. तेव्हा श्री. साबाजीरावांनी तेथून पाय काढला. याप्रसंगी मी त्यांना प्रथम पाहिले.

नंतर १९६६ मध्ये दिल्ली येथे तेथील अखिल भारतीय संस्कृत विद्यापीठाच्या संस्कृत संमेलन प्रसंगी निमंत्रणावरून व्याख्यानाकरिता मी गेलो होतो. तेथे श्री. आप्पासाहेब पाटील, चालुक्य, यांची दुसरी भेट

झाली. त्या सम्मेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् यांना कांही पुस्तकांची भेट दिल्याचे आढळले. त्या वेळी त्या ग्रंथांचा नामोल्लेख झाला नव्हता असे स्मरते. तथापि डॉ. मंडन मिश्र यांच्या प्राक्कथनावरून त्यांपैकी एक प्रस्तुत 'अय्यणवंशचरितकाव्य' होते, असे दिसते. या प्रसंगाचा फोटो प्रस्तुत पुस्तकात घातला आहे.

वरील दोन प्रसंगांशिवाय अन्यत्र श्री. आप्पासाहेब पाटील, चालुक्य यांची माझी भेट अद्यापि झाली नाही. त्यांच्या पुस्तकावर परीक्षण आलेले मी कोठे पाहिले नाही.[१] श्री. चौहान यांनी त्याचे ऐतिहासिक महत्त्व सविस्तरपणे प्रतिपादिल्यामुळे त्याची चिकित्सक छाननी करणे आवश्यक झाले आहे. ते येथे करताना सत्यान्वेषणाखेरीज दुसरा कोणताहि हेतु नाही. श्री. आप्पासाहेबांशी झालेल्या अल्प परिचयाचे जे वर निवेदन केले आहे त्यावरूनहि हे वाचकांच्या लक्षात आले असेल.

'अय्यणवंशचरित'काव्याच्या सत्यत्वाविषयी संशय घेण्यास अनेक प्रबळ कारणे आहेत. त्यांचा आता यथाक्रम विचार करू.

(१) पहिले मुख्य कारण हे की चालुक्य राजाने त्यात म्हटल्याप्रमाणे शके ३५८ (सन ४३६) मध्ये आपली राज्यसत्ता स्थापिली तेव्हापासून शके १७१३ मध्ये पेशव्यांनी शृंगेरी मठ लुटला त्या वेळी त्यांना शौर्याने प्रतिकार करणाऱ्या मनकोजी याच्या (हा श्री. साबाजीरावांचा पिता माणकोजी असल्यास त्याच्या) पर्यंत ६० पिढ्या आणि १३५५ वर्षे होतात. या साडेतेराशे वर्षांच्या चालुक्यांच्या पिढ्यांविषयी बरोबर माहिती श्यामभट्टास असेल हे सुतराम् असंभवनीय वाटते. जगात कोणताहि राजवंश किंवा सामान्य वंश इतका दीर्घ काळ टिकलेला आणि त्याच्या पिढ्यांविषयी इतकी निश्चित माहिती असलेली आढळत नाही. प्रस्तुत चालुक्य वंशाचेच उदाहरण घेऊ. प्राचीन कालाच्या इति-

---

१. डॉ. पी. बी. देसाई यांच्या *A History of Karnāṭaka* या ग्रंथात एके ठिकाणी (पृ. १६० वर) त्याचा सन्दर्भ दिलेला पाहिला आहे.

हासात याच्या दोन शाखा सुविख्यात आहेत. त्यांपैकी पहिली वातापीहून (विजापूर जिल्ह्यातील बादामीहून) आणि दुसरी तिच्यानंतर सुमारे २०० वर्षांनी बिदर जिल्ह्यातील कल्याणीहून राज्य करीत होती. पुढील विवेचन समजण्यासाठी पहिलीचा पूर्ण ज्ञात वंश आणि दुसरीचा आरंभीचा ज्ञात वंश खाली दिला आहे.

बादामी शाखा

- जयसिंह
  - रणराग
    - प्रथम पुलकेशी
      - कीर्तिवर्मा
        - द्वितीय पुलकेशी
          - प्रथम विक्रमादित्य
            - विनयादित्य
              - विजयादित्य
                - द्वितीय विक्रमादित्य
                  - द्वितीय कीर्तिवर्मा
      - मंगलेश

कल्याणी शाखा

- द्वितीय तैलप
  - सत्याश्रय
  - दशवर्मा
    - पंचम विक्रमादित्य
    - द्वितीय अय्यण
    - द्वितीय जयसिंह
      - प्रथम सोमेश्वर
        - द्वितीय सोमेश्वर
        - षष्ठ विक्रमादित्य
        - जयसिंह

द्वितीय कीर्तिवर्म्याचे शेवटचे ज्ञातवर्ष सन ७५७ आहे आणि द्वितीय तैलपाचे आरंभीचे वर्ष सन ९७३ आहे त्यांमधील सुमारे २१६ वर्षांच्या काळातील चालुक्यांचे लेख सापडले नाहीत. कल्याणीच्या शाखेच्या आरंभीच्या लेखांत त्या शाखेचा पूर्वकालीन बादामी शाखेशी संबंध जोडलेला आढळत नाही. काही काळानंतरच्या लेखांत या दोन

शाखांचा संबंध जोडून मध्यंतरीच्या कालात पुढील राजांनी राज्य केले असे वर्णन केले गेले.

भीम
|
तृतीय कीर्तिवर्मा
|
प्रथम तैलप
|
तृतीय विक्रमादित्य
|
द्वितीय भीम
|
प्रथम अय्यण
|
चतुर्थ विक्रमादित्य

या राजांचे लेख मिळाले नसल्यामुळे आणि नंतरच्या एक दोन लेखांतच त्यांचा नामनिर्देश आल्यामुळे डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांना त्यांच्या कारकीर्दीविषयी संशय होता. ते म्हणत " उत्तरकालीन चालुक्तांना आपला बादामीच्या चालुक्यांशी प्रत्यक्ष संबंध माहीत नव्हता. ते त्यांच्याहून निराळे होते, हे त्यांच्या लेखांवरून, नावांवरून, बिरुदांवरून स्पष्ट दिसून येते. प्राचीन काळी चालुक्य वंशाच्या अनेक शाखा दक्षिण भारतात राज्य करीत होत्या. कल्याणीची शाखा कालान्तराने प्रबळ झाल्यावर तिने आपला संबंध पूर्वीच्या विख्यात शाखेशी मुद्दाम जोडविलेला दिसतो." सुमारे दोनशे वर्षांतील इतिहासाची ही कथा ! साडेतेराशे वर्षांच्या दीर्घ कालात काय झाले असेल त्याची कल्पना वाचकांनी करावी.

(२) दुसरे संशयाचे कारण या काव्याच्या वंशाला 'अय्यणवंश' का म्हटले ते कळत नाही. चालुक्यवंशात द्वितीय पुलकेशी, षष्ठ विक्रमा-

दित्य असे अनेक महाप्रतापी, दानशूर, कीर्तिमान् राजे होऊन गेले. बिल्हणाने त्यापैकी एकावर–षष्ठ विक्रमादित्यावर–आपले ‘विक्रमांकदेव-चरित’ काव्य रचले आहे. ‘अय्यणवंशचरिता’चा विवक्षित नायक हा द्वितीय अय्यण होय. याने एखादे वर्षच राज्य केले असावे. अनेक ताम्रपटांत याचे नाव राजवंशावलीतून गाळले आहे तर एका ताम्रपटात[२] त्याला ‘मनाला येईल तसे वागणारा’ व ‘गर्विष्ठ’ म्हटले आहे. बिल्हणाने षष्ठ विक्रमादित्याच्या पूर्वजांचे वर्णन करताना याचे नाव गाळले आहे. श्यामभट्टाने मात्र आठव्या सर्गाच्या आरंभी ‘तो धार्मिक वृत्तीचा, उदार, सत्यवक्ता आणि विद्वान् होता. त्याने सहा महिनेच राज्य करून ते नंतर आपल्या बंडखोर भावास देऊन टाकले, आणि तो स्वतः अरण्यात तपश्चर्येस निघून गेला’ असे कपोलकल्पित वर्णन केले आहे. त्याला अद्यापपर्यंत कसलाहि आधार नाही. तो ज्योतिषात निपुण होता आणि त्याने ‘अय्यणत शा?’ या नावाचा ग्रंथ ज्योतिषावर लिहिला होता. त्याचा संस्कृतात अनुवाद काशीस्थ पंडितांनी केला होता, असे श्यामभट्ट सांगतो (८, १७). या नावाचा ग्रंथ सुप्रसिद्ध ज्योतिर्विद् शं. बा. दीक्षित यांनाहि माहीत नव्हता. तो मराठीत असावा असे श्री. चौहान म्हणतात. अय्यण शक ९७६ (सन १०५४) मध्ये वारला. तेव्हा अकराव्या शतकाच्या मध्यात मराठी भाषा चांगलीच प्रौढ झाली होती, असे मानले पाहिजे. कोरीव लेखांचा पुरावा याविरुद्ध आहे. मराठीतील पहिला कोरीव लेख यानंतर सहाच वर्षानंतरचा आहे. (दिवेआगर ताम्रपट शके ९८२ पाहा[३].) त्यांतील मराठी भाषा इतकी प्रौढ नाही. तेव्हा हे सर्व वर्णन काल्पनिक दिसते.

(३) ‘अय्यणवंशचरित’ काव्याच्या सत्यतेविषयी शंका येण्याचे तिसरे प्रमुख कारण हे की त्यात आलेल्या ऐतिहासिक माहितीची साधने त्या काव्याचा कर्ता श्यामभट्ट याच्या काळी, शके १७३७ (सन १८१५) मध्ये, उपलब्ध झाली नव्हती. श्री. चौहान यांनी म्हटले आहे की हे

२. इंडियन् अँटिक्वरी, व्हॉ. ४, पृ. २०८.

३. प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ. १०–१४.

काव्य लिहिताना श्यामभट्टाने चालुक्य वंशासंबंधी शिलालेख, ताम्रपत्रे, भूर्जपत्रीय ग्रंथ, उत्तरकालातील कागदपत्रे आणि फिरिश्ता याचा ग्रंथ ही साधने पाहिली होती. पण त्यांनाहि इराणच्या द्वितीय खुश्रूने पुलकेशी-कडे आपला राजदूत पाठविला होता ही माहिती श्यामभट्टाला कशी मिळाली हा प्रश्न पडला होता आणि तो त्यांनी मला या लेखाच्या आरंभी उल्लेखिलेल्या पत्रात विचारला होता. हा उल्लेख मुसलमानी इतिहासकार ताबरी याच्या ग्रंथात आलेला फर्ग्यूसन साहेबाने जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटीच्या एप्रिल १८७९ च्या अंकामध्ये म्हणजे प्रस्तुत पुस्तकाच्या कालानंतर ६४ वर्षांनी **प्रथमच** दाखविला तेव्हा माहीत झाला. श्यामभट्टाला तो स्वप्नातही दिसणे शक्य नव्हते. अय्यणवंशचरित (४, २७) मधील—

ग्रामाणां नवनवतिसहस्रेण समन्वितम् ।
देशं महाराष्ट्रसंज्ञं स वशे कृतवान् कृती ।।

या श्लोकावरून असेच महाराष्ट्र देशाचे वर्णन असलेला द्वितीय पुलकेशीचा ऐहोळे शिलालेख श्यामभट्टाने पाहिला होता, असे अनुमान श्री. चौहानांनी केले आहे. केवळ हे वर्णनच नव्हे तर त्या चौथ्या सर्गातील द्वितीय पुलकेशीच्या सर्वच दिग्विजयाचे वर्णन तथाकथित श्यामभट्टाने ऐहोळे शिलालेखातून घेतले आहे. पण तो शिलालेख सन १८१५ पूर्वी वाचला गेला होता काय ? त्या लेखाचे **पहिले वाचन** सन १८७६ मध्ये डॉ. फ्लीटने इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. ५, पृ. ६७-७३, मध्ये इंग्रजी अनुवादासह प्रसिद्ध केले.[४] नंतर तीन वर्षांनी (१८७९ मध्ये) इं. अँ. व्हॉ. ८ (पृ. २३७–२४५) मध्ये छापासह त्याने त्याची सुधारून आवृत्ति छापली, आणि शेवटी सन १९०० मध्ये कीलहॉर्नने त्याचे अनुवादासह उत्कृष्ट संपादन केले. तेव्हा ऐहोळे लेखाची माहिती तथाकथित श्याम-

४. या वेळी त्याचे शकसंवत्सर त्याने चुकीने ५०६ (सन ५८४) असे वाचले. खरे वाचन शक संवत् ५५६ (सन ६३४) हे नंतर रामकृष्णपंत भांडारकरांनी दाखविले. फ्लीटनेही ते आपल्या नंतरच्या लेखात दिले आहे.

भट्टानंतर **साठ वर्षांनी** हा लेख प्रथम वाचला गेला तेव्हा झाली. ती श्यामभट्टाला कशी मिळाली ?

मागे म्हटल्याप्रमाणे भारतीयांच्या ऐतिहासिक काव्यांतहि कालाचे उल्लेख आढळत नाहीत. 'अय्यणवंशचरिता'त मात्र ते चौऱ्याण्णव संख्येइतके विपुल आहेत. हे कालनिर्देश गेल्या दोनशे वर्षांत युरोपीय आणि भारतीय विद्वानांनी केलेल्या अविश्रांत परिश्रमांमुळे माहीत झाले आहेत. वॉरन हेस्टिंग्जच्या अमदानीत सन १७८४ मध्ये कलकत्त्यास एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल स्थापन होऊन भारतीय वाङ्मय व इतिहास यांच्या संशोधनास प्रारंभ झाला, तरी पहिली शंभर वर्षे त्यात फारशी प्रगति झाली नव्हती. सन १८७२ मध्ये इंडियन अँटिक्वरी या नियतकालिकाची स्थापना होऊन त्यात विविध विषयांवरील संशोधनपर लेख आणि शिलालेख, ताम्रपट वगैरे इतिहाससाधने यांच्या प्रसिद्धीस चालना मिळाली. सन १८८८ मध्ये भारत सरकारच्या 'एपिग्राफिया इंडिका' या नियतकालिकात कोरीव लेख उत्कृष्ट छाप व काटेकोर संपादन यांसहित प्रसिद्ध होऊ लागले. त्यानंतर आपल्या प्राचीन इतिहासविषयक ज्ञानात निश्चितता येऊ लागली. प्राचीन काळी भारतात अनेक संवत् प्रचलित होते. त्यांचा नक्की आरंभ काळ निश्चित होण्यास शताधिक वर्षे संशोधकांस परिश्रम करावे लागले. उदाहरणार्थ, गुप्त संवताच्या आरंभकालाविषयी डॉ. फ्लीटचा लेख पाहा.[५] अलीकडे मीहि कलचुरि[६] आणि गंग[७] संवताच्या आरंभ-तिथि दीर्घ परिश्रमानंतर निश्चित केल्या आहेत. हे सर्व ज्ञान आता अभ्यासकांना भारतीय विद्याभवनने प्रसिद्ध केलेल्या हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल (भारतीयांचा इतिहास आणि संस्कृति) या ग्रंथमालेच्या खंडांत सहज उपलब्ध झाले आहे. पं. विश्वनाथशास्त्री भारद्वाज यांनी या ग्रंथमालेचा

५. कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम, भाग ३, मधील फ्लीटची प्रस्तावना पाहा.

६. कॉ. इ. इं., भाग ४ ची प्रस्तावना पाहा.

७. स्टडीज इन इण्डॉलॉजी, भाग ४, पृ. १६६–२०४ पाहा.

उल्लेख केला आहे. त्यांना ही साधने उपलब्ध आहेत. पण दीडशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या त्यांच्या तथाकथित श्यामभट्ट नामक पूर्वजास ती माहीत असणे अत्यंत असंभवनीय आहे. त्याच्या काळी ही शिलालेख, ताम्रपट, नाणी, भूर्जपत्रीय ग्रंथ इत्यादि साधने उपलब्ध असती तर फ्लीट, कीलहॉर्न, बुल्हर, हुल्श, स्टेन कोनो, भांडारकर वगैरे विद्वानांना विविध घटनांची कालनिश्चिति करण्याचे जे परिश्रम पडले ते पडते ना.

(४) 'अय्यणवंशचरिता'च्या सत्यतेविषयी मला संशय येण्याचे आणखी एक कारण हे की श्री. साबाजीराव पाटील, चालुक्य, यांनी जी नाणी माझ्याकडे आपल्या वंशाची जुनी म्हणून पाठविली ती संशयास्पद वाटतात. त्यांनी १९६५ मध्ये माझ्याकडे येथे छापलेली तीन नाणी पाठविली.[८] त्यांपैकी क्र. १ चे नाणे प्रथम इंदूरचे डॉ. एच्. व्ही. त्रिवेदी यांनी जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया, व्हॉ. २० (पृ. २१९) मध्ये प्रसिद्ध केले. त्यांच्या वर्णनावरून ते तांब्याचे असून त्यावर एका बाजूस 'जयाश्रय' अशी अक्षरे, त्यांच्यावर अर्धचंद्राकृति आणि खाली इंग्रजी एक्स् सारखे अक्षर आडवे दाखविले आहे. दुसऱ्या बाजूवर हत्तीची आत सोंड वळविलेली आकृति आहे. डॉ. त्रिवेदींनी या दुसऱ्या, हत्ती असलेल्या, बाजूचा फोटो छापला नाही. त्यांच्या मते अक्षरवटिकेवरून जयाश्रय ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील राजा असावा. पण तसा कोणी राजा त्या काळात झाल्याचे माहीत नाही हेहि त्यांनी मान्य केले आहे.

त्या जर्नलमध्ये या नाण्याच्या 'जयाश्रय' अक्षरे असलेल्या बाजूचा फोटो पाहताच तो चालुक्य नृपत्ति द्वितीय पुलकेशीचा पुत्र, धराश्रय जयसिंह, याचा पुत्र विनयादित्य मंगलरस जयाश्रय होय हे माझ्या लक्षात आले, याचे शक ६१३ आणि ६५५ चे ताम्रपट सापडले आहेत. तो उत्तर कोकणात ख्रिस्तोत्तर सातव्या शतकाच्या शेवटी आणि आठव्या शतकाच्या आरंभी राज्य करीत होता. इतक्या प्राचीन कालचे बादामीच्या

८. सोबतची प्लेट क्र. १२ पाहा.

चालुक्यांच्या वंशाचे नाणे प्रथमच सापडले हे मी नंतर न्यू. सो. च्या जर्नलमध्ये (व्हॉ. २१, पृ. १३५–१५६) दाखविले होते. श्री. साबाजीराव यांनी पाठविलेले नाणे अगदी याच तऱ्हेचे आहे. मात्र त्याच्या दुसऱ्या बाजूवर आत सोंड वळवलेला हत्ती नसून डावीकडे तोंड करून चालणारा **वराह** दाखविला आहे. मी श्री. साबाजीराव यांस ते नाणे माझ्याकडे पाठविण्यास सांगितले. पण त्यांनी ते व इतर सोन्याची नाणी सुवर्ण नियंत्रण कायद्यामुळे आपण स्वतःजवळ न ठेवता बिदर जिल्ह्यातील कल्याणी येथील कोठीत ठेवली असल्यामुळे पाठविता येत नाहीत याबद्दल खेद व्यक्त केला होता.

श्री. साबाजीरावांनी ज्याचे फोटो माझ्याकडे पाठविले ते हे क्र. १ चे नाणे मला संशयास्पद वाटते. त्याच्यावर एका बाजूस ' जयाश्रय ' अशी अक्षरे फोटोतल्याप्रमाणे असल्यास ते इ. स. च्या सातव्या–आठव्या शतकातील जयाश्रय चालुक्याचे होय यात संशय नाही. पण तसे असल्यास त्याच्या दुसऱ्या बाजूवर डॉ. त्रिवेदींच्या नाण्याप्रमाणे **हत्ती** नसून **वराह** कसा ? हा प्रश्न उपस्थित होतो.

माझा लेख न्यू. सो. च्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर ते चालुक्यांचे नाणे आहे असे समजल्यावर कोणीतरी ते श्री. साबाजीरावांस ' हे तुमच्या पूर्वजाचे नाणे आहे ' असे सांगून बनविले तर नसेल ना ? त्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा–हत्ती असलेला–फोटो त्रिवेदींनी प्रसिद्ध केला नव्हता. माझ्याहि पूर्वोक्त लेखाबरोबर तो छापला नव्हता. म्हणून त्या बाजूवर वराहाची आकृति दाखविलेली दिसते. पण हा वराह जयाश्रयाच्या नंतर शेकडो वर्षांनी झालेल्या चालुक्यांच्या इतर दोन नाण्यांवरील वराहासारखा कसा ? असा प्रश्न उपस्थित होतो. तेव्हा हे नाणे संशयित आहे.

श्री. साबाजीरावांनी पाठविलेल्या क्र. २ व क्र. ३ च्या फोटोंची नाणीही संशयास्पद वाटतात. क्र. २ च्या नाण्याच्या पुढील बाजूवर मध्यभागी अर्धचंद्र, सूर्य आणि सभोवार ' आयणदेव कल्याणेश्वर ' आणि

दुसऱ्या बाजूवर मध्ये वराह, त्याच्या वरील बाजूस शकु आणि खालील बाजूस ९३७ असा अंक आहे. हे नाणे चालुक्य नृपति द्वितीय अय्यण याचे आहे असे दाखविण्याचा प्रयत्न दिसतो. पण ख्रिस्तोत्तर अकराव्या शतकात ९ या अंकाला सध्याचे नागरी रूप आले नव्हते, शिवाय हे ९३७ वर्ष श्यामभट्टाच्या 'अय्यणवंशचरिता'तील विधानाच्या विरुद्ध आहे. त्या काव्याच्या सर्ग ७, श्लो. १९ मध्ये श्यामभट्ट सांगतो की पंचम विक्रमादित्य शक ९४० मध्ये मृत्यु पावला. नंतर अय्यणाने फक्त पांच सहा महिनेच राज्य केले. पण आपला भाऊ जयसिंह याच्या बंडामुळे विरक्त होऊन तो राज्यत्याग करून तपश्चर्येकरिता गेला. अशा परिस्थितीत तो शक ९३७ मध्ये (म्हणजे गादीवर येण्यापूर्वी तीन वर्षे) आपल्या नावे **सोन्याचे नाणे** पाडणार कसा ?

क्र. ३ चा फोटो 'श्रीकांवादेव महामंडलेश्वर' याच्या नाण्याचा आहे. त्याच्या दुसऱ्या बाजूवर 'कल्याणपुरवराधीश्वर' असे त्याचे बिरुद आहे. त्यावरून तो कल्याणीच्या चालुक्य वंशातील दिसतो. पण तसे राजनाम त्या कालाच्या वंशावळीत दिसत नाही.

याशिवाय इतर कांही प्रमाणांवरून ही नाणी संशयास्पद वाटतात. ती अशी (१) चालुक्यांची सोन्याची नाणी पातळ पत्र्यावर निरनिराळ्या टंकांनी सभोवार अक्षरे उमटवलेली आणि मध्ये वराहाची आकृति असलेली अशी असतात. त्यांच्या दुसऱ्या बाजूवर अक्षरे उमटविली नसतात. (इलियटचे कॉइन्स् ऑफ सदर्न इंडिया, प्लेट ३, क्र. ७९ पाहा.) तेच प्लेट १३, क्र. १ पाहा.[९] (२) त्यांची राजधानी कन्नड प्रदेशात असल्यामुळे त्यांच्या नाण्यांवरची लिपी कन्नड असते. प्रस्तुत नाणी क्र. २ व क्र. ३ वरीलप्रमाणे ती नागरी नसते.

तेव्हा 'अय्यणवंशचरिता' प्रमाणे ही नाणीही बनावट वाटतात.

वरील कारणांवरून हे 'अय्यणवंशचरित' काव्य सन १८१५ इतके जुने नसून ते अलीकडे–गेल्या वीस पंचवीस वर्षांतील–भारतीय विद्या-

---

९. सोबतच्या प्लेट क्र. १३ मधील श्री 'चालुक्यवल्लभ' नाव असलेले नाणे पाहा, [इलियटच्या ग्रंथातून]

भवनने आपल्या ग्रंथमालेचे खंड प्रसिद्ध केल्यानंतरचे–दिसते. ते काव्य साध्या अनुष्टुभ् छंदात रचले असून त्यात काव्य असे कांहीच नाही हे श्री. चौहान यांनी म्हटले आहेच. मात्र त्याचा कर्ता बहुश्रुत, चौकस आणि अद्ययावत् ऐतिहासिक माहिती जमविण्याची काळजी घेणारा असावा. नाही तर, मागे दाखविल्याप्रमाणे सन १९५९ मध्ये मी वाचलेल्या जयाश्रय चालुक्याच्या नाण्याचा उपयोग, त्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर वराहाची आकृति आहे असे दाखवून, त्याला करता आला नसता.

‘अय्यणवंशचरितकाव्या’त कांही माहिती खरी आहे तर कांही काल्पनिक आहे. त्यांतील फिरिश्ताच्या ग्रंथातून घेतलेल्या माहितीतील दोष श्री. चौहान यांनी दाखविले आहेत. प्राचीन काळच्या आपल्या इतिहासज्ञानात अनेक त्रुटि असल्याने त्या भरून काढण्याकरिता या काव्याच्या निर्मात्याने आपल्या कल्पनेचा सढळ उपयोग केला आहे. उदाहरणार्थ, कल्याणीचे चालुक्य बादामीच्या चालुक्यांचे वंशज होते हे दाखविण्याकरिता त्याने सर्ग ८, श्लो. ६–३७, मध्ये दिलेली द्वितीय तैलपाची मंगलेशापासूनची वंशावळ बहुतांशी काल्पनिक आहे. मराठेशाहीच्या इतिहासातील दोष तज्ज्ञ सहज दाखवू शकतील.

हा एवढा खटाटोप श्री. साबाजीराव पाटील चालुक्य यांनी, आपण थेट उत्तरकालीन चालुक्य नृपति अय्यण याच्या वंशात जन्मलो आहो हे सिद्ध करण्याकरिता, केलेला दिसतो. पण तो साधला नाही असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. प्रस्तुत काव्याच्या दोन प्राचीन प्रती उपलब्ध असताना पाठभेद कसे दिले नाहीत असे श्री. चौहान यांनी विचारले आहे. त्याचे उत्तर संपादक पं. विश्वनाथशास्त्री यांनी पृ. ९ वर अगोदरच दिले आहे. ते सांगतात की आपण श्री. साबाजीराव यांची प्राचीन हस्तलिखित प्रत आपल्या जवळील प्रतीशी ताडून पाहून प्रेस कॉपी तयार करण्याकरिता घेऊन गेलो. दोन्ही प्रती आपल्या घरी एका बस्त्यांत इतर हस्तलिखितांसह बांधल्या होत्या. काही कालानंतर तो बस्ता उघडून पाहू लागलो तेव्हा तो फार हलका लागला. त्यातील हस्तलिखितांची

वाळवीमुळे माती झाली होती ! हा किस्सा राजवाड्यांच्या नष्ट झालेल्या ज्ञानेश्वरी प्रतीच्या किश्शासारखा दिसतो.

भारतात अशा तऱ्हेचे बनावट ग्रंथ रचण्याचे प्रयत्न फार प्राचीन काळापासून चालत आले आहेत. अलीकडे एका गृहस्थाने भविष्यपुराणांत गुप्त कालातील घटनांचे उल्लेख आले आहेत, असे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. पण ते उतारे अलीकडच्या पुरातत्त्वीय संशोधनाची माहिती असणाऱ्या कोणी तरी लिहून ते त्या पुराणात घुसडले आहेत, असे डॉ. रमेशचंद्र मुजुमदारसारख्या विद्वानांनी सिद्ध केले आहे. काठेवाडांतील राजवैद्य जीवराम कालिदास शास्त्री (ज्यांनी पुढे संन्यास घेऊन 'चरण-तीर्थ' हे नाव धारण केले त्यांनी) भासाचे 'यज्ञफल' नाटक, समुद्रगुप्ताचे 'कृष्णचरित' काव्य, 'पूर्वपाणिनीयम्' नामक व्याकरणग्रंथ, भोजपत्री गीता, इत्यादि ग्रंथ प्रकाशित करून विद्वानांत मोठी खळबळ उडवून दिली होती. 'यज्ञफल' नाटकाने तर कै. डॉ. पी. के. गोडे, डॉ. रा. ना. दांडेकर यासारख्यांना चकविले होते. पण पुढे ते ग्रंथ त्यांनी पं. गोपालदत्त शास्त्री यांच्याकडून लिहवून घेऊन स्वतःच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध केले होते, हे त्या शास्त्र्यांनीच, त्यांच्याशी बेबनाव झाल्यावर, प्रसिद्ध केले होते. तरीहि डॉ. पुसाळकर यांना ते 'यज्ञफल' नाटक भासाचेच आहे असे शेवटपर्यंत वाटत होते. ते नाटक आणि समुद्रगुप्तकृत 'कृष्ण-चरित' काव्य ही बनावट आहेत हे मी इतरत्र सिद्ध केले आहे.[१०] 'भोजपत्री गीता' ही त्याच प्रकारची आहे हे डॉ. बेलवलकरांनी दाखविले होते. 'यज्ञफल' नाटकाच्या सत्यासत्यतेची परीक्षा करताना पंधरा वर्षांपूर्वी मी काढलेले उद्गार येथे देऊन हा प्रदीर्घ लेख समाप्त करतो[११]

"अशा प्रकारचे उद्योग आपल्या देशात फार प्राचीन काळापासून चालू आहेत. स्वतःच्या कृतीची प्रसिद्धि होऊन तिला मान्यता मिळावी

---

१०. संशोधनमुक्तावलि, सर २, पृ. ४६–६३. आणि तरुण भारत, नागपूर, सन १९५१, च्या दिवाळी अंकातील माझा लेख पाहा.

११. संशोधनमुक्तावलि, सर २, पृ. ६३.

या हेतूने अनेक विद्वानांनी स्वत: अज्ञात राहून आपले ग्रंथ–पुराणे, स्मृति, काव्ये, नाटके इत्यादि–प्राचीन ऋषींच्या किंवा प्रथितयश ग्रंथकारांच्या नावांवर खपविलेले आढळतात. त्यामुळे संस्कृतवाङमयेतिहासात अतिशय घोटाळा उत्पन्न झाला आहे. अठरा पुराणे व्यासानेच रचली की दुसऱ्या कोणी, कालिदास एक किंवा तीन, श्रीशंकराचार्यांच्या नावावर असलेले ग्रंथ त्यांनी रचले किंवा दुसऱ्या कोणी, इत्यादि प्रश्न त्यामुळेच उत्पन्न झाले आहेत. उपलब्ध पुराव्याची छाननी करून ते सोडविण्यात संशोधकांचे श्रम खर्ची पडत आहेत. अशा वेळी असे नवीन नवीन बनावट ग्रंथ रचून त्यांचे काम बिकट करणे योग्य होणार नाही. **कितीही कौशल्याने बनावट ग्रंथ रचले तरी आधुनिक चिकित्सक युगात सत्य उघडकीस आल्याशिवाय राहत नाही.** तेव्हा संस्कृत विद्वानांनी अशा प्रकारचे उद्योग करण्याचे सोडून आपली विद्वत्ता योग्य कार्यास लावावी."

'भारतीय इतिहास आणि संस्कृति' त्रैमासिकाच्या गेल्या (३८ व्या) पुस्तकातील निवेदनावरून देवासच्या सरदार चालुक्यांकडून काही कागदपत्र महाराष्ट्र सरकारच्या दफ्तरखान्यात आल्याचे कळते. त्यांनी मला पाठविलेल्या मागील एका पत्रात श्री. राजवाडे यांनी आपल्या वडिलांस फसविल्याचे कळविले होते. त्यांच्या कागदपत्रांची चिकित्सकपणे छाननी करावी असे सुचवितो.

१७. ‘अय्यणवंशचरिता’तील घासलेट तेलाचा काल्पनिक इतिहास*

‘भारतीय इतिहास आणि संस्कृति’ त्रैमासिकाच्या पु. ४३ (पृ. १५–२७) मध्ये श्री. देवीसिंग चौहान यांनी ‘महाराष्ट्रातील घासलेटचा वापर’ या शीर्षकाचा एक महत्त्वाचा आणि उद्‌बोधक लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी ‘ज्ञानेश्वरी’, नरेंद्रकृत ‘रुख्मिणीस्वयंवर’ आणि भास्करभट्टकृत ‘शिशुपालवध’ यांमध्ये आलेल्या ‘आगियेल’ या मराठी शब्दाने आणि बिल्हणाच्या ‘विक्रमांकदेवचरिता’त आलेल्या ‘पारसीक तेल’ या संस्कृत शब्दाने घासलेट (रॉकेल) तेल विवक्षित होते, असे दाखविले आहे. यापूर्वी पं. विश्वनाथ शास्त्री भारद्वाज यांनी आपल्या ‘विक्रमांकदेवचरिता’वरील (९–२०) टीकेत आणि श्री. बाळकृष्ण दाभाडे यांनी ‘महानुभाव मासिका’त[1] पारसीक तेलाचा तो अर्थ दाखविला, हे मान्य करून श्री. चौहान यांनी ‘अय्यणवंशचरिता’तील माहितीच्या साहाय्याने

---

* भारतीय इतिहास आणि संस्कृति, पृ. ४३, पृ. ३–१०.

१. हे मासिक माझ्या पाहण्यात आले नाही; पण श्री. दाभाडे यांनी नागपूरच्या ‘तरुण भारत’ दैनिकाच्या दि. ११–११–१९७२ च्या अंकात ‘नरेन्द्र कवि आणि पर्शियन तेल’ या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्याचे कात्रण माझ्या संग्रही आहे. त्या लेखात दाभाडे यांनी ‘पारसीकतैलाग्नि’ याचा ‘विक्रमांकदेवचरिता’ वरील इ. स. १२८६ मध्ये लिहिलेल्या संस्कृत टीकेतील अर्थ व डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांचे त्यावरील टिप्पण यांचा उल्लेख केला आहे. आगियेल म्हणजे केरोसीन तेल हे त्यांनी दाखविले आहे.

घासलेटचा वापर महाराष्ट्रात शके ८०० (ई. स. ८७८) मध्ये होत होता असे प्रतिपादिले आहे.

श्री. चौहान यांचा लेख वाचल्यावर त्यांनी दाखवून दिलेल्या 'आगियेल'चा अर्थ मनाला पटला. महाराष्ट्रात बिल्हणाच्या काळी म्हणजे इ. स. च्या अकराव्या शतकात पारसीक तेलाचा किंवा घासलेटाचा वापर होत होता या विषयी संशय राहिला नाही. पण त्यापूर्वी त्याचा उपयोग उत्तरकालीन चालुक्य नृपति तृतीय कीर्तिवर्मा याने युद्ध करून आपले राज्य विस्तारले होते, ही माहिती मात्र आश्चर्यजनक वाटली. अद्यापि या तेलाचा वापर युद्धात करून जय मिळविल्याचे कोठेही वाचले नव्हते. श्री. चौहान यांना ही माहिती 'अय्यणवंशचरिता'-वरून मिळाली असे वाचल्यावर तर माझे कुतूहल जास्तच वाढले. कारण ते काव्य बनावट आहे हे मी 'भारतीय इतिहास आणि संस्कृति' त्रैमासिकाच्या पु. ४० (पृ. ४८–६०) मध्ये सविस्तर दाखविले होते. म्हणून मी त्या काव्यातील वर्णनाचा जरा बारकाईने अभ्यास केला. त्यावरून त्यातील घासलेटची कथा केवळ काल्पनिक आहे, असे माझे मत झाले. त्याची प्रमाणे पुढे देत आहे.

'अय्यणवंशचरिता'तील या पारसीक तेलाचा भारतातील इतिहास श्री. चौहान यांनी पुढील प्रमाणे दिला आहे :–

"हे तेल चालुक्यवंशी कीर्तिवर्मा या उयोदन्मुख राजाला सिंध देशाच्या आपल्या राजमित्राकडून मिळाले असे म्हटले आहे. त्याचे असे झाले. या चालुक्यवंशाची राजसत्ता दुसऱ्या पुलकेशीनंतर शेपन्नास वर्षांनी म्हैसूर (महिशूर) प्रदेशात चालू होती. चालुक्य वंशाचे गोव्याच्या शिलाहार (शेलार) अपराजिताशी सोयरिकीचे नाते होते. दक्षिण गोव्यातील कोणा कदम्ब राजाने अपराजिताला हुसकवून लावून त्याचे राज्य घेतले. कदम्ब राजा समुद्रकिनाऱ्यावरील (प्रदेशाचा) व नौसैन्याचा स्वामी. म्हणून चालुक्य महीशूरपति भीम राजाने सिन्धु देशाच्या राजाचे साहाय्य घेऊन कदम्बांचा पराभव केला व अपराजित शिलाहाराला त्याचे राज्य पुनः परत करून दिले. त्यामुळे भीम चालुक्याची सिंधच्या राजाशी

विशेष मैत्री जडली. एकदा सिंधुराजाची बोट कदम्बवंशीयांनी लुटली. त्यामुळे चिडून सिंधुदेशाच्या राजाने चालुक्य नरेशाचे साहाय्य मिळवून वरील लुटीचा सूड घेतला. चालुक्यांच्या या मदतीने सिंधुराजा संतुष्ट झाला व त्याने चालुक्य नरेशाला एक परम अद्भुत असे रहस्य सांगितले. त्यामुळे चालुक्य राजाला सर्वत्र जय मिळविता आला.

हे अद्भुत रहस्य म्हणजे एक प्रकारचे तेल होते. ते चालुक नावाच्या प्राण्याला झाडाला अधोमुख बांधून त्याच्या खाली जाळ केला असता त्याच्या शरीरातून खाली पडते. त्या तेलाविषयी कवि म्हणतो–

तेन तैलेन दुर्गे वारण्य प्रज्वलितोनल: ।
कदापि न शमं याति जलेन सिकतेन वा ।
वायुना चोदित: शीघ्रं दावानलसमो भवेत् ।।

(या तेलाचा अग्नि पाण्याने किंवा वाळूने विझत नाही. उलट वायूचे साहाय्य झाल्यास तो दावानलासारखा पसरतो.)

हे वर्णन पारंपरिक कल्पनात्मक असले तरी वस्तुत: ते तेल इराण –बाकू देशांतून आणलेले घासलेटच होय. त्याचे वरील वर्णन घासलेटला जुळते.

नंतर कीर्तिवर्म्याने कल्याणीच्या व वातापीच्या सगळ्या राजांना जिंकले. हा कीर्तिवर्मा शके ८१९ पर्यंत राज्य करीत असावा. तेव्हा घासलेटचा दक्षिणेत प्रचार शक संवत ८०० (ई. स. ८७८) च्या आसपासचा आहे."

आता आपण या वृत्तांताची सत्यासत्यता उपलब्ध पुराव्याच्या कसोटीने निश्चित करण्याचा प्रयत्न करू.

'अय्यणवंशचरित काव्य' श्यामभट्टाने शक संवत् १७३७ मध्ये (अर्थात् पेशवाई नष्ट होण्यापूर्वी तीन वर्षे, सन १८१५ मध्ये) रचले असे त्या काव्यात (पृ. १५३) म्हटले आहे. त्या काव्यात ९४ इतके कालोल्लेख आहेत. ते त्या काळी श्यामभट्टाला माहीत असणे शक्य नव्हते; कारण ते गेल्या दीडशे वर्षांतील अनेक विद्वानांच्या दीर्घ परिश्रमाने केलेल्या संशोधनाने प्राप्त झाले आहेत, हे मी मागील लेखात

दाखविले होते. तरीही श्री. चौहान ‘या ग्रंथाच्या उपलब्धीमुळे महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासात मोलाची भर पडली आहे’ असे म्हणतात. तेव्हा उपरिनिर्दिष्ट वर्णन काळजीपूर्वक तपासले पाहिजे.

वरील वर्णनात सकृद्दर्शनीच हे आढळते की त्यांत चालुक्य नृपति भीम व कीर्तिवर्मा आणि शिलाहार नृपति अपराजित यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही राजाचा नामनिर्देश नाही. आरंभापासून ९४ इतके निश्चित कालोल्लेख करणाऱ्या श्यामभट्टाने वरील वृत्तांतातील सिंधुराजाचे व कदंबराजाचे नाव देऊ नये हे चमत्कारिक वाटते. तथापि उपलब्ध राजनामांचा उपयोग करून प्रस्तुत प्रकरणावर काय प्रकाश पडतो ते पाहू.

वर उल्लेखिलेला कीर्तिवर्मा हा चालुक्यवंशांतला तिसरा कीर्तिवर्मा होय. त्याची पुढील वंशावळ ‘अय्यणवंशचरित’काव्यात आणि त्या काव्यास जोडलेल्या परिशिष्टात पुढील प्रमाणे दिली आहे :–

१. काव्यातील वंशावळ

- द्वितीय पुलकेशी
  - धराश्रय (जयसिंह)
    - शिलादित्य
    - मंगलेश
      - माणिक्यादित्य
        - नरसिंह
          - कतियारक
            - विमलादित्य
              - भीम
                - तृतीय कीर्तिवर्मा
    - पुलकेशी

२. परिशिष्टातील वंशावळ

- द्वितीय पुलकेशी
  - धराश्रय जयसिंह
    - शिलादित्य
    - मंगलेश
      - माणिकदेव
        - नरसिंहदेव
          - गोगीदेव
            - केशवदेव
              - वीरविजय भीमदेव
                - कीर्तिवर्मा (तिसरा)
    - पुलकेशी

यातील कोणती वंशावळ खरी मानावयाची ? कोणतीही घेतली तरी ती शिलालेख ताम्रपटादि अस्सल ऐतिहासिक साधनांशी जुळत नाही.

मागील लेखात सांगितल्याप्रमाणे पूर्वकालीन चालुक्यांचा अस्त सन ७५७ च्या सुमारास झाला. नंतर २१६ वर्षांनी उत्तरकालीन चालुक्य सुमारे सन ९७३ मध्ये उदयास आले. मध्यंतरीच्या काळातील ऐतिहासिक साधने उपलब्ध नाहीत. उत्तरकालीन चालुक्यांनी आपल्या नंतरच्या लेखांत आपली वंशावळ पूर्वकालीन चालुक्यांच्या वंशावळीशी कशी बशी जोडली आहे हे खाली दिलेल्या दोन वंशावळींची तुलना केल्यावर दिसून येईल–

(कोरीव लेखांत दिलेल्या वंशावळी)

(३) पूर्वकालीन चालुक्य वंशावळ

द्वितीय पुलकेशी
|
प्रथम विक्रमादित्य
|
विनयादित्य
|
विजयादित्य
|
द्वितीय विक्रमादित्य
|
द्वितीय कीर्तिवर्मन्

(४) उत्तरकालीन चालुक्यांची आरंभापासून वंशावळ

सत्याश्रय (द्वितीय पुलकेशी)
|
नेडमरि
|
आदित्यवर्मन्
|
प्रथम विक्रमादित्य
|
युद्धमल्ल
|
विजयादित्य
|
द्वितीय विक्रमादित्य
|
द्वितीय कीर्तिवर्मन् — भीम
भीम
|
तृतीय कीर्तिवर्म

वरील दोन्ही वंशावळी कोरीव लेखांवरून ज्ञात झाल्या आहेत. त्यांपैकी क्र. ३ ची वंशावळ समकालीन कोरीव लेखांवरून ज्ञात झालेली, अतएव अत्यंत विश्वसनीय आहे. क्र. ४ ची वंशावळ उत्तरकालीन चालुक्य नृपति पंचम विक्रमादित्य याचा ई. सन १००९ चा कवठे ताम्रपट,[२] द्वितीय जयसिंह याचा इ. स. १०२४ चा मिरज ताम्रपट[३] इत्यादि नंतरच्या ताम्रपटांवरून ज्ञात झालेली आहे. पूर्वकालीन चालुक्य नृपति द्वितीय कीर्तिवर्मा याच्या इ. स. ७५३ मधील उच्छेदानंतर क्र. ४ ची वंशावळ सुमारे अडीचशे वर्षांनी बनविली असल्यामुळे ती अविश्वसनीय आहे. केवळ अडीचशे वर्षांनी बनविलेल्या वंशावळीची ही कथा ! मग सहस्राधिक वर्षांनी (सन १८१५ मध्ये) रचलेल्या श्यामभट्टाच्या ‘अय्यणचरिता’तील उपरिनिर्दिष्ट क्र. १ ची वंशावळ या दोन्हींहून भिन्न अतएव अत्यंत अविश्वसनीय आहे यात आश्चर्य काय ? तेव्हा त्या काव्यातील विधाने काळजीपूर्वक तपासल्यावरच ग्राह्य धरली पाहिजेत.

‘अय्यणवंशचरिता’त म्हटले आहे, की ‘द्वितीय पुलकेशीचा मुलगा धराश्रय जयसिंह याला शीलादित्य, मंगलेश व पुलकेशी (उर्फ अवनिजनाश्रय) असे तीन पुत्र होते. त्यांतील शीलादित्य आणि (अवनिजनाश्रय) पुलकेशी हे निपुत्रिक वारले; मग मंगलेशाच्या पुत्र-पौत्रांनी महीशूर (मैसूर) प्रदेशात राज्य स्थापले. त्या वंशात पुढे भीम व तृतीय कीर्तिवर्मा हे उत्तरकालीन चालुक्य राजे झाले.’ या विधानांना काडीचाही आधार नाही. मंगलेशाचे (वस्तुतः मंगलरसाचे) ताम्रपट ठाणा जिल्ह्यात सापडले आहेत खरे,[४] पण त्याच्या वंशजांचा अद्यापि एकही कोरीव लेख मिळाला नाही. ते मैसूर जवळच्या प्रदेशावर राज्य करीत होते याला मुळीच आधार नाही. द्वितीय तैलप याच्या काळी (ई. स. ९७३ मध्ये) उत्तरकालीन चालुक्य मैसूर जवळच्या प्रदेशात

२. इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १६, पृ. २१ इ.

३. पूर्वोक्त, व्हॉ. ८, पृ. ११ इ.

४. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. २८, पृ. १७ इ. आणि जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी, व्हॉ. १६, पृ. ५ इ.

नव्हे, तर विजापूर जिल्ह्यात उदयाला आले. त्या जिल्ह्यातील भीमा नदीच्या काठच्या तर्दवाडी (सध्या तर्द्देवाडी) येथे चालुक्य नृपति द्वितीय तैलप हा राष्ट्रकूटांचा मांडलिक म्हणून राज्य करीत होता.[५] पुढे त्याने राष्ट्रकूट सम्राटाचा उच्छेद करून स्वत:चे स्वतंत्र राज्य स्थापले. तो तृतीय कीर्तिवर्म्याचा सहावा वंशज[६] ! तेव्हा त्याच्या पूर्वी सहा पिढ्या होऊन गेलेल्या मैसूरच्या भीमपुत्र तृतीय कीर्तिवर्म्याने सिंधुराजाकडून घासलेटचे रहस्य संपादन करून त्याच्या साहाय्याने आपले साम्राज्य स्थापले ही केवळ लोणकडी थाप !

आता महीशूरच्या भीम राजाने शेलार (शिलाहार) नृपति अपराजित याला दक्षिण गोव्यातील कदंबांविरुद्ध मदत करून त्याचे राज्य मिळवून दिले, या विधानाचे परीक्षण करू.

हा भीमराजा शक संवत् ८९५ (इ. स. ९७३–७४) मध्ये गादीवर आलेल्या द्वितीय तैलपाचा सातवा पूर्वज. तेव्हा त्याच्या कारकीर्दीचा आरंभ (प्रत्येक पिढी २० वर्षांची धरल्यास) सुमारे शक संवत् ७५५ (इ. स. ८३३) मध्ये यावा.[७] 'या भीमराजाने दक्षिण गोव्याच्या कदंबांपासून शेलार (शिलाहार) राजाचे रक्षण केले ' या विधानाची आता छाननी करू.

गोव्याच्या कदंबांचा मूळ पुरुष कंटकाचार्य होता. त्याचे कोरीव लेख सापडले नाहीत. तथापि त्याचा नातू प्रथम षष्ठदेव हा शक संवत् ९२८ मध्ये राज्य करीत होता.[८] त्यावरून कंटकाचार्य सुमारे शक संवत ८८० मध्ये राज्य करीत असावा. त्याच्या १२५ वर्षे पूर्वी (शक

---

५. हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल, व्हॉ. ५, पृ. १६१.

६. 'अय्यणवंशचरिता 'च्या शेवटी दिलेली वंशावळ पाहा. भीमदेव ते द्वितीय तैलप पर्यंतचा या वंशावळीचा भाग कोरीव लेखांतल्या प्रमाणे आहे.

७. पूर्वोक्त वंशावळ पाहा.

८. इं. अँ. व्हॉ., १२, पृ. २१२ इ.

संवत ७५५ मध्ये) कोणी कदंब राजा दक्षिण गोव्यात राज्य करीत होता याला पुरावा नाही.

बरे, शक संवत ७५५ (इ. स. ८३३) मध्ये कोणी अपराजित नामक शिलाहार राजा तरी उत्तर गोवा प्रदेशात किंवा कोकणात राज्य करीत होता काय ? इतिहासात फक्त एकच अपराजित नामक शिलाहार राजा ज्ञात आहे. तो उत्तर कोकणात सुमारे सन ९७५–१०१० या काळात म्हणजे चालुक्य प्रथम भीमानंतर सुमारे दीडशे वर्षांनी राज्य करीत होता[९] तेव्हा चालुक्य नृपति प्रथम भीमाने त्याला साहाय्य केले असणे शक्य नाही.

तेव्हा चालुक्य नृपति प्रथम भीमाचे समकालीन कदंब नृपति व शिलाहार अपराजित अद्यापि (श्यामभट्टानंतर दीडशे वर्षांच्या संशोधनानंतरही) ज्ञात झाले नाहीत. श्यामभट्टाच्या काळी ते ज्ञात होते आणि त्यानंतर ते अज्ञात झाले असणे अत्यंत असंभवनीय आहे.

महीशूरच्या या तृतीय कीर्तिवर्म्याने वातापि (विजापूर जिल्ह्यातील बादामी) आणि कल्याणी यांच्या परिसरातील राजांना जिंकले असे 'अय्यणवंशचरिता 'त (६, २४) म्हटले आहे. पण या काळी वातापि उद्ध्वस्त झाली होती व कल्याणी ही राजधानी झाली नव्हती. म्हणून श्यामभट्टाचे हे विधान असत्य आहे.[१०] चौऱ्याण्णव निश्चित कालोल्लेख करणाऱ्या या श्यामभट्टाचे चालुक्य, कदंब आणि शिलाहार राजांविषयीचे हे सर्व उल्लेख असत्य आणि काल्पनिक सिद्ध झाले आहेत. तेव्हा त्याने वर्णिलेली चालुक प्राण्यापासून घासलेट तेल मिळते ही अद्भुत गोष्ट तरी खरी कशी मानावयाची ? आणि त्याच्या वर्णनावरून शक संवत् ८०० (सन ८७८) या कालात महाराष्ट्रात घासलेटचा प्रचार होता हे तरी कसे खरे मानावयाचे ?

---

९. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ. १९.

१०. द्वितीय तैलपाने इ. स. ९९३ नंतर कल्याणी येथे आपली राजधानी केली त्यापूर्वी तो मान्यखेटाहूनच राज्य करीत होता. हि. क. इं. पी., व्हॉ. ५, पृ. १६७.

मग श्यामभट्टाने हे वर्णन कसे केले, हा प्रश्न उपस्थित होतो. माझ्या मागील लेखात दाखविल्याप्रमाणे हे 'अय्यणवंशचरित' काव्य अलीकडच्या प्राचीन भारतीय इतिहासाच्या संशोधनाची माहिती असलेल्या कोणा संस्कृत पंडिताने रचले आहे. या पंडिताला विक्रमांकदेवचरितातील 'पारसीक तेला'चा उल्लेख माहीत असावा व त्याच्या वर्णनावरून ते घासलेट तेल असावे हेही त्याच्या लक्षात आले असले पाहिजे.[११] हा पंडित प्राचीन इतिहासाचा अभ्यासक असल्याने त्याला गोव्याचे कदंब आणि उत्तर कोकणचे शिलाहार यांच्यातला दीर्घकालीन संघर्ष माहीत असावा. म्हणून त्याने तथाकथित मैसूर नृपति भीम व सिंध राजांचे कदम्बांच्या उच्छेदाकरिता सख्य कल्पून सिंधच्या राजाकडून भीमपुत्र कीर्तिवर्म्याला या घासलेट तेलाची माहिती प्राप्त झाल्याची काल्पनिक कथा रचली आहे. श्री. चौहान यांनी त्याच्याही पुढे जाऊन त्या कीर्तिवर्म्याने त्या तेलाचा प्रभाव पाहून आपल्या पुत्राचे नाव तैलप ठेवले असे अनुमान केले आहे. वरील विवेचनावरून ह्या दोन्ही घटना केवळ काल्पनिक आहेत हे वाचकांच्या ध्यानात येईल अशी आशा आहे.

हा लेख लिहून झाल्यावर श्री. देवीसिंह चौहान यांनी माझ्या पत्राच्या उत्तरात कळविले की आपण आपला लेख 'इतिहास आणि संस्कृति' त्रैमासिकात प्रकाशनार्थ दोन वर्षांपूर्वी पाठविला होता. 'अय्यणवंशचरिता'वरील माझा मागील लेख प्रसिद्ध झाल्यावर त्यांनी त्या काव्यावर आधारलेले सर्व प्रतिपादन गाळण्याविषयी संपादकांस कळविले होते. पण काही चुकीमुळे ती दुरुस्ती गहाळ होऊन सर्व लेख छापला गेला. 'अय्यणवंशचरित' म्हणजे एक अप्रामाणिकपणाचा प्रयत्न आहे याविषयी आपली खात्री झाली आहे असे त्यांनी कळविले आहे.

---

११. 'अय्यणवंशचरिता'चे संपादक पं. विश्वनाथ शास्त्री भारद्वाज यांनी 'विक्रमांकदेवचरित' यापूर्वी टीकेसह प्रकाशित केले होते. 'अय्यणवंशचरिता'ची त्यांनी लिहिलेली भूमिका पाहा.

१८. कालिदास-स्मारकातील चित्रांचा भारतीय संस्कृतिदृष्टया विचार*

(प्रतिमा क्र. ९ ते ११)

सन १९१९ च्या जून महिन्यात नोकरीच्या निमित्ताने माझे नागपुरास आगमन झाल्यावर लौकरच रामटेक येथे जाण्याचा योग आला. त्या काळी रामटेकची पुण्य क्षेत्र म्हणून ख्याति होती. पण त्याला ऐतिहासिक महत्त्व नव्हते. त्यानंतर माझे विदर्भाच्या प्राचीन इतिहासाकडे लक्ष वळून मी ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत विदर्भावर राज्य करीत असलेल्या वाकाटक राजवंशाच्या इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करू लागलो. तेव्हा रामटेकपासून केवळ तीन मैल अंतरावरचे नंदिवर्धन (सध्याचे नंदरधन) येथे वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेची राजधानी होती असे आढळून आले. वाकाटकांच्या पुणे येथे सापडलेल्या ताम्रपटावरून वाकाटक आणि गुप्त या राजघराण्यांचा ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या शेवटी झालेला वैवाहिक संबंध माहीत झाला. कलिदासाच्या कालाच्या साधनांचा चिकित्सक अभ्यास केल्यावर तो गुप्त नृपति द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याच्या दरबारी राजकवि होता हे निश्चित करता आले. त्याने 'सेतुबन्ध' काव्य आपला आश्रयदाता महाराजाधिराज विक्रमादित्य याच्या आज्ञेने महाराज प्रवरसेन याच्याकरिता रचले या, त्या काव्याच्या एका प्राचीन टीकाकाराने उल्लेखिलेल्या, आख्यायिकेवरून कालिदासाने वाकाटक राजधानी नन्दिवर्धन येथे काही काल वास्तव्य केले होते, हे स्पष्ट झाले. तेव्हा त्या कवीने

* विदर्भ संशोधन मंडळ, १९७४, पृ. १५६–१८२.

आपल्या नितान्तमधुर अशा ‘ मेघदूत ’ काव्यात यक्षाचे निवासस्थान म्हणून वर्णिलेला ‘ रामगिरि ’ हा रामटेकच याची निश्चिति झाली. नंतर रामटेकवरील लक्ष्मणाच्या देवळात बसविलेल्या शिलालेखात त्या टेकडीचे नाव ‘ रामगिरि ’ म्हणून उल्लेखिलेले पाहिल्यावर ते समीकरण दृढ झाले. पुढे प्राचीन महानुभाव वाङ्मयात रामटेक येथील राम-लक्ष्मणांच्या देवळांच्या वर्णनात ‘ सीतेच्या न्हाणी ’चा उल्लेख पाहिला. तो मेघदूतातील ‘ जनकतनयास्नानपुण्योदकेषु आश्रमेषु ’ या वर्णनास जुळला. रामगिरीपासून विदिशेपर्यंतचा मेघदूतात वर्णिलेला मेघमार्ग रामटेकासच जुळतो दुसऱ्या कोणत्याही रामगड, रामशेज, इत्यादि राम-नामांकित पर्वतांस जुळत नाही हे पाहिल्यावर तर संशयास मुळीच जागा राहिली नाही.

“ ‘ मेघदूता ’त वर्णिलेला रामगिरि म्हणजे रामटेक ” हे समीकरण मी सन १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या माझ्या ‘ कालिदास ’ ग्रंथात प्रथम प्रतिपादिले. नंतर गेल्या चाळीस वर्षात इतरांनी प्रतिपादिलेल्या अन्य समीकरणांची चिकित्सक छाननी करून ती कशी अग्राह्य आहेत हे दाख-विले. आता हे समीकरण सर्व मान्यवर इतिहासकारांनी व संशोधकांनी स्वीकारले आहे. त्यांची मते विदर्भ संशोधन मंडळाने १९५९ मध्ये प्रकाशित केलेल्या ‘ मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक ’ या माझ्या मराठी व हिंदी पुस्तकांत दिली आहेत.

सन १९५५ मध्ये मेघदूतातील रामगिरीचे रामटेकशी समीकरण तत्कालीन मध्यप्रदेश सरकारला मान्य होऊन रामटेकवरील संकल्पित कालिदास–स्मारकाचे स्वरूप निश्चित करण्याकरिता मुख्य प्रधान पं. रविशंकर शुक्ल यांनी समिति नेमून त्याकरिता लागणाऱ्या रकमेची तरतूद त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात केली होती. पुढे अनेक स्थित्यंतरांतून ही योजना जाऊन शेवटी १९७३ च्या डिसेंबर महिन्यात हे कालिदास–स्मारक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांच्या हस्ते संपन्न झाले. आणि त्या स्मारकाविषयीचे माझे स्वप्न ‘ याची देहीं याची डोळां ’ साकार झाले. स्मारक–मंदिर पूर्ण होत आल्यावर ते कालिदासीय

ग्रंथांतील प्रसंगांच्या विशाल चित्रांनी सुशोभित करावे, अशी सूचना मी महाराष्ट्र शासनास केली होती. ती मान्य होऊन कलासंचालक, महाराष्ट्र राज्य, श्री. सातवळेकर यांनी संकल्पित चित्रांच्या विषयांविषयी माझ्या सूचना १९७२ मध्ये मागविल्या होत्या. शेवटी चित्रांचे विषय चित्रकारांच्या इच्छेवर सोपवावे असे ठरून चित्रे तयार करविण्यात आली. ती आता रामटेकवरील कालिदास–स्मारकात लावली आहेत.

सामान्य जनांना चित्रकलेचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना या चित्रांतील सौंदर्याची यथार्थ कल्पना येणार नाही. म्हणून नागपूर येथील चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. वसंतराव परब यांचे तद्विषयक व्याख्यान विदर्भ संशोधन मंडळात गत वर्षी आयोजिले होते. त्या चित्रांतील कलेची यथार्थ कल्पना यावी म्हणून मंडळाच्या विनंतीवरून प्रा. परब यांनी लिहिलेला तद्विषयक लेख १९७४ च्या वार्षिकात दिला आहे. त्या चित्रांच्या प्रतिकृति मंडळाच्या सभागृहात लावल्या आहेत. प्रा. परब यांच्या लेखाच्या साहाय्याने निरीक्षकांना त्यांतील कलेचा आस्वाद घेता येईल.

या निमित्ताने मी या चित्रांचा थोडाबहुत अभ्यास केला. त्यावरून माझ्या मनात आलेले विचार प्रस्तुत लेखात मांडणार आहे. मी चित्रकलाभिज्ञ नाही. प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यासक आहे. त्या संस्कृतीच्या दृष्टीने या चित्रांचा विचार करणार आहे.

कालिदास–स्मारकात लावलेल्या त्या कवीच्या ग्रंथांतील प्रसंगांच्या चित्रांत तत्कालीन संस्कृतीचे यथार्थ स्वरूप दिसावे अशी कोणाचीही साहजिकच अपेक्षा असणार. कालिदास ख्रिस्तोत्तर ४०० च्या सुमारास होऊन गेला हे मत आता सर्वमान्य झाले आहे. तत्कालीन संस्कृतीची माहिती केवळ त्याच्या ग्रंथांवरूनच नव्हे तर इतर साधनांवरूनही आपणांस मिळविता येते. अजंट्याची क्र. १६, १७ व १९ ची लेणी वाकाटकांच्या राजवटीत त्यांच्या एका मंत्र्याने व खानदेशातील मांडलिकाने

कोरविली होती हे सिद्ध झाले आहे[१] १६ आणि १७ या लेण्यांतच तत्कालीन अनेक चित्रे अद्यापि बऱ्याचश्या सुस्थितीत आहेत. कालिदास गुप्त–वाकाटककाली होऊन गेला हे मागे दाखविले आहे. तेव्हा त्याच्या कालातील संस्कृतीच्या ज्ञानाचे एक महत्त्वाचे साधन आपणांस सुदैवाने अद्यापि उपलब्ध आहे. त्याचा उपयोग चित्रकारांनी करावा, अशीच कोणाचीही अपेक्षा असणार.

सन १९१९ मध्ये पुण्यात अखिल भारतीय प्राच्यविद्यापरिषदेचे अधिवेशन झाले. तेव्हा ' महाभारता 'ची चिकित्सक आवृत्ति भांडारकर संशोधन मंडळाने काढावी असे ठरले. त्यावेळी औंध संस्थानचे राजेसाहेब श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधि यांनी तदर्थ एक लक्ष रुपयांची उदार देणगी जाहीर करून त्या आवृत्तीला योग्य चित्रांनी विभूषित करण्याचे काम हाती घेतले आणि ते यथावकाश पूर्ण केले. ती चित्रे त्यांनी आपल्या चित्रकारांकडून अजंट्याच्या चित्रकलेस अनुसरून काढविली होती. अजंट्याची लेणी महाभारत–कालानंतर शेकडो वर्षांनी कोरविली होती आणि शिल्पचित्रादिकांनी विभूषित केली होती, तरी भारतीय संस्कृतीचे स्थितिशीलत्व (conservatism) लक्षात घेता ती चित्रे महाभारतकालीन संस्कृतीची निदर्शक मानणे चुकीचे होणार नाही असे त्यांनी प्रतिपादिले होते. कालिदास तर अजंट्याच्या सोळा, सतरा व एकोणीस क्रमांकांच्या लेण्यांचा समकालीन होता. तेव्हा त्या लेण्यांतील चित्रांना व शिल्पांना तत्कालीन संस्कृतीचे प्रतिनिधि मानण्यात मुळीच प्रत्यवाय नसावा.

पण कालिदास–स्मारकातील ही चित्रे पूर्वोक्त अजंटा पद्धतीची नाहीत. त्यांतील व्यक्तींची वेषभूषा, गृहादिकांतील उपकरणे, वाद्ये वगैरे गप्त–वाकाटककालीन नाहीत. चित्रकारांनी तत्कालीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करून ती चित्रे रेखाटली नाहीत हा दोष सकृद्दर्शनीच लक्षात येतो.

---

१. मिराशी ' वाकाटक नृपति आणि त्यांचा काल ', पृ. ३४१-३८८ पाहा.

दुसरी गोष्ट अशी की कालिदासाच्या ग्रंथांत आलेल्या प्रसंगांची चित्रे काढावयाची तर ती त्या प्रसंगांस सर्वस्वी अनुसरून असली पाहिजेत. त्याकरिता चित्रकारांनी कालिदासीय ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला असला पाहिजे आणि त्यांना भारतीय संस्कृतीचे चांगले ज्ञान असले पाहिजे. प्रस्तुत चित्रे त्या कसोटीस उतरत नाहीत हे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते. या प्रश्नाच्या विवेचनाकरिता आपण काही चित्रांचे परीक्षण करू.

कुमारसंभव–या काव्यात वर्णिलेला शिव–पार्वती–विवाह हा या चित्राचा विषय आहे. शंकराच्या आकृति चार ठिकाणी विविध प्रसंगांच्या निमित्ताने काढल्या आहेत. सर्व ठिकाणी त्याचा वर्ण गडद निळा दाखविला आहे. भारतीय परंपरागत श्रद्धेप्रमाणे भगवान् शंकर गौरवर्णी आहेत. देवांच्या पूजेत कर्पूरारतीच्या वेळी आपण ' कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम् । सदा वसन्तं हृदयारविन्दे भवं भवानीसहितं नमामि ।।' हा श्लोक म्हणून कापूर लावतो. यात भगवान् शंकराचे ' कापराप्रमाणे गौरवर्णी ' असे वर्णन केले आहे. रामदासकृत शंकराच्या आरतीतही ' कर्पूरगौर भोळा नयनी विशाळा ' असेच त्याचे वर्णन केले आहे. कालिदासालाही हेच विवक्षित होते. त्याने ' कुमारसंभवा 'त (सर्ग २, श्लो. ६१; सर्ग ६, श्लो. ८१) ' शितिकण्ठ ' आणि (सर्ग ५ श्लो. ५७) ' नीलकण्ठ ' अशी शंकराची विशेषणे योजिली आहेत. त्यांवरूनही त्याचे गौरवर्णत्व सूचित होते. त्याने समुद्रमंथनातून उत्पन्न झालेले हालाहल विष प्राशन केले म्हणून त्याचा फक्त कंठ काळा झाला, अशी कथा आहे. शंकर कृष्णवर्णी असता तर त्याचा निळा कंठ प्रामुख्याने दिसला नसता. तेव्हा चित्रात शंकराचा केवळ कंठच नव्हे तर सर्व शरीर गडद निळे दाखविले आहे. ही ढोबळ चूक आहे, यात संशय नाही.

मेघदूत–यानंतर आपण ' मेघदूता 'चे चित्र घेऊ. या चित्रातील यक्षाची आकृति भारतीय परंपरेला अनुसरून नाही. भारतात अनेक ठिकाणी गुप्तकालीन यक्षमूर्ति सापडल्या आहेत. त्यांवरून यक्षाची मूर्ति चित्रित करावयास हवी होती.

प्रस्तुत चित्रातील मुख्य कल्पना ही की, रामगिरीवर पत्नीपासून वियुक्त झालेला यक्ष आपल्या कल्पनेने अलकेतील आपल्या विरही पत्नीच्या विविध व्यापारांविषयी कोणत्या कल्पना करीत होता हे दाखविणे. चित्राच्या मध्यभागी यक्षपत्नीचे पूर्ण चित्र दाखविले आहे त्यावरून तिच्या सौंदर्याची कल्पना यावी. यक्षाने आपल्या पत्नीचे वर्णन पुढील श्लोकात केले आहे–

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः ।
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः ॥ श्लो. ८३ ॥

चित्रातील मध्यभागी उभी असलेली यक्षपत्नी या प्रकारची आहे काय हे वाचकांनी ठरवावे !

चित्राच्या ऊर्ध्वभागी पाच ठिकाणी यक्षपत्नीची आकृति रेखाटली आहे. त्यावरून ती दिवस–रात्र कशी घालवीत असावी याविषयी यक्षाच्या कल्पना 'मेघदूता'स अनुसरून चित्रित केल्या आहेत. त्या सर्वांत एक गोष्ट विशेषेकरून लक्षात येते ती ही की, यक्षपत्नीने आपले केस सर्वत्र मोकळे सोडले आहेत. तिच्या विरहिणी अवस्थेचे हे गमक आहे असे चित्रकर्त्याला विवक्षित असावे. पण ते भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध आहे.

संस्कृत वाङ्मयात अनेक ठिकाणी प्रोषितभर्तृका किंवा विरहिणी स्त्रियांचे वर्णन आहे. त्यात कोठेही त्यांच्या लंबालकत्वाचा उल्लेख नाही. सर्वत्र त्यांचे 'एकवेणीधरा' असेच वर्णन येते. यक्षानेही खालील श्लोकात (श्लो. ९६) आपल्या पत्नीचे तसेच वर्णन केले आहे—

आद्ये बद्धा विरहदिवसे या शिखा दाम हित्वा
शापस्यान्ते विगलितशुचा तां मयोद्वेष्टनीयाम् ।
स्पर्शक्लिष्टामयमितनखेनासकृत्सारयन्तीं
गण्डाभोगात्कठिनविषमामेकवेणीं करेण ॥

त्या काळची पद्धत ही की पति परगावी जाताना आपल्या पत्नीची एक पेडाची वेणी घाली. त्याची विरहिणी पत्नी तो परत येईपर्यंत एक पेडाची वेणीच घालीत असे. परत आल्यावर पतीने ती एक पेडाची वेणी सोडावयाची असे. नंतर ती विविध प्रकारची केशरचना करू शके.

प्रोषितभर्तृका स्त्रियांच्या 'एकवेणी'चा उल्लेख कालिदासाने अनेक ठिकाणी केला आहे. खालील उतारे पाहा–

१. आपल्या पत्नीला पाठविलेल्या संदेशात यक्ष आपल्या मेघदूताचे खालील वर्णन करतो–

यो वृन्दानि त्वरयति पथि श्राम्यतां प्रोषितानां
मन्द्रस्निग्धध्वनिभिरबलावेणिमोक्षोत्सुकानि ॥१०४॥

२. 'अभिज्ञानशाकुन्तला'च्या सातव्या अंकातील, प्रत्याख्यात शकुंतलेचे खालील वर्णन पाहा–

वसने परिधूसरे वसाना नियमक्षाममुखो धृतैकवेणिः ।

अशी वर्णने केवळ कालिदासच नव्हे तर सर्व संस्कृत कवि करतात. 'वाल्मीकिरामायणा'च्या सुंदरकांडांतील (सर्ग १५, श्लो. २५) हनुमानाला अशोकवटिकेत सीता कशी दिसली याचे वर्णन पाहा–

नीलनागाभया वेण्या जघनं गतयैकया
नीलया नीरदापाये वनराज्या महीमिव ॥

'उत्तररामचरिता'च्या तिसऱ्या अंकातील परित्यक्ता सीतेचे वर्णन तसेच आहे—

परिपाण्डुदुर्बलकपोलसुन्दरं दधती विलोलकबरीकमाननम् । (३,४)

तेव्हा विरहिणी स्त्रिया एका पेडाची वेणी धारण करीत असत यात संशय नाही.

डॉ. सौ. सिंधु डांगे यांनी एका लेखात या 'एकवेणी'चा निराळाच अर्थ सुचविला आहे.[२] त्या म्हणतात, "एक वेणी म्हणजे एका पेडाची वेणी,

---

२. Sindhu S. Dange, The Symbolism of the Veṇī, *Ind. Ant.* (Third Series), Vol. V, pp. 36–68.

हा अर्थ बरोबर नाही. कारण अशी वेणी दीर्घकाल ठेवणे शक्य नाही. स्त्रियांना मधून मधून डोक्यावरून स्नान करावेच लागते. तेव्हा एक वेणी म्हणजे पाठीवर मोकळे सोडलेले किंवा खाली रिबनसारख्या एकेरी दोऱ्याने बांधलेले केस होत. ‘वेणीसंहारा’त द्रौपदीने आपले केस असे ठेवले होते. भीमाने दुर्योधनाला ठार मारल्यावर त्या केसांची वेणी घातली होती. त्यावरूनही असे केस ठेवले जात असत असे दिसते.” ‘विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक १९७४’च्या अंकातील आपल्या लेखात त्यांनी ‘एकवेणी’चा हाच अर्थ पुन: दिला आहे.

पण हा अर्थ बरोबर नाही. डॉ. डांगे समजतात त्या तऱ्हेच्या केसांना ‘मुक्तवेणी’ म्हणत, ‘एकवेणी’ नव्हे. ‘वेणीसंहारा’तील (अंक १, श्लोक १९) भीमाच्या तोंडी घातलेला खालील श्लोक पाहा—

कौरव्यवंशदावेऽस्मिन्क एष शलभायते ।
मुक्तवेणीं स्पृशन्नेनां कृष्णां धूमशिखामिव ।।

प्रवासास जाताना पति आपल्या पत्नीची एकपेडाची वेणी घालत असे आणि परत आल्यावर ती सोडत असे. एकवेणी धारण करणे हे प्रोषित-भर्तृकत्वाचे द्योतक होते. मध्यंतरीच्या काळात स्नानादिकांच्या वेळीही ती सोडू नये असे कोठेही म्हटले नाही. विरहिणी स्त्रिया फक्त तैलादिकांनी केश-संस्कार करीत नसत. म्हणून एकवेणी धारण करणाऱ्या स्त्रियांचे केस रूक्ष, मुखावर व गालावर येतात असे वर्णन आढळते. ‘मेघदूत’ श्लोक ९५ मधील यक्षपत्नीचे—

शुद्धस्नानात्परुषमलकं नूनमागण्डलम्बम् ।

हे वर्णन पाहा. त्यात यक्षपत्नीने तैलादि स्निग्ध पदार्थ न वापरता ‘शुद्ध’ स्नान केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हा एकवेणी म्हणजे एक पेडाची वेणी हाच अर्थ बरोबर आहे.

याच्या उलट प्रस्तुत चित्रातल्याप्रमाणे पाठीवर केस मोकळे सोडले तर ते गतभर्तृकत्वाचे चिन्ह मानले जात असे. ‘हरिवंशा’त वर्णिले आहे की जेव्हा कृष्ण आणि बलराम कंसाच्या बोलावण्यावरून मथुरेत

प्रवेश करते झाले, तेव्हा त्यांना वाटेत कंसाचा रजक (धोबी) वस्त्रे घेऊन जाताना दिसला. त्यांनी ती वस्त्रे मागितली. तेव्हा त्याने उर्मटपणे उत्तर दिले. तेव्हा चिडून कृष्णाने त्याला तेथेच ठार केले. हे पाहून त्याच्या स्त्रियांनी केस मोकळे सोडून कंसाकडे आक्रोश करीत धाव घेतली—

तं हतं परिदेवन्त्यो भार्यास्तस्य विचुक्रुशुः ।
त्वरितं मुक्तकेश्यश्च जग्मुः कंसनिवेशनम् ।।
(हरिवंश—चिकित्सक आवृत्ति, ७१, १४)

'कुमारसंभवा'त भगवान् शंकरांनी मदनाला दग्ध केल्यावर त्याची पत्नी रति हिचे कालिदासाने केलेले वर्णन पाहा—

विललाप विकीर्णमूर्धजा समदुःखामिव कुर्वती स्थलीम् ।।
(कुमार, ४, ४)

एका शिलाहार राजाने आपल्या शत्रूंना ठार मारल्यावर त्यांच्या अंतःपुरांतील स्त्रियांची काय अवस्था झाली हे खालील श्लोकात वर्णिले आहे.[३]

लम्बालकानि कुचकुम्भतटोपकण्ठ—
प्रभ्रष्टहारलतिकानि निरञ्जनानि ।
उत्खाततीक्ष्णकरवालविदारितस्य
योऽन्तःपुराणि परिपन्थिजनस्य चक्रे ।।

'वेणीसंहारा'तील प्रसंग निराळ्या तऱ्हेचा आहे. दुःशासनाने केस पकडून राजसभेत आणल्यापासून द्रौपदी आपल्या केसांची वेणी घालत नसे. पुढे भारतीय युद्धापूर्वी कुलनाश टळावा म्हणून युधिष्ठिराने केवळ पांच गावांची मागणी केली. त्यानंतर द्रौपदी गान्धारीचे पादवंदन करून परत येत असता दुर्योधनाची पत्नी भानुमती हिने तिला किंचित् हसून म्हटले, 'अग याज्ञसेनी ! पांडवांनी पाच गावांची मागणी केली आहे असे ऐकते. मग अजूनही तू केसांची वेणी का घालत नाहीस ?' त्यावर द्रौपदीच्या दासीने उलट टोमणा मारला, 'अग भानुमती ! तुमचे केस

३. मिराशी, 'शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख', पृ. ५९.

सुटले जात नाहीत तोपर्यंत आमच्या राणीसाहेब कशी वेणी घालतील ?' (दुर्योधन मारला गेल्यावर तू आपले केस मोकळे सोडशील तेव्हाच द्रौपदी आपली वेणी घालील हा ध्वन्यर्थ.) तेव्हा हे उदाहरण येथे गैरलागू आहे. येथे 'एकवेणी'चा प्रश्न नाही, 'मुक्तवेणी'चा आहे आणि त्या प्रकारच्या केसांनी भर्तृमरण सूचित होत होते हे स्पष्ट आहे.

यक्षपत्नी प्रोषितभर्तृका होती, गतभर्तृका नव्हती. म्हणून तिला 'मुक्तकेशी' दाखविण्यात चित्रकाराने अक्षम्य चूक केली आहे.

प्रस्तुत चित्राच्या वरच्या भागात यक्षपत्नी पाच ठिकाणी विविध व्यापारांत गुंतलेली दाखविली आहे. या भागाचे जरा बारकाईने निरीक्षण केल्यास उजवीकडच्या भागातील मंदिरात प्रार्थनेकरिता जाताना आणि घरच्या मैनेला 'कच्चिद्भर्तुः स्मरसि रसिके त्वं हि तस्य प्रियेति' (हे रसिक मैने ! तुला आपल्या धन्याची आठवण येते का ? तू तर त्यांची लाडकी होतीस !) असे विचारताना दिसत आहे. या प्रसंगी ती गौरवर्णी दाखविली आहे. याच्या उलट डावीकडच्या भागात घरी देवतेची पूजा करताना, शय्येवर पडून आपल्या पतीचे चिंतन करताना आणि एकतारीवर त्याचे गुणगान करताना तिला कृष्णवर्णा चित्रित केले आहे. डावीकडचे प्रसंग रात्रीचे आहेत हे दाखविण्याचा चित्रकाराचा हेतु दिसतो. पण हे कालिदासाच्या वर्णनानुसार नाही. अलकानगरीच्या बाहेरच्या उपवनात भगवान् शंकराचे सदैव वास्तव्य असल्यामुळे तेथील प्रासाद सदोदित चांदण्याने शुभ्र झालेले असतात असे कालिदासाने पुढील श्लोकार्धात वर्णिले आहे. यक्ष मेघास म्हणतो–

गन्तव्या ते वसतिरलका नाम यक्षेश्वराणां
बाह्योद्यानस्थितहरशिरश्चन्द्रिकाधौतहर्म्या ॥ ७ ॥

तेव्हा या चित्रातील डावीकडचे चित्रण कालिदासीय वर्णनानुसार नाही.

शाकुन्तल–आता आपण 'शाकुन्तला'च्या चित्राकडे वळू. यात त्या नाटकाच्या पहिल्या अंकातील प्रसंग चित्रित केला आहे. दुष्यन्त मृगया करताना हरिणाच्या मागे लागून कण्वाश्रमाच्या जवळ येतो. तेथे त्याला शकुंतला, प्रियंवदा व अनसूया आपल्याला पेलतील असे घट घेऊन लहान

लहान झाडांना पाणी घालताना दिसतात. त्या क्षणी त्याच्या तोंडून 'अहो मधुरमासां दर्शनम् ।' असे उद्‌गार निघतात. तो त्यांच्याकडे एका झाडाआडून पाहत असलेला दाखविला आहे.

संस्कृतज्ञांना या चित्रातील काही दोष ठळकपणे दिसतात. शकुन्तला व प्रियंवदा यांना मुक्तकेशी दाखविले आहे. ते योग्य नाही. प्राचीन काळी केशरचनेचे विविध प्रकार होते.[४] त्यांचा उपयोग करावयास हवा होता. तिघीही तरुणी वृक्षांना पाणी घालण्याच्या उद्योगात होत्या तरी शकुंतलेचा घट कोठेही दिसत नाही. विशेष दोष हा की, या तीनही आश्रमकन्यका वल्कले नेसलेल्या दाखविणे जरूर होते. वल्कलातही शकुन्तला सुंदर दिसते असे दुष्यन्त म्हणतो–

इयमधिकमनोज्ञा वल्कलेनाऽपि तन्वी ।
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ।।

शकुन्तलेने हातापायांत पुष्पालंकार घातले आहेत. पण कण्व ऋषि म्हणतात, 'शकुन्तलेला अलंकारांची आवड आहे तरी लतावृक्षांवर तिचे इतके प्रेम की त्यांचे पानही खुडणे तिला आवडत नाही '–

नादत्ते प्रियमण्डनाऽपि भवतां स्नेहेन या पल्लवम् ।

तेव्हा शकुन्तलेची वेषभूषा 'शाकुन्तल' नाटकातील वर्णनानुसार नाही.

आणखी एक ढोबळ दोष हा की, झाडाआड उभा राहिलेला दुष्यन्त मुकुटधारी आभरणयुक्त दाखविला आहे, हे 'शाकुन्तला'तील विधानाच्या विरुद्ध आहे. मृगयेच्या नादात आपण कण्व ऋषींच्या आश्रमाजवळ आलो असे समजताच तेथे ते ऋषि नसले तरी जाऊन त्यांच्याविषयी आदर दाखवावा, म्हणून तो आश्रमाला भेट देण्याचे ठरवितो. 'आश्रमात विनययुक्त वेषाने गेले पाहिजे'[५] असे म्हणून तो आपली

---

४. भ. श्री. पंतप्रतिनिधि-अजंठा, चित्रांक २७, मधील स्त्रियांची विविध केशरचना पाहा.

५. **राजा–सूत, विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम। इदं तावद् गृह्यताम् (सूतस्याभरणानि धनुश्चोपनयति ।।)**

मुकुटादि राजचिन्हे काढून ठेवतो. तो राजचिन्हरहित साध्या वेषात असल्यामुळे पुढे शकुन्तलेला एक भ्रमर त्रास देत असताना संधी साधून पुढे झाल्यावर 'आपण धर्मविषयक व्यवस्था पाहण्याकरिता राजाने नेमलेला अधिकारी आहो' (यः पौरवेण राज्ञा धर्माधिकारे नियुक्तः सोऽहमविघ्नक्रियोपलम्भाय धर्मारण्यमिदमायातः[६]) अशी बतावणी करणे त्याला शक्य होते. पुढेही शकुन्तलेला वृक्षसेचनाच्या ऋणातून मुक्त करण्याकरिता तो आपली अंगठी काढून तिच्या सख्यांना देतो, तेव्हा तिच्यावरील ('महाराजाधिराजदुष्यन्तः' यासारखे) राजनाम पाहून त्या चकित होतात. तेव्हाही 'ही अंगठी राजेसाहेबांनी खूश होऊन मला बक्षीस दिली आहे'[७] असे म्हणून त्यांचा संशय दूर करण्याचा प्रयत्न करतो. या सर्व घटनांवरून त्याला या प्रसंगी साध्या वेषात चित्रित करणे जरूर होते हे ध्यानात येईल.

याप्रमाणे या चित्रांत भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने आढळणारे आणि कालिदासीय ग्रंथांतील वर्णनाशी विसंगत वाटणारे असे काही दोष दाखविले आहेत. रामटेक येथील कालिदास–स्मारक पाहण्यास देशी–विदेशी सहस्त्रावधि लोक यापुढे येतील. त्यांना या कृति निर्दोष दिसाव्या, हा यामागील हेतू आहे. **महाराष्ट्र शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी याचा विचार करून पूर्वोक्त दोष पटल्यास योग्य त्या उपायांनी ते दूर करावे, अशी विनंती करून हा लेख संपवितो.**

---

६. यात दुष्यन्तावर असत्य भाषणाचा दोष येत नाही. कारण 'पौरवेण राज्ञा' याने त्याच्या पित्याचाही बोध होऊ शकतो.

७. **राजा–अलमस्मानन्यथा संभाव्य । राज्ञः परिग्रहोऽयमिति राजपुरुषं मामवगच्छथ ।** शाकुन्तल, अं. १. याचेही दोन अर्थ होऊ शकतात.

१९. श्री. पु. ना. ओकांचा संशोधनातील दुराग्रह*

मार्च १९७५ मध्ये एके दिवशी 'धर्मभास्कर'चा त्या महिन्याचा अंक आलेला पाहून मला थोडे आश्चर्य वाटले. कारण मी त्या मासिकाचा ग्राहक नाही. अंक चाळल्यावर त्यांतील श्री. पु. ना. ओकांचा मद्विषयक लेख दृष्टीस पडला. सात वर्षांपूर्वी (श्री. ओक म्हणतात त्याप्रमाणे पाच वर्षांपूर्वी नव्हे) त्यांच्याशी 'ताजमहाल हे शिवमंदिर होते काय' या विषयावर नागपूरच्या वृत्तपत्रांत झालेला वाद आठवला. त्या वेळच्या लेखांची कात्रणे अद्यापि माझ्याजवळ आहेत. 'धर्मभास्कर'च्या अंकात तोच वाद श्री. ओकांनी पुनः उकरून काढला आहे. त्यांच्या लेखात आरंभापासून अखेरपर्यंत प्रतिपक्षाची निंदा व हेटाळणी भरली आहे. मी मांडलेल्या प्रमाणांचा विचार न करता त्या वादप्रसंगी आपले मत सर्वांस पसंत पडले अशी आत्मप्रौढी त्यांनी मारली आहे. त्यांच्या टीकेस उत्तर द्यावयाचे म्हणजे पुनः तीच प्रमाणे वाचकांपुढे मांडावी लागतील. त्याकरिता मला वेळ नाही. म्हणून श्री. ओकांना 'मया जितम्'ची आरोळी ठोकू द्यावी; जाणत्या विद्वानांना कोणते मत सयुक्तिक आहे हे सहज समजेल असे पाहून मी स्वस्थ बसण्याचे ठरविले. एकदा डुकराची व सिंहाची चकमक झाली. तेथून पळ काढताना डुकराने 'मी सिंहाचा पराजय केला' असे ओरडण्यास सुरवात केली. तेव्हा सिंह म्हणाला—

गच्छ सूकर भद्रं ते ब्रूहि सिंहो मया जितः ।
अन्तरं कथयिष्यन्ति सिंहसूकरयोर्जनाः ॥

---

* धर्मभास्कर (मुंबई) चा अहल्या देवी अंक (१९७५).

(बा डुकरा ! तू पळ काढ. तुझे भले असो ! 'मी सिंहाला जिंकले' अशी बढाई मार. पण जाणते लोक सिंह व डुक्कर यांच्यातील अंतर सहज सांगू शकतील !)

आणि तसेच झाले, 'धर्मभास्कर'च्या एप्रिलच्या अंकात संस्कृतचे विख्यात प्राध्यापक रा. ब. आठवले यांनी सविस्तर लेख लिहून श्री. ओकांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घातले आहे. त्यांनी तथाकथित बटेश्वर येथील शिलालेखातील—

प्रासादो वैष्णवस्तेन निर्मितोन्तर्वहन् हरिम् ।
मूर्ध्ना स्पृशति यो नित्यं पदमस्यैव मध्यमम् ॥

या श्लोकाचा श्री. ओक यांनी केलेला पुढील अर्थ (त्याने हरीची मूर्ति ज्यात आहे असा एक राजवाडा बांधला व तो हरीच्या चरणावर नित्य डोके टेकवीत असे) कसा चुकीचा आहे हे स्पष्टपणे दाखविले आहे. या अर्थात 'मध्यमम्' हे पद गाळले आहे. मीहि नागपूर टाईम्समधील त्या वेळच्या लेखात Mr. Oak has missed the word *madhayma* 'the middle one', which qualifies *pada*, 'a step of Vishṇu) असे दाखवून त्यांचा अर्थ कसा चुकीचा आहे हे त्यांच्या दृष्टीस आणले होते. सोनाराने कान टोचले म्हणजे दुखत नाहीत. तेव्हा प्रा. आठवले यांच्या या लेखाने तरी श्री. ओकांना त्या श्लोकाचा खरा अर्थ कळो !

श्री. ओकांच्या लेखात मी केलेला त्या श्लोकाचा अर्थ (मुद्दाम) चुकीचा दिला होता. 'त्या हरिमंदिराचे शिखर आभाळातील विष्णूच्या चरणास लागत होते' (धर्मभास्कर, एप्रिल, पृ. ६३) असे मी कोठेही म्हटले नाही. तरुणभारत (दि. १०–२–६८) च्या अंकात 'ते देवालय आपल्या शिखराने नेहमी विष्णूच्या मध्यम पदाला स्पर्श करते, म्हणजे ते गगनचुम्बी आहे,' असा अर्थ मी दिला आहे. तोच अर्थ कीलहॉर्न आणि प्रा. आठवले यांनी दिला आहे. 'मी कीलहॉर्नवर भिस्त ठेवून संस्कृताचे बाबतीत एका भारतीयाविरुद्ध खुशाल एका पाश्चात्याचा हवाला देत होतो,' याबद्दल ओक मला दोष देत आहेत. त्यांच्या मते 'आपण

भारतीय; तेव्हा भारतीयांनी आपल्या चुकीच्या विधानांना पाठिंबा द्यावा !' त्यामुळेच ते सदोदित पाश्चात्य विद्वानांवर दुगाण्या झाडत असतात आणि आपण संशोधनात 'सर्वतंत्रस्वतंत्र' आहो अशी शेखी मिरवितात.

संशोधनाची ही पद्धति घातक आहे हे त्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी मी सात वर्षांपूर्वी मराठीत व इंग्रजीत लेख लिहिले होते. नागपुरात व्याख्यान देण्यापूर्वी त्यांना फारसा कोठे विरोध झाला नव्हता. अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या एका अधिवेशनात 'ताजमहाल हा राजपुतांचा राजवाडा आहे,' यावरील अभिनव संशोधनाचा लेख वाचण्यास त्यांना परवानगी मिळाली नव्हती. भारतीय इतिहासज्ञ त्यांच्या संशोधनाची अनुल्लेखाने उपेक्षा करीत. तेव्हा नागपुरास त्यांना विरोध झाल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. याची कारणमीमांसा त्यांनी पुढीलप्रमाणे केली—'ताजमहाल हे हिंदु मंदिर आहे या माझ्या सिद्धांताने शाळा–कॉलेजांतील इतिहास शिकविणाऱ्यांची मोठी बिकट परिस्थिति झाली आहे. हा सिद्धान्त शिकवला तर सरकार व वरिष्ठ अधिकारी कोठे ठपका ठेवतील. शिवाय आजपर्यंत शिकवला तो इतिहास चूक ठरला तर इतिहासशिक्षक म्हणून मिळविलेली प्रतिष्ठा नष्ट होईल.' म्हणून त्यांनी मिराशींना त्या सिद्धांताला विरोध करण्यास चिथावले. ही कारणमीमांसा केवळ कपोलकल्पित आहे. ओकसाहेब ! अजून तुमच्या ताजमहालविषयक तर्कटाला सिद्धांताचे स्वरूप आले नाही. दिल्ली बहोत दूर है ! आपल्या ताजमहालविषयक विवेचनात ते उपलब्ध साधनांचा दुरुपयोग करीत आहेत हे त्यांच्या लक्षात आणून द्यावे, हा, ते लेख लिहिण्यात, माझा उद्देश होता. दुसऱ्या लेखांकाच्या शेवटी मी लिहिले होते–'सध्याचे भारतीय इतिहास चुकीचे आहेत, म्हणून श्री. ओक नवीन इतिहास लिहिण्याच्या उद्योगात आहेत. त्यांत त्यांनी ऐतिहासिक साधनांचा योग्य उपयोग न केल्यास त्यांचा इतिहास जास्तच विकृत होण्याचा संभव आहे. हे त्यांच्या लक्षात आणून देण्याकरिता हा दीर्घ लेख लिहिला आहे.' (तरुण भारत, नागपूर १९–१२–६७)

ऐतिहासिक साधनांचा श्री. ओक कसा दुरुपयोग करतात याची एक दोन उदाहरणे देतो. ताजमहाल हे हिंदु मंदिर आहे हे दाखविण्याकरिता त्यांनी बटेश्वर येथील लेखाचा उपयोग केला आहे. खजूराहो येथील चंदेल्ल राजांनी बांधलेल्या मंदिरांचे वर्णन करताना छत्तरपूरच्या एका गृहस्थांनी तो बटेश्वर शिलालेख उद्धृत केला होता. त्यात चंदेल्ल राजा परमर्दी याच्या मंत्र्याने एक विष्णूचे व दुसरे शंकराचे अशी दोन मंदिरे बांधल्याचा उल्लेख आला आहे. शंकराचे मंदिर 'स्फटिकावदात' (स्फटिकाप्रमाणे शुभ्र) होते असे त्यात वर्णन आहे. झाले ! श्री. ओकांना पाहिजे होता तो ताजमहालाच्या बांधणीचा पुरावा सापडला ! त्यांनी 'स्फटिकावदात' म्हणजे 'संगमरवरी' असा अर्थ करून या वर्णनाचा ताजमहालशी बादरायण संबंध जोडला, आणि बटेश्वर लेखात उल्लेखिलेले मंदिर म्हणजे ताजमहाल अशी आरोळी ठोकली. पूर्वी आपण ताजमहालला राजवाडा म्हणत होतो, त्याला आता शिवमंदिर कसे म्हणावे अशी अडचण येत होती. पण त्या वर्णनात 'प्रासाद' शब्दाचा उपयोग केला होता. संस्कृतात, 'प्रासाद' याचे (१) देवमंदिर आणि (२) राजवाडा असे दोन अर्थ होत असल्याने त्या शब्दाचा 'राजवाडा' असा अर्थ घेऊन त्यांनी त्या अडचणीचे निराकरण केले. पण तो लेख 'बटेश्वरचा शिलालेख' म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचा ताजमहालशी संबंध काय ? असे कोणी म्हणेल तर त्यावर श्री ओकांचे उत्तर हे की तो लेख कोरलेला दगड ताजमहालातून काढून कोणी तरी बटेश्वर येथे लपवून ठेवला असावा. 'प्राचीन काळी शिलालेख मूळ ठिकाणाहून हलवत नसत. गेल्या एक दोन शतकांत त्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन म्यूझियमध्ये ते सुरक्षिततेकरिता ठेवण्यात येतात. हा लेख आग्र्याहून सुमारे ३५ मैलांवर बटेश्वर येथे सापडला होता असे म्हणतात. तेथे हिंदु देवळांचे अवशेष आहेत,' हे आम्ही त्यांच्या निदर्शनास आणल्यावर त्यांना बटेश्वर नावाचे गाव आग्र्यापासून तीन मैलांवर सापडले. तरीही तेथे त्या लेखात उल्लेखिलेल्या मंदिराचे अवशेष नाहीत ही अडचण राहत होती. तेव्हा त्यांनी तो दगड कोणी तरी (मुसलमानाने ?) आग्र्याहून तेथे नेऊन लपविला असावा अशी क्लृप्ति काढली ! (अशा

तऱ्हेने दगड लपविण्यापेक्षा अनेक देवळांचे व मूर्तींचे उच्छेद करणाऱ्यांना त्यांचे तुकडे करता आले नसते काय ? असा विचार सहजच मनात येतो.)

वास्तविक त्या शिलालेखाचा ताजमहालाशी मुळीच संबंध नाही. तो आग्ऱ्यापासूत ३५ मैलांवर बटेश्वर येथे कनिंग्ह्यामला (छत्तरपूरच्या गृहस्थांना नव्हे) सुमारे नव्वद वर्षांपूर्वी आढळला, असे म्हणतात. कीलहॉर्नने एपिग्राफिया इंडिया या कोरीव लेखांच्या प्रकाशनास वाहिलेल्या नियतकालिकाच्या पहिल्या पुस्तकात (प्रकाशनकाल सन १८८८ ते १८९२) तो प्रसिद्ध केला आहे. यात वर्णिलेल्या मंदिराचा ताजमहालाशी बादरायण संबंधही जोडणे शक्य नाही, हे आम्ही सात वर्षांपूर्वी श्री. ओकांच्या निदर्शनास आणले होते. तरीही ते आपल्या पूर्वीच्याच मताची री ओढत आहे हे पाहून गोल्डस्मिथच्या 'डेझर्टेड व्हिलेज' मधील शाळा मास्तरच्या 'Even though vanquished he could argue still,' (पराजय झाला तरी त्याला वाद चालविता येत असे) या वर्णनाची आठवण येते.

संशोधकाने आपल्या मताचा दुराग्रह धरू नये, सत्य उघडकीस आल्यावर ते प्रांजळपणे मान्य करावे, असा खऱ्या संशोधनाचा सर्वमान्य नियम आहे. पण श्री. ओक तो जुमानीत नाहीत. बटेश्वर लेखातील विष्णुमंदिरविषयक श्लोकाचा त्यांनी केलेला अर्थ कसा चुकीचा आहे हे आम्ही त्यांना सात वर्षांपूर्वी दाखविले होते. तरी ते आपल्याच अर्थाला चिकटून आहेत. आता प्रा. आठवले यांनीहि त्यांचा तो अर्थ कसा चुकीचा आहे हे सविस्तरपणे सिद्ध केले आहे. आता त्यांची सत्यप्रियता कसोटीस लागेल.

दुसरी गोष्ट बटेश्वर लेखाच्या मितीची. त्या लेखाचा काल 'पक्षत्यक्षमुखादित्य' या विक्रमसंवतात दिला आहे. त्याचा अर्थ कील-हॉर्नने विक्रम संवत् १२५२ (सन ११६५-६६) असा केला होता. श्री. ओक तो विक्रम संवत् १२१२ (सन ११५५-५६) असा घेतात. हा दुसरा काल मानला तर त्या वर्षी परमर्दी राज्य करीत नसून त्याचा

आजा मदनवर्मा गादीवर होता; कारण त्याचे यानंतरचे विक्रम संवत् १२१५ व १२१९ चे लेख सापडले आहेत. हे आम्ही दाखवून दिले होते (तरुण भारत, १०–२–६८). यावर श्री. ओक म्हणतात, "आमच्या वाचनावरून परमर्दि देवाचा काळ दुरुस्त केला पाहिजे." खासा न्याय ! तसे केले तर परमर्दिदेवाच्या आज्याला सात आठ वर्षे अगोदर स्वर्गाला पाठवावे लागेल ! पण ओकांना त्याची फिकीर नाही !

श्री. ओकांना कळले तरी वळत नाही. धर्मभास्कर (मार्च १९७५) च्या अंकात ते म्हणतात, "ह्याला (खरा अर्थ कोणता ते ठरविण्याला) एक सोपा तोडगा आहे. संवत् (? सन) ११५५–५६ मध्ये आश्विन शुक्ल पंचमीला त्या लेखात उल्लेखिल्याप्रमाणे रविवार येतो की संवत् (? सन) ११९५–९६ मध्ये येतो ताडून पाहिले तर या प्रश्नाचा बिनतोड निकाल लागू शकतो." अगदी बरोबर ! कीलहॉर्नने ही तिथि विक्रम संवत् १२५२ ला जुळते; त्या वर्षी आश्विन शुक्ल पंचमी रविवारी (१० सप्टेंबर ११९५ रोजी) पडली होती, असे दाखविले होते. हाच वार पिल्ले जंत्री प्रमाणे येतो. आता श्री. ओकांनी आपली तिथि पडताळून दाखवावी. नाही तर कीलहॉर्नचे वाचन बिनशर्त मान्य करावे.

[सर्वमान्य पिल्ले जंत्रीप्रमाणे सन ११५५–५६ मध्ये आश्विन शुक्ल पंचमी शनिवारी (३ सप्टेंबर रोजी) पडते.]

वेळी अवेळी पाश्चात्य विद्वानांवर आणि त्यांचे संशोधन मान्य करणाऱ्या भारतीय विद्वानांवर तोंडसुख घेण्यात श्री. ओकांना धन्यता वाटते. यावर प्रा. आठवले यांनी त्यांना केलेला उपदेश त्यांनी ध्यानात घ्यावा. मॅक्समूल्लर, बुल्हर, कीलहॉर्न, ओल्डनबर्ग, ब्लूमफील्ड, मॅक-डोनेल इत्यादि जर्मन, अमेरिकन व इंग्रज विद्वानांनी भारतीय वाङ्मय, भाषा, शास्त्रे, इतिहास यांचे निरलसपणे व निरपेक्षपणे संशोधन करून भारतावर महान् उपकार केले आहेत. त्यांचे महत्त्व श्री. ओकांसारख्या अर्ध्या हळकुंडाने पिवळे होऊ पाहाणाऱ्या भारतीय संशोधकांना कसे

कळणार ? त्या संशोधकांच्या हातून क्वचित् चुका झाल्या असतील, पण त्यांचे ऋण न मानणे ही शुद्ध कृतघ्नता आहे.

हा प्रदीर्घ लेख संपविण्यापूर्वी प्रा. आठवले यांच्या '**धर्मभास्कर**'च्या एप्रिल अंकात केलेल्या 'ताजमहाल हा मूळचा तेजोमहाल अथवा सूर्यमंदिर होते असे मला म्हणावेसे वाटते,' या विधानाचा परामर्श घेतला पाहिजे.

प्राध्यापक आठवल्यांना बटेश्वर शिलालेखाची चांगली माहिती नाही. त्यांनी तो लेख वाचला नाही. श्री. ओक यांच्या लेखातील एकतर्फी विधानांवरून तो लेख ताजमहालजवळ सापडला होता अशी त्यांची समजूत झालेली दिसते. ताजमहाल हा मूळचा तेजमहाल असावा आणि म्हणून त्यात बसविलेली विष्णूची मूर्ती सूर्याची असावी असा त्यांचा तर्क आहे, आणि त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी वेदवाङमयांत विष्णु हे सूर्याचे नाव होते, असे दाखविले आहे.

पण हे मत भ्रामक आहे. वेदकाली विष्णु हे सूर्याचे नांव होते खरे, पण प्रस्तुत शिलालेख वेदकालीन नाही. तो ईसवी सनाच्या बाराव्या शतकातील आहे. त्या काळी सूर्याला विष्णु म्हणत नसत. त्या काळी ब्रह्मा, विष्णु व शिव या तीन देवांना महत्त्व आले होते. त्यांचे स्वरूप याच नावांच्या वेदकालीन देवतांच्यापेक्षा भिन्न होते. तत्कालीन वाङ्मयात सूर्याचा विष्णु या नावाने उल्लेख केलेला आढळत नाही. वामनावतारात विष्णूने आपल्या एका पदाने आकाश व्यापले ही कथा वेदोत्तर संस्कृत वाङमयात प्रचलित झाली असल्याने बटेश्वर लेखात आकाशाचा 'विष्णूचे मध्यम पद' म्हणून उल्लेख आला आहे.

बटेश्वर लेख ताजमहाल येथे सापडला होता याला पुरावा नाही. ताजमहालाचे स्वरूप ईसवी सनाच्या बाराव्या शतकातील कोणत्याही हिंदु मंदिरासारखे नाही. तत्कालीन अनेक मंदिरे अद्यापि भारतात अवशिष्ट आहेत. त्यांचे गर्भगृह, अंतराल, सभामंडप, अर्धमंडप असे भाग

असतात. त्यांवर निरनिराळी शिखरे असतात. ताजमहाल तसा आहे काय ?

तेव्हा ताजमहाल हे प्राचीन शिवमंदिर होते हे सिद्ध करण्याचा उपद्व्याप श्री. ओकांनी सोडून द्यावा. संशोधन करताना केवळ सत्यान्वेषणाची वृत्ति धारण करून इतरांची–विशेषतः पाश्चात्य विद्वानांची–नालस्ती करण्याची आपली सवय टाकून द्यावी अशी त्यांस विनंती करून हा प्रदीर्घ लेख समाप्त करतो.

---

२०. बटेश्वर शिलालेख आणि श्री. पु. ना. ओकांची सत्यनिष्ठा*

आग्र्याच्या आग्नेय दिशेस सुमारे ३५ मैलांवर (बेग्लरच्या मते ४३ मैलांवर) बटेश्वर नामक यात्रेचे ठिकाण आहे. तेथील देवळांचे वर्णन कनिंग्ह्यामचा मदतनीस बेग्लर याने पुरातत्त्वविषयक अहवालाच्या सातव्या पुस्तकात (पृ. ५ ते ९) केले आहे. तेथे चंदेल्ल राजा परमर्दिदेव याच्या काळचा एक मोठा शिलालेख सापडला होता, असे म्हणतात.[१] तो बटेश्वरचा शिलालेख या नावाने प्रसिद्ध आहे.

ताजमहाल हे प्राचीन हिंदु देवालय आहे. या विलक्षण मताच्या सिद्ध्यर्थ श्री. पु. ना. ओक यांनी या शिलालेखाचा अनेकदा उल्लेख केला आहे. ‘ धर्मभास्कर ’च्या मार्च १९७५ च्या अंकात ते म्हणतात “आग्र्याच्या कांही रहिवाश्यांच्या मते ताजमहालपासून चार मैलांवर एक बटेश्वर असून तेथे दरवर्षी यात्रा भरते.” एखाद्या स्थलाचे अस्तित्व कोणाच्याही मतावर अवलंबून नसते. आग्र्याच्या कोणत्या दिशेत चार मैलांवर हे बटेश्वर आहे, त्याच्याजवळ कोणते गांव आहे, हे श्री. ओकांनी निश्चितपणे सांगावे. आमच्या माहितीप्रमाणे आग्र्याच्या दहा मैलांच्या परिसरात तरी तसे गांव नाही. आग्र्याच्या आग्नेय दिशेस ३५ मैलांवर यमुनेच्या तीरी असलेले बटेश्वर प्रख्यात आहे. हे दुसरे बटेश्वर मात्र ओकांची लोणकढी थाप आहे !

---

* धर्मभास्कर, सप्टेंबर १९७५, पृ. ११–२०.

१. हा शिलालेख वस्तुतः बटेश्वरचा नसून हमीरपूर जिल्ह्यातील बघारी गांवचा आहे, हे पुढे दाखविले आहे.

दुसरे असत्य विधान त्याच लेखात पुढे आले आहे. ‘ धर्मभास्कर ’ च्या मार्च १९७५ च्या अंकात पृ. १५ वर श्री. ओक लिहितात, “ छत्रपुरचे एक दिवंगत महाराष्ट्रीय श्री. काळे यांच्या खजूराहो अर्थात् खर्जूरवाहक[२] नावाच्या लहानशा पुस्तकांत जे २३ शिलालेख[३] आहेत त्यांतही बटेश्वर शिलालेखाचा अंतर्भाव आहे. त्यात काळे यांनी त्या शिलालेखाबद्दल अशी एक टीप दिलेली आहे की, हा शिलालेख एका खळग्यांत अशा अवस्थेत सापडला की जसा कोणी मुद्दाम घाईघाईने तो सुरक्षित राहावा म्हणून तेथे दडवून ठेवावा. यावरूनही तो ताजमहालाच्या परिसरातून आणून दूर टाकणे अशक्य नाही.” पृ. १६ वर पुढे ते म्हणतात, “ तो लेख बटेश्वरात सापडला असला तरी दुरून कोठून तरी आणून टाकलेला दिसत होता. ही काळे यांची साक्ष मिराशींच्या गांवीही नव्हती हे त्यांच्या संशोधनाचे न्यून होते.” पुढेही पृ. ५५ वर ते असे सांगतात, “ काळे यांच्या पुस्तकात तो शिलालेख मुद्दाम दूर नेऊन टाकला असावा असे स्पष्टच म्हटले आहे.”

याप्रमाणे अनेक ठिकाणी उल्लेखिलेला श्री. काळे यांचा ग्रंथ खरोखर प्रमाणभूत असला पाहिजे. तो न पाहण्यात आपली भयंकर अक्षम्य चूक झाली हे ध्यानात येऊन आम्ही त्या ग्रंथाच्या प्राप्तीकरिता प्रयत्न केला. अनेक मित्रांना तो मिळवून पाठविण्याविषयी लिहिले. शेवटी इंदूरचे आमचे स्नेही डॉ. एच. व्ही. त्रिवेदी यांनी कळविले की, त्या पुस्तकात महत्त्वाचे काही नाही. त्यांनी त्याची प्रत मिळवून दिली. तेव्हा श्री. ओकांनी उल्लेखिलेल्या या प्रमाणग्रंथाचे दर्शन झाले. त्याचे थोडक्यात वर्णन असे :—

हे पुस्तक क्राऊन आकाराचे १४१ पृष्ठांचे आहे. त्याचे लेखक दामोदर जयकृष्ण काळे, रिटायर्ड जज्ज, रियासत छत्तरपुर, हे असून त्यात प्रकाशन–काल दिला नसला तरी भूमिकेच्या अखेरीस संवत् २०१४

२. या पुस्तकाचे खरे नांव ‘ खर्जूरवाहक अर्थात वर्तमान खजुराहो ’ असे आहे.

३. **यांची संख्या** २० आहे.

चा उल्लेख आला असल्यामुळे ते सुमारे १७ वर्षांपूर्वी प्रकाशित झाले असावे. या पुस्तकात छत्तरपूरचे विद्वान् पंडित जयकृष्ण शास्त्री यांनी गोळा केलेले चंदेल्लकालीन संस्कृत लेख दिले आहेत. पं. जयकृष्ण शास्त्रींनी आपल्या निधनापूर्वी आपले सुपुत्र श्री. दामोदर जयकृष्ण काळे यांना ते लेख पुस्तकरूपाने छापण्याचा आदेश दिला होता. तदनुसार श्री. दा. ज. काळे यांनी शिलालेख क्रमांक ८ ते १६ यांचे हिंदी भाषांतर, लेखांवर टीपा व चंदेल्लांच्या मंदिरांची वर्णनात्मक भूमिका यांसह ते सचित्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. हे पुस्तक जिज्ञासू, सामान्य वाचकांस चंदेल्लांच्या संस्कृत लेखांची व तत्कालीन मंदिरांची माहिती व्हावी या हेतूने रचले आहे. ते संशोधनात्मक नाही. त्यात केलेल्या विधानांचे कोठेही प्रमाणभूत संदर्भ दिले नाहीत.

पं. जयकृष्ण शास्त्री हे छत्रपूरच्या अधिपतींचे राजपंडित होते. त्यांचे घराणे संस्कृत विद्येविषयी प्रख्यात होते. त्यांचे वडील धुंडिराज शास्त्री यांचे 'श्रीमद्भागवतव्यञ्जनम्' हे काव्य त्यांचे नातू डॉ. गोविंद जयकृष्ण काळे यांनी अलीकडे दोन भागांत प्रसिद्ध केले आहे. त्यावरून त्यांची अगाध विद्वत्ता आणि प्रतिभा प्रत्ययास येते. पंडित जयकृष्ण शास्त्री यांनी चंदेल्लांचे लेख निर्णयसागर प्रेसने पूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'प्राचीनलेखमाले'च्या अनेक भागांतून व इतर साधनांतून संकलित केले होते. ते त्यांचे पुत्र दामोदर जयकृष्ण काळे यांनी प्रसिद्ध केले आहेत. मागे सांगितल्याप्रमाणे कांही लेखांचे हिंदी भाषांतर व त्यांवरील टीपा मात्र श्री. दा. ज. काळे यांच्या आहेत.

हिंदी भाषांतरात कांही चुका आहेत. उदाहरणार्थ, बटेश्वर लेखातील श्री. पु. ना. ओक यांनी वारंवार उल्लेखिलेला पुढील श्लोक घेऊ—

प्रासादो वैष्णवस्तेन निर्मितोन्तर्वहन्हरिम् ।
मूर्ध्ना स्पृशति यो नित्यं पदमस्यैव मध्यमम् ।।

याचे श्री. दा. ज. काळे यांनी केलेले भाषांतर पाहा—

'इन्होंने भगवान विष्णु का एक मंदिर बनवाया। जिसमें हरि की स्थापना की। वे अपने सिरसे बीच की रेखा को छुआ करते थे।'

यातील दुसऱ्या अर्धाचा अर्थ चूक आहे हे आम्ही, तसेच प्रा. रा. ब. आठवले यांनी केलेल्या अनुवादावरून वाचकांच्या लक्षात आले असेल. या चुकीच्या भाषांतरावर पु. ना. ओक यांचे भाषांतर 'तो हरीच्या चरणांवर नित्य डोके ठेवीत असे' आधारलेले दिसते. ते चूक आहे हे मागील लेखांत दाखविले आहे.

एका बाबतीत मात्र श्री. पु. ना. ओक यांनी नवीन संशोधन केले आहे. बटेश्वर शिलालेखाचा काल पुढील श्लोकात आला आहे.

पक्षत्र्यक्षमुखादित्यसंख्ये विक्रमवत्सरे।
आश्विनशुक्लपंचम्यां वासरे वासरेशितुः॥

यात विक्रम संवत् १२५२ चा उल्लेख आहे आणि त्या संवत्सरातील आश्विन शुक्ल पंचमी या श्लोकात सांगितल्याप्रमाणे रविवारी पडते, हे कीलहॉर्नने दाखविले होते. हाच निर्देश प्राचीनलेखमाला, भाग २, पृष्ठ १२५ वर त्या भागाचे संपादक महामहोपाध्याय पं. शिवदत्त आणि काशिनाथ पांडुरंग परब यांनी तो श्लोक खालीलप्रमाणे छापून स्वीकारला आहे.

पक्षत्र्यक्षमुखादित्य(१२५२)संख्ये विक्रमवत्सरे।
आश्विनशुक्लपंचम्यां वासरे वासरेशितुः॥

यात कंसात घातलेली १२५२ ही संख्या मूळ शिलालेखात नाही. ती 'एपिग्राफिया इंडिका', व्हॉ. १, मधील कीलहॉर्नच्या लेखातून घेऊन वाचकांच्या सोईसाठी प्राचीनलेखमाला, भाग २ चे संपादक पं. शिवदत्त आणि काशीनाथ पांडुरंग परब यांनी कंसात दिली आहे. हीच संख्या श्री. दा. ज. काळे यांनीही पूर्वोक्त पुस्तकातील हिंदी भाषांतरात दिली आहे.[४] पाश्चात्य विद्वानांचे वाचन व संशोधन योग्य वाटल्यामुळे स्वीका-

४. श्री. दा. ज. काळे यांनी पृष्ठ १२४ वर हे वर्ष १२५२ असे बरोबर दिले आहे. पण पृष्ठ १०८ वर मुद्रणदोषामुळे १२१५ असे पडले आहे.

रणाऱ्यांस श्री. पु. ना. ओक 'पाश्चात्य इतिहासकारांचे अंकित, दासानुदास, शागीर्द, ताटाखालची मांजरे', अशी शेलकी विशेषणे लावतात. (धर्मभास्कर, मार्च १९७५ चा अंक, पृ. ५६.) आपण स्वत: मात्र 'स्वतंत्रप्रज्ञ' म्हणून शेखी मिरवितात. पण त्यांचे पूर्वोक्त श्लोकात निर्दिष्ट केलेल्या कालाचे 'विक्रमसंवत् १२१२' हे स्पष्टीकरण कसे चूक आहे हे आम्ही मागील लेखात दाखविले आहे. ते चूक मानण्याची मुख्य कारणे– (१) 'त्यक्षमुख' (शंकराचे मुख) याने 'एक' ही संख्या विवक्षित नाही. तसे असते तर 'त्यक्ष' पदाची आवश्यकता नसती. माणसांना, किंबहुना गाढवालाही, एकच मुख असल्याने 'नरमुख' किंवा 'खरमुख' शब्द योजून 'एक' ही संख्या दाखविता आली असती.

(२) विक्रम संवत् १२१२ मध्ये आश्विन शुक्ल पंचमी रविवारी पडत नाही. शनिवारी पडते. संवत् १२५२ मध्ये मात्र ती रविवारी पडते.

(३) विक्रम संवत् १२१२ मध्ये परमर्दिदेव गादीवर आला नव्हता. त्यानंतरही कित्येक वर्षे त्याचा आजा मदनवर्मन् गादीवर होता. तेव्हा वरील श्लोकातील कालनिर्देशाचे विक्रम संवत् १२१२ हे स्पष्टीकरण चूक आहे. हे श्री. ओक कबूल करतात की, 'खाली पडलो तरी माझे नाक वरच' या रीतीने वितंडवाद घालतात. यावर त्यांच्या सत्यनिष्ठेची कसोटी लागणार आहे.

तिसरे असत्य विधान, "श्री. काळे यांनी आपल्या पुस्तकात 'बटेश्वर शिलालेखाचा दगड दुरून कोठून तरी आणून टाकलेला दिसत होता' असे म्हटले आहे हे होय." हे श्री. ओकांनी अनेकदा ठासून केले आहे. श्री. दा. ज. काळे यांची एतद्विषयक टीप पुढीलप्रमाणे आहे (पृ. १२४) "यह शिलालेख बटेश्वरमें मिट्टी के ढेर में पाया गया था, जिसको जनरल कनिंगहेम ने लखनऊ के अजायब घर में रखवा दिया जहां पर वह अब भी विद्यमान है। महाराज परमर्दिदेवने बटेश्वर में जो दो श्वेत पत्थर के सुंदर मंदिर एक भगवान् विष्णु के लिए और दूसरा भगवान्

शंकर के लिए बनवाये[५]। आगे चलकर मुसलमानों से युद्ध हुआ उसमें ये मंदिर विध्वस्त कर दिये गये। इन मंदिरोंका शिलालेख किसी चतुर पुरुषने एक मिट्टी के ढेर में दबा दिया जो कई वर्षों तक दबा रहा और १९०० की शताब्दी में[६] खोज होने पर जनरल कनिंगहेम को प्राप्त हुआ था।"

श्री. दा. ज. काळे यांनी या वर्णनाला आधार दिला नाही. ते अनुमानावर आधारलेले दिसते. ती शिला सन १८९० पूर्वी लखनऊच्या म्यूझियममध्ये पोचली होती. कारण त्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या 'एपिग्राफिया इंडिका'च्या पहिल्या खंडातील बटेश्वर शिलालेखावरील कीलहॉर्नच्या लेखात त्या लेखाचा उल्लेख आला आहे. अर्थातच श्री. काळे यांचे विधान ऐकीव माहितीवर किंवा अनुमानावर आधारित दिसते. त्यांनी स्वतः तो दगड बटेश्वर येथे मातीत दबलेला पाहिला नव्हता. त्याची शिला श्री. काळे यांच्या जन्मापूर्वी लखनौ म्यूझियममध्ये पोचली होती. शिवाय श्री. काळेही 'बटेश्वर लेखाची शिला तेथील मंदिरे उद्ध्वस्त केल्यावर कोणी चतुर पुरुषाने तेथील मातीच्या ढिगाऱ्यात लपवून ठेवली होती', एवढेच सांगतात. 'तो दगड बटेश्वरात सापडला तरी दुरून कोठून तरी आणून टाकलेला दिसत होता' असे कोठेही म्हणत नाहीत. 'ते तसे स्पष्ट म्हणतात' हे श्री. ओकांचे विधान पूर्णपणे असत्य आहे. बटेश्वर लेखाचा ताजमहालासाठी संबंध जोडण्याकरिता ते विधान जाणून बुजून केले आहे. आणि "ताजमहाल हे हिंदू राजमंदिर होते" या आपल्या तर्कटाच्या पुष्ट्यर्थ ते त्यांनी श्री. काळे यांच्या माथी मारले आहे. श्री. काळे यांचे दुर्मिळ पुस्तक मिळवून पुढे कोणी आपले बिंग

५. ही मंदिरे परमर्दिदेव या चंदेल्ल राजाने बांधली होती हे श्री. दा. ज. काळे व पु. ना. ओक यांचे विधान चूक आहे. ती त्याच्या मंत्र्यांनी बांधलेली होती.

६. 'उन्नीसवीं शताद्वी में' असे पाहिजे. कनिंगहॅमने 'हा शिलालेख बटेश्वर येथे सापडला' असे कोठेही म्हटले नाही. त्याचा उल्लेख त्याने बघारी शिलालेख असाच केला आहे.

बाहेर फोडील अशी कल्पना न आल्यामुळे त्यांनी हे धाष्टर्य केले असावे पण त्यात त्यांची फसगत झाली आहे.

आतापर्यंतच्या विवेचनात प्रस्तुत शिलालेखाचा उल्लेख, पु. ना. ओकांच्या विवेचनाला अनुसरून, बटेश्वराचा शिलालेख म्हणून केला आहे. पण त्या लेखाविषयी अधिक माहिती मिळाल्यावर वस्तुतः तो बटेश्वरात सापडला नव्हता, किंबहुना आग्रा जिल्ह्यात कोठेही सापडणे शक्य नव्हते हे स्पष्ट झाले. ते पुढे दाखवितो.

या शिलालेखाविषयी पुढील विवेचन वाचकांस समजावे म्हणून प्रथम त्याचा सारांश देतो.

या लेखाची शिला सध्या लखनौ म्यूझियममध्ये ठेवली असून तिचे दोन तुकडे झाले आहेत. तिच्यावरील लेख २४ ओळींचा संस्कृतमध्ये आहे. पहिल्या दोन ओळींतील कांही अक्षरे एक लहान तुकडा न सापडल्यामुळे नष्ट झाली आहेत. प्रस्तुत लेखात चंदेल्ल वंशातील मदनवर्मा, त्याचा पुत्र यशोवर्मा व नंतर त्याचा पुत्र परमर्दी यांचे वर्णन आले आहे. या लेखाचा उद्देश परमर्दिदेव राजाचा मंत्री सल्लक्षण याने एक विष्णूचे व दुसरे स्फटिकावदात (स्फटिकाप्रमाणे शुभ्र) असे शंकराचे अशी दोन मंदिरे बांधण्यास आरंभ केला होता. विष्णूचे मंदिर पूर्ण झाले, पण शंकराचे मंदिर त्याच्या ह्यातीत अपूर्ण राहिले होते, ते त्याचा पुत्र आणि चंदेल्ल परमर्दिदेवाचा मंत्री पुरुषोत्तम याने पूर्ण केले हे नमूद करण्याचा होता. लेखाच्या शेवटी विक्रम संवत् १२५२ चा निर्देश आला आहे, हे मागे दाखविले आहे.

या लेखाला बटेश्वरचा शिलालेख असे नाव चुकीने पडले होते. कीलहॉर्नने तो याच शीर्षकाखाली एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १ (पृ. २०७–२१४) मध्ये संपादिला आहे. पण आपल्या प्रस्तावनेच्या आरंभी त्याने 'हा लेख बटेश्वर येथे सापडला काय' या विषयी मला संशय आहे, असे म्हटले आहे. तो कनिंगहॅमने आपल्या चंदेल्लविषयक लेखांच्या यादीत 'बघारी येथे एका तळ्याच्या काठी दोन तुकड्यांत सापडला' असा उल्लेखिलेला लेख असावा त्याने असे म्हटले आहे. कीलहॉर्नचे अनुमान

आता खरे ठरले आहे. त्याची प्रमाणे येणेप्रमाणे–(१) कनिंगहॅमने कोठेही हा लेख बटेश्वर येथे सापडला असे म्हटले नाही. त्याचा मदतनीस बेग्लर याने बटेश्वराचे विस्तृत वर्णन कनिंगहॅमच्या रिपोर्टाच्या सातव्या व्हॉल्यूममध्ये केले आहे. त्यात कोठेही उद्ध्वस्त देवळांचा व शिलालेखाचा उल्लेख नाही. (२) कनिंगहॅमने आपल्या रिपोर्टाच्या २१ व्या व्हॉल्यूममध्ये चंदेल्लांच्या लेखांची यादी दिली आहे. तीत परमर्दीच्या काळच्या दोनच लेखांचा (कालिंजर व बघारी येथील म्हणून) निर्देश केला आहे. प्रस्तुत शिलालेख कालिंजरच्या लेखाहून भिन्न असल्यामुळे तो बघारीचाच असला पाहिजे. (३) 'त्या बघारी लेखाची शिला दोन खंडांत फुटली आहे; तिजवरील लेख २४ ओळींचा आहे' हे वर्णन प्रस्तुत लेखास जळते.

या प्रमाणांवरून प्रस्तुत शिलालेख 'परमर्दिदेवाच्या काळचा बघारी शिलालेख' असा आता ओळखला जातो. ह्याच नावाने त्याचा उल्लेख व्हिन्सेंट स्मिथने आपल्या चंदेल्ल लेखांच्या यादीत[७] आणि डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांनी आपल्या 'उत्तरभारतीय कोरीव लेखांच्या यादी'त (क्र. ४३१) केला आहे. तेव्हा प्रस्तुत लेख बटेश्वरचा नसून बघारीचा आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. अर्थातच 'तो मूळचा ताजमहालाच्या परिसरातील असून कोणीतरी बटेश्वर येथे नेऊन लपवून ठेवला होता' हे श्री. ओकांचे विधान पूर्णपणे असत्य ठरले आहे.

प्रस्तुत शिलालेख बघारी येथे सापडणे अगदी शक्य आहे. बघारी हे गाव हमीरपूर जिल्ह्यातील चंदेल्लांची राजधानी महोबा (महोत्सवपुर) हिच्याजवळ आहे. त्याला आता सिघणपुर-बघारी म्हणतात. तेथे चंदेल्लांचे मंत्री सल्लक्षण व पुरुषोत्तम यांनी भगवान् विष्णु व शिव यांची मंदिरे उभारली असणे सुतराम् शक्य आहे. पुढे परमर्दीच्या कारकीर्दीच्या अखेरीस कुतुबुद्दीन ऐबक व अल्तमश यांनी सन १२०३ मध्ये चंदेल्लांच्या राज्यावर आक्रमण करून त्यांच्या कालिंजर येथील किल्ल्याला वेढा घातला. परमर्दीने मोठ्या शौर्याने शत्रूशी झुंज दिली. पण शेवटी त्याला

७. इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. ३७, पृ. ११६–१२५.

शरण यावे लागले. त्यानंतर लौकरच त्याचा मृत्यु झाला. तेव्हा त्याचा मंत्री अजदेव याने शत्रूशी युद्ध सुरू केले. पण किल्ल्यातील पाण्याचा साठा संपल्यामुळे त्यालाही एप्रिल १२०३ मध्ये शत्रूला शरण जावे लागले. तेव्हा कुतुबुद्दिन ऐबकने महोबा राजधानीवर चाल करून ती काबीज केली. या प्रसंगी मुसलमानांनी महोबाजवळच्या बघारी गांवी आक्रमण करून तेथील विष्णु व शंकर यांची मंदिरे उद्ध्वस्त केली असावी.[८] पुढे कनिंगहॅमला तेथे प्रस्तुत शिलालेख आढळल्यावर तो सुरक्षित राहण्याकरिता लखनौच्या म्यूझियममध्ये नेण्यात आला असे दिसते.

तेव्हा प्रस्तुत शिलालेख आग्रा जिल्ह्यातील बटेश्वर गावी सापडला नव्हता हे सुस्पष्ट आहे. किंबहुना, 'चंदेल्लांचा शिलालेख आग्र्याजवळ सापडणे अशक्य आहे' (A Chandella inscription could not have been from Agra) असे व्हिन्सेंट स्मिथने म्हटले आहे.[९] त्याची कारणे त्याने दिली नसली तरी सांगणे कठीण नाही.

चंदेल्लांचे राज्य सध्या बुंदेलखंड म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रदेशावर होते. मदनवर्मा व परमर्दी यांच्या कारकीर्दीत त्यांच्या राज्याची पश्चिम सीमा वेत्रवती (बेटवा) नदी आणि उत्तर सीमा यमुना नदी ही होती. यमुनेच्या उत्तरेस गाहडवालांचे राज्य पसरले होते. पूर्वेस कलचुरींच्या अमलाखालचा (सध्याचा बघेलखंडाचा) प्रदेश होता. चंदेल्लांचे कोरीव लेख याच भागात सापडले आहेत. वायव्येस आग्रा शहरापर्यंत त्यांचा अम्मल कधीच पसरला नव्हता. तेव्हा त्यांचा शिला-

---

८. वरील माहितीवरून चंदेल्लांची राजधानी महोत्सवपुर (सध्याचे महोबा) याच्या जवळचे बघारी येथील ही सुंदर मंदिरे विक्रम संवत् १२५२ (सन ११९५) मध्ये पूर्ण झाली आणि सुमारे आठ वर्षांनी १२०३ मध्ये मुसलमानांनी उद्ध्वस्त केली, असे दिसून येईल. काय हा दैवदुर्विलास !

९. जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल, १८९५, भाग १, पृष्ठ १५८, टीप १.

लेख आग्र्याच्या परिसरात सापडणे शक्य नाही, आणि त्यात ताज-महालाचा शिवमंदिर म्हणून उल्लेख येणे नितान्त असंभवनीय आहे.

श्री. ओकांच्या मनात पाश्चात्य संशोधकांविषयी भयंकर दुराग्रह आहे. कीलहॉर्नसारख्या पाश्चात्यांच्या संशोधनावर विसंबून आम्ही आपणासारख्या भारतीयांविरुद्ध संस्कृतीच्या बाबतीत लिहावे, हे त्यांना पसंत नाही (धर्मभास्कर, मार्च १९७५, पृ. १४). (पण खऱ्या संशोधकाची ही रीत नाही. तो केवळ सत्याचा उपासक असतो. सत्य पाश्चात्यांकडून प्राप्त झाले तर तो ते झिडकारत नाही, आणि भारतीयाने पुरस्कारिलेल्या असत्याचा स्वीकार करत नाही.)

कीलहॉर्नला संस्कृताचे खरे ज्ञान असेल यावर श्री. ओकांचा विश्वास नाही. प्रा. रा. ब. आठवले यांनी त्याच्याविषयी त्रोटक माहिती धर्मभास्करच्या एप्रिल १९७५ च्या अंकात दिली आहे. त्याने मॅक्सम्यूलरला सायण–भाष्यासहित ऋग्वेदाची आवृत्ति प्रकाशित करण्यास साहाय्य केले होते. त्याची पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्यावर त्याने तेथील शास्त्र्यांच्या साहाय्याने पाणिनीय व्याकरणाचे खोल अध्ययन केले. नंतर त्याने पंतजलीच्या महाभाष्याची चिकित्सक आवृत्ति व नागेशाच्या परिभाषेन्दुशेखराची इंग्रजी भाषांतरासह संशोधित आवृत्ति प्रकाशित केली. त्याने पाणिनीय तसेच इतर प्राचीन भारतीय व्याकरणांवर अनेक चिकित्सक लेख लिहिले आहेत. तो उत्तम ज्योतिर्विद् होता. त्याने विक्रम, शक, कलचुरि–चेदि, नेवारी इत्यादि प्राचीन भारतीय संवतांच्या अनेक मित्या पडताळून पाहून प्रसिद्ध केल्या आहेत. प्राचीन भारतीय इतिहासात त्याची कामगिरी केवळ अद्वितीय आहे. चंदेल्ल, कलचुरि, यादव, शिलाहार इत्यादि अनेक प्राचीन भारतीय राजवंशांचे शेकडो कोरीव लेख उत्कृष्टपणे संपादून त्याने प्रसिद्ध केले आहेत. सेवानिवृत्त झाल्यावर डॉ. बुल्हरच्या साहाय्याने त्याने 'आर्य–भारतीय संशोधनाच्या विश्वकोशा'ची योजना आखून तीत अनेक विद्वानांचे ग्रंथ प्रकाशित केले आहेत. संस्कृत, प्राचीन भारतीय इतिहास, भारतीय ज्योतिर्विज्ञान या विषयांत तो प्रमाण मानला जात असे. अशा थोर

संशोधकाच्या 'ताजमहाल हे प्राचीन राजमंदिर होते' या पोकळ संशोधनाची वारंवार टिमकी वाजविणाऱ्या आणि साध्या संस्कृत श्लोकाचा खरा अर्थ समजू न शकणाऱ्या श्री. ओकांनी अधिक्षेप करावा, हे मोठे धाष्टर्च आहे. ते सूर्यावर थुंकण्यासारखे आहे.

कीलहॉर्नने पूर्वोक्त शिलालेखातील दोन श्लोकांचा केलेला अर्थ आम्ही स्वीकारला म्हणून श्री. ओक आम्हांस 'पाश्चात्त्य विद्वानांचे दासानुदास' मानतात. कीलहॉर्नविषयी आमच्या मनात नितान्त आदर आहे. त्याने केलेले सर्वच अर्थ किंवा त्याने प्रतिपादिलेली सर्वच मते आम्ही स्वीकारली नाहीत. आमचेही बरेचसे संशोधन भारतीय इतिहास या विषयात असल्याने कांही ठिकाणी त्याने केलेले अर्थ व प्रतिपादिलेली मते अभ्यासाअन्ती आम्ही स्वीकारली नाहीत, हे आमच्या पुस्तकांतील विवेचनावरून आढळून येईल. पण असे असले तरी कीलहॉर्नला संस्कृत समजत नव्हते, असे कोणी म्हटल्यास त्याची गणना मूर्खांत करावी लागेल.

वरील विवेचनावरून प्राचीन भारतीय इतिहासाचे संशोधन करणे किती कठिण काम आहे हे श्री. ओकांच्या ध्यानात येईल अशी आशा आहे. हे 'येरा गबाळांचे काम' नाही. येथे निव्वळ तर्कट करून भागणार नाही. 'नाविष्णुः पृथिवीपतिः।' असे म्हणतात, म्हणून विष्णु म्हणजे राजा, आणि 'वैष्णवः प्रासादः' म्हणजे राजाचा राजवाडा, अशी व्युत्पत्ति लावून त्यांनी स्वतःस हास्यास्पद करून घेऊ नये.[१०] 'कुचेष्टे-शिवाय प्रतिष्ठा वाढत नाही' या तत्त्वाचा आश्रय घेऊन प्रतिपक्ष्यांची (विशेषतः यावज्जीव निरपेक्षपणे भारतीय संस्कृतादि वाङ्मय, प्राचीन इतिहास आणि संस्कृति यांचे संशोधन केलेल्या विदेशी संशोधकांची) निंदा करण्याची सवय त्यांनी टाकून द्यावी. संशोधन म्हणजे सत्याच्या

---

१०. इतके करूनही त्या शिलालेखात उल्लेखिलेले मंदिर 'राजाचा राजवाडा' (वैष्णवः प्रासादः) होत नाही. कारण ते एका मंत्र्याने बांधले होते असे मागे सांगितले आहे. येथे 'भक्षितेऽपि लशुने न शान्तो व्याधिः।' (निषिद्ध अशी लसूण खाल्ली, पण क्षयरोग कांही हटला नाही) या संस्कृत म्हणीची आठवण येते.

आविष्कारार्थ केलेला प्रयत्न असे जाणून आपल्या मताच्या सिद्ध्यर्थ हातचलाखी करण्याची आपली पद्धत सोडून द्यावी.[११] स्वतःच्या विधानांतील चुका इतरांनी दाखविल्यास त्या प्रांजळपणाने कबूल कराव्या, असे त्यांस स्नेहभावाने सुचवितो.

श्री. ओक हे आपल्या पुस्तकात व लेखांत असे विधान ठासून करतात की शहाजहानने ताजमहाल बांधलाच नाही (धर्मभास्कर, वर्ष ४, अंक १२, पृ. ११). हे त्यांचे विधान कसे असत्य आहे हे डॉ. आर्. नाथ यांनी मुंबईच्या इलस्ट्रेटेड वीक्लीच्या ८ जून १९७५ च्या अंकात (पृ. ३२–३५) सप्रमाण दाखवून दिले आहे. त्यांनी शहाजहानाच्या पाच फर्मानांचा उल्लेख करून त्यांतील तीन फर्मानांची छायाचित्रेही दिली आहेत. त्यांवरून ताजमहालाकरिता शहाजहानने जयपूरच्या मिर्झा राजा जयसिंगामार्फत सन १६३२ पासून पाच वर्षेपर्यंत मकरानहून संगमरवरी शिला आणविल्या होत्या व कुशल कारागीरही बोलाविले होते असे स्पष्ट दिसते. तेव्हा या बाबतीतही श्री. ओकांचे विधान पूर्णपणे असत्य ठरले आहे. जिज्ञासूंनी हा लेख अवश्य वाचावा.

अलीकडे भारतीय समाजात भ्रष्टाचाराचा धुमाकूळ माजला आहे. त्याने संशोधनाच्या क्षेत्रातही पाय पसरण्यास आरंभ केला आहे. म्हणून, कोणी भास, समुद्रगुप्त यांच्या नावांवर आपली काव्यनाटके खपविण्याचा प्रयत्न करतात, तर कोणी आपण प्राचीन विख्यात राजवंशात उत्पन्न झालो हे प्रतिपादण्याकरिता आपल्या हस्तकाकडून बनावट संस्कृत

---

११. 'ताजमहाल हे शिवमंदिर होते' हे दाखविण्याकरिता श्री. ओकांनी केलेली दुसरी हातचलाखी 'ताजमहालवर त्रिशूळ आहे' हे विधान. ताजमहालावरील चिन्ह त्रिशूळ नसून मुसलमानांच्या अनेक इमारतींवर दिसणारा चंद्र आहे हे आम्ही सात वर्षांपूर्वी त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. तरी ते विधान करण्याचे ते सोडीत नाहीत. चंद्र आणि त्रिशूल यांच्या आकृतींतील भेद त्यांना समजत नाही असे कसे म्हणावे ?

ऐतिहासिक काव्य रचवून त्यात आपली वंशावळ घुसडवून देतात. 'ताजमहाल हे प्राचीन भारतीय राजमंदिर आहे' हे तथाकथित बटेश्वर शिलालेखावरून सिद्ध करण्याचा श्री. ओक यांचा खटाटोप तसाच आहे. असे प्रयत्न दीर्घकाळ टिकत नाहीत. शेवटी 'सत्यमेव जयते, नानृतम् ।' (सत्याचाच जय होतो, खोटयाचा नाही) हे त्यांनी सदैव ध्यानात बाळगावे.

परिशिष्ट

डॉ. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख

१. इंग्रजी ग्रंथ

1. *Bhavabhūti: His Date, Life and Works*
   (published by M/S. Motilal Banarsidass, Delhi)
2. *Literary and Historical Studies in Indology*
   (published by the same Publishers)

हिन्दी ग्रंथ

१. **प्राच्यविद्यानिबन्धावलि : खण्ड ४**
   (प्रकाशक : मध्य प्रदेश हिन्दी ग्रन्थ अकादमी, भोपाल)

इंग्रजी लेख*

255. Dvisandhāna or Rāghava-Pāṇḍavīya Kāvya of Dhanañjaya (*Literary and Hisiorical Studies in Indology*, pp. 24 f.)
256. The Nāmamālā of Dhanañjaya (*Ibid.*, pp. 47 f.)
257. The Riddle of the Māṭvaṇ Plates (*Viśveśvarānanda Indological Journal*)
258. New Light on the History of the Śilāhāras of North Koṅkaṇ (*Literary and Historical Studies in Indology*, pp. 145 f.)

---

* For a list of 254 articies, see Appendex in Saṁśodhana-muktāvali, Part VI.

259. The Identity of the Sātavāhana King Śivaśrī Puḷumāvi (*Journal of the Numismatic Society of India*), Vol. XXXI., pp. 151 f
260. Wāṭegaon Hoard of Sātavāhan Coins (*J. N. S. I.*, Vol. XXXIV., pp. 205 f.)
261. Two Kshatrapa Coins from Vidarbha (*J. N. S. I.*, Vol. XXX, pp. 92 f.)
262. Dahigaon Hoard of Kshatrapa and Traikūṭaka Coins (*J. N. S. I.*, Vol. XXXV, p. 118 f.)
263. Numismatic Notes (*J. N. S. I.*, Vol XXXII, pp. 65 f.)
264. Location of Rāvaṇa's Laṅkā (*J. O. I.*, Vol. XXIV, pp. 35 f.)
265. Who built the Temple of Mahālakshmī at Kolhāpur and When ? (*L. H. S. I.*, pp 233 f.)
266. The Date of the Mārkaṇḍī Temples (*Ibid.*, pp. 239 f.)
267. The Ayyaṇavaṁśacharitakavya (*Journal of Indian History*, Vol. LII, pp 317 f)
268. The Coins of the Śilāhāras (*J. N. S. I.* Vol. XXXVI.)
269. The Patronage to Jainism by the Śilāhāras of Kolhāpur (to be published in the *Mahāvīra Volume*)
270. A Note on the Umā-Maheśvara Image Inscription at Śkandar (to be published in the *Journal of the Oriental Inslitute)*
271. The Malhārā Plates of Ādityarāja
272. Are the Grants of Mahārāja Bhuluṇḍa dated in the Gupta era ? (*Journal of the Epigraphical Society of India*, Vol. II, pp. 42 f.)

मराठी ग्रंथ

१. **कालिदास** (तृतीयावृत्ति)
(प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई)

२. **शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख**
(प्रकाशक : विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर)

लेख*

§ १४३. धनंजय कवीचे द्विसन्धान अथवा राघवपाण्डवीय काव्य (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७२, पृ. १ इ.)

§ १४४. धनंजय कवीची नाममाला

§ १४५. 'श्रीवाडेश्वरोदय काव्य' आणि चित्पावन या उपजातिनामाची व्युत्पत्ति (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७४, पृ. ८९ इ.)

§ १४६. मल्हारा येथील आदित्यराजाचा ताम्रपट (वि. सं. मं. वार्षिक, १९७५, पृ. १ इ.)

§ १४७. महाराज भुलुंड याच्या ताम्रपटातील वर्षे गुप्त संवताची आहेत काय ?

§ १४८. त्रैकूटकांच्या माटवण ताम्रपटासंबंधी काही विचार, (भारतीय इतिहास आणि संस्कृति, पु. ३८, पृ. ५ इ.)

§ १४९. खिद्रापूर–प्राचीन महाराष्ट्रातील विख्यात समरभूमि (धर्म-भास्कर, १९७५ चा दिवाळी अंक)

§ १५०. वाटेगाव येथील सातवाहन नाण्यांचा संचय (भा. इ. सं., पु. ३७, पृ. १० इ.)

§ १५१. भर्तृदामन् याचे विदर्भातील तांब्याचे नाणे

§ १५२. दहीगाव येथील क्षत्रप आणि त्रैकूटक नाण्यांचा संचय

§ १५३. पवनार येथील विष्णुकुंडींचे विशिष्ट नाणे

---

* या पूर्वीच्या १४२ लेखाच्या यादीकरिता सं. मु. सर ६ पाहा.

§ १५४. शिलाहारांच्या कोरीव लेखातील नाणी

§ १५५. रावणाच्या लंकेचे स्थान (नवभारत, वाई, वर्ष १४, अंक ९, पृ. २९–४२)

§ १५६. कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे देवालय कोणी व केव्हा बांधले ? (पूर्वोक्त, वर्ष २७, अंक ५, पृ. ६५ इ.)

§ १५७. मार्कंडी येथील देवळांचा काळ (वि. सं. मं. वार्षिक, १९७३, पृ. ५३ इ.)

§ १५८. अय्यणवंशचरित–एक बनावट ऐतिहासिक संस्कृत काव्य (भा. इ. सं., पु. ४०, पृ. ७८ इ.)

§ १५९. अय्यणवंशचरितातील घासलेट तेलाचा काल्पनिक इतिहास (पूर्वोक्त, पु. ४३, पृ. ३–१०)

§ १६०. कालिदासस्मारकातील चित्रांचा भारतीय संस्कृतिदृष्ट्या विचार (वि. सं. मं. वार्षिक, १९७४, पृ.)

§ १६१. श्री. पु. ना. ओकांचा संशोधनातील दुराग्रह (धर्मभास्कर, अहल्यादेवी अंक, १९७५)

§ १६२. बटेश्वर शिलालेख आणि श्री. पु. ना. ओकांची सत्यनिष्ठा (पूर्वोक्त, सप्टेंबर १९७५, पृ. ११–२०)

---

§ या चिन्हाने अंकित लेख प्रस्तुत सरात अंतर्भूत केले आहेत.

सूची

ख

ल

व

डॉ. मिराशींच्या ग्रंथांवरील काही अभिप्राय

१. संशोधनमुक्तावलि : सर ६

प्रस्तुत सहाव्या सरातील १८ लेखांपैकी एक 'पहिला मराठी लेख कोणता?' हा सोडल्यास बाकीचे सतरा लेख संस्कृत वाङ्मयाशी व प्राचीन भारतीय इतिहासाशी संबद्ध असून, त्यांतील काही स्थल-निर्णयात्मक व कालनिर्णयात्मक आहेत, तर इतर लेखांतून प्राचीन भारतीय इतिहासातील कांही समस्यांचा ऊहापोह व उलगडा केला आहे; त्यांतील कांही लेख डॉ. मिराशींच्या संशोधनपद्धतीच्या व लेखनशैलीच्या वैशिष्टयांचे उत्तम नमुने आहेत. डॉ. मिराशींच्या संशोधन-लेखनपद्धतीची कांही मौलिक वैशिष्टये त्यांच्या लेखांत हटकून आढळून येतात. पहिल्यांदा ते आपल्या वर्ण्य विषयाची 'नामूलं लिख्यते किंचित्' या न्यायानुसार, मूळाबरहुकूम वचने उद्धृत करून, मुद्देसूद माहिती देतात. ती दिल्यावर त्या विषयासंबंधी इतर कोणी संशोधकांनी कांही निर्णायक मत व्यक्त केले असल्यास ते त्यांच्या युक्तिवादासहित सादर करतात. नंतर त्या युक्तिवादाचा परामर्श घेऊन, आपले भिन्न मत सप्रमाण रीतीने निःसंदिग्धपणे मांडतात. आपल्या मताला उपोद्‌बलक अशी प्रमाणे त्यांनी मांडलेली वाचीत असताना आपणांस त्यांच्या संस्कृत वाङमयाच्या विस्तृत व्यासंगाची व शिलालेख, ताम्रपट, नाणी यांच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष पटते. किंबहुना, शिलालेख, ताम्रपट इत्यादि साधनांनी त्यांनी सादर केलेला पुरावा इतका सबळ व भक्कम ठरतो की, त्यामुळे

त्यांचा संशोधकीय निर्णय निःसंदिग्धपणे वाचकाला मान्यच करावा लागतो.

*   *   *

इतिहास कथन करावयाचा म्हणजे त्यात कोणतेही कच्चे दुवे उपयोगी नाहीत. इतिहासातील, व्यक्ति, स्थळ, घटना, काल यांचे दुवे भरभक्कम पक्के असल्यासच इतिहासाला प्रामाण्य साधते. डॉ. मिराशींच्या ज्या बुद्धीच्या मुशीतून हे लिखाण बाहेर पडले आहे, ती बुद्धि सत्यान्वेषी असून पक्क्या दुव्यांनी गुंफलेला इतिहास कथन करण्यावर ती केंद्रित झाली आहे. लेखकाच्या याच संशोधकीय, सत्यान्वेषी बौद्धिक सूत्राने लेखांना एकसूत्रीपणा प्राप्त झाला आहे.

वि. म. बेडेकर
(नवभारत, वाई)

२. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख

(१)

कोल्हापूर, ठाणे व खारेपाटण येथील शिलाहारवंशीय राजांच्या ताम्रपटांच्या व शिलासनांच्या आधारे त्या काळचा राजकीय व सामाजिक इतिहास या ग्रंथात वर्णिलेला आहे. पहिल्या भागात, जीवनाच्या सर्व शाखांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे विस्तृत व साधार विवेचन आहे. दुसऱ्या भागात मूळ लेख छापले असून त्यांचे वाचन दिलेले आहे. वरील विवेचनास उपकारक ठरणारी अन्य साधने म्हणजे तत्कालीन नाणी, मूर्ति इत्यादि. त्यांचीही वर्णने, छायाचित्रे ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. आतापर्यंत

म. म. मिराशी यांनी वाकाटक आणि कलचुरि या दोन्ही घराण्यांचा असाच इतिहास प्रसिद्ध केलेला आहे. त्याच उच्च परंपरेत प्रस्तुत ग्रंथही बसतो.

(भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, पुणे)

(२)

आधार विवेचनाचा हा ग्रंथ अत्यंत परिश्रमाने लिहिलेला आहे. त्यातील माहिती केवळ चर्चात्मक नाही तर ती ज्ञान आणि मनोरंजन यांची सुंदर सांगड घालणारी आहे. लेखकाच्या चर्चेत व एकंदर निष्कर्षात प्रचारकी अभिनिवेश नाही. किंबहुना, त्यांतील अनाग्रही व समतोल विवेचनामुळे ग्रंथाची एकूण वैचारिक बैठक उदात्त व उच्च पातळीची झाली आहे. हा ग्रंथ म्हणजे शिलाहार राजवंशाचा ज्ञानकोशच म्हटला पाहिजे !

डॉ. **र. वि. हेरवाडकर**
(महाराष्ट्र टाइम्स, मुंबई).

---

* **संशोधनमुक्तावलि : सर ६**
  विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर १९७२
  पृष्ठे २४४ : मूल्य रु. ८–००

* **शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख**
  विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर १९७४
  पृष्ठे ५५० : प्रतिमापत्रे ३१ : मूल्य रु. ३५–००

डॉ. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ

इंग्रजी

१. *Inscriptions of the Kalachuri-Chedi Era* (Corpus Inscriptionum Indicarum Vol. IV)
२. *Inscriptions of the Vākāṭakas* (C. I. I., Vol. V)
३. *Inscriptions of the Śilāhāras* (C. I. I, Vol. VI) (in press)
४–७. *Studies in Indology*, Vols. I to IV.
८. *Literary and Historical Studies in Indology.*
९. *Kālidāsa: His Date, Life and Works.* (in collaboration)
१०. *Bhavabhūti, His Date, Life and Works.*

मराठी

११. कालिदास
१२–१८. संशोधनमुक्तावलि : सर १ ते ७
१९. भवभूति
२०. कलचुरि नृपति आणि त्यांचा काल
२१. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल
२२. शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख
२३. मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक

उडिया


२४. कालिदास (प्र. उत्कल विद्यापीठ)

हिंदी


२५. कालिदास
२६. भवभूति
२७. मेघदूत में रामगिरि अर्थात् रामटेक
२८. कलचुरि नरेश और उनका काल
२९. वाकाटक राजवंश का इतिहास तथा अभिलेख
३०. प्राच्यविद्यानिबन्धावलि खण्ड ४ (प्रमध्य प्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी)

कन्नड


३१. कालिदास (संकलिपत) (मैसूर विद्यापीठ)
३२. भवभूति (संकलिपत) (मैसूर विद्यापीठ)




प्रतिमा क्र. १ – पहिला पत्रा




प्रतिमा क्र. २ – दुसरा पत्रा : पहिली बाजू




प्रतिमा क्र. ३ – दुसरा पत्रा : दुसरी बाजू




प्रतिमा क्र. ४ – तिसरा पत्रा : पहिली बाजू



प्रतिमा क्र. ५ – तिसरा पत्रा : दुसरी बाजू




प्रतिमा क्र. ६ – चौथा पत्रा : पहिली बाजू



प्रतिमा क्र. ७ – चौथा पत्रा : दुसरी बाजू

आदित्यराजाचा मल्हारा ताम्रपट



प्रतिमा क्र. ८ – पाचवा पत्रा




प्रतिमा क्रमांक ९ – कुमारसंभव-शिव-पार्वती विवाह



प्रतिमा क्रमांक १० – मेघदूत-यक्षाची आपल्या अलकेतील पत्नीच्या व्यापारांविषयी कल्पना




प्रतिमा क्रमांक ११-शाकुंतल-दुष्यंत कण्वाश्रमातील शकुंतलेला व तिच्या सख्यांना वृक्षा आडून पाहतो.



प्रतिमा १२ – सातवाहनाची वाटेगाव नाणी

क्र. १ ते ५ – शिवश्री पुळुमावीची नाणी

क्र. ६ ते १० – स्कन्द सातकर्णीची नाणी




प्रतिमा १३ – मार्कंडी येथील शिलालेख



प्रतिमा १४ – चालुक्यांची बनावट नाणी



प्रतिमा १५ – चालुक्यांचे एक खरे नाणे



प्रतिमा १६ – पवनार येथील विष्णुकुंडींचे विशिष्ट नाणे